# कवनरत्नहार.

संपादक

**दिनकर सीताराम सांखळकर.**

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—
**एस्. गोविंद अँड कंपनी, बुकसेलर्स,**
सॅन्ढर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई.

# कवनरत्नहार.

संपादक

दिनकर सीताराम सांखळकर,
'धर्म' व 'काव्यमंजरी' या पुस्तकांचे कर्ते.

आवृत्ति पहिली.

[ सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन. ]

सन १९२५.

किंमत एक रुपया.

मुद्रक—रा. चिंतामण सखाराम देवळे, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स्
ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, मुंबई.

प्रकाशक—रा. रा. शंकर विष्णु कावतकर,
कानजी खेतसी भाटिया चाळ, कांदेवाडी, मुंबई नंबर ४.

# प्रस्तावना.

हा कवनरत्नहार मुख्यतः दुय्यम शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां रचला आहे. याचे तीन सर असून, प्रत्येक सरांत विविध प्रकारचीं जुनीं व नवीं कवनरत्नें ग्रथित केलीं आहेत; व निरनिराळ्या कवींच्या कवनरत्नांचें पाणी तुलनात्मक दृष्टीनें अजमावण्याची संवय विद्यार्थ्यांस लागावी या हेतूनें, सदृश अशीं कवनरत्नें होतां होई तों जवळजवळ गुंफण्याचा प्रयत्न केला आहे.

धांवणें, हांसणें, सांवरणें, हांक, ओंवी, त्वरें, कृपें, माझीं, पुढारां वगैरे अनेक शब्द सानुनासिक किंवा निरनुनासिक लिहिण्याची पद्धति मराठींत रूढ झाल्यामुळें, असल्या शब्दांचीं दोन्ही प्रकारचीं रूपें या पुस्तकांत आढळून येतील. याच कारणामुळें कींवि, जेंवि इत्यादि अव्ययें केविं जेविं अशीं, व करूनियां, देऊनियां इत्यादि धातुसाधितें करूनिया, देऊनिया अशींहि राखिलीं गेलीं आहेत.

ज्या आधुनिक कवींचीं कवनें या पुस्तकांत घेतलीं आहेत त्यांचे आम्ही फार ऋणी आहों. एक दोन कवींची परवानगी आम्हांस मिळवितां आली नाहीं. तरी ते कवी थोर मनानें क्षमा करतील असा भरंवसा आहे.

पुस्तकाच्या शेवटीं स्पष्टीकरण व टीपा दिल्या असून कोठेंकोठें अल्पशी टीकाहि दिली आहे. ती विद्यार्थ्यांस उपयुक्त होईल अशी आशा आहे. स्पष्टीकरण व टीपा देण्याच्या कामीं पद्यरत्नसमुच्चय व काव्यामोद वगैरे पुस्तकांचा आम्हांस चांगला उपयोग झाला. म्हणून त्या पुस्तकांच्या कर्त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. तसेंच प्रुफें तपासणें वगैरे कामीं आमचे स्नेही श्रीयुत नरसिंह विठ्ठल बागाव यांनीं आम्हांस मोठ्या प्रेमानें पुष्कळ साह्य केलें आहे. पण त्यांचे आभार शब्दांनीं कोठवर मानावे? शेवटीं हें पुस्तक सुबक छापून दिल्याबद्दल मुंबई वैभव छापखान्याच्या चालकांचेहि आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

शक्य तितकी काळजी घेतली असतांहि, थोडीं अशुद्धें नजरचुकीनें राहून गेलीं व कांहीं छापतांना मात्रा, वेलांटी, अनुस्वार वगैरे मोडल्यामुळें झालीं. यामुळें शुद्धिपत्र देणें भाग पडलें. तरी त्याकडे **अगोदर** लक्ष्य पुरवावें अशी विनंति आहे.

कानजी खेतसी भाटिया चाळ,
कांदेवाडी; मुंबई नं. ४.
ता. १५ मार्च १९२५.

**दिनकर सीताराम सांखळकर.**

# अनुक्रमणिका.


| कवि व कवन | पृष्ठांक. |
| --- | --- |
| **ज्ञानेश्वरः** | |
| १ संताचीं लक्षणें ... | ३२ |
| २ दया ... | ४५ |
| ३ कोणाचेंहि उणें पाहूं नये | १०१ |
| **नामदेवः** | |
| १ भक्ताचा रुसवा ... | १३ |
| **एकनाथः** | |
| १ नारायणाची शांति ... | ७८ |
| **तुकारामः** | |
| १ गृहस्थाश्रमकर्तव्य ... | १७ |
| २ अभंगमणिमाला ... | २६ |
| ३ दुर्जननिन्दा ... | ३१ |
| ४ अंतःशुद्धि आणि बहिःशुद्धि | ३२ |
| ५ देवाचा धांवा ... | ५९ |
| ६ स्वहितसाधन ... | ७४ |
| ७ भक्ताचें पारमार्थिक मरण | १३२ |
| ८ दांभिकनिंदा ... | १६६ |
| **रामदासः** | |
| १ करुणाष्टक ... | १ |
| २ उत्तमपुरुषलक्षण ... | ६७ |
| ३ दैवी संपत्तीचीं लक्षणें ... | १०२ |
| ४ भीषण महारण्य ... | १०७ |
| ५ लक्ष्मण-इंद्रजित्-युद्ध ... | ११८ |
| ६ सद्गुरुस्तवन ... | १३० |
| ७ संतस्तवन ... | १६८ |
| **मुक्तेश्वरः** | |
| १ दमयंतीचा विलाप ... | १५ |
| २ इंद्रप्रस्थवर्णन ... | २९ |
| ३ नळराज्यवर्णन ... | ४५ |
| ४ दुष्यन्त-शकुंतला-भेट ... | ७२ |
| ५ ईशस्तवन ... | ८४ |
| ६ भीषणरात्रिवर्णन ... | ८५ |
| ७ प्रभातकाल ... | ८५ |
| ८ वर्षाकाल ... | ८८ |
| ९ हरिश्चंद्रगुणवर्णन ... | ९६ |
| १० दुर्योधनाचें भीमाच्या गदेशीं लग्न ... | ९७ |
| ११ हिमालय .. | १०६ |
| १२ जरासंधवध ... | १२७ |
| १३ संस्कृत आणि मराठी ... | १४३ |
| १४ रामकृष्णांचें हस्तिनापुरीं आगमन ... | १४६ |
| **वामनपंडितः** | |
| १ वेणुसुधा ... | ६ |
| २ तेजस्विप्रशंसा ... | १४ |
| ३ रामप्रत्यागमन ... | ४१ |

| कवि व कवन | पृष्टांक. |
|---|---|
| ४ नीतिमुक्तामाला ... | ६६ |
| ५ सत्संगमहिमा ... | ८० |
| ६ कालियामर्दन ... | ८९ |
| ७ हरिनामसुधा ... | १४४ |
| ८ वैराग्यमणिमाला ... | १६२ |
| **श्रीधरः** | |
| १ सीताशुद्धि. ... | ९ |
| **मोरोपंतः** | |
| १ रुक्मिणीविवाहकथा ... | ७ |
| २ श्रीकृष्ण-सुदाम-भेट ... | २२ |
| ३ ईशस्तवन ... | ३६ |
| ४ रामराज्यवर्णन ... | ४४ |
| ५ कच आणि देवयानी ... | ५३ |
| ६ अभिमन्यूचा पराक्रम व वध | ६० |
| ७ अभिमन्यूविषयीं अर्जुनाचा विलाप ... | ६४ |
| ८ सत्संगमहिमा ... | ८० |
| ९ साधूचीं लक्षणें ... | ८२ |
| १० देवापाशीं मागणें ... | ८२ |
| ११ पुण्यश्लोक नल ! ... | ९३ |
| १२ द्रौपदीगुणवर्णन ... | ९७ |
| १३ सेतुबंधावर उत्प्रेक्षा ... | १०४ |
| १४ रामविलाप ... | ११६ |
| १५ रामविलाप ... | ११६ |
| १६ भीमदुर्योधनांचें गदायुद्ध | १२१ |
| १७ कृष्ण-दुर्योधन-संवाद ... | १२४ |
| १८ संशयरत्नमाला ... | १३९ |
| १९ राजपुत्रास उपदेश ... | १४१ |

| कवि व कवन | पृष्ठांक. |
|---|---|
| २० संस्कृत आणि मराठी ... | १४३ |
| २१ नाममाहात्म्य ... | १४५ |
| २२ महाराष्ट्रकविस्तवन ... | १४७ |
| २३ श्रीकृष्णाची मिथिलापुरीस भेट ... | १५१ |
| २४ ईशप्रार्थना ... | १६८ |
| **रघुनाथपंडितः** | |
| १ ऋतुपाख्य उद्यान ... | २७ |
| २ रामदासवर्णन ... | ६५ |
| ३ नळराजगुणवर्णन .. | ९० |
| ४ दमयंतविर्णन ... | ९२ |
| ५ दमयंतीनें केलेलें नळाचें स्वागत ... | १५७ |
| **विठ्ठलः** | |
| १ शिवधनुर्भंग ... | १८ |
| **परशुरामतात्या गोडबोलेः** | |
| १ वर्षावर्णन ... | ८६ |
| **कृष्णशास्त्री चिपळूणकरः** | |
| १ विरहिविलाप ... | ११२ |
| २ अन्योक्तिकलाप ... | १५३ |
| **गणेशशास्त्री लेलेः** | |
| १ अजविलाप ... | ११४ |
| **कृष्णशास्त्री राजवाडेः** | |
| १ वर्षा ऋतु ... | ४ |
| **कान्होबा रणछोडदास कीर्तिकरः** | |
| १ स्त्री आणि पुरुष ... | १५९ |
| **विष्णु मोरेश्वर महाजनीः** | |
| १ सैनिकाचें स्वप्न ... | १५६ |

| कवि व कवन. | पृष्ठांक. |
|---|---|
| **पांडुरंग व्यंकटेश चिंतामणि पेटकरः** | |
| १ हिमालयाच्या मस्तकावरील भयाण प्रदेश ... | १०६ |
| **गणेश जनार्दन आगाशेः** | |
| १ पुण्याची सद्यःस्थिति ... | ३० |
| **कृष्णाजी नारायण आठल्येः** | |
| १ वृक्षोपदेश ... | ५१ |
| **गोविंद वासुदेव कानिटकरः** | |
| १ परमेश्वरापाशीं मागणें ... | ३३ |
| **वासुदेव वामनशास्त्री खरेः** | |
| १ मृत्यु ... | १६४ |
| **नारायण वामन टिळकः** | |
| १ कवि आणि फूल ... | ४६ |
| २ माझी भार्या ... | ९८ |
| **कृष्णाजी केशव दामलेः** | |
| १ रांगोळी घालतांना पाहून | ११ |
| २ शरदृतु ... | ३९ |
| ३ कचाप्रत देवयानी ... | ५५ |
| ४ आम्ही कोण ? ... | ११७ |
| ५ भृंग ... | १३६ |
| ६ नैर्ऋत्येकडला वारा ... | १४८ |
| **काशिनाथ हरि मोडकः** | |
| १ मूर्तिकार ... | १०८ |
| २ प्रेम ... | १५८ |
| **चंद्रशेखर शिवराम गोऱ्हेः** | |
| १ घनागमनोत्कंठा ... | १३७ |
| **विनायक जनार्दन करंदीकरः** | |
| १ कृष्णा कुमारी ... | ६८ |

| कवि व कवन. | पृष्ठांक. |
|---|---|
| २ प्रीती निमाली तर ... | ११२ |
| **लक्ष्मण रामचंद्र पांगारकरः** | |
| धर्मगुरूचा आदर्श ... | १०२ |
| **बाळकृष्ण अनंत भिडे** | |
| १ गर्व व काळ ... | १३ |
| **दत्तात्रय कोंडो घांटेः** | |
| १ कोकिलकूजित ... | ४० |
| **श्रीपाद नारायण मुजुमदारः** | |
| १ राजा विश्वासरायाच्या भार्येचें गुणवर्णन ... | ९८ |
| **कृष्णाजी पांडुरंग लिमयेः** | |
| १ इंद्रधनुष्य ... | ३ |
| २ सायंकाळ ... | ३७ |
| ३ दाता व देव ... | १०९ |
| **दत्तात्रेय अनंत आपटेः** | |
| १ माझें फूल कुस्करलें ... | २० |
| २ पतंगाचे बोल ... | १६० |
| **राम गणेश गडकरीः** | |
| १ अरुण ... | २ |
| २ विरामचिह्नें ... | ७५ |
| ३ पुनर्जात प्रेमास ... | ११० |
| ४ नदीस पूर आलेला पाहून ... | १३३ |
| **त्रंबक बापूजी ठोमरेः** | |
| १ अरुण ... | २ |
| २ निर्झरास ... | ७६ |
| ३ फुलराणी ... | १३४ |
| **माकंदः** | |
| १ चंद्रावरील कलंक ... | १०५ |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ७ | २३ | शाल्व मगध | शाल्व-मगध. |
| ८ | १ | गरळ विलेपन | गरळ-विलेपन. |
| ९ | ७ | मूत | मूर्त. |
| १२ | १७ | तत्त्व | तत्त्वें. |
| २३ | २१ | छंद | छंदें. |
| २८ | २२ | ज | जें. |
| २८ | २३ | त | तें. |
| २८ | २४ | विसांववीत | विसांववीतें. |
| ३४ | २५ | तारिल | तारिलें. |
| ४१ | ४ | विहग | विहंग. |
| ४१ | ५ | ढाळाव | ढाळावें |
| ४१ | ६ | विनय | विनयें |
| ४३ | २ | नत्य | नृत्य. |
| ४६ | १४ | कविगानाच | कविगानाचें |
| ६० | १४ | कोठ | कोठें. |
| ६२ | १ | णे | म्हणे. |
| ६३ | ८ | त | तें |
| ८२ | १३ | काय | कार्य |
| १०९ | ३ | करू | करूं. |
| ११० | ७ | काल वश | काल-वश |
| १२५ | १३ | गत ब्राह्मण | गत-ब्राह्मण |
| १४७ | ९ | सद्विया | सद्विद्या. |
| १४९ | १३ | किता | किती. |
| १६३ | २२ | वर्षोत्पल | वर्षोपल |
| १९२ | २८ | अंक ४; ] | अंक४; |

श्रीगणेशाय नमः ।

# कवनरत्नहार.

## सर १ ला.

### १ ईशस्तवन.

#### करुणाष्टक.

श्लोक—भुजंगप्रयात.

समाधान साधू-जनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ॥
घडीनें घडी शीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥१॥
घरें सुंदरें सौख्य नाना परींचें । परी कोण जाणेल तें अंतरींचें ॥
मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥२॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहीं केल्या घडेना ॥
नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ३ ॥
अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत, कोण्हासि सांगों ॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ४ ॥
कृपाळूपणें भेट रे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ॥
जनामाजि लौकीक हाही न सूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥५॥
अहा रे विधी त्वां असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें ॥
बहूतांमधें चूकतां तूक तूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ६ ॥
समर्था मनीं सांडि माझी नसावी । सदा सर्वदा भक्तचिंता असावी ॥
घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥७॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी । न होतां तुझी भेटि, काया पडावी ॥
दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ आटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥८॥

—रामदास.

## २ अरुण.

[ चंद्रकांत राजाची० ...ही चाल. ]

अहा ! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला ।
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला ॥ १ ॥
विश्व-सूत्र-धर सारुनियां करिं पडदा रजनीचा ।
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा ! ॥ २ ॥
करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा ।
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा ! ॥ ३ ॥
पूर्व-दिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी ।
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी ! ॥ ४ ॥
प्रातःकाळीं गगन-पुष्प कीं सूर्याचें फुललें ।
सुगंध-मकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले ! ॥ ५ ॥
कल्प-लतांवर फुलें बहरतां सडा परागाचा ।
काय तरंगे स्वर्गंगा-जालिं तांबुस रंगाचा ! ॥ ६ ॥
हा रजनींच्या उदरीं दिसतो गर्भचि दिवसाचा ।
कीं काळाचा बाळ नवा हा नव्याच नवसाचा ! ॥ ७ ॥
ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडके जरिपटका ।
चिरंतनाची सनद मानवां तिचा ताम्रपट का ! ॥ ८ ॥
मना ! कल्पना पुरे; प्रभूची हीच असे जाण ।
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण. ॥ ९ ॥

वाग्वैजयंती. —गोविंदाग्रज.

---

## ३ अरुण.

[ चंद्रकांत राजाची० ...ही चाल. ]

पूर्व-समुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची ।
कुणीं उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ? ॥ १ ॥

पूर्वदिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं ।
हर्ष-निर्भरा दिशा डोलती या मंगल-कालीं ॥ २ ॥
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें ।
सृष्टि-सतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ! ॥ ३ ॥
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिंवळे कांहीं ।
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं ॥ ४ ॥
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा ।
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुर-रस अपुल्या अंगा ? ॥ ५ ॥
अरुण-चितारी नभः-पटाला रंगवितो काय ।
प्रतिभा-पूरित करी जगाला कीं हा कवि-राय ? ॥ ६ ॥
कीं नव युवती उषा-सुंदरी दारीं येवोनी ।
रंग-वल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ? ॥ ७ ॥
दिवस-यामिनी परस्परांचें चुंबन घेतात ।
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत ! ॥ ८ ॥
स्वर्गीच्या अप्सराच अथवा गगन-मंडळांत ।
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ! ॥ ९ ॥
किंवा ‘ माझी चोरुनि नेली मोत्यांची माला ’ ।
म्हणुनि नभः-श्री रुसली, आली लाली गालांला ? ॥ १० ॥

बालकवींची समग्र कविता, भाग १ ला. —बालकवि.

---

## ४ इंद्रधनुष्य.

### श्लोक.

मेघोदयें नील नभस्तलाला । विभूषवी वासव-चाप-लीला ॥
करी तिचें सुंदर चित्र रूप । आश्चर्य-योगें जन चित्र-रूप ॥ १ ॥
नभस्तला माणिक पाच नील । यांचें जणूं कोंदण रम्य-शील ॥
कोणी करी शिल्प-कला-विहारी । मयासुराचा मद जो निवारी ॥ २ ॥
पयोधरीं भासुर चित्र-हार । नभः-श्रियेच्या करितो विहार ॥
अनंग-चाप-प्रतिमाच किंवा । घेई नभश्चित्रपटीं विसावा ॥ ३ ॥

परोपकारीं निज-जीवनाला । वेचावया अंबुद-राज आला ॥
तदादरा इंद्र-धनुः-स्वरूप । शोभे जणूं तोरण रम्य-रूप ॥ ४ ॥
अनेक-रत्नावलि-बद्ध-सेतू । मंदाकिनी-मंडन-मुख्य-हेतू ॥
असे, दिसे भव्य कमान त्याची । न मूर्ति ही इंद्र-शरासनाची ॥ ५ ॥
मुकुंद-वक्षः-स्थल-वास-लोला । विचित्र-वर्णा वन-पुष्प-माला ॥
पूर्वीं कशी शोभलि हें जनांला । आली धनुः-श्री जणुं सांगण्याला ॥६॥
नभः-पटा उज्ज्वल वर्ण-लेप । भरूनियां सुंदर इंद्र-चाप ॥
रेखी करांनीं सविता स्वकीय । ही मानवां साध्य न गोष्ट होय ॥ ७ ॥
रवि-प्रभेची शुचि बाह्य काया । तशीच कीं आंताहि हें पहाया ॥
प्रकाश-वर्गीकरण-क्रियेचा । प्रयोग होतो गगनांत साचा ॥ ८ ॥
' परस्पर-स्नेह-वशें स्वतांची । शोभा चढे सर्वहि संहतीची ' ॥
हें सांगण्या तत्त्व गमे जगाला । शोभे नभीं सुंदर वर्ण-माला ॥ ९ ॥
दिव्य-प्रभा-भूषित चाप-कांती । पहावया उन्मुख लोक होती ॥
अधिष्ठितां उच्च-पदा, जनांची । कोणाकडे दृष्टि वळे न साची ॥ १० ॥
धनुष्य हें निर्गुण वक्र-शील । टिके जरी केवळ अल्प काल ॥
तरी तयाला वश लोक होय । अतुल्य-सौंदर्य-रसें तदीय ॥ ११ ॥

होतां पयोद-पटलीं क्रम-पूर्व लोप ।
सांगे जनां घन-रवें जणुं इंद्र-चापः—॥
" आयुष्य अल्पचि असो परि लोकमान्य-।
होवोनि जा मिळविण्या पर-लोक धन्य " ॥ १२ ॥

—राधारमण.

---

## ५ वर्षा ऋतु.

### श्लोक.

वर्षास येइ परि ही सकलांस वर्षा—।
देऊनि जीवन, करी बहुत प्रहर्षा ॥
आईच ही स्व-शिशु-ताप-निवारणाला ।
अत्यंत तत्पर असे जन-पोषणाला ॥ १ ॥

ढगापाठीमागें ढग जमुनि हे थाट असती ।
जसे योद्धे अंगीं धरुनि कवचें कृष्ण दिसती ॥
पुढें वारा सेना-पतिच सरसावूनि हटवी- ।
तपर्तूतें मागें अणिक बहु तच्छक्ति घटवी ॥ २ ॥

सूं सूं अगोदर सुटे घनघोर वारा ।
मागोनियां सरसरा पडताति धारा ।
व्योमीं विजा लखलखा लवताति भारी ।
गर्जे बहू कडकडा घन भीति-कारी ॥ ३ ॥

धाराभिघात अचलावरि होत आहे ।
मित्रा तरी तिळहि हे ढळती न पाहे ॥
जे उच्च त्यांस व्यसनें जरि फार आलीं ।
तत्रापि ते स्थिरचि होत विपत्ति-कालीं ॥ ४ ॥

वाटा तृणें उगवतां सकळा बुजाल्या ।
संस्कार-शून्य बहु-संशयदायि झाल्या ॥
विद्या जशा परिचयाविण संशयातें- ।
देताति लुप्त बहु होउनियां जनातें ॥ ५ ॥

आकाश हें सगुण त्यास धरूनि राहे- ।
हें इंद्र-चाप गुण-शून्यहि शोभताहे ॥
ये निगुर्णास गुण-संगतिनेंच शोभा ।
हें जाणती धरिति जे गुणे-संग-लोभा ॥ ६ ॥

चंद्र प्रकाशित करी सकळां घनांतें ।
त्याचेंचि रूप घन झांकिति हे पहा तें ॥
आहे तयास फळ—अल्प दिनांत हानी ।
साहंकृती मलिन जो गुरुला न मानी ॥ ७ ॥

होतां कलाधिप तमांत विलुप्त सारा ।
खद्योत-संघ करि हा अपुल्या प्रसारा ॥
विद्वत्प्रसंग नसतां बहु सावकाश ।
स्वच्छंद मूर्ख करिती अपुला प्रकाश ॥ ८ ॥

होतां अखंड घन-गर्जित त्यांत भेक ।
टों टों ध्वनी मिळुनि हे करिती अनेक ॥
मूर्खें उगाच विबुधांपुढतीं बसावें ।
हासास पात्र न कदापि वदून व्हावें ॥ ९ ॥
पूरें समुन्नत तरू उपटून गेले ।
होऊनि वेतस वि-नम्र तसेचि ठेले ॥
अत्यंत नम्रचि सदा प्रबळास व्हावें ।
ह्या वेतसांपरि समुन्नतिला भजावें ॥ १० ॥

ऋतुवर्णन. —कृष्णशास्त्री राजवाडे.

---

## ६ वेणुसुधा.

श्रीकृष्ण वनांत **वेणु** वाजवीत असतां त्याचा **सुधा**तुल्य मधुर ध्वनि ऐकून सर्व प्राणी मोहित झाले; ही कथा ह्या प्रकरणांत वर्णिलेली आहे. म्हणून ह्यास **वेणुसुधा** हें नांव दिलें आहे.

### श्लोक.

अंग वक्र अधरीं धरि पांवा । गोप-वेष हरि तोचि जपावा ॥
वाम-बाहुवरि गालहि डावा । तो टसा स्व-हृदयांत पडावा ॥ १ ॥
वेणु-ध्वनी तो सुर-गायकांनीं । त्यांच्या विमानांतहि बायकांनीं ॥
आश्चर्य कानीं पडतांचि केलें । न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ॥ २ ॥
मोहती व्रज-पशू मृग गाई । आमुचें नवल काय अगाई ॥
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें । वेणुच्या ध्वनि-रसेंचि विचित्रें ॥ ३ ॥
मातृ-स्तनींचा रस आननांत । तों होय वेणु-ध्वनि काननांत ॥
गळे गिळेना पय वासुरांतें । आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ ४ ॥
मल्ल-वेष रचिला अभिराम । श्री-धर प्रभु सवें बळराम ॥
मोर-पत्र-मुकुटीं तरु-पत्रें । नेत्र सुंदर जसीं शत-पत्रें ॥ ५ ॥
सये असा म्यां हरि देखिला गे । तो प्रेम-रंगीं मनिं रेखिला गे ॥
पाचारितो वेणु-रवेंचि गाई । आश्चर्य तेव्हां करितों अगाई ॥ ६ ॥

गो-धनीं बहु पुढें न वजावें । ठाव एकाचि धरूनि थिजावें ॥
वाजवी म्हणुनि जो निज पांवा । कृष्ण तोचि हृदयांत जपावा ॥ ७ ॥
वनीं राजहंसीं पिकांनीं शुकांनीं । ध्वनी गोड तो आयकोनी स्व-कानीं ॥
त्वरें येउनी सेवियेलें हरीतें । महा-पापही नाम ज्याचें हरीतें ॥ ८ ॥
वदन लावुनि ते सकल क्षिती । नयन झांकुनि अन्य न लक्षिती ॥
स्थिर मनें करुनि स्थिर आसना । करिति ते खग कृष्ण-उपासना ॥९॥
जगज्जीवन श्रीहरी आणि काळा । करी तो जगीं जीवनाच्या सुकाळा ॥
असे मेघही या निमित्तें सखा हो । सुहृद्भाव ऐसा नसे आणिकां हो ।१०।
झणीं उष्ण लागे सख्या केशवातें । म्हणूनी त्वरें येउनी लेश-वातें ॥
मुकुंदावरी मेघ तो छत्र झाला । करी स्वात्म-देहार्पण श्री-अजाला॥११॥
हळुहळू घन गर्जतसे नभीं । मुरलिहूनि चढेल म्हणोन भी ॥
श्रवण-भक्ति-अतिक्रम वर्जतो । करित कीर्तनही घन गर्जतो ॥ १२ ॥
यशोदे तुझा पुत्र वंश-स्वरांनीं । सुधा ओष्ठिंची वर्षतो या स्व-रानीं ॥
तईं भोंवते मोहती देव-जाती । जयांचीं मनें उन्मनत्वास जाती ॥ १३ ॥

वेणुसुधा, प्रसंग १ ला. —वामनपंडित.

---

## ७ रुक्मिणीविवाहकथा.

रुक्मिणी ही विदर्भदेशच्या भीमकराजाची कन्या. लहानपणापासून तिचें मन कृष्णाच्या ठायीं आसक्त असल्यामुळें भीमकानें तिला कृष्णाला देण्याचें ठरविलें. पण त्याचा थोरला मुलगा रुक्मी यानें हट्टानें तिला चेदिदेशचा राजा शिशुपाल यास देऊं केलें. तेव्हां रुक्मिणीनें सुदेव नामक ब्राह्मणास कृष्णाकडे गुप्तपणें पाठवून स्वतःस घेऊन जाण्याविषयीं कृष्णास एक पत्र दिलें. पुढील हकीकत ती सांगतेः—

### आर्या.

तों आला शाल्व मगध-पति-सख, तो चैद्य, मांडलें लग्न ।
झालें पुर तद्बळ-जळ-निधींत, आधींत मन्मनहि मग्न ॥ १ ॥
तांतडि बहु दादाची, कैंचा अवकाश, लागली हळद ।
खळ-दर्प-घ्न दिसेना, जो नत-चातक-दया-सुधा-जळद ॥ २ ॥

गरळ विलेपन वाटे लाविति अंगास जी हरिद्रा ते ।
सखि ! सु-कृपण-कृत शुष्कोपचरण निवविल कसें दरिद्रातें ? ॥ ३ ॥
शतदां ध्वजाचि झाल्यें प्रासाद-शिरीं पुरेक्षण-छद्में ।
द्वारवती-पथ पाहाति नयनें, हरि-दिङ्मुखा जशीं पद्में ॥ ४ ॥
आली रात्रि सु-गात्रि द्रौपदि ! अवकाश तीच लग्नासी ।
झाली यष्टी कष्टी जें मन त्या आधि-भार-भग्नासी ॥ ५ ॥
चिंता-ज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं शत-वार प्राण जाहले गोळा ॥ ६ ॥
लावियला म्यां दुःखीं बाई ! त्या ईश्वरासही बोल ।
यत्पद-पद्म-रजाचें चिंतामणि-कोटिही नव्हे मोल ॥ ७ ॥
तोंचि समूळाधि-ज्वर-हर मात्रा आणुनी उषःकाळीं- ।
आला द्विज-धन्वंतरि, सदय पिताही तसा नसे बाळीं ॥ ८ ॥
आधीं विप्र-मुख-श्री कळवी येतांचि माधवागमन ।
मग मुनि सांगत, मज तों ऊठ म्हणे गुरु-पदास लाग, मन ॥ ९ ॥
विप्रें कथिलें मज कीं, ‘ वत्से ! लिहिलेस उत्तम श्लोक ।
ज्यांच्या अर्थ-श्रवणें आला धांवोनि उत्तम-श्लोक ’ ॥ १० ॥
कृष्णागमनानंदें हृदयांतुनि ज्यां बळेंचि घालविलें ।
चैयादि-मनें याया स्थळ त्या चिंतादिकांसि पालविलें ॥ ११ ॥
अंबेच्या नमनाला न्यावी जीचा विवाह नवरी ती ।
धरि हरि शंका दादा, देवी-यात्रा कुळीं, न नव रीती ॥ १२ ॥
मग बाई ! दादाचे मागध-शाल्वादिकांहि मेल्यांचे-।
सैनिक मज रक्षाया आले, धाकें विरोनि गेल्यांचे ॥ १३ ॥
स्व-सखी धात्री जननी विप्र-स्त्री मंडळी न; ती पेटी ।
तींत मणी मीं, नेलें शुभ-विधिनें श्री-शिवेचिये भेटी ॥ १४ ॥
पूजुनि पाय विनविली, ‘ कन्यांतें प्रसवताति ज्या माता ।
त्या लटिक्या, तूंचि खरी; तुज कृष्णाचि योग्य होय जामाता ’ ॥ १५ ॥
पत्रीं लिहिलें होतें ‘ देवी-यात्रेंत मज पदें दावा ।
दावा बहुतांसीं हा भाव कळों दुर्जनासि नेदावा’ ॥ १६ ॥

प्रभुसि पहाया पूर्वींपासुनि मन्नेत्र-पद्म बहु लोल ।
तों लग्न-समय, ते उपवासहि, लावील कोण सखि ! बोल ? ॥ १७ ॥
तों आला हरि, सुंदरि ! जोडा नाहींच त्या महा, भागा-
आपुलिया घ्याया, ते कोले वारिति कसे महाभागा ? ॥ १८ ॥
हरि रवि, मी नलिनी, स्त्री कैरविणी, वीर वायसाराती ।
आनंदाची वेळा सांगों तुज साध्वि ! काय सारा ती ? ॥ १९॥
माझा मूत मनोरथ तो रथ आला प्रियास घेऊन ।
दर्शन नयनें घेतीं, जैसें शिशिरीं दरिद्र घे ऊन ॥ २० ॥
तों आलि म्हणे मज, ' सखि ! सुमनो-माळा वरा वहायास ।
हा या समयीं विधि, मग नित्य असेचि प्रिया पहायास ॥ २१ ॥
माळा उंचवितां, प्रिय आपणहि रथावरूनियां लवला ।
लव लागेना तों घे अंकीं करुणा-समुद्र कालवला ॥ २२ ॥
हरि-नीळ-निभ-वरांकीं बसल्यें, न श्री तसी घनीं चपळे ।
गेला घेउनि हरि निज-भाग सुखें, त्यास म्हणति नीच ' पळे ' ॥ २३ ॥
हंसें मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनीं ।
हाकांनीं नभ भरलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥ २४ ॥
शाल्व-जरासंधादिक चैद्याचे जे सहाय ते रागें-।
मागें धांवत आले, तळमळती अंतरीं दिल्या डागें ॥ २५ ॥
पुष्कळ खळ बळ घेउनि हरिवरि आले नृपाळ ते कुतरे ।
उतरे एकहि न कसीं कनकासीं कोटि भांडतां धुतरे ॥ २६ ॥

कृष्णविजय अ. ८३. —मोरोपंत.

---

## ८ सीताशुद्धि.

रावणवधानंतर रामदर्शनासाठीं अत्यंत आतुर अशा सीतेला श्रीरामचंद्रांच्या सांगण्याप्रमाणें त्यांच्या सन्निध आणण्यांत आलें. सीतेच्या पावित्र्याविषयीं रामचंद्रांची पूर्ण खात्री होती व तिच्या भेटीसाठीं तेहि फार आतुर होते. पण लोकापवाद नाहींसा करण्याकरितां, ते सीतेला म्हणाले:—' परगृहवासामुळें तुझ्या पावित्र्याबद्दल मोठी शंका उत्पन्न झाली असल्यामुळें, मला तुझ्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तूं वाटेल तिकडे जा'—

## ओंव्या.

ऐसें बोलतां रघुनाथ। सीतेसी वाटला कल्पांत। कीं शब्दरूपें शस्त्र-घात। अकस्मात जेविं खोंचे ॥ १ ॥ शब्द नव्हे ते सौदामिनी। अंगा-वरी पडे तेक्षणीं। कीं शब्दशस्त्रें करूनी। तोडिलें वाटे शरीर ॥ २ ॥ परम गहिंवरें दाटोनी। बोले तेव्हां मंगळ-भगिनी। अग्नींत करपे कमळिणी। तैसें तेज उतरलें ॥ ३ ॥ 'षण्मास कष्टी होऊन। आजि दृष्टीं देखिले चरण। तों पूर्व-कर्म माझें गहन। आडवें विघ्न हें आलें ॥ ४ ॥ जैसें शुद्ध सुवर्ण। अग्नि-संगें कळे पूर्ण। तैसें आतां दिव्य घेईन। सर्वां देखतां येथेंची' ॥ ५ ॥ नयनीं वाहती अश्रु-पात। सीता वानरां आज्ञापित। म्हणे कुंड करून अद्भुत। अग्नि सत्वर चेतवा ॥ ६ ॥ तंव केलें अद्भुत कुंड। काष्ठें घातलीं उदंड। अग्नि-ज्वाळा माजल्या प्रचंड। निराळ ग्रासूं धांवती ॥ ७ ॥ जगन्माता बोले वचन। 'जरी मी शुद्ध असेन। तरी येईन परतोन। चरण पहाया स्वामीचे' ॥ ८ ॥ देव वानर सुरेश्वर। अवघे झाले चिंतातुर। म्हणती हा अनर्थ थोर। एकाएकीं मांडला ॥ ९ ॥ रण माजलें देखोनी। वीर निर्भय अंतःकरणीं। तैसी निर्भय विदेह-नंदिनी। अग्नीस नमी तेधवां ॥ १० ॥ कुंडासी करूनी प्रदक्षिणा। दृष्टी-भरी पाहिलें रघु-नंदना। कंठींचा सुमन-हार काढोनि जाणा। अग्नीवरी टाकिला ॥ ११ ॥ 'सत्य जय सत्य' म्हणोनी। त्रिवार गर्जे जगज्जननी। अग्नि-कुंडीं तये क्षणीं। उडी घाली अकस्मात ॥ १२ ॥ मंगळ-जननी-हृदय-रत्न। अग्नि-कुंडीं पडतांचि जाण। कन्या गांजली म्हणोनि। पृथ्वी कांपे थरथरां ॥ १३ ॥ जाहली एकचि आरोळी। शोकार्णवीं पडली मंडळी। सकळ सुरवर ते काळीं। प्रळय-काळ भाविती ॥ १४ ॥ दशदिशा दाटला धूर। कढों लागले सप्त समुद्र। वैकुंठ कैलास-पदें समग्र। डोलों लागलीं तेधवां ॥ १५ ॥ थरथरां कांपे अंबर। नक्षत्रें रिचवती अपार। सौमित्रि हनुमंतादि वानर। नेत्रोदकें ढाळिती ॥ १६ ॥ म्हणती अग्निमुखींहूनि पुढती। कैंची देखों सीता सती। बोलती हे कर्मगती। परम दुर्धर वाटतसे ॥ १७ ॥ एक घटिकापर्यंत। अग्निमाजी जानकी गुप्त। तों मस्तकीं

पुष्पें घवघवित । अकस्मात निघाली ॥ १८ ॥ पाहिल्या रूपाहूनि आगळें । शत-गुणीं रूप जाहलें । प्रभेनें भू-मंडळ भरिलें । आश्चर्य झालें ते वेळीं ॥ १९ ॥ जानकी देखतां साचार । जाहला एकचि जयजयकार । अठरा पद्में वानर समग्र । नमस्कार घालिती ॥ २० ॥ दिव्य पुष्पांचे संभार । सीतेवरी टाकिती सुर-वर । म्हणती सीता सती पवित्र । सर्व वंदन करिताती ॥ २१ ॥ सौमित्रि सुग्रीव बिभीषण । जानकीस घालिती लोटांगण । हनुमंत नमुनियां चरण । आनंदें पूर्ण नाचतसे ॥ २२ ॥ असो; श्रीरामाकडे सीता सती । चालली तेव्हां हंस-गती । मग उठोनियां रघु-पती । उभा ठाकला ते वेळे ॥ २३ ॥ श्री-राम-मुख विलोकून । सीता करी हास्य-वदन । धांवूनि दृढ धरिले चरण । जगद्गुरूचे ते काळीं ॥ २४ ॥ मग जानकीस उठवोनी । क्षेम देत कोदंड-पाणी । वामांकावरी घेउनी । रघु-नाथ तेव्हां बैसला ॥२५॥ नव-मेघ-रंग रघुनाथ । जानकी विद्युल्लता तळपत । तयांसि देखोन समस्त । जय-जय-कार करिताती ॥ २६ ॥

रामविजय अ. ३४. —श्रीधर.

---

## ९ रांगोळी घालतांना पाहून.

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

होतें अंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर ।
बालार्कें अपुली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर ॥
तीची जी भगिनी अशी शुभ-मुखी दारीं अहा पातली ।
रांगोळी मग त्या स्थळीं निज करें घालावया लागली ॥ १ ॥

आधीं ते लिहिले तिनें रवि-शशी, नक्षत्र-माला तदा ।
मध्यें स्वस्तिक रेखिलें, मग तिनें आलेखिलें गोष्पदां ॥
पद्में, बिल्व-दलें, फुलें, तुळसही, चक्रादिकें आयुधें–।
देवांचीं लिहिलीं; न तें वगळिलें जें चिह्न लोकीं सुधें ॥ २ ॥

होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी ।
गेला दाटुनि शान्त तो रस अहा तेणें मदभ्यंतरीं ॥
तीर्थें, देव, सती, मुनी, नर-पती, देवी तशा पावना ।
अन्तर्दृष्टिपुढूनियां सरकल्या, संतोष झाला मना ॥ ३ ॥
चित्रें मीं अवलोकिलीं रुचिर जीं काव्यें तशीं चांगलीं ।
त्यांहीं देखिल न स्मरेच इतुकी मद्वृत्ति आनंदली ॥
लीलेनें स्व-करें परंतु चतुरे ! तूं काढिल्या आकृती ।
त्या या पाहुनि रंगली अतिशयें आहे मदीया मती ॥ ४ ॥
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्ये ! मला वाटतो ।
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य मिळणें काव्यांत चित्रांत तो ॥
स्वर्भू-संग असा तयांत इतक्या अल्पावकाशीं नसे ।
कोणीं दाखविला अजून सुभगे ! जो साधिला तूं असे ॥ ५ ॥
आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल ।
तैसें स्वस्तिक सूचवी स-फलता धर्मार्थकामांतिल ॥
पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही, शोभेस हीं सारसें ।
पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे ॥ ६ ॥
तत्त्व मंगल सर्वही विहरती स्वर्गीं तुझ्या या अये ! ।
आर्ये तूं उपचारिकाच गमसी देवी तयांची स्वयें ॥
नातें स्नेह निदान ओळख जरी येथें मला आणिती ।
होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या कृती ॥ ७ ॥
चित्तीं किल्मिष ज्याचिया वसतसे ऐशा जनालागुनी ।
या चिन्हांतुनि हा निषेध निघतो आहे गमे मन्मनीं-॥
' जा मार्गें अपुल्या, न दृष्टि कर या द्वाराकडे वाकडी ।
पापेच्छूवरि हें सुदर्शन पहा आणील कीं सांकडीं ॥ ८ ॥
' आहे निर्मल काय अंतर तुझें ? मांगल्य कीं जाणसी ? ।
लोभ-क्षोभ-जयें उदात्त हृदयीं व्हावयास का इच्छिसी ? ॥
ये येथें तर, या शुभाकृति मनी घे साच अभ्यासुनी ।
आर्यें स्वागत हें निघे सरल या त्वल्लेखनापासुनी ॥ ९ ॥

साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे ।
नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा आंधळे ! ॥
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणें ।
कोठें स्वर्ग-समक्षता प्रगटते हें नेहमीं पाहणें ॥ १० ॥

केशवसुतांची कविता. —केशवसुत.

---

## १० भक्ताचा रुसवा.

### अभंग.

१

युगा ऐसें पळ तुजाविण जाय । पहातोसी काय अंत माझा ॥ १ ॥
कोमल हृदय तुझें पंढरीच्या राया । कठिण सखया कैसें केलें ॥ २ ॥
विचारिलें चित्तीं दुर्लभ हरिहरां ॥ कैसा जाऊं घरा रंकाचिया ॥ ३ ॥
अंगीकारावरी अव्हेराची मात । नोहे हें उचित देवराया ॥ ४ ॥
मागें जे जे आळी केली वासुदेवा । उदारा केशवा पुरविली ॥ ५ ॥
नुपेक्षिसी, चित्तीं ऐसा हा भरंवसा । दिसोनि निराशा झाली आतां॥६॥
वांचोनियां दुःख भोगावें रे किती । प्राणासी मूकतां तेंचि भलें ॥ ७ ॥
वर्णितां तो नामा झाला समाधिस्थ । जाहलें विदित पांडुरंगा ॥ ८ ॥

२

त्वरें धांवोनियां आलासे गोविंद । सावध सावध नामदेवा ॥ १ ॥
रुसलासे नामा देवाशीं न बोले । करें कुरवाळिलें वदन तेव्हां ॥ २ ॥
समजावोनि देवें धरिला पोटाशीं । बोल रे मजसीं नामदेवा ॥ ३ ॥
नामा म्हणे देवा उशिर कां केला । किंवा माझा आला तुला राग ॥४॥

—नामदेव.

---

## ११ गर्व व काळ.

### श्लोक—शार्दूलविक्रीडित.

बुद्धि, द्रव्य, कुल, प्रताप, पदवी, प्रौढी वृथा सर्वथा ।
येतां तो प्रतिकूळ काळ ढळवी अभ्रंकषां पर्वतां ॥

ऐश्वर्य-द्रविणोपभोग अवघे आहेत हे बुद्बुद ।
मृत्यूचा अगदीं समीप निवसे नक्तंदिनीं जासुद ॥ १ ॥
पाहे मृत्यु न रंक, राव अथवा दारिद्य वा वैभव ।
येतां काळ तया निवारिल असा कोणी नसे मानव ॥
मृत्यूची अनिवार्य चाल जगतीं, ती कोणता आडवी ।
तो दण्ड-ध्वज-चामरादि निमिषें धूळीमधें पाडवी ॥ २ ॥
कोणी धीर गभीर वीर अपणा युद्धांत नांवाजवी ।
खड्गातें परजोनि जो अरि-मुखीं दंतावळी वाजवी ॥
त्याचेंही परि चंड-दंड-युग तें निस्त्राण होतें लुलें ।
काळाचीं थरकांप-कारक यदा तीं वाजती पाउलें ॥ ३ ॥
संमानें जन आदरून तुमची गाती स्तुती संप्रती ।
सत्कृत्यास्तव भूषवून तुमच्या माळा गळां घालती ॥
ही कोमे परि माळ काळ-वश हो ! आहोंत सारे जण ।
कर्तव्यास करा, परी मिरविणें हें व्यर्थ मोठेपण ॥ ४ ॥
ज्यांची सत्कृति, शौर्य, दान, सु-मति प्रख्यात होती जनीं ।
त्यांची विस्मृति आज हाय ! पडली लोकां, स्मरा हें मनीं ॥
कालोपद्रुत विश्व सर्व; मग हीं गर्व, प्रसिद्धी, यश ।
कोठें होत निरूढ ! मूढ मनुजा ! होई न आशा-वश ॥ ५ ॥

काव्यरत्नावलि. —बा. अ. भिडे.

---

# १२ तेजस्विप्रशंसा.

## श्लोक.

आली जरी कष्ट-दशा अपार । न टाकिती धैर्य तथापि थोर ।
केला जरी पोत बळेंचि खालें । ज्वाळा तरी ते वरती उफाळे ॥ १ ॥
क्रोधें जळे माणि अचेतन सूर्य-कांत ।
ज्या लागतांच दिन-नायक-पाद-घात ॥
संभावितांत गणना पहिली जयाची ।
साहेल तो पण कशी शठता दुजाची ? ॥ २ ॥

सिंहाचा जो बाल, तोही चपेटा—।
मारी त्याला जो करी मत्त मोठा ॥
तेजस्वी जे वृत्ति ऐशीच त्यांची ।
येथें कांहीं चाड नाहीं वयाची ॥ ३ ॥

झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरी, कीं व्यापिला वार्धकें ।
आली कष्ट-दशा, घडो मरणही कीं तेज गेलें निकें ॥
ऐसाही मृग-राज जीर्ण तृण तो भक्षील कीं काय हा ।
शौर्यें भेदुनि हस्ति-मस्तक शुभ-ग्रासींच ज्याला स्पृहा ॥ ४ ॥

मलिन रुधिर-मांसावेगळें हाड दैवें—।
अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे ॥
क्षुधितहि गज-हंता जंबुकातें न मारी ।
अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी ॥ ५ ॥
आरंभितात्ति खल विघ्न-भयें न, येती—।
विघ्नें स्व-कार्य तरि मध्यम सोडितात्ती ॥
केलें जरी बहुत जर्जर विघ्न-घातें ।
प्रारब्ध उत्तम-जनीं न विसंबिजेतें ॥ ६ ॥

अ-मूल्य रत्नीं सुर ते न धाले । हालाहला देखुनियां न भ्याले ॥
सुधेविणें; यास्तव जे समर्थ । न निश्चितार्थाविण ते कृतार्थ ॥ ७ ॥
पुष्पापरी दों परिचींच साची । हे वृत्ति संभावित जे तयांची ॥
लोकांचिये एक शिरीं सजावें । वनींच कीं एक सुकोनि जावें ॥ ८ ॥

नीतिशतक. —वामनपंडित.

---

## १३ दमयंतीचा विलाप.

निषधदेशचा राजा नल ह्याचें सर्वस्व त्याच्या भावानें द्यूतांत हरण केलें व त्यास दमयंतीसह वनवासास घालवून दिलें. तेथें त्याच्या देहांत शिरलेल्या कलीनें त्या उभयतांचा अत्यंत छळ केला. शेवटीं नळ व दमयंती फक्त एका वस्त्रानें फिरत असतां, आपल्या रूपगुणसंपन्न पत्नीचें तें दुःख नलास पहावेनासें होऊन, दमयंती

झोंपली असतां दोघांनीं नेसलेलें वस्त्र छेदून, नलराजा दमयंतीस घोर अरण्यांत निद्रिस्थ एकटीच टाकून अर्धरात्रीं निघून गेला.—

## ओंव्या.

यापरी सांडुनी दमयंती । नैषध गेला अरण्य-पंथीं । स्वल्प उरली असतां रात्री । प्रबोधली पतिव्रता ॥ १ ॥ निकट न देखे भ्रतार । भीमकी करी हाहाकार । सबळ दाटला अंधकार । भंवतें कांहीं दिसेना ॥२॥ घाबरेपणीं धांवोनि चरणीं । अडखळोनी पडे धरणीं । मस्तक लागोनि पाषाणीं । रक्त वाहे भडभडां ॥३॥ हाक मारी दीर्घ-स्वरें । म्हणे, 'वल्लभा ! धांव का त्वरें । मातें सांडोनि पुढारे । पाय कैसे चामकती ? ॥ ४ ॥ तुज न देखतां प्राण । देहीं न राहे अर्ध-क्षण । येईं सत्वर धांवोन । आलिंगन मज देईं ॥ ५ ॥ माझा करूनियां घात । काय तो साधिशी पुरुषार्थ ? । मज वेगळें तुझें चित्त । काय विश्रांती पावेल ? ॥ ६ ॥ क्षुधित वनीं मी गोरटी । अर्ध वसनें होय कष्टी । पडलिया वन-संकटीं । प्राण कंठीं पातला ॥ ७ ॥ भयें झोंबूं कवणाचे कंठीं । सांग रिघों कवणा पोटीं । तुज वेगळी सर्व सृष्टी । वोस वाटे वल्लभा ॥ ८ ॥ स्नेहें धांवोनि लवलाहीं । मातें कवळीं दोहीं बाहीं । तुज वेगळा मज नाहीं । सोडविता रक्षिता ॥ ९ ॥ तुजवरी ठेवूनियां दृष्टी । मी विसरलें दुःख कोटी । तुझ्या संगीं सर्व सृष्टी । सुख-भरित मज वाटे ॥ १० ॥ धांव धांव नैषधराया ! । केशीं झाडीन तुझ्या पायां । झाडणें करूनि सांडीन काया । तुजवरुनी आवडी. ' ॥ ११ ॥ पडे, उठी, मागुती पडे । दिशा अवलोकुनी चहूंकडे । 'नळा ! नळा !' म्हणउनी रडे । आकांतली काननीं ॥ १२ ॥ 'प्राणेश्वरा ! नळनरेशा' । मुखें गाजवी ह्याचि घोषा । ऊर्ध्व अवलोकी आकाशा । रिघों पाहे पाताळीं ॥ १३ ॥ 'नमन माझें' म्हणे 'अनिला ! । माझी वार्ता जाणवीं नळा । लोटुनी आणीं मज-जवळां । श्रेय घेईं जीवाचें ॥ १४ ॥ पक्षी हो ! तुम्हां पक्ष-बळ । उडोनि शोधा माझा नळ । वार्ता सांगोन उतावीळ । शीघ्र आणा मजपाशीं ' ॥ ॥ १५ ॥ चक्रवाकाचिया युग्मा । म्हणे, ' वेदना ठाउकी तुम्हां । नळातें शोधुनियां श्रमा । माझिया हो परिहरा' ॥१६॥ मधुकरांतें बोले शब्द ।

'तुम्हां प्रिय पुष्प-गंध। नळाचा मुखाब्ज-मकरंद। सेवुनी सांगा शुद्धीतें' ॥ १७ ॥ दुःख-समुद्रामाजी मग्न। संकटीं गेला वर सांडुन। परी मुखें नुच्चारी अवगुण। निंदा कांहीं न बोले ॥१८॥ आठवुनी नळाचे कष्ट। दुःखें होतसे हृदय-स्फोट। नाठवी आपुलें संकट। वनिता-श्रेष्ठ दमयंती ॥ १९ ॥ 'हा हा महाराज! नळ नरेश!। मातें होत कां तुझे क्लेश। तुवां असावें सुख-संतोष। तुझें अरिष्ट मज लागो ॥ २० ॥ माझा पति-व्रता-धर्म। तूतें सर्वदा करू क्षेम। तुझे अवदशेचा श्रम। सर्व हो कां मजलागीं' ॥ २१ ॥ ऐसा मुखीं गाजवी ध्वनी। अश्रु-धारा गळती नयनीं। मार्ग-रहित वनोपवनीं। कोमळ पायीं चामके ॥ २२ ॥

वनपर्व, अ. ७. —मुक्तेश्वर.

---

## १४ गृहस्थाश्रमकर्तव्य.

### अभंग.

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेच करीं ॥ १ ॥
उत्तमाचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव-खाणी ॥ २ ॥
पर-उपकारी, नेणे पर-निंदा। पर-स्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥
भूत-दया गाई-पशूंचें पाळण। तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥
शांति-रूपें नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ। परम-पद-बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

२

पराविया नारी माउलीसमान। मानिलिया धन काय वेचे ॥ १ ॥
न करितां पर-निंदा पर-द्रव्य-अभिलाष। काय तुमचें यास वेचे सांगा॥२॥
बैसलिये ठायीं म्हणतां राम राम। काय होय श्रम ऐसें सांगा ॥ ३ ॥
संतांच्या वचनीं मानितां विश्वास। काय तुमचें यास वेचे सांगा ॥ ४ ॥
खरें बोलतां कोण लागती सायास। काय वेचे यास ऐसें सांगा ॥ ५ ॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं। आणीक ते आटी न लगे कांहीं ॥६॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. १०९

३

न करीं दंभाचा सायास । शांती राहे बहुवस ॥
जिह्वे सेवीं सुगंध-रस । न करीं आळस राम-नामीं ॥ १ ॥
जन-मित्र होईं सकळांचा । अ-शुभ न बोलावी वाचा ॥
संग न धरावा दुर्जनाचा । करीं संतांचा सायास ॥ २ ॥
करिसी देवाविण आस । अवघी होईल निरास ॥
तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ॥ ३ ॥
धरूनि विश्वास धरीं धीर । करिता देव हाचि निर्धार ॥
तयाचा वाहे योग-क्षेम-भार । नाहीं अंतर तुका म्हणे ॥ ४ ॥
गाथा. —तुकाराम.

---

## १५ शिवधनुर्भंग.

सीतेचा बाप जनकराजा याचे घरीं शिवाचें धनुष्य होतें. तें सामान्य मनुष्यास उचलतां येण्यासारखें नव्हतें. सीतेनें लहानपणींच त्याचा खेळावयास घोडा केला होता. म्हणून ‘ स्वयंवरीं हाचि पण । जो धनुष्यासी वाहिल गुण । त्यासीच द्यावी हे आपण । ’ असें जनकानें ठरविलें होतें. विश्वामित्रास रामचंद्राचें अलौकिक सामर्थ्य माहित होतें. म्हणून तो त्यास सीतेच्या स्वयंवरास घेऊन गेला. तेथें तें धनुष्य उचलतांना रावणासारख्या बलाढ्य राक्षसाची झालेली दुर्दशा पाहून, कोणीहि वीर तें उचलण्यास पुढें येईना. तेव्हां ‘ निर्वीरमुर्वीतलम् ’ असें जनकानें म्हटलें. तें रामचंद्रास सहन न होऊन विश्वामित्राच्या आज्ञेनें तो वर उठला—

श्लोक.

घातली सदृढ कास राघवें । वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें ॥
ठेविला वरद हस्त मूर्धनीं । ‘ पाव तूं विजय चाप मर्दुनी ’ ॥ १ ॥
जनक-जा मिरवे उपरीवरी । सह-चरी वसनांचळ सावरी ॥
सखि म्हणे, ‘ रघु-वीर उभा असे । धनुष भंगिल, संशय हा नसे ’॥ २ ॥
ती भूमीसि म्हणे, ‘ उमानिं धनुषा रामासि साह्या करीं ।
शेषा ! लोटिं शरासनासि; तपना ! ओढीं सहस्रां करीं ॥
शंभू ! कार्मुक आवरीं दश-भुजीं; पृष्ठीसि कूर्मा ! धरीं ।
चापा दिग्गज हो ! धरा; विधि तुवां होईं हळू तें करीं ॥ ३ ॥

तीर्थे, व्रतें, जप, पुरश्चरणादि दानें ।
उद्यापनादि हवनें, द्विज-भुक्त-मानें ॥
साह्या करो सुकृत पूर्विल आजि मातें ।
भंगो शरासन खरें रघु-वीर-हातें ' ॥ ४ ॥
नाना तिणें नवसिले सुर भूमि-साक्षी ।
भंगावया धनुष ऊदित सर्व-साक्षी ॥
श्री-मूर्ति ते उभि असे भुपतींत देखा ।
त्याच्या स्वरूपिं दुसरा करि कोण लेखा ? ॥ ५ ॥
केयूरांगद, कुंडलें, मणगटीं जांबूनदें कंकणें ।
वांकी तोडर गर्जती घन-रवें, पादांबुजीं भूषणें ॥
सीता-चित्त-मयूर नृत्य करितो श्री-राम सर्वांपुढें ।
धीरोदार उभा, प्रताप-महिमा नेणेति शास्त्रें मुढें ! ॥ ६ ॥
राजे-मानव-देव-दानव-सभे नृत्यांगना नाचती ।
वाद्यांचे घन-घोष होति, अवघे रामाकडे पाहती ॥
नाना तें चतुरंग सैन्य परिघीं पाहों उभें ठाकलें ।
विप्रांचे जय-शद्ब होति अवघे चित्रोपमा थोकले ॥ ७ ॥
उल्हासें चमकोनि जाय धनुषापाशीं उभा राहिला ।
सांगातें अवघे पुरोहित, पुढें श्री-राम तो एकला ॥
कोदंडासि सभे समोर उजवें घालोनियां वंदिलें ।
दोर्दंडें उचलोनियां चढविलें कर्णांत तें ओढिलें ॥ ८ ॥
रामानें सहवर्तमान मुनिच्या कोदंड उच्चालिलें ।
राजे आणि विदेह-संशय-धियां संयुक्त आस्फाळिलें ॥
सीता-चित्त-समेत ओढुनि, भृगू-पुत्रादि साहंकृती-।
त्यांचा दुर्मद गर्व भंगुनि धनुर्भृत्त्यक्त-सर्वाकृती ॥ ९ ॥
घोषें चाप कडाडिलें रघुपती कोदंड ओढी बळें ।
तेव्हां कोटि कडाडिले घन विजा कोदंड-कोलाहलें ॥
सीमा सांडिति सिंधु, मस्तक तुकी शंभु स्वयें आपुलें ।
ते सर्वे भुप राम-शक्ति नयनीं देखोनि वेडावले ! ॥ १० ॥

सीतास्वयंवर, सर्ग ५ वा. —विठ्ठल.

# १६ माझें फूल कुस्करलें!

एके दिवशीं सूर्यास्तसमयीं एक प्रेमळ माता आपल्या बालकांस आकाशाची रमणीय शोभा दाखवीत होती—

**साक्या.**

ज्येष्ठ कन्यका तिची तदा त्या आनंदाच्या काळीं ।
स्फुंदत स्फुंदत डोळे चोळित जडपदिं हळु हळु आली ॥ १ ॥
वीची उठुनी तांडव करितां सागर उसळे जैसा ।
फुटुनि उमाळे तिचा प्रस्फुरे अंतःसिंधू तैसा ॥ २ ॥
हात गळाले, अधरहि कांपे, मुखाब्ज झालें म्लान ।
तनू विगलिता कदलीपरि, ती गळली स्कंधीं मान ॥ ३ ॥
हिम-काळीं ती तुहिन-पीडिता दिसते नलिनी जैशी ।
दुःख-क्लिन्ना मधु-गात्रा ती दिसे बालिका तैशी ॥ ४ ॥
पाहुनि तिजला रडतां ऐशी कळवळुनी ती माय ।
हृदयीं धरुनी, प्रेमें कवळुनि पुसे जाहलें काय ? ॥ ५ ॥
' कोण बोललें, कुणीं मारिलें, कोणीं केलें काय ? ।
सांग सांग गे ! नको रडूं तूं पदर चिंब हा होय ! ' ॥ ६ ॥
रडत रडत ती वदे बालिका, ' दैत्यानें त्या माझें ।
कुस्करुनी गे ! कसें टाकिलें फूल पहा हें ताजें ॥ ७ ॥
वेणीमध्यें घालायाला खुडुनी हें हौसेनें ।
तुझ्याकडे मी येतचि होत्यें घेउनि आनंदानें ॥ ८ ॥
अवचित येउनि तों दादानें घेउनि तें हिसकोनी ।
करुनि पांकळ्या वरी मारिलें मलाच रागावोनी ' ॥ ९ ॥
वदे तेधवां माय तिला ती, ' इतुक्यासाठिंच कां गे ।
इतुकें व्हावें तुला रडाया ? नवलचि वाटे मज गे ! ' ॥ १० ॥
मृदुल मनोहर अभिनव सुंदर एक पुष्प घेवोनी ।
खिन्न-वदन ये बंधु तिचा तैं धांवत तिजमागोनी ॥ ११ ॥
हृदय कालवे शल्य सले जणुं, थर थर कांपे ओंठ ।
जीभ ळवे परि शब्द न उमटे होय सगद्गद कंठ ! ॥ १२ ॥

तसाचि कष्टें वदला, ' घे हें फूल आपुलें ताई ! ।
शब्द-बाण परि तुवां मारिला खोल शिरे तो हृदयीं ! ' ॥ १३ ॥
बोलुनि ऐसें बाल तेधवां दूर उभा तो राहे ।
एकसारखा तिच्याकडे परि दुःख-क्षोभें पाहे ॥ १४ ॥
हसली, रिझली प्रथम-दर्शनीं फूल पहातां चित्तीं ।
परि बंधूची मुद्रा बघतां होई ओशाळी ती ॥ १५ ॥
जवळ घेउनी बालेला त्या पुसे तेधवां माता ।
' मिळलें ना तव फूल तुला हें कष्टी कां गे आतां ? ॥ १६ ॥
तूंही कां रे ! खिन्न असा हा तंटा झाला गेला ।
दिलेंस ना तूं फूल तिचें तिज, आतां कां रागेला ? ' ॥ १७ ॥
वदे बाल तो, ' फूल मोडिलें म्हणुनी मी अन्यायी ।
परि ही वदली निष्ठुर जें मज विसरूं कसें तें आई ! ' ॥ १८ ॥
वात्सल्यें तैं उभय मुलांना जवळ घेउनी माय ।
वदे मुलीला, ' तुझाचि मज गे ! दिसतो बहु अन्याय ॥ १९ ॥
देवें दिधली सुंदर वाणी थोर कृपा ही त्याची ।
तिनें न ऐशीं दुखवावीं गे ! हृदयें कधिं दुसऱ्यांचीं ॥ २० ॥
जा बाळांनो शांत मनानें क्षणभर खेळा आतां ।
गोड गोड मग खाऊ देइन येणें सदनीं होतां ' ॥ २१ ॥
हाय ! हाय ! किति दुसरीं सु-मनें याहुनि नामी नामी ।
नकळत कैशीं चुरुन टाकितों अविचारानें आम्ही ! ॥ २२ ॥
दुःश्वासांनीं, दुःशब्दांनीं, दुष्कृतिंनीं बहुसाळ ।
मनः-सुमें किति मनुजांचीं हो ! चुरडूं सांज-सकाळ ! ॥ २३ ॥
मदांध निर्घृण मनास अमुच्या कशी कल्पना त्याची ।
व्हावी ? हा ! हा ! मतंगजाला काय दया कमलांची ! ॥ २४ ॥
गेलें सुम तें मिळेल दुसरें, मनः-सुमन जें गेलें ।
पुन्हा न येई जवळ कदाही; गेलें ! अक्षय गेलें ! ॥ २५ ॥

हृदयतरंग, पुस्तक १ लें. —अनंततनय.

# १७ श्रीकृष्ण-सुदाम-भेट.

## आर्या.

१

तेव्हां होता अमळा कमळा-शयनीं मुकुंद तीसहित ।
महित-प्रताप जो हरि, मोह रिपू नित्य त्यास, तीस हित ॥१॥
सदनांगणांत दूरुनि पाहुनि सन्मित्र बंधुला सहसा ।
सह-सात्त्विक-भाव प्रभु धांवे, तो होय मूर्त सन्महसा ॥ २ ॥
राहे हर्षीं न मना नमनाचें भान बंधु पाहूनि ।
बाहूनि प्रेमानें मानें आलिंगिलाचि बाहूंनीं ॥ ३ ॥
दोघांचेहि भरि तें आलिंगन हृत्प्रमोद-कारि गळे ।
प्रेमें दोघांच्याही नेत्रांतूनि प्रभूत वारि गळे ॥ ४ ॥
बैसविला तो बंधु त्रिजगत्तातें मग स्व-पर्यंकीं ।
आधींच भक्तवत्सल स्व-कृपा-सत्काम-कल्पवल्ल्यंकीं ॥ ५ ॥
तोषे तो तीर्थांचा गुरु सेवक-पाप-यवस-दव धूतां—।
बंधु-पदांतें, दुर्लभ यच्छ्रीपद-धूलि-लव सदवधूतां ॥ ६ ॥
यत्पद-रजः—पवित्रा देवधुनी जगदशुद्धितें वारी ।
धरि माथां तो पावन जन-संग्रह-निष्ट-बुद्धि तें वारी ॥ ७ ॥
सुर आपणास पूजिति तैसें पूजी सुदाम-देवातें ।
ढाळुनि सु-व्यजनाला त्या सुख शैब्या निकाम दे वातें ॥ ८ ॥
' स्व-पति-सख द्विज ' ऐसें जाणति नातें पुराण न वधू तें ।
विस्मित होउनि म्हणती, ' या केलें पुण्य काय अवधूतें ? ॥ ९ ॥
त्यजुनि श्रीस पलंगीं, धावुनि आलिंगिला अधम भिक्षु ।
छि ! क्षुज्जीर्ण मलिन वरि, परि हरि करि लोभ, हा गमे इक्षु ॥ १० ॥
प्रेमें आलिंगावे जैसे धावूनि रामभावोजी ।
तो जीव-प्राण-प्रिय-भाव प्रभु याहि भिक्षुकीं योजी ॥ ११ ॥
ऐसा केवळ दीन, श्री न स्वल्पहि, दिसे कुरूप महा ।
पूजियला सद्गतिनें पतिनें, तरि कोण कीं गुरूपम हा ? ' ॥ १२ ॥

त्या सच्चूडा-रत्नीं पत्नी हरिच्या सु-विस्मिता होती ।
तों तीर्थ-पद श्रवण-प्रवण-श्रवणांत वाक्सुधा ओती ॥ १३ ॥

* * *

‘ स्मरतें कीं तें श्री-गुरु-दारांहींच इंधनानयना-।
पाठविलें विपिनाला ? माझ्या दिसतें तपोधना ! नयना ॥ १४ ॥
तें रज, ती वृष्टि तसी, त्या करका, तें तमिस्र, तो पवन ।
लोप वन-स्थळ-मार्ग-ज्ञानाचा, काय तैं सकोप वन ? ॥ १५ ॥
हिंडों धरुनि परस्पर कर, खर-कर तिळहि न करि अनुकंपा ।
शंपा दे भय; तमही, न मही पथ, पावल्या स्व-तनु कंपा ॥ १६ ॥
भार शिरीं, अंधसम भ्रमतचि होतों तमांत, मग सूर—।
दूर ध्वांत कराया ये, चित्तांतील तमाहि गुरु-शूर ॥ १७ ॥
पाहे आम्हां आर्तच्छात्रांतें करुनि बहु वनीं शोध ।
तो धर्मज्ञ दयार्णव गुरु वर दे, ज्यांत आत्म-हित-बोध ॥ १८ ॥
आलिंगुनि आम्हांतें, माथां हुंगूनि, तो वदे साधू ।
माधुर्य तें म्हणे, ‘ रे उपमेच्छो ! अमृत-कर-मळा जा धू ’ ॥ १९ ॥
श्रीगुरु म्हणे, ‘ अहो ! हे पुत्रक हो ! अस्मदर्थ या गहनीं ।
दहनीं मृग-शावकसे श्रमलां दुःसह-महा-विपत्-सहनीं ॥ २० ॥
प्राण्यास प्रिय परम स्व-वपु, तुम्हीं तेंहि मानिलें तुच्छ ।
सुच्छत्र काष्ठ-भारहि सुर-सुमनांचेचि भाविले गुच्छ ॥ २१ ॥
धर्माद्यखिल-पुमर्थ-प्राप्तीचें मुख्य मूळ हें देह ।
स्नेह त्यागुनि गुरुच्या पद-पद्मीं अर्पिलें असंदेह ॥ २२ ॥
मी सु-प्रसन्न झालों द्विज-वर हो ! जीं दिलीं तुम्हां छंद ।
तीं अ-प्रणष्ट सारें इह-पर-लोकीं स्फुरोत हृच्छंदें ॥ २३ ॥
कर्मीं वसा, नसो पर-मर्मीं लोचन, असा दया-धर्मीं ।
नर्मींहि मृषोक्ति न यो, शर्मीं नांदा, शिरा क्षमा-वर्मीं ॥ २४ ॥
मजहूनि त्रि-जगांत प्रख्यात यशें असाल, कविराजे— ।
गातिल, कां मत्करुणा-श्रीचें लोकीं न बालक विराजे ? ॥ २५ ॥
मीं बहु न प्रकट जगीं, व्हाल तुम्हीं सर्व-वंद्य, न ख्यात-।
तात क्षीर-धि, परि हर-चूडारूढ प्रसिद्ध तज्जात ’ ॥ २६ ॥

ऐसा श्रीमद्गुरुनें केला आम्हांवरि प्रसाद, बुधा ! ।
तन्मधुरता न जननी-स्तन्यास, न काम-धेनुच्याहि दुधा ॥ २७ ॥
गुरु-गृह-निवास-वृत्तें तुजाहि सकळ विदित असति अनुरक्ता ! ।
वक्ता किति वर्णिल बा ! परि वरिते शुद्ध शांति गुरु-भक्ता ॥ २८ ॥

२

झाल्या प्रथम कथा, मग चित्त-ज्ञ प्रभु म्हणे, ‘ धरा-देवा ! ।
दे, वाट पाहिली बहु, काय मला आणिला असे मेवा ॥ १ ॥
भक्तीं स्वल्पहि दिधलें तें प्रेमें होय मज सख्या कोटी ।
मोटी प्रीति तयाची, गोष्टी तुजसी वदों नये खोटी ॥ २ ॥
ऐसें वदे परि द्विज पृथुक-प्रसृति प्रभूसि अर्पीना ।
सर्पी नाहिं बहु म्हणुनि भक्ति प्राघुण-शिखीस तर्पीना ॥ ३ ॥
बोल कसा लावावा ? लक्ष्मी-पतिच्या करीं कसे तो हे ।
पोहे देइल ? लज्जा-भक्ति-विसंवाद म्हणुनिही मोहे ॥ ४ ॥
लज्जा-भर-नम्र-शिरा प्रभुपासीं होय तो कवि-प्रवर ।
नव-रम्य-नीरजानन चिंति, न पाहे सशंक विप्र वर ॥ ५ ॥
चित्तीं देव म्हणे ‘ हा पूर्वीं मोक्षेच्छु मत्सखा भजला—।
मजला न श्री-कामें, साध्वीचें प्रिय करावया सजला ॥ ६ ॥
मीं विश्व-सुहृत् सत्यचि, परि हाचि सखा भला मला साजे ।
लाजे याच्या प्रेमा रामाहि, तद्भवा जसे राजे ’ ॥ ७ ॥
आणुनि चित्तीं ऐसें शोधि श्रीकर कर-द्वयें चिंध्या ।
त्या सत्त्व-श्री-भूषा प्राकृत निंदोत, न स्वयें निंद्या ॥ ८ ॥
तों जीर्ण-मलिन-वस्त्रीं सांपडली श्रीकरासि गांठोडी ।
जोडि द्रव्याची जसि चुकली कृपणास, हे तुला थोडी ॥ ९ ॥
‘ हें काय सख्या ! ’ ऐसें बोले, डोले, हळूच मग सोडी ।
‘ गोडी याची मज बहु, भेटि उदारा ! तुला गमे थोडी ॥ १० ॥
निर्मळ पुष्कळ केवळ अमृत-रसाचे नवे रवे, पोहे— ।
नोहेत स्वल्प सख्या ! मज विश्वात्म्याहि फार साधो ! हे ॥ ११ ॥
झालों मी तृप्त सख्या ! हे पोहे पाहतांचि, कां आणा ।
प्राणांच्या लाटिक्या बा ! वाहेन तुम्हां बरें मनीं आणा ’ ॥ १२ ॥

श्रीवदनीं लौकरि भरि हरि हरि ! हरि ! सतुष-पृथुक-कण-मुष्टी ।
तुष्टि प्रेमें; भाजि व्रज-पशुपांचीहि सेविली उष्टी ॥ १३ ॥
मुष्टि भरी दुसरी जों भक्षाया देव भक्त-वर्याप्त ।
श्री कर धरी, म्हणे, 'हा राहो पहिलाचि मुष्टि पर्याप्त ' ॥ १४ ॥

३

ब्राह्मण त्या रात्रींत प्रभुनें मणि-कनक-मंडिता पाटीं ।
बैसविला सन्मानें, जेवविला कांचनाचिया ताटीं ॥ १ ॥
स्व-करें साक्षाल्लक्ष्मी या भावोजीस आग्रहें वाढी ।
काढी प्रभु गुरु-गोष्टी, मुख-कर्ण-युगाहि तृप्ति दे गाढी ॥ २ ॥
दे स्व-करें करुनि विडा निबिडानंद प्रभु प्रभूत-नया ।
तनयापरिस स्व-जनीं भजनीं लालस, न रीति नूतन या ॥ ३ ॥
मागति मुनि पाद-रजा सादर ज्या प्रभुसि, तो स-दार गडी–।
निजवुनि निज-शयनावरि, शय नावरि, बंधुच्या पदा रगडी ॥ ४ ॥

४

प्रातः-कालिंच हरि प्रिय-सख-विप्रोत्तमांघ्रिला लागे ।
'बा ! गेहा जरि जातां, तरि मज विसरों नको ' असें मागे ॥ १ ॥
'अन्योन्य-प्रेम खरें, याच्या पोटांत लाभ कोटि, कवे ! ।
मज तुज विरह-लव नसे, भस्मीं मीनासि काय हो टिकवे ?॥ २ ॥
सर्वस्व तुम्ही माझें, मी तुमचें, हें नकोचि बोलाया ।
डोलाया पुनरपि द्या दर्शन मज साधु-संग-लोला या ' ॥ ३ ॥
धरुनि कर स्व-करानें गेला पावावयासि दूरवर ।
ब्रह्मण्य-देव सेवक-जन-चिंतित-काम-दान-शूर-वर ॥ ४ ॥
आलिंगुनि वंदुनियां मुरडे मागें स-खेद यदु-राय ।
पाय न वाहति, जाली वत्स-वियुक्ताचि काय ती गाय ! ॥ ५ ॥

कृष्णविजय, अ. ८०-८१. —मोरोपंत.

## १८ अभंग-मणि-माला.

१

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जगासी एकला तो ॥ १ ॥
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ति । वाढवी श्री-पति सवें दोन्ही ॥ २ ॥
फुटे तरु-वर उष्ण-काळ-मासीं । जीवन तयासी कोण घाली ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥ ४ ॥
तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ५ ॥

२

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥ १ ॥
मग तो कृपा-सिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥
भवाचिया पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

३

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । इतरांतें डोळां न देखवे ॥ १ ॥
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ॥ २ ॥
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥ ३ ॥

४

साहोनियां टाकी-घाये । पाषाण देवचि जाला पाहें ॥ १ ॥
तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ॥ २ ॥
बाण शस्त्र साहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सती । अग्न न देखे ज्या रीती ॥ ४ ॥

५

आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥
रोग्या विष-तुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रि-भुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

६

मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ॥ १ ॥
पुंडलीकें काय केलें । पर-ब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥
तैसा होईं सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥

तुका म्हणे माय-बापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥

७

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥
अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ॥ २ ॥
त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ ३ ॥
तुका म्हणे देव । त्याचे चरणीं आझा भाव ॥ ४ ॥

८

आपणा लागे काम वाण्याघरीं गूळ । त्याचें याति-कुळ काय कीजे ?॥१॥
उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठाया गुणें ? ॥ २ ॥
गाईचा जो भक्ष अ-मंगळ खाय । तिचें दुध काय सेवूं नये ? ॥ ३ ॥
तुका म्हणे काय सलपटासी काज। फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥४॥

९

ओले मातीचा भरंवसा । कां रे धरिशी मानसा ॥ १ ॥
डोळे चिरीव चांगले । वृद्धपणीं सरक्या जाले ॥ २ ॥
नाक सरळ चांगलें । येउन हनुवटी लागलें ॥ ३ ॥
तुका म्हणे आलें नाहीं । तंव हरिला भज रे कांहीं ॥ ४ ॥

१०

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा, काय फार शिकवावें ॥४॥

गाथा. —तुकाराम.

---

## १९ ऋतुपाख्य उद्यान.

### श्लोक.

उद्यान एक ऋतुपाख्य तया त्रिकूटीं ।
केलें स्वतंत्र वरुणें निज-केलिसाठीं ॥
नाना फुलीं विकसतां सकळांस भासे ।
हें या मिषेंकरुनि चैत्ररथास हासे ॥ १ ॥

चिगुरले, फुलले, फळले तसे । तरुच भूषण तें वन लेतसे ॥
सकलिकां कलिकांस विकासवी । मधु, सुवास, निवास पिकास वी ॥२॥
लतेतळीं रुंद निरुंद कालवे । गळोनि तेथें मकरंद कालवे ॥
परागही सांद्र तयांत रंगती । फुलांसवें भृंग-तती तरंगती ॥ ३ ॥

रुचिर मधुर जैसीं चांगलीं तूप-केळें ।
सु-रुचिर रुचितेसी लागलीं तूप-केळें ॥
शिवति गगन तैशा नारिकेळी, रसाळें ।
सहित फळ-कदंबें सांद्र केळी रसाळें ॥ ४ ॥

## गीति.

उपरि स-कंटक साचे, परंतु सांचे जयांत सु-रसाचे ।
घोंस तसे फणसांचे षण्मासांचे तसेच वरसाचे ॥ ५ ॥

## श्लोक.

विख्यात नामें ‘ लवली ’ लता जे । फलावलीनें लवली विराजे ॥
चंद्रोदयीं घोंस तिचे फुलांचे । होती विसांवे अलिनी-कुलांचे ॥ ६ ॥
दाडिंबें, स्वादु लिंबें, कुरबक, बदरी, वृक्ष सीता-फळांचे ।
जेथें जंबू-फळांचे समुदय पिकले, घोंसही श्रीफळांचे ॥
वेलांचे वेल वाचे न वदवति जसे, ते तसे वेळवांचे ।
शाखा वायू जयांचे विवरिं रव करी जोड जे पावयांचे ॥ ७ ॥
तया वनीं एक तटाक तोयें । तुडंबलें तामरसानपायें ॥
निरंतरामंद मरंद वाहे । तापांतही यास्तव रिक्त नोहे ॥ ८ ॥

पीतां मरंद, उदरं-भर-बंभरांचें ।
जे होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें ॥
ते पद्म तेथिल सहस्र दलां धरीतें ।
प्रत्यक्ष सूर्य-किरणांस विसांववीत ॥ ९ ॥

तया वन-सरोवरीं उमलतां सरोजें, रजें—।
मिळोनि, मिरवे दळीं सलिल मौक्तिकाकार जें ॥
तयास सम आणिकें कवण माणिकें मोकळीं ? ।
असोत जरि पोवळीं दिसति कोंवळीं कोंवळीं ॥ १० ॥

### गीति.

मधुपांचीं खिल्लारें, सरोवरामाजि कुमुद-कल्हारें ।
इंदु-विकास-विलासें, होती सकळांस मानसोल्लासें ॥ ११ ॥

### श्लोक.

अमृतही पयही म्हणवीतसे । मधु-रसा रसतें जल गा ! तसें ॥
मधुर सारस यास्तव गातसे । उभय होय तसी रुचि वीतसे ॥ १२ ॥
राजहंसा तया तोयीं राजहंस विसांवती ।
चक्रेंही चक्रवाकांचीं चक्राकार विराजती ॥ १३ ॥

गजेंद्रमोक्ष. —रघुनाथपंडित.

---

## २० इंद्रप्रस्थवर्णन.

### ओंव्या.

परिघ पौळिया गृह गोपुरें । सौधें शतखणी दामोदरें । तळघरें उपरिकाकारें । पडशाळा देहलिका ॥ १ ॥ गगनचुंबी विशाळ हुडे । वर्तुळ पर्वताचे नि पाडें । द्वारीं कनक-कपाट-जोडें । गर्जतां छळिती वैरियां ॥ २ ॥ लाज सांडोनियां क्षिती । मेघाआड अमरावती । लपाली; आणि भोगावती । पाताळ-गर्तें निघाली ॥ ३ ॥ पश्चात्ताप धरूनि चित्तीं । कुबेराची अलकावती । कैलास-वसनामाजी वस्ती । करूनि बसे वैराग्यें ॥ ४ ॥ उपवनें अवलोकितां नयनीं । लज्जा दाटली नंदन-वनीं । सेवुनी मंदाकिनीचें पाणी । तपश्चर्या आचरे ॥ ५ ॥ वापी कूप सरोवरें । अमृत-स्वादु सरिता-तीरें । अनेक रंगांचीं कल्हारें । विकाशिलीं घमघमिती ॥ ६ ॥ बकुल जातिका शत-पत्र । चंपक केतकी दमनकांकुर । पराग धुळोरा मधुकर । गुंजारवें खेळती ॥ ७ ॥ हंस कारंडक मयूर । चातक चक्रवाक चकोर । खंजरीट मधुर-स्वर । कोकिळांचे उमटती ॥ ८ ॥......................रमणीय याचे सरी । पट्टण आन असेना ॥ ९ ॥

आदिपर्व, अ. ४६. —मुक्तेश्वर.

---

# २१ पुण्याची सद्यःस्थिति.

सन १९०० च्या आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत पुण्यास प्लेगानें जो कहर करून सोडला त्या वेळचे कवीचे हे उद्गार आहेत.

श्लोक–शार्दूलविक्रीडित.

पुण्याई सरली न पुण्य-नगरी हें नांव साजे तुला ।
झाली जी तव हानि तीस भुवनीं कोठेंच नोहे तुला ॥
अत्यंत प्रिय तूं जशी नर-वरां होतीस तैशी जनां ।
सर्वस्वी हत-भागिनि ! प्रभु-वरें केली तुझी हेलना ॥ १ ॥
झंझावात सुटे अकाळिं गळती जैशीं फळें कोंवळीं ।
किंवा बाल-तरू वनीं उलथुनी कीं लोळती भू-तळीं ॥
गारांची अवकाळिं वृष्टि घडतां होई फुलांचा सडा ।
तैसा काळ मनुष्य-जीवित हरी मारूनियां हांसडा ॥ २ ॥
एकामागुन एक नित्य मरती, कोणी न कोणा रडे ।
जो तो आपुलिया मनीं म्हणतसे होणार तें तें घडे ॥
होतां अप्रिय लेशही, खळखळां जीं आंसवें लोटती ।
दुःखाचा अतिरेक आज घडतां नेत्रींच तीं आटती ! ॥ ३ ॥
मेला तो परवां ! दुजा अमुक तो गेला अहो तेरवां ।
देवाज्ञा तमक्यास काल घडली ! वार्ता अशी दुःश्रवा–॥
पत्रीं वाचुनि अंतरंग विटलें, मित्रांचिया भाषणीं ।
सौख्याचा नच शब्द, कान किटले, वृत्तांत हे ऐकुनी ॥ ४ ॥
होता हा तरणा अपात्र मरणा, तो देखणा शाहणा ।
नाहीं मोल गुणा, परंतु करुणा आली न नारायणा ।
पोरेंही पडलीं कितीक उघडीं होऊनियां बापडीं ।
भिक्षा-पात्र करीं धरून छबडीं जातील देशोधडी ॥ ५ ॥
जों उल्लंघिति शैशवा, पति-गृहीं आस्वादिती वैभवा ।
तों झाल्या विधवा, न पार दिसतो, त्यांच्या विपत्त्यर्णवा ॥
देती शाप भवा, न त्या परिसवे शोकार्त हा ! हा ! रवा ।
देवा ! हें मिटवा अरिष्ट सगळें, धांवा, जना वांचवा ॥ ६ ॥

...मराठी ग्रंथ... स्थान... ग्रंथालय...

पानें जीं पिकलीं, अपाप सुकलीं, खालीं बहू लोंबलीं ।
वार्धक्यें थकलीं तशींच पितरें जीं भूमिला वांकलीं ॥
पुत्रांकीं शिर ठेवुनी यम-गृहा जायास उत्कंठलीं ।
एंशीं काल-वशें निपुत्रिक अहा ! एक्या क्षणीं जाहलीं ! ॥ ७ ॥
पाषाणास फुटेल पाझर अशी एकेक वार्ता नवी ।
ऐकूं येइ उपाय सर्व हरले, 'आतां प्रभो ! सोडवीं' ॥
ऐसे हे करुणार्त शब्द निघती सर्वत्र चिंतानलें ।
झाले दग्ध समस्त दूर जन जे आम्हांपरी राहिले ! ॥ ८ ॥

काव्यरत्नावलि. —ग. ज. आगाशे.

---

## २२ दुर्जननिन्दा.

### अभंग.

१

कावळ्याच्या गळां मुक्ताफळ-माळा । तरि काय त्याला भूषण शोभे ॥ १ ॥
गजालागीं केला कस्तूरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ? ॥ २ ॥
बकापुढें सांगे भावार्थ-वचन । वाउगाचि शीण होय त्यासी ॥ ३ ॥
तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वांयां सीण करूं नये ॥ ४ ॥

२

सूकरासि विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥ १ ॥
तेवीं अ-भक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ २ ॥
श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरी ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्पा पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष जालें ॥ ४ ॥

३

रासभ धूतला महातीर्थांमाजी । नव्हे जैसा तेजी श्यामकर्ण ॥ १ ॥
तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥ २ ॥
सर्पासी पाजिलें शर्करा-पीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥ ३ ॥
तुका म्हणे श्वाना क्षीरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥ ४ ॥

गाथा. —तुकाराम.

---

## २३ अंतःशुद्धि आणि बहिःशुद्धि.

### अभंग.

१

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥ १ ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां केलें आपणया ॥ २ ॥
वृंदावन-फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुम्ही ॥ ४ ॥

२

आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥
अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई-दाढी ॥ २ ॥
बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ॥ ३ ॥
पाप गेल्याची खूण । नाहीं पालटले अवगुण ॥ ४ ॥
भक्ति-भावेंविण । तुका म्हणे अवघा सीण ॥ ५ ॥

गाथा. —तुकाराम.

---

## २४ संताचीं लक्षणें.

### ओंव्या.

जो सर्वां भूतांचे ठायीं । द्वेषातें नेणेचि कंहीं । आप-पर नाहीं । चैतन्या जैसा ॥ १ ॥ उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें कांहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ॥ २ ॥ कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न म्हणेचि कृपाळू । प्राणु पैं गा ॥३॥ गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि गा करूं । तोय जैसें ॥ ४ ॥ तैसी आघवियांचि भूत-मात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेसी धात्री । आपण जो ॥ ५ ॥ तेवींचि क्षमेलागीं । पृथ्वीसी पवाड आंगीं । संतोषा उत्संगीं । दिधलें घर ॥ ६ ॥ वार्षियेवीण सागर । जैसा जळें नित्य निर्भर । तैसा निरुपचार । संतोषी जो ॥ ७ ॥ तरी सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे । आणि जळ-चरीं नुबजे । समुद्र जैसा ॥ ८ ॥ किंबहुना पांडवा ।

शरीर जैसें अवेवां । तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥ ९ ॥ आंतु-बाहेरि चोखाळ । सूर्य तैसा उजाळ । आणि तत्वार्थींचा पायाळ । देखणा जो ॥ १० ॥ वोखटें कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे । राति दिवो न घटे । सूर्यासि जेवीं ॥ ११ ॥ पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं । रिपु-मित्रा दोहीं । सरिसा पाडु ॥ १२ ॥ कां घरींचिया उजेडु करावा । पारखियां अंधारु पाडावा । हें नेणेचि गा पांडवा । दीपु जैसा ॥ १३ ॥ जो खांडावया घावो घाली । कां लावणी जेणें केली । दोघां एकीचि साउली । वृक्ष दे जैसा ॥ १४ ॥ नातरी कां इक्षु-दंडु । पाळतिया गोडु । गाळितया कडु । नव्हेचि जेवीं ॥ १५ ॥ माधुर्थे चंद्रिका । सरिसी राया-रंकां । तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥ १६ ॥ आघवेया जगा एक । सेव्य जैसें उदक । तैसे जयातें तिन्ही लोक । आकांक्षिती ॥ १७ ॥ जो निंदेतें ने घे । स्तुति न श्लाघे । आकाशा न लगे । लेपु जैसा ॥ १८ ॥ जो यथा लाभाचेनि तोखे । अलाभें न पारुखे । पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ॥ १९ ॥ आघवांचि आकाश-स्थितीं । जेविं वायूसि नित्य वस्ती । तेविं जगाचि विश्रांति-। स्थान जया ॥ २० ॥ हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाला ॥ २१ ॥ ऐसा बोधचि केवळ । जो होऊनि असे निष्कळ । त्याहीवरी भजनशीळ । माझां ठायीं ॥ २२ ॥ तरि तयाऐसें दुसरें । आम्हां पढियंतें सोयरें । नाहीं गा साचोकारें । तुझी आण पांडवा ॥ २३ ॥

ज्ञानेश्वरी, अ. १२. —ज्ञानेश्वर.

---

## २५ परमेश्वरापाशीं मागणें.

श्लोक-पृथ्वी.

‘ मला शरण ये नरा ! अखिल धर्म ते त्यागुनी ।
तुझी सकल पातकांमधुनि मुक्तता होउनी ॥
मिळेल पद शाश्वत ध्रुवचि शांतिही पावशी ’ ।
त्वदुक्ति सकलां जनीं विदित पंडु-पुत्रा अशी ॥ १ ॥

न दर्प मनिंचा गळे, नच जळे तसा लोभही ।
न मत्सर मला त्यजी, धरी मना बिळा कीं अही ॥
न रोष तिळ आवरे, हलवि फार जो शांतिला ।
प्रवात तरुला जसा पृथिवि-कंप वा भूमिला ॥ २ ॥
निराश मजला तरी न करिं, मागतों मागणें ।
मनोभ्रम-विनाशनें करिं कृतार्थ माझें जिणें ॥
प्रभो! पसरुनी तुला पदर, याचितों त्वत्कृपा ।
नसे तुजसि द्यावया कठिण दान हें विश्व-पा ॥ ३ ॥
करून, न करून बा! घडति पातकें हातुनी ।
भयंकर असे किती तरि विचार येती मनीं ॥
क्षमा करुनि लेंकरा, वद 'मदीय हा लाडका'।
करील जननी जसे, जन दुजा करी लाड का? ॥ ४ ॥
तुझी करिति भक्ति जे सुख सदव ते सेविती ।
तयांवरि कृपा तुझी, भिउनि जे तुला वागती ॥
तुझ्या भजनिं लागला, कु-पथ तो न सेवी कदा ।
तुझे परम भक्त बा! करिति बोध ऐसा सदा ॥ ५ ॥
अ-भाग्य नर मी, मला पद तुझें दिसेना कसें?।
कृपेविण तुझ्या तुझें विशद-रूप कैसें दिसे? ॥
स्वरूप तव वर्णिती नयन दिव्य देशी जयां ।
कशी दिधालि अंधता मज अभाग्य दासास या? ॥ ६ ॥
तुझ्याच पद-पंकजीं सकल आस माझी वसे ।
तयीं सतत मन्मनो-भ्रमर वास इच्छीतसे ॥
प्रसाद तव हो म्हणें, करिं वितृष्ण माझ्या मना ।
तुझ्याविण करी दुजा सफल कोण ही कामना? ॥ ७ ॥
अघाचल-अजामिळ-प्रभृति ज्यां तुवां तारिलें ।
तयांहुनिहि पातकी अधिक मी असें वाटलें ॥
असें जरि न, सांग बा! मजसि हेतु देवा! खरा ।
मिळे न मज कां तरी तव कृपा-जलाचा झरा ॥ ८ ॥

अनुग्रह करीं त्वरें मजवरी जगच्चालका ।
दया करुनि, दिव्य दे त्वरित दृष्टि या बालका ॥
न सांग बुडवील कीं जल भवाब्धिचें घातकी ।
मिळे तव कृपा-तरी तरिच हा तरे पातकी ॥ ९ ॥

दया करुनि सोडवीं मजसि या विमोहांतुनी ।
वनीं फसलि गायशी त्वरित काढ गर्तेतुनी ॥
नितांत शिणलों, करीं नच विलंब तारावया ।
विमोह-कुहरीं बुडें, करिसि वेळ कां यावया ? ॥ १० ॥

भ्रमात्मक भुजंग हा विभव, फार मारी उडी ।
तुझ्याविण न मांत्रिक प्रबळ अन्य तो गारुडी ॥
अहर्निश अशांतता मज पिशाचिका पीडिते ।
अगा ! कुशल मांत्रिका ! पळविं सर्व माझीं भुतें ॥ ११ ॥

खराचि तुज पातकी जडाचि भक्त हा लाभला ।
विमोह-रिपुनें असे तुडविला सदा जो भला ॥
निवारिं मम संकटें प्रभु-वरा ! धरोनी करा ।
मनस्तिमिर-कर्दमामधुनि काढिं या लेंकरा ॥ १२ ॥

तुझ्यासम नसेचि या भ्रम-गदास धन्वंतरी ।
नसेल दुसरा असा भ्रम-गदार्त माझ्यापरी ॥
महौषधि कृपाच ती तव मिळो, करीं प्रार्थना ।
मनो-गद-विनाशना ! पुरविं सत्वरीं कामना ॥ १३ ॥

संमोहलहरी. —गो. वा. कानिटकर.

---

## सर १ ला समाप्त.

---

ॐ तत्सत् ।

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ६ नारायण
वा. नों.

# सर दुसरा.

## १ ईशस्तवन.

श्लोक—पृथ्वी.

तुझ्या बहुत शोधिले अघ-निधी पदाच्या रजें ।
न तें अनृत वर्णिती बुध जनीं सदाचार जें ॥
असें सतत ऐकतें, सतत बोलतें, मीच ते—।
प्रमाण न म्हणों जरी, उचित माझिया नीचते ॥ १ ॥

तसाचि उरलों कसा, पतित मी नसें काय? कीं—।
कृपाचि सरली, असेंहि न घडे जगन्नायकीं ॥
नसेन दिसलों कसा नयन सर्व-साक्षी रवी ।
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विष, क्षीर वी ॥ २ ॥

सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें ।
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें ॥
नता करुनि मुक्तही म्हणसि ' मी बुडालों रिणें '।
अशा तुज न जो भजे मनुज, धिक् तयाचें जिणें ॥ ३ ॥

सदैव अपराध मी रचितसें, असे कोटि गा ।
स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज, मी कोटिगा ॥
अजांड-शत-कोटि ज्या उदरिं सर्वदा नांदवा ।
न त्यांत अवकाश या, स्थळ दिलें तदा कां दवा ? ॥ ४ ॥

दयाब्द वळशील तूं, तरि न चातकां सेवकां—।
उणें किमपि; भाविकां उबगशील तूं देव कां ? ॥
अनन्य-गतिकां जनां निरखितांचि सोपद्रवा ।
तुझेंचि करुणार्णवा ! मन धरी उमोप द्रवा ॥ ५ ॥

कळी करि सु-निर्मळीं परम उग्र दावा नळीं ।
तयांत अविशुद्ध मी, शलभ जेविं दावानळीं ॥

व्रणार्त-पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे—।
स्मरादि रिपु मन्मनीं; अहि न काळ भेका कसे ? ॥ ६ ॥
धना, परि-जना, घरीं तुमचिया उणें कायसें ? ।
न लाभ मणि-हेम-भूपतिस जोडिल्या आयसें ॥
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती ।
गुणा न म्हणतां उणा अधिक, आदरें सेविती ॥ ७ ॥
अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा ! हे, विधी—।
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ? ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ८ ॥
प्रभो ! शरण आलियावरि न व्हा कधीं वांकडे ।
म्हणोनि इतुकेंचि हें स्व-हित-कृत्य जीवांकडे ॥
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें ।
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ॥ ९ ॥
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण ।
प्रभो चुकतसों तरी करिसि तूंचि संरक्षण ॥
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती ।
रुचे विषय; ज्यां मिळे अमृत, ते न मद्या पिती ॥ १० ॥

केकावलि. —मोरोपंत.

---

## २ सायंकाळ.

श्लोक–वसंततिलका.

घेऊनियां निजशिरावरि रश्मि-भार ।
उल्लंघितां पथ नभस्तलिंचा अपार ॥
आदित्य दिव्य पथिक श्रम फार पावे ।
अस्ताचलीं म्हणून संप्रति तो विसांवे ॥ १ ॥
केशावली रवि-शिरीं किरण-स्वरूपा ।
झाली गमे विरल वृद्ध-दशानुरूपा ॥

जातां लया सु-दिन कीं दिनराज याचा ।
गेला लया विपुलहीं करभार साचा ॥ २ ॥
अध्व-श्रमें दिन-करा बहु ताप झाला ।
होई न तो सहन कीं बहुधा तयाला ॥
अस्ताचलीं म्हणुनि शीतल वात सेवी ।
वस्त्रापरी किरण-मंडळ दूर ठेवी ॥ ३ ॥
जे राहिले मजसवें उदय-प्रसंगीं ।
ते सोडिती किरण कां मजला प्रसंगीं ॥
देखूनि दुष्कृति अशी बहु कोप आला ।
त्या कारणें मज गमे रवि लाल झाला ॥ ४ ॥
उत्तुंग-शैल-शिखरीं कनक-द्रवाचा ।
ओती सदा निज-करें पति पद्मिनीचा ॥
वाटे प्रदोष-समयासह संगरास ।
तो अर्पितो रुचिर केशरि वेष त्यांस ॥ ५ ॥
संपूर्ण कुंकुम-रसें भरली प्रतीची ।
भासे मना समर-भूमिचिया प्रतीची ॥
लीन-प्रभा-वलय भास्कर लब्ध-दैन्य ।
शोभे श्रमाकुल जसा भट नष्ट-सैन्य ॥ ६ ॥
लोकोपकार करण्या निज-रश्मि-मात्र ।
वेची; उरे तपन केवळ बिंब-मात्र ॥
होई विशेष नयना परितोष-दाता ।
चित्तीं भरे अधिक निर्धन पूर्ण दाता ॥ ७ ॥
जों जों करी गमन भास्कर पश्चिमेस ।
तों तों मिळे भुवनिंच्या लय चेतनेस ॥
मंदावलें विविध भू-मुख-शब्द-जाल ।
अंग-प्रभा जगतिची गळली विशाल ॥ ८ ॥
जेव्हां बुडे जलधिच्या जलिं अर्ध-काय ।
घेण्या समाश्रय जणूं दिन-काल-राय ॥

दे क्षीण आत्म-कर उन्नत शैल-भाळीं ।
उच्चांस उच्च-सहवास रुचेल काळीं ॥ ९ ॥

ज्या सागरीं सकल-भूतल-तीर्थ-गेह ।
ठेवी तदंतरिं सुखें रवि शुद्ध देह ॥
आत्माच सृष्टि-तनुचा पर-लोक सेवी ।
कां स्तब्ध शून्य मलिना मग ती न व्हावी ? ॥ १० ॥

रत्नें दुजीं वसति अंतरिं सागराचे ।
शंका अशी निपजली मनिं निर्जरांचे ॥
शोधार्थ ते म्हणुनि पाठविती दिनेश ।
तो हेरसा जणुं करी जलधि-प्रवेश ॥ ११ ॥

सायंतनें विकसवी कमळें फुलेंही ।
दीपावलि मिरविते निज तेज गेहीं ॥
झांकी स्व-पर्ण-नयनां तरु-वर्ग कांहीं ।
मित्रापदा निरखिण्या जणुं शक्त नाहीं ! ॥ १२ ॥

मार्तंड हा तिलक सुंदर कुंकुमाचा ।
गेला गळूनि, घडला क्षय मंगलाचा ॥
सायंप्रभा अनुमृता जणुं शोक-मग्ना ।
तों जन्म घे रजनि कृष्ण-मुखी कुलघ्ना ॥ १३ ॥

—राधारमण.

---

## ३ शरदृतु.

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

दीनें ज्यांविण वाटतात सु-दिनें साऱ्याहि वर्षांतलीं ।
नांवानें जरि दुर्दिनें, सुखद जीं होती पुढें चांगलीं ॥
तीं येऊन बरींच, वृष्टि करुनी त्यांहीं दिली भूवरी ।
तेणें सांप्रत पाहतां दिसतसे सृष्टी अहा साजिरी ॥ १ ॥

सस्यांचा बरवा अनर्घ्य हिरवा शालू असे नेसली ।
जाईची जुइची गळां धरितसे जी रम्य पुष्पावली ॥
ती भाळीं तिलकांकिता शशि-मुखी आतां शरत्-सुंदरी ।
माथां लेउनि केवडा विचरते घेऊनि पद्में करीं ! ॥ २ ॥
जो गोपाळ गमे प्रभात-समयीं गाई वनीं चारितां ।
वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यांस जो अर्पितां ॥
जो भासे दिवसा कृषीवल शिरीं खोंवूनियां लोंब्रें ।
तो आतां ऋतु शारदीय बहुधा शेतांतुनी संचरे ॥ ३ ॥
राजा जो धन-धान्य-दायक असे साचा कुबेरापरी ।
त्या श्री-मंडित शारदीय ऋतुची राणी दिवाळी खरी ॥
रूपैश्वर्य-गुणाढ्य ती जवळ ये; द्याया तिला स्वागता—।
सारेहीं शुभ योजनांत गढले—कांहीं नुरो न्यूनता ! ॥ ४ ॥

केशवसुतांची कविता ( दिवाळी ). —केशवसुत.

---

## ४ कोकिलकूजित.

[ चाल—चंद्रकांत राजाची० ]

प्रातःकालीं कुणी कोकिला तरु-शिखरीं बैसुनी ।
उंच स्वरानें सांगुं लागली जगतालागोनी ॥ १ ॥
वसंत-रायें आज्ञा देउनि मजला पाठविलें ।
राजदूति मी आज्ञा त्याची सांगाया आलें ॥ २ ॥
वसंत-राया येइल आतां तुम्हां भेटाया ।
राज-दर्शना सज्ज रहावें आलें सांगाया ॥ ३ ॥
अलंकार भूषणें लेवुनी तनुला सजवावें ।
सुहास्य-वदनें चतुर खगांनीं सामोरें जावें ॥ ४ ॥
बाल-तृणाचे रम्य गालिचे वनांत पसरावे ।
विविध फुलांचे सडे तरूनीं मार्गीं घालावे ॥ ५ ॥
प्रफुल्ल सुमनें हातीं घेउनि लतिकांनीं रहावें ।
मंद सुगंधित शीतल अनिलें वनीं संचरावें ॥ ६ ॥

तन्वंगी सरितांनीं प्रेमें नाचावें गावें ।
तुंग गिरींनीं वसंत-वैभव जगता दावावें ॥ ७ ॥

मिलिंद-बंदी-जनीं त्यापुढें पथिं ललकारावें ।
विहग-वैतालिकें तरुवरी स्तुति-पाठा गावें ॥ ८ ॥

ताल-तरूनें छत्र, कीचकें चामर ढाळावं ।
तरु-लतिकांनीं विनय वांकुनि राया वंदावें ॥ ९ ॥

बाल-रवीनें अरुण-गुलाला गगनीं फेंकावें ।
विकसित सुमनीं रायावरि मकरंदा उधळावें ॥ १० ॥

दिगंगनांनीं दहिंवर सिंचुनि स्नाना घालावें ।
उपवन-श्रीनें वस्त्राभरणें राया सजवावें ॥ ११ ॥

वन-देवींनीं षड्रसयुत फल-भोजन घालावें ।
सरोवरांनीं कमल-सुगंधी जल प्याया द्यावें ॥ १२ ॥

मदनोद्यानीं उंच आसनीं राया बसवावें ।
वृक्ष-वल्लरी मिळुनी मंगल-पूजन साधावें ॥ १३ ॥

वनीं येउनी कविंनीं कोकिल-कूजित ऐकावें ।
हा बघ आला वसंत कविते, त्यातें वर्णावें ॥ १४ ॥

दत्तांची कविता. —द. कों. घांटे.

---

# ५ रामप्रत्यागमन.

रावणाचा वध केल्यानंतर श्रीराम, सीता व लक्ष्मण यांसह, पुष्पकविमानांतून अयोध्येस आले. त्यावेळचा अयोध्याप्रवेश व रामराज्याभिषेक एथें वर्णिलेला आहे.

## श्लोक.

जवळि अनुज सीता राम बैसे विमानीं ।
कपि-पतिसह ज्यातें बंधुतें जेविं मानी ॥
दशमुख-अनुजा दे उत्तम-श्लोक लंका ।
पवनजसह यानीं घे तया निष्कलंका ॥ १ ॥

प्रभु करि चिर-जीवी शत्रुच्या सोदराशी ।
रवि-शशि गगनीं तों राज्य दे मोद-राशी ॥
रघु-पति परते हो ! तैं सुरां सौख्य वाटे ।
स्तविति कुसुम-वर्षें त्या विमानांत वाटे ॥ २ ॥

गो-मूत्र पक्व जव भक्षुनि वाट पाहे ।
येणें तदर्थ भरतावरि हो ! कृपा हे ॥
कीं स्थंडिलावरि निजे, क्षण कल्प कंठी ।
जो प्राण ठेवुनि असे बसला स्व-कंठीं ॥ ३ ॥

श्रवणिं भरत ऐके ' राम आला अयोध्ये ' ।
अभिमुख विभुतें ये, येति आमात्य योद्धे ॥
पुर-जन गुरु संगें, पादुका मस्तकांतीं ।
करिति रवि-शशींच्या ज्या अहो ! ध्वस्त कांती ॥ ४ ॥

वसे नंदि-ग्रामीं, परि हृदय रामीं, भरत तो ।
विना त्याचे पाय त्रि-भुवनिं न जो लाभिं रततो ॥
वसे वेदाध्यायीं, धरि इतर ठायीं न मन तो ।
करी वाद्यांगीतांसहित पद-पद्मा नमन तो ॥ ५ ॥

कनकमय पताका वृंद चित्र-ध्वजांचे ।
रथ चपळ तुरंगीं स्वर्ण-सन्नाह ज्यांचे ॥
कवच-सहित योद्धे मुख्य मुख्य प्रजांचे ।
प्रभु-अभिमुख येती, दास पादांबुजांचे ॥ ६ ॥

चिह्नें महा-विभव-राज-विलास-मुद्रा । आणी पुढें भरत त्या करुणा-समुद्रा
प्रेमें पदांवरि पडे विसरूनि देहा । आलिंगनें प्रभु, भुजा पसरोनि, दे, हा ॥७

प्रथम शिरिंहुनी त्या पादुका पाद-पद्मा—।
जवळि भरत ठेवी, ज्या पदीं नित्य पद्मा ॥
मग चरणिं पडे त्या क्षेम दे सु-स्वभावा ।
प्रभु नयन-जळीं स-प्रेम न्हाणी स्व-भावा ॥ ८ ॥

ब्राह्मणांस करि वंदन पादीं । ' हें मला प्रिय ' असें उपपादी ॥
लक्ष्मण-क्षितिसुतेसह पायीं । लोक वंदिति जयास उपायीं ॥ ९ ॥

कोसलाधिपति कोसल-लोकीं । देखिला बहु दिसां अवलोकीं ॥
नत्य वस्त्र उडवूनि करीती । पुष्प-वृष्टि वरि कौतुक-रीती ॥ १० ॥

धरी भरत पादुका, व्यजन-चामरें वीजतीं—।
बिभीषण-कपींद्र, जे निज-सुखें तयाच्या जिती ॥
मरुत्सुत धरी सुधाकर-सितातपत्रा कृती ।
प्रवेश करि राघव स्व-नगरीं पवित्राकृती ॥ ११ ॥

धरुनि स-धनु भाते दास्य शत्रुघ्न मानी ।
धरि करिं जळ-झारी राम-कांता विमानीं ॥
धरियलिं असि-चर्मं अंगदें ऋक्ष-पाळें ।
विभव नगर-लोकां दाविलें हें कृपाळें ॥ १२ ॥

रघु-पति अति शोभे पुष्पकीं व्योम-वाटे ।
द्विज-गुरुसह नेत्रा-उत्पलीं सोम वाटे ॥
नटति युवति, गाती कीर्ति बंदी विमानीं।
प्रियतम जन आत्मा आपुला जेविं मानी ॥ १३ ॥

रचित कुसुम-रत्नें श्री-अयोध्या-पुरी ते ।
जन अमृत-रसाच्या वाहती त्या पुरीं ते ॥
नृप-गृहिं गुरु-पत्न्या, माउल्या, त्यांस भावें—।
नमन करि, तयीं त्या तोषल्या बंधु-भावें ॥ १४॥

वंदिलें अवघियां वडिलां हो ! । धाकुट्यां स्व-पद-वंदन-लाहो ॥
राम-लक्ष्मण-धरातनयांहीं । घेतलें पुजुनि पूजन यांहीं ॥ १५॥

असे नंदिग्रामीं, जननिहि विनाराम नयनीं—।
न पाहे शत्रुघ्नासह भरत जी भूमि-शयनीं ॥
म्हणोनी चौघांही भिजविति तिघी एक-समयीं ।
तनु-प्राण-न्यायें नयन-जळिं माया-रसमयीं ॥ १६ ॥

मग उकलि जटांतें राम कोदंड-पाणी ।
कुळ-गुरु जयिं न्हाणी, घे चतुः-सिंधु-पाणी ॥
त्रिदश-गुरु सुरेंद्रा, ये रिती रामचंद्रा ।
द्विज वडिलहि देती मान वंशाब्धि-चंद्रा ॥ १७ ॥

सु-स्नात होउनि असा करुणांबु-राशी। अंगीकरी मग विभूषण अंबरांशी ॥
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें । घे तो पद-प्रद सुरां कमळासनातें ॥१८॥
जनां स्व-वर्णाश्रम-धर्म-वाटे—। लावी, जयां बापचि राम वाटे ॥
प्रजा गमे संतति त्या पित्याला। स्पर्शों न दे दुःख कदापि त्यांला ॥१९॥

त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला ।
देखूनि राज्य करितां रघु-वंशजाला ॥
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजांला ।
प्रेम प्रजा भजति त्या भरताग्रजाला ॥ २० ॥

वनें, नद्या, पर्वत, सर्व खंडें । द्वीपां-समुद्रां-सहितें स-खंडें ॥
हीं काम-धेनू सकळां प्रजांला । देखूनि होती भरताग्रजाला ॥ २१ ॥

बहु भिति यम-लोक श्री-वरा राम-राया ।
जन मरण न पावे, जो न बैसे मराया ।
वळखिति न जराधि-व्याधि-शोकादिकां या ॥
श्रमभय-असुखातें नेणती लोक-काया ॥ २२ ॥

रघु-पती निज एक-वधु-व्रता—। शिकवि हो ! जन-चित्त-मधुव्रता ॥
स्फुट करी गृह-धर्म समस्त कीं। धरुत लोक कथा-रस मस्तकीं ॥ २३ ॥

करि जनक-कुमारी नित्य निर्व्याज सेवा ।
तुम्हिहि जन मनीं हो ! तो महाराज सेवा ॥
स-गुण स-लज सीता भाव जाणे पतीचे ।
मन हरिति पतीचें प्रेम-संलाप तीचे ॥ २४ ॥

भागवतरामायण, अ. २. —वामनपंडित.

---

## ६ रामराज्यवर्णन.

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

राज्यातें अज तो करीत असतां जाले दरिद्री धनी ।
रोगी रोग-विहीन, बालिश रत ज्ञानाचिया साधनीं ॥
गाई त्या घट-दोहनी, बहु-रसा सस्यावृता मेदिनी ।
यूप-स्तंभ-समन्वितांहि सरयू लोक-त्रयाह्लादिनी ॥ १ ॥

दिव्य-स्वादु-फलाढ्य भू-रुह, लता संशोभती पुष्पिता ।
आत्मापत्य-मृति-प्रति क्षिति-तळीं पाहे न माता-पिता ॥
वंध्या लब्ध-बहु-प्रजा, सकलही वर्ण स्व-धर्मीं रत ।
श्री-रामाख्य-सुधेसि कर्ण-चषकें पीती सुखें संतत ॥ २ ॥
पापातें न वसावया स्थळ दिसे, कोण श्रमांला पुसे ? ।
नाहीं आश्रय, यास्तव क्षिति-तळीं चिंता स-चिंता वसे ॥
विघ्नांतें बहु विघ्न होति, रुसली भीति त्रि-लोकीं बरी ॥
साकेतीं रघु-नाथ सानुज-सुहृद् राज्यासि जेव्हां करी ॥ ३ ॥

—मोरोपंत.

---

## ७ नळराज्यवर्णन.

### ओंव्या.

धरा-मंडळीं प्रताप-तरणी । प्रसन्न-वदना प्रजा-नलिनी । धर्म-संपदा हीं दोन्हीं । चक्रवाकें एकत्र ॥ १ ॥ दारिद्र्य-दोषाची हो राती । नाहींच केली सर्व जगती । दुर्जन-तारकांची वस्ती । पाहतां कोठेंही दिसेना ॥ २ ॥ पाषंड-उलूकांचे घुंगाट । नाहीं कुतर्क-तस्कर-वाट । हंस-कोकिल साधु-श्रेष्ठ । विष्णु-स्मरणें गुंजती ॥ ३ ॥ वसुधा पाळिली बहुत काळ । कीर्तीनें भरला ब्रह्म-गोळ । पुण्य-श्लोक राजा नळ । स्मरणें अघें नासती ॥ ४ ॥

वनपर्व, अ. ६. —मुक्तेश्वर.

---

## ८ दया.

### ओंव्या.

दया ते ऐसी । पूर्ण चंद्रिका जैसी । निवविती न कडसी । सानें थोर ॥ १ ॥ तैसें दुःखिताचें शिणणें । हिरतां स-करुण-पणें । उत्तमाधम नेणे । विवंचूं गा ॥ २ ॥ पैं जगीं जीवनासारिखें । वस्तु अंगवरी

उपखे । परि जातें जीवित राखे । तृणाचेंही ॥ ३ ॥ तैसें पुढिलांचेनि तापें । कळवळालिये कृपे । सर्वस्वेंसी दिधलें आपणपें । न्यूनचि मानी ॥ ४ ॥ पैं पायीं कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ ५ ॥ कां पावो शीतळता लाहे । कीं ते डोळ्यांचि लागीं होये । तैसा परसुखें जाये । सुखावत जो ॥ ६ ॥ किंबहुना तृषितालागीं । पाणी आरायिलें असे जगीं । तैसें दुःखितांचा सेलभागीं । जिणें जयाचें ॥ ७ ॥ तो पुरुष वीर-राया । मूर्तिमंत जाण दया । मी उदैजतांचि तया । ऋणिया लाभें ॥ ८ ॥

ज्ञानेश्वरी, अ. १६. —ज्ञानेश्वर.

---

## ९ कवि आणि फूल.

एक कवि फिरतां फिरतां एका निर्जन अरण्यांत आला. तेथें त्याला एक अत्यंत सुंदर फूल दिसलें. तें पाहून तो अगदीं तल्लीन झाला व गात गात त्याकडे निघाला—

### साक्या.

गाती पक्षी कवि-गानाच प्रत्युत्तर मधु देती ।
वृक्ष-लतांची श्रेणी वाणी त्यासह गोड वदे ती ॥ १ ॥
जातां जातां झरा कवीला पाहुन कुशल विचारी ।
फार कशाला ? तृणें तयासह रमती दीन बिचारीं ॥ २ ॥
असो; पाहुनी येतां जवळी कविला सुम तें बोले ।
'या कवि-राया !' क्षणामधें तें घरचें जैसें झालें ! ॥ ३ ॥
व्याज न जेथ, नसे वक्रता, उपचारांची पीडा ।
स्वभाव ऐसा विदित जगीं जो ग्राम्य, वन्य वा वेडा ॥ ४ ॥
वन्य सुमें त्या निज स्वभावा अनुसरुनी, त्या कविचें ।
स्वागत केलें कळे न हरिलें आपण चित्त तयाचें ॥ ५ ॥
आलों आलों म्हणत कवीश्वर अत्युत्कंठित जाय ।
हात पसरुनी आत्म-संयमीं झाला क्षीणोपाय ॥ ६ ॥
परंतु सुम तें तया वाटलें दचकुन सरलें दूरी ।
मनीं खोंचला !—कीं, ऐसें तें रसिक-वरा धिक्कारी ! ॥ ७ ॥

जाता तेथुन तसाच परतुन,—अरसिक जरि तो होता ।
परि त्या रसिका कोठुन कळणें मान-खंडना आतां ? ॥ ८ ॥
उलट तयाचा प्रेमा वाढे अनल जसा अनिलानें ।
अधिक तयाला जवळ ओढिलें सुमनें धिक्कारानें ! ॥ ९ ॥
पुन्हां पुष्प तें हांसुन वदलें, ' बसा; दुरूनी बोला ।
योग्य न शिवणें,-जगदीशाला अर्पित झालें,-त्याला ! ॥ १० ॥
दो दिवसांचें जीवित माझें दिधलें मी परमेशा ।
ध्यावें त्याला आहें तोंवर, अन्य नसे मज आशा ! ॥ ११ ॥
मला समजलें रसज्ञ आपण मित्र फुलांचे लोकीं ।
यास्तव अपुलें स्वागत केलें, श्रम अपणां दिधले कीं ॥ १२ ॥
बसा घडीभर आपण दोघें परमेशाला गाऊं ।
भक्ति-रसाचें अनुपम, अद्वय, रुचिकर भोजन सेवूं ॥ १३ ॥
याहुन दुसऱ्या आतिथ्याची नको कल्पना येथें ।
मान्य करुन घ्या कृपा करोनी या दीना साधें तें ! ' ॥ १४ ॥
हांसुन बोले कवि त्या सुमना, 'पवित्र जगिं तूं साचें ।
वैराग्याचें निधान दिसशी मजला भक्ति-रसाचें ! ॥ १५ ॥
परंतु जातें वनांत तव हें यौवन मित्रा वाया ।
ज्ञाते म्हणती जन साधन हो पुरुषार्था साधाया ॥ १६ ॥
निर्जन रानीं जेथें न दिसे एक सख्या ! फुलझाड ।
उच्च शाल्मली, देवदारु, वट, पिंपळ दिसती ताड ॥ १७ ॥
तुझ्या भोंवतीं क्षुद्र वनस्पति माजुन, तुज नाहींसें—।
करावयाला झटती, गगनीं नक्षत्रा घन जैसे ॥ १८ ॥
तूं येथें हें कुणा न ठावें, नाहीं तर भ्रमरांच्या—।
झुंडी येत्या धांवत कविच्या स्वर्गांतुन रसिकांच्या ! ॥ १९ ॥
सर्व अप्सरा, किन्नर सारे धांवुन येथें येत ।
सख्या फुला ! तुजमुळें हाच रे दुसरा स्वर्ग करोते ! ॥ २० ॥
कोमलता ही, रङ्ग तुझा हा, हास्य तुझें हें नामी ।
सौरभ तव हा, पुरे ! मजसवें चल सखया आरामीं !' ॥ २१ ॥

‘ उद्यानीं मम नाश निश्चयें ! ’ म्हणे कवीला फूल ।
‘ वयें तरुण तूं परी अनुभवें दिसशी अजाण मूल ! ’ ॥ २२ ॥
वन्य पुष्प तें निस्पृह पुरतें जगास सोडुन बसलें ।
नवल कशाचें त्या मान्याला अवमानुन जरि बोले ? ॥ २३ ॥
पुन्हां म्हणे सुम, “ सारा स्वार्थी मर्त्य लोक हा आहे !
दर्शन राहो दूरच ! याचें नांव न मजला साहे ! ॥ २४ ॥
थर थर थर थर पंख कांपती उरलें नाहीं भान !
पुष्पीं रत मधुपास वाटतें पुष्पच पंच-प्राण ! ॥ २५ ॥
स्वार्थाचे हे अवघे चाळे ! अमुची वेडी जात ! ।
भ्रमराचें मज नको पहाया मुख साऱ्या जन्मांत ! ॥ २६ ॥
ज्या ज्या सुमनीं रमेल तें तें तितक्यापुरतें त्याचा ।
जीवच ! परि हें प्रेम न; सगळा लोभ नवीन रसाचा ! ॥ २७ ॥
नित्य करावें पुढें पुढें, मधु गाणें गावें, न्यावें—।
लुट्टन सु-रसा, परी शेवटीं ओळख विसरुन जावें ! ॥ २८ ॥
कोण अशांच्या पाशामध्यें पडेल सांग शहाणें ? ।
योगी म्हणती यास्तव, कीं, ‘ सुख दूर वनांत रहाणें ! ’ ॥ २९ ॥
भ्रमर एकला मात्र नीच नच, परि जग सारें नीच ! ।
निश्चय झाला मम, कीं, जगतीं निवास ही हानीच ! ॥ ३० ॥
फळें तोंवरी द्विज-रायाचें गायन चाले वृक्षीं ।
सरतां तीं परि, परके होती वृक्ष आणखी पक्षी ! ॥ ३१ ॥
कार्य साधितो तोंवर मिळती आशीर्वाद घनाला ।
थोडा चुकतां शिव्या-शाप मग नकोनकोसे त्याला ! ॥ ३२ ॥
‘ शितें तोंवरी भुतें भोंवतीं ’ म्हण ही साधी भारी ।
परि अनुभूती सकल बुधांची हींत ओतिली सारी ! ॥ ३३ ॥
जगीं चहुंकडे स्वार्थ, नीचता, मूर्खपणा अभिमान ! ।
हार म्हणोनी सापासाटीं कोण पुढें करि मान ? ॥ ३४ ॥

*   *   *   *

“ उषा आणि मी परस्परांना बघतां सस्मित होतों ।
या प्रेमाचा अनुभव जगतीं कोठुन दुसरा हो तो ! ॥ ३५ ॥
दर्शन माझें हाच लाभ तिज, तद्दर्शन मज लाभ ।
कधिं न ठाउका स्वार्थें केला अमुचा चित्त-क्षोभ ॥ ३६ ॥
कोठें दिनकर, दीन कुसुम मी कोठें ? तरि कुरवाळी—।
सर्व उग्रता सोडुन मजला, कन्येसम सांभाळी ! ॥ ३७ ॥
दिशादिशांना सौरभ माझा वाहुनि वारा नेतो ।
नको नको मी म्हणतां कुतुकें यश माझें पसरीतो ! ॥ ३८ ॥
सृष्टीही हिम-मिषें मनोहर नव मोत्यांची जाळी ।
घाली मजवर ! सजवी मजला ! माय तशी प्रतिपाळी ! ॥ ३९ ॥
सोडुन असले मित्र निधी हे निष्काम-प्रेमाचे ।
धूळ जगाची माथां घेणें कोण म्हणे कामाचें ? ॥ ४० ॥
जा ! जा ! जा ! जा ! जा रम जगतीं, उद्यानीं वा सदनीं ! ।
बुद्धि-भेद मम करूं नको रे ! असल्या मोहक वचनीं ! ” ॥ ४१ ॥

*　　*　　*　　*

विस्मित होउन उगाच कवि तो फुलाकडे त्या पाही ।
जेथें प्रीती, तेथें आशा, क्षमा सर्वदा राही ॥ ४२ ॥
सस्मित होउन पुनरपि बोले मञ्जुल वचनीं सूरी ।
त्या सुमनाचें कठिण सर्वथा रुसलेलें मन हारी ॥ ४३ ॥
म्हणे कवी, “ तूं, मीही होइन विशीर्ण एके दिवशीं ।
निवास येथिल विवास केवळ सुमना तुजशी मजशी ! ॥ ४४ ॥
तथापि जगता परकें व्हावें, जाउन दूर रहावें ।
या शीलाला कसें कळेना सज्जन-शील गणावें ? ॥ ४५ ॥
भ्याडपणाचा, स्वार्थाचा वा परमावधि हा होय ।
अशा नराचा मृताहुनीही मृत झालेला काय ! ॥ ४६ ॥
क्षण-भंगुर वय, त्यांत फुला ! हें यौवन दो निमिषांचें ।
एकवार तनु वाळुन जातां धरेस ओझें हीचें ! ॥ ४७ ॥
वृक्ष-लतादिक परोपकारास्तव येती जन्माला ।
नद्या वाहती; अंबुद गळती सुख द्याया लोकांला ॥ ४८ ॥

कृतघ्न हें जग, जें तें स्वार्थी, यांत न शंका कांहीं ! ।
परंतु तेणें प्रीतिकरांची प्रीती सरली नाहीं ॥ ४९ ॥
ताडन, घर्षण, अग्नि-निवेशन यांना स्वर्ण न भ्यालें ।
परंतु यांहीं तेज तयाचें जगांत मान्य जहालें ! ॥ ५० ॥
जों जों होई छिन्न छिन्न तों मधुर मधुर हो ऊंस ।
शिव्या-शापही साहुन जगती फलद करी पाऊस ॥ ५१ ॥
शरीर झिजवुन चंदन देतो पर-देहाला शांति ।
स्वयें सोसुनी ताप, तरूत्तम दे इतरां विश्रांति ! ॥ ५२ ॥
कधिं दगडांच्या, कधिं काष्टांच्या, कधिं शस्त्रांच्या मारा ।
सोसुन तरु-वर देई इतरां अपुल्या मधु-फल-भारा ! ॥ ५३ ॥
फार कशाला ? अन्य-हितास्तव खांडें खांडें होतां—।
निज-देहाचीं, तीच धन्यता वाटे तरुच्या चित्ता ! ॥ ५४ ॥
तीं खांडें जरि अग्निंत गेलीं तरी तयाला काय ? ।
' शीत निवारी परक्याचें हा धन्य ' तरु म्हणे ' काय ! ' ॥५५॥
भू-गर्भ-स्थित हीरक सोडुन निवास बाहिर यावा ।
स्वार्थि-जनाच्या करांत जावा, शाणोल्लीढहि व्हावा ॥ ५६ ॥
कधीं कुधीच्या, कधीं सुधीच्या हातामध्यें यावा ।
परंतु त्याला नित्य घडावी जगामध्यें जन-सेवा ॥ ५७ ॥
याविण त्याच्या त्या कांतीचा हेतु न दुसरा कांहीं ! ।
परमेशाचा नियम हा असा अभेद्य विश्वीं पाहीं ॥ ५८ ॥

*　　　*　　　*　　　*

" तुझी प्रिय-सखी उषा तियेला विचार, पुष्पा, जा जा ! ।
परोपकारा सोडुन करिते अन्य कोणत्या काजा ? ॥ ५९ ॥
तुझ्याकडे ती मात्र पाहुनी हंसते, तुज हांसविते—।
असें न; जगता उद्बोधित ती करिते, प्रसन्न करिते ॥ ६० ॥
दिनकर सुमना ! तुझाच केवळ नाहीं, परि जगताचा ।
तुला न ठावें वियोग पळभर नाहिं जगाचा त्याचा ! ॥ ६१ ॥
नित्य सेवितो जगास, तेणें विसरुन तत्कर्त्याला ।
किती वंदिती, किती मानिती जगदीश्वरही त्याला ! ॥ ६२ ॥

स्तुत्य खरी निष्काम-प्रीती अनिलाची तुजवरती ।
परंतु वांटेकरीण हीची सुमना ! अवघी जगती ॥ ६३ ॥
जननी सृष्टी तुझी न केवळ, अमुची परि सर्वांची ।
जगास सोडुन बसली नाहीं यांत मती एकाची ॥ ६४ ॥
तुला सांगतों, प्रिया प्रसूना ? म्हणशी तूं जी भक्ति ।
भक्ति न ती रे ! परि परमेशीं स्वार्थास्तव आसक्ति ! ॥ ६५ ॥
जगदीशाच्या निंदुन कृतिला स्तोत्रें त्याला गावीं ।
निर्दय होउन त्या सदयाची पदवी जवळ करावी ॥ ६६ ॥
कोण म्हणे ही भक्ती ? किंवा उपासना ही कसली ? ।
जगच्चालका कशी आवडे मती जगावर रुसली ? ॥ ६७ ॥
चल जगतीं तूं, रम उद्यानीं, भिऊं नको जगताला ।
सेव जनाला, तेणें होशिल मान्य फुला देवाला ” ॥ ६८ ॥

वनवासी फूल. —ना. वा. टिळक.

---

# १० वृक्षोपदेश.

संसार करून भागलेला एक ब्राह्मण, आपल्या देहाचें सार्थक व्हावें म्हणून मोक्षाचा मार्ग दाखविणाऱ्या गुरूच्या शोधार्थ पुष्कळ फिरला. पण सर्वत्र दंभ, आशा इत्यादि भरलेलीं असून, ‘ कोणी न पात्र देण्या मोक्षप्रद मज गुरूपदेशास ’ असें त्यास आढळून आलें. तेव्हां तो स्वदेशीं परत यावयास निघाला. वाटेंत विश्रांतीसाठीं एका आंब्याच्या झाडाखालीं उतरला असतां त्या वृक्षानें त्यास उपदेश केला तो असाः—

## आर्या.

रे ब्राह्मणा ! कशाला जगभरि तूं कष्ट खात फिरतोस ? ।
वेड्या मनीं वृथा कां सद्गुरु नाहीं म्हणूनि झुरतोस ? ॥ १ ॥
उपदेशाया एकचि ब्रह्मांडीं मनुज काय रे उचित ? ।
भरल्या अनंत वस्तू देतिल उपदेश त्या तुला खचित ॥ २ ॥
सत्य-विचारें बघतां आहे जरि बुद्धिमंत नर कुलिन ।
नाना विकार पावुनि पुढती तद्बुद्धि होतसे मलिन ॥ ३ ॥

काम-क्रोध-विकारें मानव-हस्तें घडे महा-पाप ।
आम्ही उद्भिज साधू शून्य-विकारी असों अपोआप ॥ ४ ॥
शत्रू, मित्र, महात्मा, आम्हां ना राव, रंक हा भेद ।
सौख्याचा गर्व नसे, दुःखाचा लेशही नसे खेद ॥ ५ ॥
माझ्या समान ठेवीं तूंही सम-बुद्धि सर्व भूतांत ।
येणेंच चित्त-शुद्धी होइल कीं सु-प्रसन्न भूतांत ॥ ६ ॥
झंझावात मला रे ! धक्के मारी कितीक ताठ्यानें ।
देवोनि पाठ त्यांला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें ॥ ७ ॥
तैसा तूंहि जगीं या राहें लोकापवाद सोसून ।
सासूचे बोल जसे खडतरही सोशिते बरी सून ॥ ८ ॥
पर्जन्याच्या धारा, झोंबे अंगास तीव्र-तर वारा ।
गारांचा वर मारा, उष्णाचा प्रखर तापही सारा ॥ ९ ॥
पंच-महा-भूतांच्या सांपडतों मी सदा सपाट्यास ।
शिरसा-वंद्य करीं मी जे जे येतील भोग वांट्यास ॥ १० ॥
केला कधीं न त्यांचा कंटाळा, मुरडिलें न मी नाक ।
तूंहि तसा वाग; मिळे इह-लोकीं सौख्य, शेवटीं नाक ॥ ११ ॥
विद्युत्पात शिरावरि अदळे कीं दुःसह प्रभा फांके ।
धाकें भीति धरोनी तरिहि कधीं संकटीं न मी वांकें ॥ १२ ॥
तूंहि तसें धैर्य धरीं, संकट-समयीं भिऊं नको लेश ।
धैर्याच्या शांतीच्या मागें आहे सदा हृषीकेश ॥ १३ ॥
लोकीं परोपकारा ऐसें नाहींच पुण्य बा ! अन्य ।
जोडूनि धन्य होतों, तरु-वर आम्ही जरी असों वन्य ॥ १४ ॥
लावुनि मजला रक्षी पशुपासुनि शिशुसमान, जो रानें—।
तोडुनि काढी हस्तें कीं जो मारी कुठार जोरानें ॥ १५ ॥
दोघांवरही माझी आहे बा ! सम-समान कीं माया ।
फल-पुष्प-पर्ण देतों दोघांनाही करीं बरी छाया ॥ १६ ॥
हा माझा शत्रु असे, येइल हा मित्र भाउ कामातें ।
ऐसा भाव दुजा हा नाहीं स्वप्नांत ठाउका मातें ॥ १७ ॥

शोषुनि दुर्गंधीतें वायूंतुनि सोडितों बरा वास।
रंकास फार कामीं येतों मी तेविं थोर रावास ॥ १८ ॥
क्षुधिताला फल देतों तमाला देतसें बरी छाया।
गेला प्राण तरीही सर्पण होवोनि जाळितों काया ॥ १९ ॥
ऐसें परोपकारीं मजसम तूं झिजविशील जरि अंग।
तरि तुज मोक्ष मिळेलाचि; विश्वंभर दूर का द्विजा ! सांग ॥ २० ॥
सद्गुरु नाहीं ऐसा झाला रे ! व्यर्थ बा तुला भ्रम हा।
स्थिर-चर पदार्थ असती याया उपदेश कीं समर्थ महा ॥ २१ ॥
हा स्थीर मंद-बुद्धी म्हणुनी मानूं नको तरूस मज।
हृदयीं धरून ठेवीं उपदेशामृत, मला गुरू समज ॥ २२ ॥
मत्सम जगांत वागें, स्थीर करीं आत्म-संयमें मतिला।
तेणें साधुत्वाला पावुनि होशील पात्र सद्गतिला ॥ २३ ॥

—कृ. ना. आठल्ये.

---

# ११ कच आणि देवयानी.

पूर्वी देवदैत्यांचीं युद्धें होत; त्यांत लढाईत मरण पावलेल्या दैत्यांस त्यांचा गुरु शुक्राचार्य हा संजीवनीविद्येच्या योगानें पुन्हां जिवंत करी; पण ती विद्या देवांचा गुरु बृहस्पती यास अवगत नसल्यामुळें, देवांचा पक्ष लंगडा पडे. म्हणून बृहस्पतीचा मुलगा कच यास देवांनीं शुक्राचार्याकडे संजीवनीविद्या शिकून येण्याकरितां पाठविलें. त्यानें आपल्या आचरणानें लवकरच शुक्राचार्य व त्याची कन्या देवयानी यांची मर्जी संपादन केली. शुक्राचार्यापासून संजीवनीविद्या शिकून देवांचा पक्ष प्रबळ करण्याकरितां कचाचा हा उद्योग आहे असें कळतांच, असुरांच्या डोळ्यांत कच फार सलूं लागला. व त्यांनीं त्यास अनेक वार ठार मारलें. पण देवयानीचा हट्ट पुरविण्याकरितां शुक्राचार्यानें त्यास तितके वेळां जिवंत केलें. शेवटीं ही ब्याद कायमची नाहींशी व्हावी म्हणून दैत्यांनीं त्याचा वध करून 'शुक्रासि पाजिलें हो तद्भस्म सुरारसांत दुष्टांनीं.' त्यास जिवंत करण्यासाठीं देवयानी पूर्वीप्रमाणें हट्ट धरून बसली. यापुढील कचास संजीवनीविद्येची प्राप्ति व कच-देवयानी-संबंध पुढील उताऱ्यांत वर्णिलेला आहे.

## आर्या.

धिक्कारुनि असुरांतें धर्मचि तो अमृतमय-वचा शिकवी ।
बाहे करुणा-विद्या-दिव्य-तपस्या-बळें कचाशि कवी ॥ १ ॥
जों गुरु ‘ वत्स कच ! ’ म्हणुनि ‘ एहि ’ असें तो म्हणावया योजी ।
तों विद्या-सामर्थ्यें उपजूनि गुरूदरीं म्हणे ‘ वो जी ! ’ ॥ २ ॥
उदर-प्रवेश पुसता झाला तो पुण्य-राशि शुक्र मुनी ।
सांगुनि खळ-कपट, म्हणे, ‘ एथ वसो काळ हा शिशु क्रमुनी ॥ ३ ॥
निर्भय वसेन काळ क्रमुनि पवित्रोदरीं असाचि सुखें ।
न हित गुरूदर-दारण, निघतां मज निंदितील साधु-मुखें ’ ॥ ४ ॥
शुक्र म्हणे, ‘ वत्से ! कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर ।
हा तरलाचि, परि तुझें या कु-व्यसनीं बुडेल माहेर ’ ॥ ५ ॥
सुरयानी त्यासि म्हणे, ‘ वदतां हें अशुभ काय हो तात ।
व्हावे दोघेहि मला चिंता-मणि हेचि पाय होतात ॥ ६ ॥
तारुनि शिष्यासि, तरो गुरु, म्हणत्यें पात्र कन्यकान्या या—।
नोहे वरासि वर-दा ! जाणसि तूं सुज्ञ-नायका न्याया ’ ॥ ७ ॥
भीड सुतेची भारी विद्या संजीविनी कचा शिकवी ।
गुरुलाहि वांचवाया योग्य करी सज्जना कचाशि कवी ॥ ८ ॥
गुरु-कुक्षि विदारुनि कच बाहेर निघे परंतु बहु तो भी ।
उठवुनि गुरु, संकोचें नमुनि, रडे कुल-ज-कीर्तिचा लोभी ॥ ९ ॥
वर्षें सहस्र होता कच गुरु-सेवेंत, मग तया प्राज्ञा ।
शुक्रें बहु संतोषें दिधली जाया पित्याकडे आज्ञा ॥ १० ॥
कच सिद्ध होय जों तों शुक्र-सुता त्या मनोहरा उचिता ।
स्व-कर-ग्रहार्थ विनवी बहु आवडली सु-विद्यता शुचिता ॥ ११ ॥
जें गुरुचें तेंच तिसीं पूज्यत्वाचें धरूनि कच नातें ।
ठेवूनि दृष्टि धर्मीं तो न तिच्या मान्य होय वचनातें ॥ १२ ॥
पडतां गळां म्हणे कच, “ भगिनीला वरुनियां न भाउ तरे ।
करितां अधर्म सद्यः स्व-पितृ-सुहृज्जन-मुख-प्रभा उतरे ॥ १३ ॥
सुख व्हावें तरि धर्माप्रति म्हण ‘ माथां वसें, नसें दूर ’ ।
पूजा कैंची लोकीं जरि दगड शिरीं धरी न सेंदूर ॥ १४ ॥

धर्म अनंत असो परि तो करितां कीर्तन स्वसे ! वेचे ।
सांग प्रकार याहुनि दुसरे कांहीं मज स्व-सेवेचे ॥ १५ ॥
ज्या उदरीं वास तुझा तेथें माझाहि, हें असें नातें ।
कोंवि कर-ग्रहण करूं संमत धर्मासि जें असेना तें ? " ! । १६ ॥
बहु दिवसांची आशा तत्काळ च्छेदितां कचें, रुष्टा—।
शुक्र-सुता त्यासि म्हणे, " रे कपट-पटो ! भला भला दुष्टा ! ॥ १७ ॥
ऐक कृतघ्ना जरि मी ' उठवाचि मदर्थ या हता ' शतदां—।
ऐसें गुरुस न म्हणतें, कैसा उठतास तूं हताश तदा ? ॥ १८ ॥
तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भवपण हि कचसाच ।
धरिला शिरींहि न स्वप्रकृति-गुण त्यजिसि नाम कच साच ॥ १९ ॥
न करीं वि-फळ मदाशा, आशा भंगूं नयेचि साधूंनीं ।
जरि भंगिसील, विद्या सिद्ध नसो जीस नेसि साधूनी " ॥ २० ॥
कचहि म्हणे, " गुरु-वेदानुज्ञा नाहीं म्हणोन या कर्मा—।
मान्य नसें; हूं शापीं, कीर्तिकरचि शाप न चुकतां धर्मा ॥ २१ ॥
पढवीन ज्यासि विद्या ही त्यास फळेल, तूंहि घे शाप ।
' तुज कोणीहि ऋषि-सुत न वरील; ' फळो तुझें तुला पाप " ॥ २२ ॥

आदिपर्व, अ. ९. —मोरोपंत.

---

# १२ कचाप्रत देवयानी.

देवयानीचें कचावर अत्यंत प्रेम असल्यामुळें, तो स्वर्गी निघून गेल्यानंतर तिला फारच दुःख झालें. त्या दुःखभरांत मागील आठवणी काढून ती कचास उद्देशून बोलत आहे—

## आर्या.

लोटून दुःख-पंकीं हा ! हा ! मज दीन धेनुलागून ।
प्रिय-सत्तमा कचा ! मज गेलास कसा स-रोष टाकून ? ॥ १ ॥
भक्त स्व-देवतेचें प्रिय करितो, त्याहुनी विशेष गुणें ।
माझें प्रिय तूं पूर्वीं आचरिलें, पाडिलें न अल्प उणें ॥ २ ॥

तेणेंच द्विज-राया आसक्त कुमुद्वती स्वयें झालें ।
नेणें मग केंचें हें प्राक्तन निर्घृण असें फळा आलें ? ॥ ३ ॥
झालासि कसा निष्ठुर एकाएकीं कचेश्वरा आर्या ! ।
प्रेमें बद्ध करुनि मज, भावी मग खंडिली कशी भार्या ? ॥ ४ ॥
विदित न तुज काय मदनुराग तुझ्यावरि कितीक होता तें ? ।
तुज तीनदां मदर्थचि विहतातें जिवविलें अहा ! तातें ॥ ५ ॥
तो तूंच काय शेखीं दुःखद उलटा असा जहालास ।
हालाहलहि न देइल ज्या दे हा शोक तीव्र हालांस ॥ ६ ॥
आम्हीं परस्परां जरि निज-जीवांहून अधिक आळविलें ।
अन्योन्य-शम झालों हत-दैवें विष सुधेंत कालविलें ! ॥ ७ ॥
अन्योन्य-शम होतां, स-जव निघालासि तूं निज-स्थाना ।
रुष्टत्वें खिन्न मुखा वळवुनि न बघें त्वदीय प्रस्थाना ॥ ८ ॥
कांहीं अवकाशानें दृष्टी गेली समोर तों नाहीं—।
तव रम्याकृति कोठें !—गमल्या मज शून्यशा दिशा दाही ॥ ९ ॥
तंव पश्चात्ताप-भरें नयनांतुनि टपटपां टिपें स्रवलीं ।
तव मूर्तिच्या अहह ! हा अंतिम-दर्शन-सुखास आंचवली ॥ १० ॥
काया कुरवंडावी ही ज्या जित-मन्मथा तुझ्यावरुनी ।
डोळे भरूनि त्या तुज कोठें पाहूं अ-भागिनी फिरुनी ? ॥ ११ ॥
तुज शेवटीं विषादें बहु मी परुषोत्तरें अहह ! वदल्यें ।
आतां तीं परतुनि मम हृदयाला टोंचिती जशीं शल्यें ॥ १२ ॥
अश्रु-क्लिन्नें नयनें सत्वर जर हीं अशींच मिटतील ।
तर तें बरेंचि होइल—तव विरह-क्लेश सर्व फिटतील ॥ १३ ॥
घालून निराशेचें अंडें आशा अहा ! उडुन गेली ।
झाडून पंख ज्यांवरि होतीं जीं ईप्सितें गिरविलेलीं ॥ १४ ॥
जें गुण-निधान दुर्मिळ, किंबहुना देव-कन्यकांनाही ।
तें माझें मी म्हणतां विधिनें लाभूं दिलें मला नाहीं ॥ १५ ॥
सुर-गुरुच्या सुत-रत्ना ! तुजलागीं वरुनि धन्य मीं व्हावें ।
आणि मनीं धरिलें कीं, येथें मी सुर-पुरींहि मिरवावें ॥ १६ ॥

मत्कृत-सारी-दुर्ग-भ्रंश-भयें चालिलासि हळु मागें ।
एक नकारें ध्वसिलें मन आशा-हर्म्य कावि तूं सांगें ॥ १७ ॥
येथें सदनीं किंवा पुष्प-वनीं बहुत वस्तु आहेती ।
स्मारक तव, दिसतां त्या धृतिला होतात माझिया हेती ॥ १८ ॥
यजनाचीं उपकरणें जीं ताताकारणें तुवां हातें—।
यावीं, तीं कां मजला मागे तो, होतसे असें मातें ॥ १९ ॥
चढुनी द्रुमीं फुलें तूं खुडिलीं परडी मदीय भरण्यास ।
पुष्पित ते बघुनि म्हणें व्यर्थ सुमें येति कां बरें यांस ॥ २० ॥
लावियला दारीं तूं अशोक तो असुनि शोक देतो कीं ।
तो रक्त, तू वि-रक्त, द्वैध असें अधिक पाडितें शोकीं ॥ २१ ॥
भिंतीवरि रंगविलीं चित्रें चतुरें तुवां पुरा रुचिरें ।
तीं बघतां तुजविषयीं उत्कंठा मन्मनांत शीघ्र शिरे ॥ २२ ॥
मग मी होउनि विह्वल, जाउनि एकीकडे कचा ! रडत्यें ।
कढत्यें विरहाग्नीनें, अधोमुखी भूवरी विकल पडत्यें ॥ २३ ॥
असुरीं तुज वधितां मी मागें केला रडून आकांत ।
त्यावेळींही नाहीं झाल्यें इतुकी निमग्न शोकांत ॥ २४ ॥
त्यावेळीं पितयानें निज-मंत्रें वाहतांचि आलास ।
मन्नेत्र पुसुनि मजला प्रेमें आश्वासिता जहालास ॥ २५ ॥
आतां मी भूमीवरि दुःख करित लोळतां तुझ्याकरितां ।
येशी न कां ?—वद कशी हाय ! तुझी आटली दया-सरिता ॥ २६ ॥
यावा तुला कळवळा कंटक खुपतां मदीय चरणास ।
मग खेंचिल उरी मम तूं कावि नकार या प्रहरणास ? ॥ २७ ॥
अणु-मात्र खेद होतां मजला झटलासि त्याचिया हरणीं ।
शोकीं कशा ढकालिली मग ही, दावानलीं जशी हरिणी ? ॥ २८ ॥
शोका ! तुजला वरित्यें मजला तूं प्रिय कचेंचि दिधलासी ।
मायेच्या पोटीं तूं दुर्विधिपासून जो उपजलासी ॥ २९ ॥
शोक हताशा दुःखें, आतां मज हींच होत गणगोत ।
तूं त्यागितां कचा मज सुख-हेतु मुळीं समोरहि नकोत ॥ ३० ॥

अथवा मीं लावावे बोल तुला कां म्हणून बहुसाल ? ।
खिन्न मनीं आणावें दीन जनें भग्न आपलें भाल ॥ ३१ ॥

मम जनकाच्या उदरीं वास तुला घडुनियां नवें नातें—।
भ्रात्याचें जें जडलें तुझें मशीं; तूज मोडवेना तें ॥ ३२ ॥

धर्म-ज्ञ द्विज मज तूं बंधु-सम, तुझ्यावरी मनीं काम—।
अजुनि धरुनि मी भक्त्यें, हें उचित न खचित सज्जनीं काम ॥ ३३ ॥

परि वेड मला लावी अनुदिन बहु काल चिंतिला हेत ।
हृदयांत मुळें त्याचीं गेलेलीं फार खोल आहेत ! ॥ ३४ ॥

करित्यें विवेक बहु, परि ठसली तव मूर्ति आंत जी कांत ।
भ्रांत मला ती करिते, कांपविते सर्व मन्मनः-प्रांत ! ॥ ३५ ॥

अक्षांची माळ तुझी घेउनिया तेविं तव मृगाजिन तें ।
बसुनि वनीं तप वाटे साधावें, त्यजुनि येथल्या जनतें ॥ ३६ ॥

तूं मी बसलों येथें, येकत्र म्हणून येथ ठरवेना ।
परि तात-स्नेहें मज पाउल येथून दूर करवेना ॥ ३७ ॥

'तुज कोणीहि न ऋषि-सुत वरिल' असा शाप तूं दिला मातें ।
परि ऋषि-सुत वा नृप-सुत कोणी नलगे मला वरायातें ॥ ३८ ॥

रत्नाला मुकल्यावरि कोण गणिल लाभ कांच सांपडणें ? ।
भग्न हृदय मम झालें, संसृति-पाशीं नको मला पडणें ॥ ३९ ॥

मग आणखी विधीनें न कळे लिहिलें असेल शिरिं काय ! ।
होऊ होणार तसें, पुनरपि न म्हणेन मी मुखें 'हाय' ॥ ४० ॥

कटु वदल्यें, शाप दिला, जा हें, पूर्व स्मरून, विसरून ।
करुणा-सिंधो ! बंधो ! विनवितसें हेंचि पदर पसरून ॥ ४१ ॥

'बंधो !' हें संबोधन तुज देतां खेद मन्मना वाटे ।
आकळितांही शोका, जल चाले अहह ! लोचनांवाटे ॥ ४२ ॥

केशवसुतांची कविता. —केशवसुत.

## १३ देवाचा धांवा.

### अभंग.

१

वाट पाहें हरि कां न ये आजूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥
काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥ २ ॥
बहुतां दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे देईं एक वेळां भेटी । शीतळ हे पोटीं होइल मग ॥ ४ ॥

२

कर कटावरी, तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ २ ॥
कटीं पितांबर कांस मिरविली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ति ॥ ३ ॥
गरुड-पारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥
झुरोनि पांजरा होउं पाहें आतां । येईं पंढरी-नाथा भेटावया ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंति उदास करूं नको ॥ ६ ॥

३

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन देखावया ॥ १ ॥
उदित हें भाग्य होइल कोणे काळीं । चित्त तळमळी म्हणऊनी ॥ २ ॥
उतावीळ बाह्या भेटीलागीं दंड । लोटांगणीं धड जावयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं । होतील पारणीं इंद्रियांचीं ॥ ४ ॥

४

आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । माझें अंतरंग कोण जाणे ॥ १ ॥
पाहें तुजकडे येऊनि जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ॥ २ ॥
भय चिंता अवघे उद्योग सांडिले । आठवुनी पाउलें असें तुझीं ॥ ३ ॥
नका विसरूं मज वैकुंठ-नायका । विनवीतसे तुका बंदी-जन ॥ ४ ॥

५

तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥
अजुनी कां न ये तुज माझी दया । काय देव-राया पाहतोसी ॥ २ ॥
आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तहान-भूकें ॥ ३ ॥

प्रेम-रस-पान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाई वोरसोनि ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें कोण हरिल दुःख । तुजाविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

६

कुरंगी पाडस चुकलेंसे वनीं । फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ॥ १ ॥
तैसा पर-देशी झालों तुजाविण । नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ २ ॥
अपराधाच्या कोटी घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा॥३॥
तुका म्हणे असों यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ॥ ४ ॥

७

अगा करुणाकरा करीतसें धांवा । या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥
ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ॥ २ ॥
मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवुनि पायीं भाव वाट पाहें ॥ ३ ॥
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला मायबापा ॥ ४ ॥
उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य झालें ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां करीं कृपा-दान । पाउलें समान दावीं डोळां ॥ ६ ॥

८

कोठें गुंतलासी कोणाच्या धांवया । आलि देव-राया निद्रा तुज ॥ १ ॥
कोठ गुंतलासी भक्ति-प्रेम-सुखें । न सुटती मुखें गोपिकांचीं ॥ २ ॥
काय पडलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ॥ ३ ॥
काय माझे तुज गुण-दोष दिसती । म्हणोनि श्री-पति कोपलासी ॥ ४ ॥
काय झालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ॥५॥

गाथा.　　　　**—तुकाराम.**

---

## १४ अभिमन्यूचा पराक्रम व वध.

द्रोणाचार्यांनें सैन्याचा चक्रव्यूह रचून युद्ध मांडलें. त्या व्यूहाचा भेद करण्याची कला एकट्या अर्जुनास मात्र माहित होती. पण तो दुसरीकडे युद्धास गुंतला होता. अशा रीतीनें पांडव मोठ्या संकटांत सांपडले. तेव्हां अभिमन्यु हा पुढें होऊन व्यूहांत शिरण्यास तयार झाला—

## आर्या.

ज्येष्ठ पित्याला देउनि अ-भय, म्हणे तो सु-वीर सूतातें ।
" हूं ! हाक रथ, म्हणावी माय सुभद्रा ' सु-वीर-सू ' तातें " ॥ १ ॥
भीमादि स-बळ सर्वहि उठले तो व्यूह-कोट फोडाया ।
इकडुनि कौरव-कटकहि होय पुढें शत्रु-सैन्य मोडाया ॥ २ ॥
रथ थडकले, भडकले हय, शस्त्रज-वह्नि धडकले वरते ।
अन्योन्य द्व्यंगुलही राहों देती न धड कलेवर ते ॥ ३ ॥
पावत असतां दोन्ही करुनि सु-तुमुलाहवास वध सेना ।
व्यूहीं शिरे गुरुपुढें; चित्तेंहि जयांत वासव धसेना ॥ ४ ॥
व्यूहीं गमे सुभद्रा-सुत गज-यूथांत जेंवि बाल-हरी ।
त्यावरि पडल्या सेना त्या मंथाद्रिवरि जेंवि बा ! लहरी ॥ ५ ॥
बहुतांसीं एकाकी सौभद्र कलह करी समुत्साहें ।
अ-सकृत् सूतासि म्हणे, ' सु-यशस्कर समर हो, समुत्साहें ' ॥ ६ ॥
तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्क रसें ।
शोभे विजयोत्साहें अभिमन्यु-मुख प्रफुल्ल पुष्करसें ॥ ७ ॥
प्रभुचा, मर्मी हाणी सर्वांसाहि तीन तीन शर, भाचा ।
वाटे, बहु सिंहांसीं समर करी कुपित पोत शरभाचा ॥ ८ ॥
द्रोण-द्रौणि-कृपादि प्रबळ बहु भटांसही न तो आटे ।
फाटे तद्दृष्टिपुढें बळ, जळदीं मूर्त-वातसा वाटे ॥ ९ ॥
भेदुनि शरें उरः-स्थळ चळचळ बळ-जळधि कर्ण कांपविला ।
मूर्छित करूनि मद्रप सौभद्रें तत्प्रताप संपविला ॥ १० ॥
एकें सुषेण वधिला बाणें, एकेंचि दीर्घ-लोचन हो ! ।
एकेंचि कुंडभेदी; गमले ते घूक, तो विरोचन हो ! ॥ ११ ॥
मानी वीर पळाले गुरुनेंहि निवारितां तडक राया ! ।
स्यंदन शीघ्राहि पिटितां सांगति सूतांसि तांतड कराया ॥ १२ ॥
सप्रेम पार्थ-पुत्राप्रति पाहुनि तत्पराक्रमें डोले ।
कुरु-पति परिसत असतां द्रोण कृपासीं कृपा-भरें बोले ॥ १३ ॥
' हर्षवितो मज पुत्राहूनि, नव्हे हा कुमार सामान्य ।
धन्या सती सुभद्रा नंदन जीचा कुमारसा मान्य ' ॥ १४ ॥

अंध णे, 'रे संजय ! हें त्या पौन्नास वर्ष सोळावें ।
लोळावें मांडीवरि, तेणें द्रोणादिकांसि घोळावें ! ॥ १५ ॥
न पवे सुनीतिचें परमार्थाची वाट लेंकरूं काय ।
सत्यचि कथिसी; परि हें मज लटिकें वाटलें करूं काय ?' ॥ १६ ॥
संजय म्हणे, 'म्हण अनृत, भीष्माचा एकला पणतु मुलगा ।
करिता जाला गुहसा, बहुतांनीं वेढिला रण तुमुल गा ! ॥ १७ ॥
कुरु-सैन्यांत गमे ज्यापरि रंभा-काननांत वारा हो ! ।
त्या विजय-श्री देउनि परिरंभा कां न नातवा राहो ?' ॥ १८ ॥
शकुनि म्हणे, 'कुरु-नाथा ! हा सर्वांहीं मिळोनि मारावा ।
भ्याले यास भट, जसे भीती गज-शिशु मृगोत्तमारावा ॥ १९ ॥
द्रोणासि कर्णहि म्हणे, "गुरुजी ! मज तों नसेचि आवांका
आवांका युक्ति, म्हणो न तुम्हांसहि हा 'करूनि आ वांका'" ॥ २० ॥
गुरुहि म्हणे, 'कर्णा ! हा तक्षकचि, गरळ, करूनि आ, वमला ।
आहें संकोचें, परि सोडुनि गेला मर्घांचि आव मला ॥ २१ ॥
मज भंगुनिहि सुखवितो, बा ! हा सामान्य काय गा ! बाळ ? ।
उतरुनि सांडावा यावरुनि स-सर्वस्व काय गाबाळ ॥ २२ ॥
अ-क्षत-धनु तोंवरि हें वीर-शिरोरत्न नावरायाचें ।
यास्तव सर्वांहि रक्षूं, आजि करुनि यत्न, नांव रायाचें' ॥ २३ ॥
प्रभु वृत्र-शिरास जसा खंडी भय-दायकास नाकाचा ।
तैसाचि कर्ण करिता काय तया सायकासना काचा ॥ २४ ॥
मारी हरींस सहसा कृतवर्मा; सारथीस गौतमही ।
परि न गडबडे तो पितृ-मातुळ-सम-शुद्ध-कीर्ति-धौत-मही ॥ २५ ॥
सौभद्र विरथ होतां धर्मज्ञहि करिति शस्त्र-वृष्टींतें ।
तें निष्कृपत्व पाहुनि झांकिति बहु सदय-साधु दृष्टींतें ॥ २६ ॥
म्हणती, 'हाणा, मारा, पाडा, घ्या, काय पाहतां तोंडा ? ।
कोंडा प्राण-व्यसनीं बाळ बुडो, कर्दमीं जसा धोंडा' ॥ २७ ॥
तो खड्ग-चर्म घेउनि अवलंबी वीर-नायक विहाय ।
संकट पडतां सोडुनि धैर्यासि, म्हणेल काय कवि 'हाय !' ॥ २८ ॥

मराठी ... ६३

खड्ग क्षितिवरि पाडी द्रोण च्छेदूनियां नव त्सरुस ।
चित्तीं म्हणे, "न मज, तुज 'धन्य' त्रिभुवन म्हणो; न वत्स! रुस" २९
कर्ण करी चर्माचे, श्रित-विघ्नाचे जसे गणप टुकडे ।
तन्हि पाहोंहि न शकले वीर विशस्राहि त्या रण-पटुकडे ॥ ३० ॥
शत्रु-मुखींचें, क्षितिवरि उतरुनि घेऊनि चक्र, पाणि हरी ! ।
भासे साक्षात् सिरला असुर-समूहांत चक्र-पाणि हरी ! ॥ ३१ ॥
वारिति जसें प्रयत्नें एक-मत सर्व संत पर-चक्र ।
कर्ण-द्रोणादि तसें खंडिति बहु त स्व-अंत-पर चक्र ॥ ३२ ॥
मग भेक-मूषकां जें क्षुधित क्रोधी महा-भुजग दे, तें—।
दुःसह भय आम्हां दे, धरुनि करीं तो महाभुज गदेतें ॥ ३३ ॥
तेणें हय-सूत वधुनि, अश्वत्थाम्याप्रति प्रभावातें—।
दावुनि, हरिली कौरव-दीप्ति, जसी दीपक-प्रभा वातें ॥ ३४ ॥
पाहुनि संमुख जेव्हां धांवे सौभद्र सिंहसा रागें ।
त्यजुनि रथोपस्थ सरे गुरु-नंदन तीन पावुलें मागें ॥ ३५ ॥
त्या सौभद्रावरि बळ-सागर गरगर गदेसि फिरवीत ।
दुःशासन-सुत, धावे निज-भुज-भुजग-प्रताप मिरवीत ॥ ३६ ॥
युद्ध-चमत्कार रुचिर, सु-चिर प्रकटुनि महागद भ्राते ।
अन्योन्य-कृताघातें बा ! मूर्छा पावले अदभ्रा ते ॥ ३७ ॥
आधीं उठोनि, उठतां सौभद्र शिरीं प्रभो ! गदा घाली ।
विवश करी ती दुष्परिहार्या जेंवि प्रभोगदाघाली ॥ ३८ ॥
आधीं श्रम बहु जाला होता, तो त्यांतही अ-सावध हो ! ।
केला दौःशासनिनें धर्म-नय त्यजुनियां असा वध हो ! ॥ ३९ ॥
प्रेक्षक, सुर मुनि सज्जन बहु हळहळले किरीटि-सुत-पातें ।
रडला पाहुनि सत्य-ब्रह्मज्ञाहि नारदादि सुतपा तें ॥ ४० ॥

द्रोणपर्व, अ. ३. —**मोरोपंत.**

# १५ अभिमन्यूविषयीं अर्जुनाचा विलाप.

## आर्या.

संसप्तक मथुनि विजय सांजे शिबिरासि यावया परते ।
प्रभुसि म्हणे, ‘ कां कांपे मन, कांपविले जरि स्वयें पर ते ? ॥ १ ॥
कंठ गहिंवरें भरला ! शिरली हृदयांत केशवा धडकी ! ।
येतें रडें वृथा कां ? बा ! माजी प्रकृति काय गा ! रडकी ? ’ ॥ २ ॥
अतुळ प्रताप लोकीं ज्या खळ-बळ-जळधि-वाडवाभाचा ।
तो कृष्णा ! आज तुझा मज आला कां न आडवा भाचा ? ’ ॥ ३ ॥
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन ।
तें पुत्र-रत्न एकचि न निरखिलें सद्गुणर्धिचें सदन ॥ ४ ॥
मृदुल-प्रकृति न साहे सुत-शोका जेंवि न रविला पाला ।
शिबिरीं करी परोपरि नारायण-मित्र नर विलापाला ॥ ५ ॥
‘ बोले कृष्ण-मुखिंची वेणु तसा, परम लाडिका वाणी ।
जो स्पर्शे, शिशुहि, न घें गुरु-सन्निध, पर, मला डिकावाणी ॥ ६ ॥
ज्याची शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत् समज ।
काय तुम्हीं केला हो ! आणुनि तो भेटवाचि वत्स मज ॥ ७ ॥
बहुधा तुम्हीं धरुनि गुरु-कृत-चक्र-व्यूह-भेद-कामातें ।
केलाचि पुढें, नाहीं तरि करिता स्पर्श खेद कां मातें ? ॥ ८ ॥
न तुम्हीं, न कौरवहि; मीं तद्घातक; कीं, तया रिघायाचा— ।
कथिला उपाय चपळा; आधीं म्यां न कथिला निघायाचा ॥ ९ ॥
तुमच्या भुज-शस्त्रांतें धिक् ! हा निःसार हो ! खटाटोप ।
शिर ज्या न रक्षवे, तो कार्याचा काय ओखटा टोप ॥ १० ॥
हर ! हर ! जाणों चुरिला तो बाळ करेणुंनीं चरण-पातें ।
शिव ! शिव ! भरितिल कीं हो ! तो बाळक रेणु नीच रण-पातें ॥ ११ ॥
कुंतीस काय सांगूं ? कृष्णेला दाखवूं कसें वदन ? ।
दुष्कर मला सुभद्रा-सांत्वन, दुर्दर्श उत्तरा-सदन ॥ १२ ॥
कां माजें उर न उले ? कावि पवि कीं म्हणाति तोक-शोकाळा ! ।
लोका लाजे मन, कीं जावें यश हारवूनि ओकाला ॥ १३ ॥

हा वत्सा ! रक्ताक्षा ! जाले त्वत्सुगुण आजि घातकसे ! ।
बा ! वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ? ॥ १४ ॥
मारिन जयद्रथ, करिन यश भुवनीं, विशिख-जाळ वितत रणीं ।
हें न घडतां जळेन ज्वलनीं, होतांचि अस्तमित तरणी ' ॥ १५ ॥
द्रोणपर्व, अ. ७. —मोरोपंत.

## १६ रामदासवर्णन.

श्लोक–वसंततिलका.

आम्हां-तुम्हांस भव-वारिधिमाजि तारूं ।
जे वाचितां परिसतां मग होय तारूं ॥
ते दासबोध-रचना घडली जयाला ।
वंदूं निरंतर तया गुरु-राजयाला ॥ १ ॥
वैराग्य-भाग्य भरलें असतां अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्ति-कन्या ॥
चौथी तयांत वरिली, उरल्या न पाहे ।
तो आमुचा गुरु समर्थ समर्थ आहे ॥ २ ॥
खेळावयास हनुमंत गडी जयाचा ।
जो या महीवरि वसंत जितेंद्रियांचा ॥
ज्याचीं पदें प्रणमिताति कवींद्र राजे ।
श्रीरामदास-गुरु तो अमुचा विराजे ॥ ३ ॥
जो डोंगरीं गिरि-दरीं फिरतां न भागे ।
ज्याची पवित्र घन कीर्ति जनीं विभागे ॥
जो तत्त्व-बोध-कविता करितां न मोजी ।
तो रामदास-गुरुवर्य नमो नमो जी ॥ ४ ॥
चिद्बोध-सेज अरुवार नव्या फुलांची ।
सायुज्य-मुक्ति ललना असतां जयाची ॥
तो रामदास अ-कलत्र असें गणावें ।
अज्ञान होत जन, काय तयां म्हणावें ? ॥ ५ ॥
रघुनाथपंडिताचे काव्यग्रंथ. —रघुनाथपंडित.

# १७ नीति-मुक्ता-माला.

## श्लोक.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे ।
तृषार्ताची तृष्णा मृग-जळ पिऊनीहि वितळे ॥
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी ।
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ॥ १ ॥
बळानें काढूं ये मणि मकर-दाढेंत दडला ।
महा-सिंधू-लाटा-तरण करुं येई भुज-बळा ॥
महा-सर्पातेंही सुम-सम धरूं ये निज-शिरीं ।
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ॥ २ ॥
विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें । स्वाधीन हें पद्म-भवें फुकाचें ॥
मूर्खास हें मौनचि फार साजे । सभेस त्यांच्या बहु जाणते जे ॥३॥
भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें ।
ज्ञानाला शम, त्या श्रुतास विनय, द्रव्यास दातृत्व तें ॥
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता ।
या सर्वांसही मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वतां ॥ ४ ॥
त्याला वह्नि जलापरी, जलधि हा कीं ओहळाचे परी ।
मेरु स्वल्प-शिलेपरी, मृग-पती तोही कुरंगापरी ॥
कीं तो सर्प फुलापरी, विष-जलें पीयूष-वृष्टीपरी ।
होतें सर्वहि यापरी, वसतसे सच्छील ज्याचे शिरीं ॥ ५ ॥
बरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें ।
महा-सर्पाच्या कीं वदनिं तरि हा हात धरणें ॥
उडी कीं वह्नींत त्वरित तरि घालूनि मरणें ।
जळो तें जें लोकीं त्यजुनि निज-सच्छील फिरणें ॥ ६ ॥
क्षीरानें दिधले स्वकीय गुणही नीरास आत्माश्रयें ।
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ॥
झाला ताप विशिष्ट, अग्नि-वदनीं तें दुग्ध जेव्हां पडे ।
तेव्हां धांवुनि तोय शीतल करी, मित्रत्व हें चोखडें ॥ ७ ॥

श्रीखंडाच्याच काष्ठेंकरुनि शिजवितो पेंड वैडूर्य-पात्रीं ।
किंवा तो अर्क-मूलास्तव कनक-हलें नांगरीतो धरित्री ॥
केळी तोडूनि टाकी त्वरित चहुंकडे पेरितो कोद्रवातें ।
जो या येऊनि लोकीं सु-कृत न करितां आचरे दुष्कृतातें ॥ ८ ॥

शनि-बुध-कुज-देवाचार्य-शुक्रादिकांतें ।
असम-बल म्हणोनी राहु टाकी तयांतें ॥
दुधडहि जरि झाला ग्रासितो सूर्य-चंद्रां ।
म्हणवुनि पुरुषार्थी तो न सोडी स्व-मुद्रा ॥ ९ ॥

श्रुतेंचि कीं श्रोत्र, न कुंडलानें । दानेंचि कीं पाणि, न कंकणानें॥
साजे तसा देहहि हा न आनें । परोपकारेंचि, न चंदनानें ॥ १० ॥

नीतिशतक. —वामनपंडित.

---

# १८ उत्तमपुरुषलक्षण.

## ओंव्या.

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वांटणें । परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥ तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस सांगावें । तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥ उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे । वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥ शरीर परोपकारीं लावावें। बहुतांच्या कार्यास यावें। उणें पडों नेदावें । कोणीयेकाचें ॥ ४ ॥ आडलें जाकसलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें । मृदु-वचनें बोलत जावें । कोणीयेकासी ॥ ५ ॥ दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें । पर-संतोषें सुखी व्हावें । प्राणिमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥ बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्य-भाग करावे । आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ॥ ७ ॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें । लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥ ८ ॥ नेमकचि बोलावें । तत्काळाचें प्रतिवचन द्यावें । कदापी रागास न यावें । क्षमा-रूपें ॥ ९ ॥ आलस्य अवघाच दवडावा । यत्न उदंडचि

करावा । शब्द-मत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ १० ॥ उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपला ॥ ११ ॥ मरणाचें स्मरण असावें । हरि-भक्तीस सादर व्हावें । मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १२ ॥ नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला । सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ १३ ॥ ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष । जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ १४ ॥ स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें । झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १५ ॥ कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ती नाहीं । विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १६ ॥ परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका । क्षमासीळ तयाच्या तुका । हानी नाहीं ॥ १७ ॥ आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें । प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ १८ ॥ आपल्या पुरुषार्थ-वैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ १९ ॥ दंभ दर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन । हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २० ॥ बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ २१ ॥

दासबोध १२. १०. —रामदास.

---

## १९ कृष्णा कुमारी.

[ चाल—चंद्रकांत राजाची० ]

१

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला ।
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला ! ॥ १ ॥
सु-नील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदु-कला ।
तोंच तिचा निर्घृण राहूनें धरिला हाय ! गळा ॥ २ ॥
भीम नृपाला प्रियतर बाळा कृष्णा वेल्हाळा ।
नडली, पडली बळी अकालीं, त्या योगें काळा ॥ ३ ॥

स्वार्थ संसृती, लोभ-परायण जगताची रीती ।
उठे सुतेवर पिता हितास्तव विसरे नय-नीती ! ॥ ४ ॥

२

उपवर झाली भीमक-बाळी रूपवती कृष्णा ।
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूप-वरां तृष्णा ॥ ५ ॥
जयपुर-राजा म्हणे गुणवती व्हावी मज भाजा ।
जोधपूरचा भूप म्हणे तो भाग असे माझा ! ॥ ६ ॥
शिंयाच्या जोरावर चढला मारवाडवाला ।
वांछी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला ॥ ७ ॥
जयपुरची मागणी तयानें धाकें परतविली ।
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली ॥ ८ ॥
कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात ।
घोर युद्ध माजलें वाहले रक्ताचे पाट ! ॥ ९ ॥

३

अमीरनामा पठाण घातक, नीच अविश्वासी ।
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं ॥ १० ॥
वदे ' हितास्तव करा स्व-दुहिता अर्पण मानातें ।
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें ॥ ११ ॥
अथवा हें खंडूनच टाका मूळ अनर्थाचें ।
कां कारण होतां पाडाया बळी सहस्रांचे ? ' ॥ १२ ॥
विचार पडला कसा पोटचा गोळा तोडावा ? ।
चुकवावें वा काय उपायें शत्रूंच्या घावा ? ॥ १३ ॥
चालक, मंत्री अजित नृपाचा तोचि मार्ग दावी ।
' समयींच ' म्हणे ' ही अग्नीची ज्योत मालवावी ! ' ॥ १४ ॥

४

आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी ।
कोसळून आकाश गमे त्या पडलें काय शिरीं ! ॥ १५ ॥
' धिक्कार असो ! ' वदे जीविता तुमच्या धिक्कार ।
व्यर्थ जन्म घेऊन जाहलों धरणीला भार ! ॥ १६ ॥

छत्र शिरीं मिरवितां म्हणवितां स्वतां लोकपाळ ।
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ ! ॥ १७ ॥
हाच काय पुरुषार्थ ! कुलाचा हाच काय मान—।
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान ? ॥ १८ ॥
रजपूतांचे छावे आम्हीं अबलांचे साथी ।
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं ॥ १९ ॥
वदा कोण त्या मृणालिनीच्या जीवावर उठला ।
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लावुन खास टिळा ! ॥ २० ॥
पडेल जेथें मृग-नयनेचा अश्रु-बिंदु एक ।
अरि-रुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड-लेख ॥ २१ ॥
नको बुद्धि ती, नका अमंगळ वच तें उच्चारूं ।
धीर न सोडा; धर्म आपुला रणीं मरूं–मारूं !' ॥ २२ ॥

५

बोध खलास न रुचे, अहि-मुखीं दुग्ध होय गरल ।
श्वान-पुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल ! ॥ २३ ॥
दौलत थिजला परि न खलांचा दुष्ट यत्न विझला ।
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला ! ॥ २४ ॥
करूनियां निर्धार मनाचा, धरून तलवार ।
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार ! ॥ २५ ॥
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी ।
जणों करी स्व-करें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं ! ॥ २६ ॥
हिम-धवलांगी धवल-चंद्रिका-हृदया बाला ती ॥
धवल फुलें तीं धवल करानें धवल गुणीं गांठी ॥ २७ ॥
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं ।
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जळीं ॥ २८ ॥
तिच्या दिव्य तेजानें दिपला, भरला कंप करीं ।
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमिवरी ! ॥ २९ ॥
टिकलें पुण्य-प्रभावापुढें नाहीं पळ दुरित ।
भग्न-मनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत ॥ ३० ॥

६

गळून पडलें शस्त्र पुढें तें—निशाण मरणाचें ।
धरून जें स्व-करीं भूमिवरी स्वैर मरण नाचे ! ॥ ३१ ॥
परि नाहीं ती धैर्य-देवता तिळभर डगमगली ।
मधु स्मिताची खळी कपोलीं उलट तिच्या पडली ! ॥ ३२ ॥
परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकांत ।
मातृ-हृदय तें करील कैसा सहन सुता-घात ! ॥ ३३ ॥
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथां हाणी ।
धाय मोकलुनि रडे, धरेला अश्रूंनीं न्हाणी ॥ ३४ ॥

७

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता ।
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता ! ॥ ३५ ॥
शस्त्र न चाले म्हणुनि विषानें भरलेली वाटी ।
आणून दिली जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं ! ॥ ३६ ॥
स्मित-वदनानें करीं विषाचा धरून तो प्याला ।
पदरें नयन पुशी मातेचे वदे वीर-बाला—॥ ३७ ॥
' कां करिसी हा शोक ? आणिसी कां नयनीं पाणी ? ।
कवण वांचला सांग भूवरी आजवरी प्राणी ! ॥ ३८ ॥
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी ।
मृत्यु-बलानें तुटे भवाची दुःखाची गांठी ! ॥ ३९ ॥
वाट जिवाला चिर-सौख्याची मृत्यु मात्र दावी ।
वद, मग आली मरणाची कां संधि घालवावी ! ॥ ४० ॥
जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी ।
भाग्यवंत ती, पडे संकटीं जनकाच्या कामीं ! ॥ ४१ ॥
धिग् जीवित ज्याकरितां पडती बळी असंख्यांचे ।
मरण यशाचें जर त्या योगें देश-धर्म वांचे ' ॥ ४२ ॥

८

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोंट ।
मोह-मूढ मातेस नावरे अश्रूंचा लोट ! ॥ ४३ ॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. १०९

एक-दोनदां घोंट विषाचा नाहीं तिज पचला ।
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला ! ॥ ४४ ॥
हाय ! कुसुंबा प्याया धरिला पुढें तिच्या ओंठीं ।
मालविली यापरी खलांनीं ती रत्न-ज्योती ! ॥ ४५ ॥
केला अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत ।
त्यां शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत ! ॥ ४६ ॥
जसें करावें तसें भरावें; बीज तसे दाणे ।
'विनायका' ला करी बोध हा कृष्णेचें गाणें. ॥ ४७ ॥

विनायकाची कविता. —विनायक.

---

## २० दुष्यन्त-शकुंतला-भेट.

### ओंव्या.

कौरव-वंशीं विख्यात-कीर्ती । दुष्यंतनामा गुणैक-मूर्ती । श्रेष्ठ भूपाळ चक्रवर्ती । वीर्यें शौर्यें आगळा ॥ १ ॥ प्राची प्रतीची दक्षिणोत्तर । चारी दिशा चतुःसमुद्र । आक्रमूनि मही-महेंद्र । सुरेंद्र तैसा भू-लोकीं ॥ २ ॥ रोग दारिद्र्य कीं बंधन । दुःख दुर्भिक्ष अकाळ-मरण । सर्प वृश्चिक तस्कर जाण । दुष्यन्त-राज्यीं असेना ॥ ३ ॥ विष्णु-समान सत्ता-बळ । प्रतापें जैसा सूर्य तेजाळ । धरा-तुल्य सहनशीळ । अक्षोभ जैसा सागरु ॥ ४ ॥ निपुण शस्त्रास्त्र-प्रहरणीं । आरूढों जाणे सर्व वहनीं । ऐसा भूपाळ-चूडामणी । दुष्यंत-राजा भू-लोकीं ॥ ५ ॥ सप्त समुद्रींचे लोट । धरा-मंडळीं एकवट । तैसे सेनेचे संघाट । घेऊनि वना चालिला ॥ ६ ॥ वाजी वारण रथ पदाती । संख्या करितां न धरवे गणती । सेना-त्रसनें सर्व जगती । पांघुरविली समर्थें ॥ ७ ॥ अनेक शस्त्रधरांचीं वृंदें । अनेक वाद्यें अनेक शब्दें । गर्जती तेणें विचित्र-नादें । नादावलें अंबर ॥ ८ ॥ देखे महा-प्रचंड गिरी । विशाळ पर्वताचिया दरी । जळें तुंबलीं सरिता-सरीं । समुद्र-तुल्य अगाध ॥ ९ ॥ नाना वृक्षांचीं अचाट । डांगें लागलीं घन-दाट । माजी निर्झरोदकांचे

पाट । सैरावैरा धांवती ॥ १० ॥ मस्तकें उचलूनि दिनकर । छाये रक्षिला अंधकार । माजी श्वापद-गणांचे भार । सुखाडले सुखवस्ती ॥ ११ ॥ मृग मारूनि असंख्यात । भक्षूनि भर्जित अभर्जित । पारध खेळतां झाले श्रांत । ते विश्रांती पावले ॥ १२ ॥ अवलोकूनि तें वन । राजा करी पुढारा गमन । तंव देखिलें कश्यपारण्य । सिद्धीं साधकीं वसविलें ॥ १३ ॥ तेथें चंदन पारिजात । देवदार केतकी सु-पुष्पित । तुळसी-वनें सुशोभित । दवने-वनें घमघमिती ॥१४॥ सरिता-सरोवरींचीं पैं जळें । पद्म-गंधें सु-शीतळें । रातोत्पळें नीळोत्पळें । सितोत्पळें कन-काचीं ॥ १५ ॥ तेथें राजहंस कारंडक । चकोर सारस चक्रवाक । करींद्र करिणी करि-शावक । स्वेच्छा करिती जल-क्रीडा ॥ १६ ॥ मयूर गर्जती किंकारें । कोकिळा गर्जती पंचम स्वरें । षट्पद बोलती झुंकारें । आणि कपोतें कूजती ॥ १७ ॥ सदा सर्वदा पुष्पीं फळीं । वृक्ष लवती भू-मंडळीं । जैसा कुळीन ऐश्वर्य-काळीं । विनयें भजे सर्वांतें ॥ १८ ॥ नदी मालिनी पवित्र-जीवनी । वाहे जैसी देव-तटिनी । तरंग-लिंगें सुफेन-सुमनीं । सु-पूजित शोभती ॥ १९ ॥... ......। राहवूनि सेना प्रधान । निःसंग एकाकी आपण । कश्यपाश्रमीं प्रवेशे ॥ २० ॥ अवलोकोनि कश्यपाश्रम । अंतरीं पाहे नृप-सत्तम । तंव कण्व-ऋषीचा आश्रम । अति रमणीय देखिला ॥ २१ ॥ आदरें येऊ-नियां निकटीं । अंतरीं पाहे पर्ण-कुटी । मनुष्यावीण सर्व सृष्टी । गृह-सामुग्री दिसताहे ॥ २२ ॥ मग गर्जोनि नराधीशें । म्हणे, 'या आश्रमीं कोण असे ?'। हें परिसोनि इंदिरा-वेशें । लावण्य-कलिका साजिरी ॥ २३ ॥ कनक-लतिका सौदामिनी । कीं चंद्र-कळा तनु-धारिणी । सुवर्ण-केतकी-पत्र-वर्णी । सुगंध-खाणी हरिणाक्षी ॥ २४ ॥ रूप-यौवन-चातुर्य-भरिता । बाहेर पातली मुनीश्वर-दुहिता । अत्यादरें धरित्री-कांता । पवित्रासन वोपिलें ॥ २५ ॥ स्वागत पुसोनियां वचनीं । अर्घ्य-पाद्यादि पूजनीं । राजा तोषवोनि बहु-मानी । कुशल-वृत्त विचारिलें ॥ ॥ २६ ॥ 'दर्शनें आनंद झाला नयनां । नाम अभिधान करावें श्रवणा । परिचय-ज्ञानें अंतःकरणा । आप्त-भाव भेटवणें' ॥ २७ ॥ ऐकोनि चातु-र्याच्या गोष्टी । राजा चमत्कारला पोटीं । म्हणे 'हे वयें धाकुटी ।

विचारें वृद्ध दिसताहे' ॥ २८ ॥ मग म्हणे, 'वो सु-लक्षणे ।! गुणालय कमलेक्षणे । तुझेनि वचन-मात्रें क्षणें । श्रम सर्वही हरपला ॥ २९ ॥ मैथिली-नरेंद्र-पुत्र जगती । दुष्यंत-राजा चक्र-वर्ती । ऐकिला असेल तरि हे मूर्ती । वोळखें दृष्टी सुजाणे ! ॥ ३० ॥ कण्व-ऋषींचें दर्शन । इच्छून येथें ममागमन । केव्हां होईल बोल वचन । विलंबें कीं अ-विलंबें ?' ॥३१॥ शकुंतला म्हणे, 'नृपती ! । मम पिता विवेक-मूर्ती । वन-फळें घेऊनि शीघ्र-गती । आतांचि येईल आश्रमा ॥ ३२ ॥ यालागीं नरेंद्र-चूडामणी ! । क्षणेक बसावें स्वस्थ होउनि । इच्छित कामना ऋषि-दर्शनीं । पूर्ण होईल निर्धारें' ॥ ३३ ॥

आदिपर्व, अ. १५. —मुक्तेश्वर.

---

## २१ स्वहितसाधन.

### अभंग.

१

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तोचि तापे जाऊनियां ॥१॥
उदक म्हणे काय या हो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥ २ ॥
काय वस्त्र म्हणे या हो मज नेसा । आपुले स्व-इच्छा जग वोढी ॥३॥
तुकया-स्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारालागूनियां ॥ ४॥

२

मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥ १ ॥
याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥२॥
उदक अन्न काय म्हणे मज खाय । भुकेला तो जाय चोजवीत ॥ ३ ॥
व्याधी पीडिला धांवे वैद्याचिया घरा। दुःखाच्या परिहारा आपुलिया४
तुका म्हणे जया आपुलें स्व-हित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥ ५ ॥

३

लोहो परिसासीं रूसलें । सोनेपणासी मूकलें ॥ १ ॥
एथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥
गंगा आली आळश्यावरी । आळशी देखोनि पळे दूरी ॥ ३ ॥

पुणे मराठी ग्रंथालय स्थापना ... ग्रं. १८३३

गांवाखालील ओहळ । रागें गंगेसी न मिळे ॥ ४ ॥
तुका केशवाचा दास । गुरूसी न भजे शिष्य ॥ ५ ॥

गाथा. —तुकाराम.

---

## २२ विरामचिन्हें.

श्लोक-शार्दूलविक्रीडित.

जेव्हां जीवन-लेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला ।
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला ॥
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे ।
तेव्हां ' स्वल्प विराम ' मात्र दिसती स्वच्छंद चौंहींकडे ॥ १ ॥
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठ असे ? ।
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ? ॥
जें तें पाहुनि यापरी भकतसें दृक् संशयें टाकित ।
सारा जीवन-लेख मी करितसें तैं ' प्रश्न-चिह्नां ' कित ॥ २ ॥
अर्धांगी पुढती करी वश मना, शृंगार-देवी नटे ।
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे ॥
प्रेमानें मग एक-जीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये ।
केला ' अर्धविराम ' तेथ; गमलें येथून हालूं नये ! ॥ ३ ॥
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं ।
दिक्कालादि अनंत-रूप बघतां मी होय वेड्यापरी ॥
सूक्ष्म-स्थूलहि सारखीं भ्रमविती; लागे मुळीं अंत न ।
त्या काळीं मग जाहलें सहजचि ' उद्गार-वाची ' मन ॥ ४ ॥
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्ति-प्रभा, सयश ।
हीं एकैक समर्थ आज नसती चित्ता कराया वश ॥
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला ।
देवा ! ' पूर्ण विराम ' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला ॥ ५ ॥

वाग्वैजयंती. —गोविंदाग्रज.

---

# २३ निर्झरास.

### गाणें.

गिरि-शिखरें वन-मालाही । दरी दरी घुमवित येई ! ॥
कड्यावरुनि घेऊन उड्या । खेळ लता-वलयीं फुगड्या ॥
घे लोळण खडकावरती । फिर गरगर अंगाभंवतीं ॥
जा हळुहळु वळसे घेत । लपत छपत हिरवाळींत ॥
पाचूंचीं हिरवीं रानें । झुलव गडे ! झुळुझुळु गानें ॥
वसंत-मंडप वन-राई । आंब्याची पुढती येई ॥
श्रमलासी खेळुनि खेळ । नीज सुखें क्षणभर बाळ ! ॥
हीं पुढचीं पिंवळीं शेतें । सळसळती गाती गीतें ॥
झोंप कोठुनी तुला तरी । हांस लाडक्या ! नाच करीं ॥
बाल-झरा तूं बाल-गुणी । बाल्यचि रे भरिसी भुवनीं ! ॥

*           *           *           *

बाल-तरु हे चोंहिकडे । ताल तुला देतात गडे ! ॥
प्रेम-भरें त्यांवर तूंहि । मुक्ता-मणि उधळुन देई ! ॥
बुदबुद-लहरी-फुलवेली । फुलव सारख्या भंवताली ॥
सौंदर्यें हृदयामधलीं । दे विश्वीं उधळून खुलीं ॥
गर्द सावल्या सुखदायी । वेलींची फुगडी होई ! ॥
इवलालीं गवतावरती । रान-फुलें फुलती हंसती ॥
झुलवित अपुले तुरे तुरे । निळी लव्हाळी दाट भरे ॥
जादूनेंच तुझ्या बा रे ! । वन नंदन बनलें सारें ! ॥
सौंदर्याचा दिव्य झरा । बाल-वसंतचि तूं चतुरा ॥
या लहरी-लहरीमधुनी । स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं ! ॥

*           *           *           *

आकाशामधुनी जाती । मेघांच्या सुंदर पंक्ति ॥
इंद्र-धनूची कमान ती । ती संध्या खुलते वरती ॥
रम्य तारका लुकलुकती । नीलारुण-फलकावरती ॥
शुभ्र चंद्रिका नाच करी । स्वर्ग-धरेवर एकपरी ॥

हीं दिव्यें येती तुजला । रात्रंदिन भेटायाला ! ॥
वेधुनि त्यांच्या तेजानें । विसरुनियां अवघीं भानें ॥
धुंद हृदय तव परोपरी । मग उसळी लहरी लहरी ॥
त्या लहरींमधुनी झरती । दिव्य तुझ्या संगीत-तति ! ॥
नवल न, त्या प्राशायाला । स्वर्गहि जर भूवर आला! ॥
गंधर्वा तव गायन रे ! । वेड लाविना कुणा बरें ! ॥

* * * *

पर्वत हा, ही दरी दरी । तव गीतें भरलीं सारीं ॥
गाण्यानें भरलीं रानें । वर खालीं गाणें गाणें ॥
गीत-मय स्थिर-चर झालें । गीतमय ब्रह्मांड डुले ॥
व्यक्त तसें अव्यक्तहि तें । तव गीतें डुलतें झुलतें ! ॥
मुरलीच्या काढित ताना । वृंदावनिं खेळे कान्हा ॥
धुंद करुनि तो नाद-गुणें । जडताही हंसवी गानें ॥
दिव्य तयाच्या वेणुपरी । तूंहि निर्झरा ! नवल परी—॥
गाउनि हें झुळझुळ गान । विश्वाचें हरिसी भान ! ॥
गोपि तुझ्या हिरव्या वेली । रास खेळती भंवतालीं ! ॥
तुझ्या वेणुचा सूर तरी । चराचरावर राज्य करी ! ॥

* * * *

काव्य-देविचा प्राण खरा । तूंच निर्झरा ! कवीश्वरा ! ॥
या दिव्याच्या धुंदि-गुणें । दिव्याला गासी गाणें ॥
मी कवितेचा दास, मला—। कवी बोलती जगांतला ॥
परि न झरे माझ्या गानीं । दिव्यांची असली श्रेणी ! ॥
जडतेला खिळुनी राही । हृदय-बंध उकलत नाहीं ! ॥
दिव्य-रसीं विरणें जीव । जीवित हें याचें नांव ॥
तें जीवित न मिळे मातें । मग कुठुनी असलीं गीतें ? ॥
दिव्यांची सुंदर माला । ओवाळी अक्षय तुजला ! ॥
तूंच खरा कविराज गुणी । सरस्वतीचा कंठ-मणि ! ॥
अक्षय तव गायन वाहे । अक्षयांत नांदत राहे ! ॥

* * * *

शिकवीं रे शिकवीं मातें । दिव्य तुझीं असलीं गीतें ॥
फुलवेली-लहरी असल्या । मम हृदयीं उसळोत खुल्या ॥
वृत्ति-लता ठायीं ठायीं । विकसूं दे सौंदर्यीही ॥
प्रेमझरी-काव्यस्फूर्ति । ती आत्म-ज्योती चित्तीं ॥
प्रकटवुनी चवदा भुवनीं । दिव्य तिचें पसरीं पाणी ॥
अद्वैताचें राज्य गडे । अविच्छिन्न मग चोंहिकडे ॥
प्रेम-शांति-सौंदर्यांही । वेडावुनि वसुधा-माई—॥
मम हृदयां गाइल गाणीं । रम्य तुझ्या झुळझुळ वाणी ॥
आणि जसें सगळें रान । गातें तव मंजुळ गान ॥
तेविं सृष्टिची सतार ही । गाइल मम गाणीं कांहीं ! ॥

बालकवींची समग्र कविता, भा. १. —बालकवि

---

## २४ नारायणाची शांति.

पूर्वी नारायण नामक ऋषीनें बदरिकाश्रमांत राहून तप आरंभिलें. तेव्हां आपल्या दिव्य तपश्चरणानें हा आपलें इन्द्रपद बळकावील अशी इन्द्रास धास्ती वाटून त्यानें कामक्रोधादि मंडळी अप्सरांसह त्याच्या तपाचा भंग करण्याकरितां पाठविली. त्या प्रसंगीं नारायणानें आपली शांति बिलकुल ढळूं न देतां निर्विकार प्रेमानें त्यांचें आदरातिथ्य केलें. तेणेंकरून तीं फजित झालीं. तो प्रसंग एथें वर्णिलेला आहे.

### ओंव्या.

ऐसा नारायणाचा प्रताप । देखोनि निष्ठा दृढ तप । तेणें इंद्रासि आला कंप । म्हणे स्वर्ग निष्पाप घेईल माझा ॥१॥ त्याचें तप देखोनि परम । म्हणे गेलें गेलें स्वर्ग-धाम । इन्द्रें कोपें प्रेरिला काम । अप्सरा-संभ्रम-समवेत ॥ २ ॥ काम-समवेत अप्सरा । सवें वसंतही दूसरा । क्रोध अवघियां पुढारा । जो तापसांतें पुरा नागवी सदा ॥ ३ ॥ ऐशीं मिळोनियां बिरुदाइतें । आलीं बदरिकाश्रमा समस्तें । नारायणु तप करी जेथें । उठावलीं तेथें अतिआक्रमेंसी ॥४॥ वसंतें शृंगारिलें वन । कोकिळा कळ-रवें गायन । सु-गंध शीतळ झळके पवन । पराग संपूर्ण वर्षती सुमनें

॥ ५ ॥ शस्त्रें तोडितां आकाशासी । आकाश स्वयें सावकाशी । तेवीं कामें छळितां नारायणासी । तो निज-संतोषी निर्द्वन्द्व ॥ ६ ॥ नेणतां नारायण-महिमे । धांवोनि घाला घातला कामें । तेव्हां अवघींच पराक्रमें । स्व-निंद्य-कर्में लाजलीं ॥ ७ ॥ तेथें अवघीं झालीं पराङ्मुखें । पाठमोरीं निघालीं अधोमुखें । तेव्हां त्यांची गति निःशेखें । नारायण देखे खुंटली ॥ ८ ॥ इंद्रिय-नियंता नारायण । नेणूनि छळूं गेलीं आपण । यापुढती पुनरागमन । सर्वथा जाण करवेना ॥ ९ ॥ मागें न निघवे निश्चितें । ऐसें जाणोनि समस्तें । थोर गजबजिलीं तेथें । भय-चकितें व्याकुळ ॥ १० ॥ जाणोनि नारायण-प्रताप । आतां कोपून देईल शाप । येणें धाकें म्लान-रूप । अति सकंप भय-भीत ॥ ११ ॥ ऐशी देखोनि त्यांची स्थिती । कृपेनें तुष्टला कृपा-मूर्ती । अणुमात्र कोप न ये चित्तीं । अभिनव शांती नारायणाची ॥ १२ ॥ इन्द्रें केला अपराध । तरी नारायणासि न येचि क्रोध । बापु निज-शांती अगाध । न मनीं विरुद्ध कामादिकांचें ॥ १३ ॥ न येचि कामादिकांवरी कोप । इन्द्रासही नेदीच शाप । नारायणाच्या ठायीं अल्प । कदा विकल्प नुपजेचि ॥ १४ ॥ अपकाऱ्यावरी जो कोपला । तो तत्काळ कोपें नागविला । अपकाऱ्या जेणें उपकार केला । तोचि लाधला परमार्था ॥ १५ ॥ अपकाऱ्यां उपकार करिती । त्याचि नांव गा परम शांती । ते शांतीची निज-स्थिती । दावी लोकांप्रती आचरोनी ॥ १६ ॥ भय-भीत कामादिक । अप्सरा-गण साशंक । त्यांतें अभय-दानें सुख । देऊनियां देख नारायण बोले ॥ १७ ॥ अहो काम-वसंतादिक स्वामी । कृपा करून आलेति तुम्ही । तुमचेनि पदागमीं । आश्रम-भूमी पुनीत झाली ॥ १८ ॥ तुमचें झालिया आगमन । अवश्य करावें आम्हीं पूजन । हेंचि आमुचें अनुष्ठान । कांहीं बळि-दान अंगीकारा ॥ १९ ॥ अवो अप्सरा देव-कांता । तुम्ही भिऊं नका सर्वथा । एथें आलिया समस्ता । पूज्य सर्व तुम्ही मज ॥ २० ॥ आश्रमा आलिया अतिथी । जे कोणी पूजा न करिती । त्यांची शून्य पुण्य-संपत्ती । आश्रम-स्थिती शून्य होय ॥ २१ ॥ तुम्हीं नांगीकारितां पूजन । कांहीं न घेतां बळिदान । गेल्या, आश्रम हा होईल शून्य । यालागीं कृपा करून पूजा घ्यावी ॥ २२ ॥ ऐसें बोलिला

तयांप्रती । परी माझी हे अगाध शांती । हेही नारायणाचे चित्तीं । गर्व-स्थिती असेना ॥ २३ ॥ जो नित्य नाचवी सुर-नरांसी । ज्या भेणें तप सोडिलें तापसीं । त्या अभय देवोनि काम-क्रोधांसी । आपणापासीं राहाविलें ॥ २४ ॥ एवं अ-भय देत नारायण । स्व-मुखें बोलिला आपण ॥ तेणें कामादि अप्सरा-गण । लाजाविरोन अधोमुख झालीं ॥ २५ ॥

एकनाथी भागवत, अ. ४. —एकनाथ.

---

## २५ सत्संगमहिमा.

### श्लोक.

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहावरी ।
तें भासे नलिनी-दलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ॥
तें स्वातीस्तव अब्धि-शुक्ति-पुटकीं मोतीं घडे नेटकें ।
जाणा उत्तम-मध्यमाधम-दशा संसर्ग-योगें टिके ॥ १ ॥
खरें वचन बोलवी, जडपणास कीं मालवी ।
महोन्नतिस डोलवी, दुरित मारुनी चालवी ॥
मनीं सुख अमोल वी, यश जगत्रयीं कालवी ।
अनेक गुण पालवी, सुजन-संगती झूलवी ॥ २ ॥
हेमाद्रि वा रजत-पर्वत कायसे ते ।
अंतीं तरू तरुचि केवळ जाण जेथें ॥
मानूं खरा मलय आश्रित वृक्ष ज्याचे ।
कंकोल, निंब, पद पावति चंदनाचे ॥ ३ ॥

नीतिशतक. —वामनपंडित.

---

## २६ सत्संगमहिमा.

### आर्या.

सत्संग अति-श्रेष्ठ, श्रेयस्कर, म्हणुनि सुज्ञ या गाती ।
यातें भजतां सिद्धि-प्राप्ति असे जी, न योग-यागा ती ॥ १ ॥

लीलेनें देतो जें सत्संग नता, न दे पद पिता तें ।
जरि राज्य दिलें, केलें नच पुत्राचें बरें तदपि तातें ॥ २ ॥
सत्संगति करिताहे लीला-लेशेंकरूनि जेंवि हित ।
न तसें माता जाणे संसारामाजि मात्र जें विहित ॥ ३ ॥
सत्संग म्हणे, 'सेवा मज, पावायासि कंजनाभा गा ।
अक्षय धन दाखविता मीच, न साधूनि अंजना भागा' ॥ ४ ॥
सत्संगाचि हित, इतरीं दिसतो प्रेमा परंतु पातळ तो ।
जोंवरि कार्या येतो जन, त्यातें तोंवरीच आतळतो ॥ ५ ॥
सत्संगाची देती ताशि इतराची कधीं न तोख दया ।
दुःसह चिर-कालामय भव हा, सत्संग होय ओखद या ॥ ६ ॥
सत्संगति-प्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले ।
सरले दोष; सकल जन न तरावे जे कधींहि ते तरले ॥ ७ ॥
प्रणतीं प्रसन्नपण जें सत्संगाचें, धरूनि शिखिता, तें—।
भस्मचि करितें सहसा सकळाही चित्रगुप्त-लिखितातें ॥ ८ ॥
अत्यद्भुता, मधुरता जीची विश्वांत भरुनियां उरली ।
सत्संगति मन हरि ती श्री-व्रज-पति-सूनुची जशी मुरली ॥ ९ ॥
जीं हरि-हर-प्रसादीं कल्याणें वसति, साधु-संगीं तीं ।
अघ शमतें, सुख गमतें, मन रमतें जेंवि दिव्य संगीतीं ॥ १० ॥
सत्संगमींच नाना-दुःखार्त तथापि, चित्त रंगतसे ।
जलनिधि-तरंग वातें, सत्संगें उठति चित्तरंग, तसे ॥ ११ ॥
स्पर्श-मणि सुवर्ण करी, दे स्पर्श-मणित्व तो न लोहातें ।
हा साधु-संग करितो साधु असाधुसि, हरूनि मोहातें ॥ १२ ॥
जळद बळद सस्याला, हरि-भजना साधु-संग हा बळद ।
मुक्तिस मुमुक्षुस करें आपण सत्संग लावितो हळद ॥ १३ ॥

सत्संगस्तव. —मोरोपंत.

---

## २७ साधूचीं लक्षणें.

### आर्या

अनता अपवित्राही साधु हित, जसा नता पवित्रास ।
साधु सुहृत् सर्वांचा, कोणासहि दे न ताप, वित्रास ॥ १ ॥
खळ निंदी, साधु रडे; पुसतां ‘ यास्तवच मी ’ म्हणे ‘ रडलों ’ ।
नरकीं पचेल निंदक, या दुःसह दुःख-सागरीं पडलों ’ ॥ २ ॥
मातेचे पाय जसे, छळ करित्याचे तसेचि जो पाहे ।
साधु निवे नच कोपे, न दुरुक्त-क्षोभ मानसीं राहे ॥ ३ ॥
वाढवि अन्याणु-गुणा साधु सदा, वायु जेंवि फुणगीतें ॥
सु-यशानें जरि साजे, लाजे परि फार आत्म-गुण-गीतें ॥ ४ ॥
ज्यासह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात ।
त्या ‘ मित्र ’ साधु म्हणती, देतीच व्यसन-सागरीं हात ॥ ५ ॥
प्रणत जनाचें जाया सिद्धिप्रति सर्व योजिलें कार्य ।
साधु मरण पथकारिती; ऐशी सद्रीति वर्णिती आर्य ॥ ६ ॥
निंदा, शापहि, घ्यावा, परि ‘ हरिस भजा ’ असेंचि सांगावें ।
हें सच्छील त्यागुनि, कुशलें तीर्थादि अन्य कां गावें ? ॥ ७ ॥
साधु, प्राणी पाहुनि संसारीं तापले, अ-सुख पावे ।
‘ व्हावें जग मुदित ’ म्हणे, ‘ तद्दुःखें आपले असु खपावे ’ ॥ ८ ॥

साधुरीति. —मोरोपंत.

---

## २८ देवापाशीं मागणें.

### आर्या.

सत्संगतीं असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं ।
रम्यहि अ-भक्त हो मज, मधुपा चंपक तसा, अ-सेव्य जनीं ॥ १ ॥
कांपावें मन कु-जनीं, वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें ।
सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें ॥ २ ॥

प्रिय हरि-जन हो जैसा आला माहेरचा वहायाला ।
स्त्री-जन जसा विवाहा, जावें म्यां सज्जना पहायाला ॥ ३ ॥
वत्स जसा स्तन्यातें सादर पीतो धरूनि आम्यातें ।
जें साधु-मुखोद्गत यश, तैसें प्यावें, करूनि आ, म्यां तें ॥ ४ ॥
जैसें अंधें वृद्धें नसतां गति-हेतु हस्तकीं यष्टी ।
तैसें व्हावें सज्जन-संगतिवांचुनि उदंड म्यां कष्टी ॥ ५ ॥
संसार-दुःख विसरवु सत्पद्धति मतिस, जेंवि काय घडी—।
वर-मायेसि विवाहीं विसरवि चवरी गुलाल पायघडी ॥ ६ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंचि हळदीनें ।
भजन न सोडावें म्यां, जेंवि कधीं कर्षकें न हळ दीनें ॥ ७ ॥
निज-देह-गेह-भान प्रभु-भक्तांच्या कधींहि मेळांत ।
मज कीर्तनीं नसावें, जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ ८ ॥
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा ।
मन्मति विनयादि-गुणां वाहो, प्रेमें नगां जसी मुग्धा ॥ ९ ॥
भव-गज-भय शमवाया वृत्ती हरि-कीर्तनींच राखावी ।
पित्त-निवारक जैसी सुलभ बरी शुंठि-शर्करा खावी ॥ १० ॥
नच सोडावें नारायण-नामानें कदापि हें वदन ।
मेल्याही लोभ्याच्या चित्तीं सोडूं नये जसें सदन ॥ ११ ॥
ज्यांचे चित्तीं हरि-हर, तत्संगति दे सदा मला देवा ।
दे त्वद्भजनीं बुद्धी आवड पुरवुनि तुझीच पद-सेवा ॥ १२ ॥

सन्मनोरथराजि. —मोरोपंत.

---

## सर दुसरा समाप्त.

---

ॐतत्सत्.

# सर ३ रा.

## १ ईशस्तवन.

### भूपाळी.

उठिं रे! गोपाळा! उघडीं स्वरूप-लोचना ।
सरलि अविद्या-राती उदयो झाला रवि-किरणा ॥
इंद्रिय-गोधन नेईं निर्गुण-कानना ।
सुटलीं मानस-वत्सें तुजविण नाकळती कोणा ॥ ध्रु० ॥
प्रबोध-पहांट झाली, सरले तिमर-तमरज ।
गुरुकृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज ॥
आत्मा-दिनकर पाठीं प्रगटे तात्काळिक सहज ।
जिव-चद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज ॥ १ ॥
दृश्यभास चांदणिया असते ठायिंच लोपलिया ।
लिंगदेह-कमळींचे मधुकर सुटले आपसया ॥
बुद्धिबाध-चक्रवाकें मिनलीं आपाणियां ।
देहबुद्धि-कुमुदिनी सुकोनी गेलीसे विलया ॥ २ ॥
योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं ।
उपनिषद्वाथार्थ शब्द केला कोकिळीं ॥
वाग्वादाचे उलूक निघती मौनाचे ढोलीं ।
विकल्प-अटवी साही चोरीं सांडियली ॥ ३ ॥
विराग-रश्मीजवळी धरितां चित्त-रविकांत ।
आत्मा-वह्नि प्रगटे विषय-वन हें जाळीत ॥
तृष्णेच्या श्वापदावरी प्रळय अद्भुत ।
विश्व हें लटिकें मूढा मृगजळवत ॥ ४ ॥
जारव्यसनीं जीव हा झाला उदमी सुविचार ।
वासना-कुंटिणिचा सहजें खुंटला व्यापार ॥
लीलाविश्वंभरस्वामी उठिला सत्वर ।
चाले मुक्तेश्वर संगें धरूनियां कर ॥ ५ ॥

—मुक्तेश्वर.

## २ भीषणरात्रिवर्णन.

### ओंव्या.

भीमसेन पाहे दृष्टी । तंव अंधकारें कोंदली सृष्टी । गुल्मलता वृक्ष-दाटीं । तृणें मार्ग लक्षेना ॥ १ ॥ निशाचरी श्वापद पक्षी । थोर गर्जना करिती कक्षीं । वोळकंबलीं महावृक्षीं । आस्वलें आणि वाघुळें ॥ २ ॥ वन-देवता यक्षिणी-पाळें । धुमस घालिती गदारोळें । दीपिका लावूनि भंबाळें । गुप्त होती एकसरा ॥ ३ ॥ प्रेत-गण स्मशानवासी । रूपें धरून भ्यासुर वेषीं । छळिती अशुचि मानवांसी । झोंबती मांस भक्षावया ॥ ४ ॥ दिवाभीतांचे घुंगाट । पिंगाळियांचे किलकिलाट । भालू भुंकती सैराट । टिटवे थोर टिवटिवती ॥ ५ ॥ चक्रवाकांचे आर्त-स्वरीं । कुमदीं भ्रमरांचे झुंकारीं । मस्तक-मणी-तेज-विखरीं । जीव आहारा शोधिती ॥ ६ ॥ असो; हे निशा दाटली काळी । जेवीं काळ पुरुषाची कांबळी । ब्रह्मांड-देवतेवरी सगळी । पांघुरविली आप्तत्वें ॥ ७ ॥

आदिपर्व, अ. ३६. —मुक्तेश्वर.

---

## ३ प्रभातकाल.

### ओंव्या.

शेष वेचतां अठरा घटिका । पूर्व-दिशेनें क्षाळिलें मुखा । कुंकुम रेखिलें त्या तिलका । अरुणोदय बोलिजे ॥ १ ॥ भार्गवाचार्य उदया येत । तंव अपार क्रमूनियां पंथ । पुढें जाह्नवी-जळाचा वात । शीतळ मंद पातला ॥२॥ हस्त आवरितां कुमुदीं । अवमान मानिला षट्पदीं । त्यांतें आदरें कोकनदीं । पाचारिलें जवळिके ॥ ३॥ कुक्कुट-रव करितां 'का का'। भयें पळ सुटला उलूकां । भेटावया चक्रवाकां । चक्र-वाकी चालिल्या ॥ ४ ॥ गगन-समुद्रीं मुक्ताफळें । अरुण-चंचूनें कनक-मराळें । वेंचूनि घेतां कळा-कुशळें । नाहींच केलीं नक्षत्रें ॥ ५ ॥ कीं व्योम-नर्मदेमाजी थोर । कार्तवीर्य सहस्र-कर । तारा-बाणलिंगांचा

भार । निवटोनि करी परीता ॥६॥ कापडी चालिले तीर्थ-पंथें । 'सोऽहमस्मि' चिंतिती ज्ञाते । भक्त स्मरती हरि-हरांतें । प्रेम-भावें आवडी ॥७॥ शाक्त चिंतिती शक्ति-प्रतिमा । सौर म्हणती 'सूर्यचि आत्मा'। गाणपत्य गणेश-महिमा-। वाखाणिती ब्रह्मत्वें ॥ ८ ॥ प्रातर्होम यावया जाणा । अग्नि-होत्री उठिले स्नाना । एक सिद्ध झाले अनुष्ठाना । जपी तपी सु-नेमें ॥ ९ ॥

आदिपर्व, अ. ३६. —मुक्तेश्वर.

---

## ४ वर्षावर्णन.

### वसंततिलका.

हा मेघ आर्द्र-महिषोदर-तुल्य काळा ।
शंखाकृती धरि करांत बलाक-माळा ॥
विद्युत्-प्रभा वसन पीत कसोनि हातें ।
वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें ॥ १ ॥

### ओंवी.

मेघोदरांतूनि जलाच्या धारा । भूमीवरी पडती झरारा ।
जैशा शुद्ध रजताच्या तारा । विद्युत्-प्रकाशें झळकती ॥ २ ॥

### शार्दूलविक्रीडित.

कांहीं हंस-मयूर-काक-बकसे वेगें उडों पाहती ।
कांहीं कांसव-मीन-नक्र-सुसरी पाण्यामधें पोहती ॥
कांहीं पर्वत-वृक्ष-तुंग-शिखर-प्रासादसे दीसती ।
वातें हालवितां नभीं घन असे नानाकृती शोभती ॥ ३ ॥
भासे कौरव-राष्ट्र-तुल्य नभ हें जें अंधकारा धरी ।
हर्षानें बहु गर्जना करि शिखी दुर्योधनाचे परी ॥
यूतीं निर्जित धर्मसा पिक वनीं आला असे संप्रती ।
गेले स्त्रीसह हंस-पांडव तसे अज्ञात-वासाप्रती ॥ ४ ॥

### वसंततिलका.

होऊनि शैल-शिखरावरि लंबमान ।
हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान ॥
ऐकोनि शब्द, उडती शिखि पक्ष-पातें ।
कीं वीजिती मणिमय-व्यजनीं नभातें ॥ ५ ॥

### शार्दूलविक्रीडित.

धारा-जर्जर दर्दुर प्रसरती, पंकीं उड्या घालिती ।
झाले मोर विमुक्त-कंठ, फुललीं झाडें पहा डोलती ॥
साधूला खळ-मंडळी, तशिच ही चंद्रास मेघावली ।
झांकी, ती कुलटेसमान चपला राहे न एके स्थळीं ॥ ६ ॥

### आर्या.

पवनचि जवन तुरग ज्या, जलमय-धाराचि शस्त्र-धारा ज्या ।
ज्या स्तनित दुंदुभि-ध्वनि, शोभे विद्युत् पताक ज्या राजा ॥ ७ ॥
तो मेघ-राज नेतो हरुनि नभीं कर-समूह चंद्राचा ।
राजा जसा स्व-नगरा नेतो कर-भार अ-बल शत्रूचा ॥ ८ ॥

### ओंव्या.

तारा गेल्या नाशाप्रती । जैशी दुर्जनावरी उपकृती ।
कांत-वियुक्त युवती । तैशा भासती दशदिशा ॥ ९ ॥
पेटतां विद्युल्लता-ज्वलन । अतरीं गेलें संतापोन ।
वाटे विरघळलें गगन । जळ-रूपें पडतसे ॥ १० ॥

### आर्या.

उतरे चढेहि वर्षे गर्जे पाडी घनांधकारातें ।
प्राप्त-नव-श्री-पुरुषापरि मेघ धरी अनेक रूपांतें ॥ ११ ॥

### उपजाति.

विद्युल्लतांनीं जळतेंच काय । धारा-जळांनीं गळतेंच काय ॥
बलाहकांनीं हंसतेंच काय । वायु-भ्रमें निःश्वसतेंच काय ॥ १२ ॥

### इंद्रवज्रा.

मेघोदरा भेदुनियां निघाल्या । पंकांतुनी जेविं मृणालि आल्या ॥
धाराच चंद्र-व्यसनें हजारा । सोडीतसे हें दिव अश्रु-धारा ॥ १३ ॥

### अनुष्टुप्.

तमाल-पिष्ट-नीलांनीं । मेघांनीं नभ लिंपिलें ।
संसक्त-शीत-सुरभि । वातांनीं उपवीजिलें ॥ १४ ॥

### ओंवी.

विद्युज्जिह्वा लांबवूनी । जलधर-हनुवटी खालवोनी ॥
इंद्रचाप-भुज उभारोनी । जांभई देतें अंतरिक्ष ॥ १५ ॥

### उपजाति.

ताडावरी कर्कश शब्द होतो । जळीं स्थळीं केवळ मंद हो तो ॥
जशा विण्याच्या झडतात तारा । तालानुसारें पडतात धारा ॥ १६ ॥

मृच्छकटिक. —प. ब. गोडबोले.

---

## ५ वर्षाकाल.

### ओंव्या.

...पातला वर्षा-काळ । पंचम ऋतु झाला प्रबळ । सुटला पश्चिमेचा अनिळ । मेघ-माला मोकली ॥ १ ॥ पृथ्वी-मंडळींचा जळ-राशी । पारधी पातला आकाशीं । पिटीत मृगांचे पाठीशीं । सैरा गगनीं धांवत ॥ २ ॥ इंद्र-चाप धरूनि मुष्टी । रोहिणी-मृगांचिया पाठीं । मेघ धारा-जीवन-वृष्टी । करीत वेगें पातला ॥ ३ ॥ सूर्यकिरण-मृगसमुदाय । निस्तेज होउनी पावले भय । लपावया शोधीत ठाय । अभ्रें आड करूनियां ॥ ४ ॥ कीं पृथ्वी-खंड त्या शाळुंका । अनेक पर्वत शिव-पिंडिका । इंद्रें मांडिलें अभिषेका । गगन-पात्रीं बहु-धारा ॥ ५ ॥ मयूर चातक कपोतक । दर्दुर करिती महाघोख । 'मेघ जगाचा पाळक'। सर्व लोकां जाणविती ॥ ६ ॥ विद्युल्लतांचे कडकडाट । घन-गर्जना गडग-

पुणे मराठी ग्रंथालय स्थापना

डाट । गंगादि सरितांचे संघाट । महापूर माजले ॥ ७ ॥ अठरा भार वनस्पती । अंकुर-वसनें वेढिली जगती । फळ शाका धान्य संपत्ती । पृथ्वी पिके जगातें ॥ ८ ॥ विष्णु जगाचा प्रतिपाळिता । तोचि मेघ होय तत्त्वतां । प्रमाण करूनी चंद्र-सविता । आप वोपी अयनांशें ॥ ९ ॥

वनपर्व, अ. १०. —मुक्तेश्वर.

---

# ६ कालियामर्दन.

यमुनेच्या डोहांत कालिया नांवाचा एक अत्यंत विषारी काळसर्प राहत असे. एके दिवशीं कृष्णाचे संवगडी असलेले कित्येक गोप व त्यांच्या गाई ह्या तहान लागली असतां त्या डोहाचें पाणी प्याल्या. त्यामुळें ते गोप व गाई सर्व लगेच मरण पावल्या. तेव्हां श्रीकृष्णानें त्या सर्पाचा नाश करण्याचें ठरविलें; 'श्रीकृष्ण काळा, यमुनाहि काळी । दंडूनि काळा फणि तेच काळीं । कालिंदिचें जीवन शुद्ध केलें,' तें 'कथामृत' एथें वर्णिलेलें आहे.

## श्लोक.

क्रुद्ध तो ऱ्हद-जळीं परमेशा । लक्षितो दुरुनि साप रमेशा ॥
त्या खळा फणिसही हरि पाहे । ते कथा परिस दिव्य नृपा ! हे ॥१॥
थोर वेग वदनीं रसनांचे । दुर्विषें प्रतिमुखीं रस नाचे ॥
दंत आंत शिशु भूमिधरांचे । प्रांत चाटित असे अधरांचे ॥ २ ॥
ज्याच्या विषाचे उदकीं चपेटे । वनाग्नि ज्याच्या नयनेंच पेटे ॥
देखे असा गर्व भुजंगमाचा । निर्माण-कर्ता स्थिर-जंगमाचा ॥ ३ ॥
जवळि खेळत खेळत पातला । झडप घालुनियां कर घातला ॥
गरगरां धरुनी भ्रमवी नभीं । गरुड सर्प जसा धरितां न भी ॥ ४ ॥

अही तोही पाहे अवसर डसायास हरिला ।
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिला ॥
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या ।
गती तत्प्राणांच्या सकळहि गळ्यामाजि चढल्या ॥ ५ ॥

नासिलें भ्रमवितांचि बळातें । क्षीण देखुनि खळा प्रबळातें ॥
शेपुटी धरि अधोमुख हातीं । कौतुकें स्व-जन सर्व पहाती ॥ ६ ॥

समग्रही सत्त्व अलक्ष (क्ष्य) यातें । नेलें तरी देह-बळ क्षयातें ॥
निःसत्त्व मानी फणि आपणातें । तरी बळें तो उचली फणांतें ॥ ७ ॥
अधोमुख श्रीहरि साप हातीं । धरी जसा गोप-स्त्रिया पहाती ॥
डसावया जों मुख सांवरी तो । वेगें हरी तों सहसा वरी तो ॥ ८ ॥
मुरडुनि नरडी करें दुजानें । धरुनि असें धरिलेंच पुच्छ ज्यानें ॥
रगडुनि फणि-कंठ कैटभारी । उपरि चढे करि नाट्य नीट भारी ॥९॥
फणांवरी सारथी पांडवाचा । आरंभ मांडी मग तांडवाचा ॥
पदांबुजीं देव-शिखा-मणीच्या । फणीचिया दीप्ति-शिखा मणीच्या १०
उदक चंचळ, चंचळ त्या फणा । फिरवितो फणि, जे रिति गोफणा॥
चपळ नृत्य करी वनिं मोकळा । सफळ ज्याकरितां सकळा कळा ११
जो प्रवर्तक विलास-कलांचा । जो कलाप्रद कला सकलांचा ॥
जे शिवादिक गुरू नटनाचे । त्यांसि आदि-गुरु तो नट नाचे ॥१२॥
जो रची अघटिता घटनातें । तो करी फणिवरी नटनातें ॥
काय विस्मय विलासमयाचा । हा कथा-रस तया समयाचा ॥१३॥
चपळ तो पळतो उदकावरी । उखळतो खळ तो हरि आवरी ॥
कुल-पती लपती फणि ते किती । भुजग ती जगती-तळ टाकिती ॥१४
आरंभिल्या ऊपरि नृत्य काय । तेथें करी कौतुक विश्व-काय ॥
देवीं कसा श्रीहरि पूजिला हो । श्रोत्यांसही ऊपरि तोचि लाहो ॥१५
विमानांतुनी वृंद वृंदारकांचे । नभीं मल्लिका-कुंद-मंदारकांचे ॥
फुलांचे समूह स्व-नाथावरी ते । बहू वर्षती, ज्यासि लक्ष्मी वरी ते १६
आणूनि नानाविध पूजनाचे । पदार्थ जेथें सुरराज नाचे ॥
ते पूजिती त्या पुरुषोत्तमातें । जो पूज्य सर्वां सुर-सत्तमांतें ॥ १७ ॥

हरिविलास अ. ३. —वामनपंडित.

---

## ७ नळराजगुणवर्णन.

### दिंडी.

चौगुणीनें जरि पूर्ण शीत-भानु । नळाऐसा तरि कला-निधी वानूं ॥
प्रतापाचा जो न मावळे भानू । तया सारीखा कोण दुजा मानूं ॥ १ ॥

### वसंततिलका.

चंद्रासि लागति कळा उपराग येतो ।
गंगेशि भंग बहु पाण-उतार होतो ॥
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ।
नाहीं समान नळराज-महायशाला ॥ २ ॥

### शार्दूलविक्रीडित.

वाजीचें मन जाणता, सकळही राजी शिपाई जया ।
याजी होउनियां द्विजांसि म्हणतो, या जी धनें घ्यावया ॥
त्याजी जो धनदापरी, सुकृत जें त्या जीव ऐसें गणी ।
गाजी तो नळ भूप, हूप धरुनी, गा जी गुणींच्या गणीं ॥ ३ ॥

### दिंडी.

लोक-बंधू जो होय रवीऐसा । कुवलयाला जो सुखद चंद्र जैसा ॥
सांग नोहे तो कुसुम-चाप तैसा । निषध-रायाशीं तुल्य-रूप कैसा ?॥४॥

### गीति.

नाडी-ज्ञान जयाचें, सरोग-बंधू चतुष्पद गणावे ।
सुत तेजी-तुरगीचे नळ-सम सुंदर कदापि न म्हणावे ॥ ५ ॥

### शिखरिणी.

कदा नेणों वोढी, शरधिंतुनि काढी शर कदा ।
कदा धन्वीं जोडी वरिवरिहि सोडी तरि कदा ॥
विपक्षाच्या वक्षावरि विवर-लक्षास्तव रणीं ।
कळे राजेंद्राची त्वरित शर-संधान-करणी ॥ ६ ॥

### वसंततिलका.

धाले धनी पुढिल याचक या नळाचे ।
येतां फिरोनि समुदाय पथीं तयांचे ॥
मागावयास जन मागिल देखियेले ।
त्यांहींच ते सकळ पूरित-काम केले ॥ ७॥
हे वामनैक-पद भूमि, नसोनि जंघी—।

एके दिशींच दिन-राज नभास लंघी ॥
वाराशि वानर-विलंघित होय तो कीं ।
लोकीं नसे नल-यशस्तुलना विलोकीं ॥ ८ ॥

### शार्दूलविक्रीडित.

जो पाहे सदसद्विचार हृदयीं, जोपा जनाची करी ।
जो पावे समयीं, विशेष गणिला जो पावनांभीतरीं ॥
सोपा जो सकळां द्विजां, सु-मतिचा सोपा, सदा लाभतो ।
कोपातें न धरीच तो नळ मही-गोपायिता शोभतो ॥ ९ ॥

जो धैर्यें धरसा, सहस्र-करसा तेजें, तमा दूरसा ।
जो रत्नाकरसा गभीर, शिरसा भूपां, यशोहारसा ॥
ज्ञाता जो सरसावला नव-रसांमाझारि शृंगारसा ।
शोभे तामरसाक्ष तो नळ रसा-नाथ स्तवूं फारसा ॥ १० ॥

नलदमयंतीस्वयंवराख्यान. —रघुनाथपंडित.

---

## ८ दमयंतीवर्णन.

### श्लोक—वसंततिलका.

जें अंतरंग पिंवळें सरसीरुहाचें ।
भासे मनांत मज अंग तसें तियेचें ॥
गोरोचनापरिस गौर असें गणावें ।
सोनेंच बावनकसी न कसें म्हणावें ? ॥ १ ॥

राया ! तिचें मुख सुधा-कर या द्वयाला ।
नाहींच वेगळिक हें गमतें मनाला ॥
संपूर्ण नित्य असता, नसता कलंकी ।
हा चंद्र, हें मुख, असें मग कोण शंकी ? ॥ २ ॥

चांफेकळीपरिसही सरलत्व नाकीं ।
जीचा धरी अधर विद्रुम-भावना कीं ॥

पुणे मराठी ग्रंथालय
९२
स्थापना
शके १८३३
ग्रंथालय शाखा

भासे मनांत मज बिंब-फळ-भ्रमानें ।
कीं सत्य चंचु-पुट वोढविलें शुकानें ॥ ३ ॥
धाता करींच करिता मृदु हे न होती ।
या कारणास्तव मनोमय मूस ओती ॥
तेथें भरोनि पहिला रस पूर्ण केली ।
ओतींव हे न घटिताकृति बोलिजेली ॥ ४ ॥

नलदमयंतीस्वयंवराख्यान. —रघुनाथपंडित.

---

## ९ पुण्यश्लोक नल !

विदर्भ देशच्या भीमक राजानें आपली उपवर कन्या दमयंती हिच्या स्वयंवराची योजना केली व राजेरजवाड्यांस निमंत्रण केलें—

### आर्या.

देवर्षि-मुखें परिसुनि शक्र करी धरुनि हरिख गमनातें ।
त्याच्या विमान येईल काय ? न येताचि हरि-खग मनातें ॥ १ ॥
जों निकट कुंडिनाच्या आले यम वरुण भूभृदर्यनळ ।
तों तोहि सकळ-सद्गुण-निधि पुण्य-श्लोक वीर-वर्य नळ ॥ २ ॥
ते सुर म्हणाति, ' अहाहा ! नळचि सकळ-पुरुष-मुकुट-हीर-मणी ।
नवरी न वरील कसी याला पाहोनि सु-मति ही रमणी ? ॥ ३ ॥
आम्हांलाचि न केवळ लावितसे व्यक्त लाज हा रविला ! ।
आम्हीं निज-तेजो-मद याचिपुढें सर्व आज हारविला ' ॥ ४ ॥
भेटोनि त्यासि म्हणती, ' कार्य-परें सर्वथा न लाजावें ।
हो अस्मद्दूत, विमुख न जनें सत्य-व्रता नला ! जावें ॥ ५ ॥
' होतों दूत ' नळ म्हणे, ' कार्य वदा, कोण हो ! तुम्ही चवघे ? ' ।
ओळख देउनि म्हणती, ' आम्ही भैम्यर्थ पातलों अवघे ॥ ६ ॥
भैमी स्वयें वरू या आम्हां चौघां जणांत अन्य-तमा ।
हें कार्य, दूत हो गा ! जा गा ! बा ! तीकडेचि धन्य-तमा ! ' ॥ ७ ॥
सस्मित-वदन नळ म्हणे, ' प्रभुजी ! जो हेतु सुर-वरागमनीं— ।
माझ्याहि तोचि, सर्वांहि मृगांच्या तुल्य सु-रव-राग मनीं ॥ ८ ॥

दूत करूनि मज तिकडे कार्यास्तव पाठवूं नको, पावा ।
कोण्हावरिहि सु-नय न स्वातिक्रम आठवून कोपावा ' ॥ ९ ॥
शक्र म्हणे, ' वदलासि प्रथम तसें वचन मग असें वदसी ।
अचळ करींच असावा व्यवहारीं शब्द, संगरीं सदसि ' ॥ १० ॥

भूप म्हणे, ' या कर्मीं पवनहि होईल मज न सांगाती ।
अंतःपुर-प्रवेशीं जी प्रभुजी ! युक्ति साधु सांगा ती ' ॥ ११ ॥
शक्र म्हणे, ' जा गा ! तूं चिंता आधींच करिशि कां गा ! ती ।
आम्हांसि हें कठिण जरि, तरि सुज्ञ प्रभु म्हणोनि कां गाती ? ॥ १२ ॥

शक्र-वरें नळ गेला शिरला अंतःपुरीं सुखें सुरसा—।
भैमीच्या हा, याच्या ती, सेवी रूप-संपदा सु-रसा ॥ १३ ॥
भैमी हर्षे त्याच्या विधुच्या तसि कुमुदिनी न आगमनीं ।
सत्कारूनि म्हणे, ' जी यावें मद्भाषणें न आग मनीं ॥ १४ ॥

सुंदर-वर कोण तुम्ही ? गुरुच्या वाटो न हें पराग मना ।
कीं जें जें अंतःपुर तें तेंहि विषय नव्हे परागमना ॥ १५ ॥
आलां कसे अ-वारित, कार्यार्थ प्रकट आयकों दावा ।
वाटे कर्णीं तुमचा वाङ्मय सौवर्ण-आय कोंदावा ! ' ॥ १६ ॥

वाहों लागे गुरु-घन-रस-पूरित वीरसेन-भू-पनळ ।
" सुंदरि ! मी पाशि-पितृप-पावक-पुरुहूत-दूत भूप नळ ॥ १७ ॥
सुमुखि ! प्रार्थिति बहु तुज ऐसें प्रभु लोक-पाळ ते चवघे ।
अवघे उणेचि रस; तूं दिव्य रसाचीच सर्वदा चव घे ॥ १८ ॥

' सुज्ञे ! तुवां वरावा आम्हां चौघां जणांत अन्य-तम ।
धन्य-तमत्व तुला यो, न शिवो पळ दयित-विरह-जन्य तम ' ॥१९॥
हांसोनि म्हणे भैमी, " 'प्रणति-प्रिय देव गुरु' असें म्हणती ।
त्यांहीं क्षमा करावी, स्वीकारावी यशोर्थ मत्प्रणती ॥ २० ॥

वरिलें हेचि चरण म्यां, त्यजितां ज्वलनांत काय होमीन ।
यज्जीवन जीवन तो दुग्धीं वांचेल काय हो मीन ? " ॥ २१ ॥
नळ नृप म्हणे, ' सुबुद्धे ! या दासावरि तिहीं न कोपावें ।
मदधिक कोटि-गुणें ते, आग्रह कांहीं धरूं नको पावें ॥ २२ ॥

स्थापना
गते १८३३

मृत्यु असो, पर-वंचन करुनि सुधेच्या जिणें नको पानें ।
त्वत्पाणि-ग्रहणें मी देवांच्या बहु शिणेन कोपानें ॥ २३ ॥
विदुषी म्हणे, “ म्हणा जा कीं ‘ म्यां कथिलें परोपरी पण ती—।
प्रणति प्रभूंसि करिती, ‘ अनुकंप्या मी स्वय-वरा ’ म्हणती ’ ॥२४॥
सत्संमत-स्वयंवर-विधिनें वरितां तुम्ही न अपराधी ।
काय करूं ! त्यजुनि तुम्हां माझी पळ अनुसरे न अपरा धी ॥ २५ ॥
होईल देह रंगीं सुरपति-नरपति-समक्ष नल-गामी ।
हा जन तुमच्याचि असे इतरा कोण्हाचियाहि न लगामीं ” ॥ २६ ॥
होय अकृत-कार्यहि नळ सुर-वर-संमत खरें निवेदून ।
सत्यें जसा, तसा न प्राज्येंहि सुधा-रसें निवे दून ॥ २७ ॥
रंगीं सर्व मिळाले तेव्हां आली तयांत दमयंती ।
जाणों चकोर ते, ती मूर्त-ज्योत्स्नाचि ताप-दमयंती ॥ २८ ॥
साहे न परोत्कर्षा ज्याची मति सच्छळीं सदानळसा ।
बैसे तिघांजणांसह हरिहि अधिष्ठूनि त्या सदा नळसा ॥ २९ ॥
रंगीं पाहों जातां दिसले चौघेहि ते धवासम जे ।
भैमी देव-कृत-च्छळ ऐसें चित्तांत तेधवां समजे ॥ ३० ॥
पांचां नळांत जेव्हां काय दिसेनाचि भेद लव तीस ।
बुद्धि म्हणे, ‘ कां भीसी, गुरु-चरणीं त्यजुनि खेद लवतीस ’ ॥ ३१ ॥
कर जोडूनि म्हणे ती, ‘ नळ भर्ता भीष्म-कन्यकेला हो ।
प्रभुजी स्वप्नांतहि जरि संकल्प नसेल अन्य केला हो ! ॥ ३२ ॥
नळ पति, इतर पुरुष पितृ-बंधु जरि मनांत मानिले असती ।
तरि ताराल इला हो प्रभुजी कैसी तरेल जी अ-सती ? ’ ॥ ३३ ॥
तीचा बलवान् निश्चय सुर-धृत नळ-रूप घे हिरावूनी ।
बहु तेज प्रकट करी शुचि सत्व-गुण च्छळीं, हिरा ऊनीं ॥ ३४ ॥
शुद्ध सवांग कुश नळद परि उपभोगोचितत्व नळदासी ।
ऐसें मनात आणुनि दमयंती सु-मति होय नळ-दासी ॥ ३५ ॥
पति-रूप सोडुनि ती लोकेशांचा प्रसाद साधूनी ।
घाली नळासि माळा, स्तविली प्रेम-प्रसन्न साधूंनीं ॥ ३६ ॥

नळ तीस म्हणे, 'कुलजे! त्वां जरि देवांसमक्ष मज वरिलें।
जों सासु तों तुझा मी होतांहि प्रेम ऊन मजवरिलें' ॥ ३७ ॥
गेले सुर-पति नर-पति पाहुनि तो साधु-तोष-कर जोडा।
बहु वदले, 'या पुण्य-श्लोका, जाया स्व-दोष, कर जोडा' ॥ ३८ ॥
झाला विवाह गेला स्व-पुरा नळ मग तिशीं सदा रमला।
भूमि म्हणे, 'ताराया अवतरला विष्णु हा सदार मला' ॥ ३९ ॥

वनपर्व, अ. ४. —मोरोपंत.

---

## १० हरिश्चंद्रगुणवर्णन.

### ओंव्या.

हरिश्चंद्र नर-केसरी। एकरथी पृथ्वीवरी। भूप-कुंजर कोटीवरी। विभांडूनि प्रतापें ॥ १ ॥ मदगर्वाचीं कुंभस्थळें। भेदूनि, संपदा-मुक्ता-फळें। विखुरलीं तीं ब्राह्मण-कुळें। अपार नेतां भागलीं ॥ २ ॥ नरव्याघ्रें आपुले अंगें। त्रासूनि भुपाळें कस्तुरीमृगें। कीर्ति-कस्तूरी भरली वेगें। या ब्रह्मांड-करंडीं ॥ ३ ॥ आंवतूनि अष्टदिशा बाळी। मळवट रेखिला तिये भाळीं। जे क्षाळितां प्रळयजळीं। प्रक्षाळिले न वचती ॥ ४ ॥ तेचि श्यामता लोपली गगनीं। गंधविषयें व्यापिली धरणी। मषी करूनि सर्व पुराणीं। जे रेखिजे विस्तारें ॥ ५ ॥ यशोधवलिमा चंदनउटी। कलंककस्तूरिका ललाटीं। अर्थनामसंबंधासाठीं। चिह्नद्वय मृगांकीं ॥ ६ ॥ प्रतापें जिंकोनि महीतळीं। राजे आणोनि पायातळीं। संपदा जोडूनि आणी आगळी। ते भूतळीं न समाय ॥ ७ ॥ उभय दिशाद्वय पारडां। उत्तरमेरु घातला धोंडा। संपदा जोखूनियां दडदडां। याचका उजु सांडिल्या ॥ ८ ॥ शर्करेचिया महापर्वता। लोटोनि क्षीर-घृताच्या सरिता। सागरीं मिळाल्या त्या तत्त्वतां। घृतसमुद्र क्षीराब्धी ॥ ९ ॥

सभापर्व, अ. ५. —मुक्तेश्वर

---

# ११ दुर्योधनाचें भीमाच्या गदेशीं लग्न.

भर सभेंत दुर्योधनानें आपली मांडी उघडी करून ' येऊनि बैसें मांडीवरी । होई अंतुरी पट्टाची ' असें द्रौपदीस म्हटलें; तेव्हां तिनें त्यास दिलेलें उत्तर खालील सुंदर रूपकांत वर्णिलेलें आहे.

### ओंव्या.

भीमाकरीं जे केळवली । गदा-नोवरी सगुणाथिली । वाग्निश्चयें तुज नेमिली । गोत्र घटित निर्धारें॥१॥ बाहुलें योजिलें रणतळवट । आयुष्य-अवधीचा अंत्रपाट । हातें सारूनि बळी वरिष्ट । लग्न लावील स्वहातें ॥ २॥ रक्त-हरिद्रा तनुलेपनीं । माथां अक्षता पायपिटणी । स्त्रियाप्रलाप वाद्यध्वनी । सुखसोहळा भोगिसी ॥ ३ ॥ ते गदा घेऊनि मांडीवरी । रण-मंचकीं निद्रा करीं । प्राण पारखे दवडूनि दूरी । मग एकांतीं पहुडें पां ॥ ४ ॥

सभापर्व, अ. १५. —मुक्तेश्वर.

---

# १२ द्रौपदीगुणवर्णन.

### आर्या.

धर्म म्हणे शकुने ! जी रूपें श्रीला; क्षमा-गुणें महिला—।
साजे सखी, अखिन्ना कृत्य-भरें, सु-मति आमुची महिला ॥ १ ॥
शरदुत्पळ-पत्राक्षी शरदुत्पळ-पुण्य-गंध-सम-गंधा ।
अस्खलित चालवी गृह-धर्मीं मज, यष्टि जसि पथीं अंधा ॥ २ ॥
आधीं जिनें उठावें, पाहुनि निजलों असें, मग निजावें ।
रागेजणें सु-दुर्मिळ, तेंहि जिचें ज्वालसें गगनिं जावें ! ॥ ३ ॥
धौम्यापासुनि गोपांपर्यंत जिनें स्वयें समाचार—।
घ्यावा, श्रित-ताप-हर श्री-गंगेचा जिचा समाचार ॥ ४ ॥

सभापर्व, अ. ४. —मोरोपंत.

---

## १३ राजा विश्वासरायाच्या भार्येचें गुणवर्णन.

### आर्या.

गुण-कुल-सौंदर्य-युता असे खरी तदनुरूप तद्भार्या ।
नामें सीताबाई, सीतेसम जी असे विमल आर्या ॥ १ ॥
मानून देवतेसम पतितें सेवी सदा सती भावें ।
लाजावें श्रीनें तिस, तद्वर्णनिं चित्त कां न लोभावें ? ॥ २ ॥
श्रांत पतिस शांत करी बोलुनि मधुरा सुधेसमा वाणी ।
तत्कोप न मनिं आणी, पति-चरणीं सतत लीन गुण-खाणी ॥३॥
वाखाणी विश्व तिला, तिजसम दुसरी पतिव्रता न कुणी ।
निर्मल जीची करणी, शोभे स्त्री-वर्गिं नम्रतादि गुणीं ॥ ४ ॥
अ-प्रिय जें निज-पतितें साध्वी तें आचरी नच कदाही ।
भर्त्यातें जें जें प्रिय तदन्य तिजला नसे सुख-द कांहीं ॥ ५ ॥
स्व-सुख-निरभिलाषा ती; परोपकारीं सदा निमग्न असे ।
दुःखित-दुःख-निवारण हेंच तिला मुख्य सौख्य वाटतसे ॥ ६ ॥
दक्ष सदाही गुरु-जन-पद-सेवनिं कधिं न वीट ती मानी ।
ब्राह्मण-सुवासिनींतें धन-दानें सर्व काळ सन्मानी ॥ ७ ॥

श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य, सर्ग १. —श्री. ना. मुजुमदार.

---

## १४ माझी भार्या.

### श्लोक—शिखरिणी.

न चंद्राची किंवा मुख न कमळाची करि सरी ।
न वर्ण स्वर्णाचा लवहि दयितेचा मद हरी ॥
न तीच्या मध्याला बघुन हरि रानांत लपला ।
अती साधी रूपें प्रिय मम सखी एक अबला ॥ १ ॥
नटावें कैसें तें मुळिंच न कधीं ठाउक तिला ।
न ती वेडी भोळी शिकलि कधिं मत्तेभगतिला ॥
विलासांनीं युक्त स्मित नच तिचें, तें सहज ये
कटाक्ष-क्षेपाची रुचिर सरणी ती तिज न ये ॥ २ ॥

उषा साधी स्मेरीं भरित मधु साधेपण तिच्या ।
अहा ! हारी साधी म्हणुन मन सायंतन-रुचा ॥
स्वभावोक्ती साधी म्हणुनच अलंकारिं सरसा ।
प्रिया माझी साधी म्हणुन मम तो स्वर्गच जसा ! ॥ ३ ॥

तिची वाणी साधी, परम मधुरा यास्तव मला ।
रहाणी ती साधी, म्हणुनच तिला जीव भुलला ॥
जशी सृष्टी तुष्टिप्रद सरल अव्याज म्हणुनी ।
तशी माझी वाटे मज सुखद ती रम्य गृहिणी ! ॥ ४ ॥

मुखीं शांति, प्रीती, विनय अकृतोपाय दिसती ।
अहा ! नेत्रीं तीच्या सतत सहजानंद वसती ॥
अहा ! औदार्याचें प्रिय-सदन तें भाल दिसतें ।
कपोलीं साध्वीच्या शुचि, विमल माधुर्य रमतें ! ॥ ५ ॥

" अरे ! वेडा गोळा पदरिं पडला, त्याप्रति जरी ।
असा जीवापेक्षां अधिक जपसी मोहुन, तरी ॥
किती नेणों रंभा मिळति मग होतासचि पिसा " ।
अशा छद्मोक्तीनें किति जन मला टोंचिति जसा ॥ ६ ॥

जिच्या लावण्यानें तम दुर पळे, चित्त उजळे ।
उषेच्या लावण्यें जगत उजळे जेविं सगळें ! ॥
असो काळी गोरी, त्रिभुवनिं तिचें रूप वाहिलें ! ।
निळें वा गोरें वा मज पुरवलें रत्न असलें ! ॥ ७ ॥

जगीं निर्द्रव्याला जनकहि गणी शत्रुच जसा ।
न देती मानाला, समजति तया बांधव पिसा ॥
जगो किंवा जावो मरुन, जग त्याला नच पुसे ।
तयाची भार्याही बहुतकरुनी त्या छळितसे ॥ ८ ॥

परी माझी भार्या सकल धन जीचें स्व-पति ती ।
अहा ! या दारिद्र्या परम-सुखदायी म्हणविती ! ॥
अशा या अंधारीं मम गृह-शशी तो उगवला ।
द्रवे ज्याच्या तेजें उपल मजऐसा नरमला ! ॥ ९ ॥

जियेची आहे कीं मजवरति निष्काम ममता ।
सुखीं वा दुःखीं वा अवगत न जीतें विषमता ॥
सखी माझी ऐशी मज गणितसे प्राण दुसरा ।
अशी भाग्यें हीना सहज मिळणें—गोष्ट विसरा ! ॥ १० ॥
प्रियासाठीं ' मी ' चा विसर पडणें हेंच पहिलें ।
स्व-वृत्तें प्रीतीचें मज शिकवि ते लक्षण भलें ॥
दिसेना कीं मानी पति म्हणुन ती दैवत मला ।
मलाही पूजेची रुचि न, रुचते प्रीति विमला ! ॥ ११ ॥
तिचा स्वामी मी, ती मम चरण-दासी न अथवा ।
न देतें हें नातें तिज मज कधींही सुख-लवा ॥
खरी प्रीती, सेवा उभय अनवद्या सहचरी ! ।
हिला ती, तीला ही त्यजुन वसती ना क्षण दुरी ! ॥ १२ ॥
तिच्या अल्पा स्वल्पा कृति, लघु तिचीं चाटु-गदितें ।
तिचीं प्रेम-स्वप्नें मनिं, नयनिं, वाणींत उदितें ॥
तिच्या दीनासाठीं अविरत दयेच्या लघु कृती ।
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती ॥ १३ ॥
तिचें थोडें थोडें पडत हंसुं जें बाहिर पडे ।
तयासंगें थोडें मिसळत मिळे जें मृदु रडें ॥
तिचें थोडें थोडें रुसुन बसणें, तें त्यजुनियां ।
पुन्हां रंगीं येणें परि धरुनियां पूर्ण विनया ॥ १४ ॥
तिचें थोडें थोडें नकळत मला बोध करणें ।
मला थोडें थोडें परि दृढ सुमार्गांत धरणें ॥
तिचें थोडें थोडें अमृत-कण सारें चरित तें ।
अनन्या रत्नांची खनि मज वृथा ती न दिसते ! ॥ १५ ॥
अहो तत्त्वज्ञांनो ! किति जरि समीक्षेंत गढलां ।
तरी तो आहे का अनुभव घडे जो मधु मला ? ॥
सखी माझी द्वैतीं विमल मज अद्वैत पढवी ? ।
न राहे धन्या ती पढवुन, परी अर्थ पटवी ! ॥ १६ ॥

टिळकांची कविता. —ना. वा. टिळक.

# १५ कोणाचेंहि उणें पाहूं नये.

## ओंव्या.

आतां कदर्थवित[1] व्याधी । बळी करणाचियां[2] आधीं । आपु पर न शोधी । सद्वैद्यु जैसा ॥ १ ॥ कां चिखलीं रुतली गाये । धड[3]-भाकड न पाहे । जो तियेचिया ग्लानी होये । कालाबुला[4] ॥ २ ॥ नाना बुडतयातें सकरुणु । न पुसे उत्तम-हीनु । काढी राखे प्राणु । हेंचि जाणे ॥ ३ ॥ पैं माहेवणी[5] निदैवें । उघडी केली विपायें[6] । ते सलज्जु न पाहे । न पांघुरवितां ॥ ४ ॥ तैसें अज्ञान-प्रमादादिकीं । कीं प्राक्तनींहि सदोषीं । निंद्यत्वाच्या सर्वाविषीं । [7]खिळिले जे ॥ ५ ॥ तया आंगिकें आपलें । देउनियां भलें । विसरविजती सलें[8] । सलतीं तियें ॥ ६ ॥ अंगा[9] पुढिलाचा दोखुं[10] । करूनियां आपुलिया दिठी चोखु । मग घापे अवलोकु । तयावरि[11] ॥ ७ ॥ जैसा पुजूनि देवु पाहिजे । पेरूनि सेता जाइजे । [12]तोखौनि आशीर्वादु घेइजे । अतिथीचा ॥ ८ ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलांचें उणें । फेडूनियां पाहणें । तयाकडे ॥ ९ ॥ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे[13] अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं ॥ १० ॥ वरि कोण्हे येकें उपायें । पाडिलें तें उभें होये । तेंचि कीजे, परि घाये । नेदावे वर्मीं ॥ ११ ॥ पैं उत्तमाचिया सोंठीं[14] । नीचें[15] मानिजे किरीटी ! । हें वांचोनि दिठी । दोष न घेपे ॥ १२ ॥ अगा अपैशून्याचें[16] लक्षण । अर्जुना हें फुडें जाण । मोक्ष-मार्गीचें सुखासन । मुख्य हें गा ॥ १३ ॥

ज्ञानेश्वरी, अ. १६. —ज्ञानेश्वर.

---

१ नासवीत, मारीत, कमी करीत. २ निरोगी करण्याच्या कळकळीमुळें. ३ दूध देणारी किंवा न देणारी. ४ कासावीस. ५ पतिव्रता. ६ कदाचित्. ७ कष्टले. ८ साहाय्य. ९ दुःखें. १० दोष. ११ दुसऱ्याचा दोष धुवून काढून मग त्याच्याकडे पाहतात हा भाव. १२ संतोषवून. १३ न गुंतविजे. १४ ठिकाणीं. १५ नीचाला देखील उत्तम मानतो. १६ उणें न पाहण्याचें.

## १६ दैवी संपत्तीचीं लक्षणें.

### ओंव्या.

कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना । सदैव-लक्षण अनुमाना । आणून ठेवी ॥ १ ॥ तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा । मूर्खपणें अनुमान-गोवा । कांहींच नाहीं ॥ २ ॥ नाना उत्तम गुण सत्पात्र । तोचि मनुष्य जग-मित्र । प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥ ३ ॥ राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ४ ॥ नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे । बोलाऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ५ ॥ जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी । धगधगीत पुण्य-रासी । महा-पुरुष ॥ ६ ॥ तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काय उणें तयाला । भू-मंडळीं ॥ ७ ॥ बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे । उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ॥ ८ ॥ सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें । अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ ९ ॥ आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर । तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ १० ॥ दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे । अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ ११ ॥ उदंड मुलें नाना परी । वडिलांचें मन अवघ्यांवरी । तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ॥ १२ ॥ न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा । दरिद्रपणाची आपदा । तेथें कैंची ॥ १३ ॥ उत्तम-गुणें शृंघारला । तो बहुतांमधें शोभला । प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १४ ॥

दासबोध १९.४. —रामदास.

---

## १७ धर्मगुरूचा आदर्श.

### पद.

[ चाल–सृष्टिचा लडिवाळ ]

श्रीहरि-चरणीं वंदन करितो नंदनसा हा कवी ।
संत-चरित हें दिव्य रसायन याची घ्यावी चवी ॥ ध्रु० ॥

१

पंचवटी-क्षेत्रांत राहिला पुण्य-पुरुष चांगला ।
वयोवृद्ध परि सतेज म्हणुनी तरुण शोभला भला ॥
पुष्प-वृक्ष-परिवेष्टित उटजीं राहुनि विश्रामला ।
' मला मला ' हा घोष करुनि तो चित्तीं नच तापला ॥
ज्या प्रभुनें मज सदयपणें नर-देह थोर हा दिला ।
योग-क्षेमाहि तोचि चालविल जाणुनि संतोषला ॥
' चोंच-निर्मिता चारा पुरवी '—यावरि विश्वासला ।
माय-बाप विश्वाचा चालक तद्भजनीं रंगला ॥
शिकला नाहीं विद्या अथवा नानाविध त्या कला ।
परोपकारीं परी परोपरि पिंड पहा पोसला ॥
शुद्ध चित्त मृदु भाषण यांहीं सर्वांला मानला ।
सभोंवारचे लोक म्हणाति हो पाहुं पुरुष हा चला ॥ १ ॥

२

मोठ्या मोठ्या शहरापासुनि दूर सदा राहुनी ।
जन-हित-कर आयुष्य वेचिलें निष्पापत्वें जनीं ॥
संपत्सत्ताधीश नुति-प्रिय दुबळ्यांच्या वंचनीं ।
शूर थोर जे त्यांचें द्वारहि पाहीना लोचनीं ॥
हांजी हांजी करुनि थोरपण मिरवावेंसें मनीं—।
घेईना; परि तत्पर राहे दीनांच्या रंजनीं ॥
आत्म-दुःख-सुख विसरे सारें पर-दुःखोद्धारणीं ।
मानी पर-धन वमन-सम सदा मूक असल्लापनीं ॥
ज्या ज्या वृद्ध प्रौढा युवती तितुक्या माता गणी ।
मुग्धा सरला बाला याला दिसती कन्या मनीं ॥
भार्या आर्या सु-शील तत्पर होती तद्रंजनीं ।
गृह-लक्ष्मीसें तिस संमानी हाही मंजु-ध्वनी ॥ २ ॥

३

भवार्णवीं दगदगले थकले त्यांतें तारावया—।
झटला, शिकला यांत महोत्सव मोक्षाहि मानावया ॥

जया माय ना बाप, बंधु, सुत उरला पोसावया ।
भोगी, रोगी, विषयी, व्यसनी—साधु जवळ करि तया ॥
भिक्षा-वृत्ति स्व-धर्म गणुनि प्रतिवर्षीं यावया—।
पलित-मुंड लिंबाजि सवकला हाही पोषी तया ॥
पूर्व-वयीं दुर्वृत्त मत्त सोमाजी मागावया ।
लज्जा शंका ज्यास न उरली सांभाळी हा तया ॥
तरुणपणींच्या युद्ध-कथा सरसावुनि सांगावया—।
सजे सयाजीराव, हाहि त्या जखमा बांधावया ॥
देश-काल-पात्रत्व पाहिजे जरी दान द्यावया ।
पात्रापात्र-विचार सुचेना, द्रवबी तन्मन दया ॥ ३ ॥

४

परोपकारीं झटला झिजला काया-वाचा-मनीं ।
कृती तयाची देखुनि वदनें लपविलिं हो चंदनीं ॥
भूतें सारीं भगवंताचीं रूपें मानी मनीं ।
तत्सेवा ही भूतात्म्याची पूजा ऐसें गणी ॥
सन्मार्ग-च्युत युव-युवती त्या आर्द्र-चित्त होउनी ।
घरीं आणुनी अथवा जाउनि सुधरि बोधबोधुनी ॥
पाप्यांच्याही मृत्यु-समयिं हा राम-नाम गर्जुनी ।
आश्वासी यां सांगे ' लय हें लावा नारायणीं ' ॥
स्व-सुखासक्त न, रक्त सदा पर-सौख्याच्या चिंतनीं ।
अनाथ दुबळे अंध पंगु या सर्वांचा हा धनी ॥
नवनीताहुनि मृदु कोमल तद्धृदय रसें ध्याउनी ।
विरला विरघळला कवि लक्ष्मण काव्य संपलें झणीं ॥ ४ ॥

आनंदलहरी. —ल. रा. पांगारकर.

---

## १८ सेतुबंधावर उत्प्रेक्षा.

[ रावणापासून सीतेला सोडविण्यासाठीं, लंकेस सैन्य नेण्याकरितां रामानें समुद्रा-वर सेतु बांधविला, त्यावरील कवीचे तर्क. ]

### आर्या.

शत-योजन आयत दश-योजन विस्तीर्ण सेतु शंकेतें—।
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमि-बाहु लंकेतें ॥ १ ॥
किंवा तो कपि-कटकोत्तर-सिंधूद्गत बुभुक्षु कालाही— ।
दूर पसरला खाया रात्रि-चरां क्षुद्र बेडकांलाही ॥ २ ॥
सेतु न तो यत्पतिनें स्व-सुता नेली, जसी वृकें एणी ।
त्या लंकेची श्री-भू-देवीनें ओढिली असे वेणी ॥ ३ ॥
राम-जयश्री-लग्नीं लंका घाली सु-नीळ पाटावें ।
सेना-वऱ्हाडणीला पाय-घडी, कां असें न वाटावें ? ॥ ४ ॥
बहुधा तुच्छ जलधि-तृण चाटायाचा धरूनियां वीट—।
गेला प्रभु-प्रतापासित-पथ रक्षोटवीकडे नीट ॥ ५ ॥
कीं पतित पति त्यागुनि विश्व-शरण्याकडे रडत वाटे—।
आली जी लंका-श्री तीचा तो सांजनाश्रु पथ वाटे ॥ ६ ॥
कीं चिरलें स्वापयशें शोकानल-दग्ध सागरोरचि तें !।
सूचविले तर्क असे त्या सेतु-वरें महा-सुधी-रचितें ॥ ७ ॥

वनपर्व, अ. १२. —मोरोपंत.

---

## १९ चंद्रावरील कलंक.

### आर्या.

अमृत-कर कला-निधि हा, याला लागो न दृष्टि कोणाची ।
म्हणुनी तज्जननीनें चंद्रा ही तीट लाविली साची ॥ १ ॥
आकाश-नदींतिल हें कनक-कमल होय, हा नसेचि शशी ।
अथवा तत्कमल-स्थित अलिवांचुनि कालिमा दिसेल कशी ? ॥२॥
किंवा कल्प-लतेचें हें सुंदर पक्क-पीत फळ आहे ।
काळें जें तेथ दिसे तें त्याचें डेंख वाटतें राहे ! ॥ ३ ॥
अथवा शिवें चुकूनी न शशी देतां, दिला परत, भाळीं—।
जो नेत्र असे साग्नी, कनीनिका मात्र ज्यांत ती काळी ! ॥ ४ ॥

काव्यरत्नावलि, अंक १३. —माकंद.

---

## २० हिमालय.

[ पंडुराजानें पाहिलेल्या हिमालयावरील प्रदेशांचें वर्णन. ]

ओंव्या.

हिमालयाचेनि परिसरें । सिद्धाश्रम गुहा-गव्हरें । हिमोदकाचीं कासारें । स्फाटिक तैसीं भासती ॥ १ ॥ हिरे-कनकाचें वाळवंट । खडक सोम-कांती निघोट । माजी जाह्नवी-जळाचे लोट । दुग्ध-वर्ण भासती ॥ २ ॥ तेथें तापसांचा मेळ । दृष्टीं देखिला निर्मळ । ज्यांचेनि दर्शनें तात्काळ । चित्त-शुद्धी पाविया ॥ ३ ॥ तेथूनि पुढां अति-शोभित । गंधमादन पर्वत । जेथें औषधी अमृत-भरित । महाभूतीं रक्षिल्या ॥ ४ ॥ इंद्रद्युम्न सरोवर । दृष्टीं देखिलें मनोहर । हंसकूट लंघूनि वीर । शतशृंगा पातला ॥ ५ ॥ ताम्र-रजत-सुवर्ण-भूमिका । पद्मराग-पाषाण देखा । चिंतारत्न-सरोवर-वापिका । मठ मंडप उभविले ॥ ६ ॥ शतशृंग-गिरि-परिसरीं । काननें लागलीं चौफेरीं । वृक्ष लवले फळ-संभारीं । तृप्ती देती परिमळें ॥ ७ ॥ पर्वत-नितंबाहूनि देखा । सरिता वाहती अधोमुखा । जैशा मेखळे पल्लव-सडका । गजाननातें शोभती ॥ ८ ॥

आदिपर्व, अ. २७. —मुक्तेश्वर.

---

## २१ हिमालयाच्या मस्तकावरील भयाण प्रदेश.

श्लोक.

जातां या स्थळिं, खालतीं वरि पुढें मागें चहूंहीकडे—।
सारें बर्फ दिसे; तयाविण दुजें कांहीं न दृष्टी पडे ॥
वर्षांतून सदैव शीत अपुला आवास येथें करी ।
तेणें वृद्धि न उद्भिजां घडतसे या शून्य भागावरी ॥ १ ॥
भूर्जांचे तरु जे क्वचित् खुरटले थंडीमुळें राहती ।
त्यांवाचून न कोणतेहि दुसरे येथें तरू वाढती ॥

कस्तूरी-मृग वा मदोद्धत करी वा हिंसक श्वापदें ।
किंवा पक्षि-समूहही न करती येथें निवासास्पदें ॥ २ ॥
जातां प्राणि-निवास-चिह्नहि बघूं कोठें नसे तत्त्वतां ।
सारा भाग दिसे भयाण, अवघी भासे उदासीनता ! ॥
कोठें उंच कड्यांवरून पडतां वेगें नद्या खालतीं ।
त्यांचीं पात-विशीर्ण तूर्ण शतधा धारा-जलें वाहती ! ॥ ३ ॥
तीं वेगें खडकांमधून पुढतीं वाहूं जशीं लागती ।
त्यांच्या भीम-रवें प्रपूरित दऱ्या साऱ्याहि नादावती ।
या येथून विलोकितां दिसती जीं जातां नभोभ्यंतरीं ।
स्वर्गारोहण-हेतु-निर्मित महा-सोपान-मार्गापरी ॥ ४ ॥
एकामागुन एक उंच शिखरें या अद्रिचीं, त्यां शिरीं—।
शोभे क्षीर-विपांडु निर्मळ हिम-प्रावार वस्त्रापरी ॥
ग्रीष्मींचा प्रखर-प्रतापहि जरी भास्वान् सहस्रां करीं—।
प्रत्यब्दीं हिम येथलें वितळण्यासाठीं प्रयत्नां करी; ॥ ५ ॥
सारे व्यर्थ तरीहि; बर्फ न कधीं येथील जातें लया ।
ज्यातें थोर निजाश्रया वितरिती, कांहीं नसे भी तया ॥
जीं येथून समीप फार, दिसती तीं स्वच्छ, नेत्रांप्रती ।
त्यांमागील लगेच अंधक जरा कांहीं दिसूं लागती; ॥ ६ ॥
त्यांहीहून विशेष अंधुक दुजीं त्यामागचीं; यापरी—।
ओळीनें शिखरें जशीं चढत हीं जाती नभोभ्यंतरीं ॥
तैसा आदिम वर्ण पालटुनियां नीलत्व त्यां येतसे ।
त्यायोगें गगनास आणिक तयां वर्णैकता होतसे ! ॥ ७ ॥

गंगावर्णना. **पां. व्यं. चिंतामणिपेटकर.**

---

## २२ भीषण महारण्य.

श्लोक—भुजंगप्रयात.

महा-घोर तो लंघिला मार्ग तींहीं । पुढें पाहतां पाहतां वाट नाहीं ॥
तरूंचीं वनें लागलीं तीं वितंडें । प्रचंडें उदंडें बहू झाड-खंडें ॥ १ ॥

भुमीं दाटले वृक्ष वृक्षा मिळाले । तया अंतरीं वंश मिश्रीत झाले ॥
वरी पाहतां वाड आकाश-पंथें । पुढें रीघ नाहीं तया वारियातें ॥ २ ॥
समें वीषमें झाड-खंडें अचाटें । मिळालीं बळें वाजती कर्कराटें ॥
कडे तूटले थोर त्या पर्वताचे । झरे वाहती झाड-खंडीं विषाचे ॥ ३ ॥
तया अंतरीं सिंह शार्दूळ कैसे । मदें मातले गर्जती काळ जैसे ॥
गजांचीं बहु दाट थाटें विशेषें । पळों लागती थोर किल्लाट-घोषें ॥ ४ ॥
बहू संकटें धांवती रान-म्हैसे। रिसें कर्कशें देखतां जीव त्रासे ॥
बहू सांबरें चीतळे रान-गाई । शुनी शूकरां कर्कटां मीति नाहीं ॥ ५ ॥
बहू श्वापदें घोर नाना परीचीं । बहू गर्जताती बहूतां स्वरांचीं ॥
भुतें खेचरें शक्ति वेताळ पीसे । बहू धांवती वह्निचे ज्वाळ जैसे ॥ ६ ॥
बहू व्याळ वेटाळिले झाड-खंडीं । वनें व्यापिलीं सर्व कूळीं उदंडीं ॥
बहूतां परीचीं बहू तीं विखारें । विषें घोळती लाळ तीं थोरथोरें ॥ ७ ॥
वहाती विषाचे महा-ओघ तेथें । धुधूकारतां ज्वाळ आकाश-पंथें ॥
गिरीशीं बळें आदळे तोय-राशी । बहूसाल त्या ताडिलें पर्वताशीं ॥८॥
गिरी-शृंग पाठार दारी कपाटें । शिळा शीखरें वृक्ष पाषाण थाटें ॥
दरे दर्कुटे थोर भ्यासुरवाणे । बहूतां परीचे तरू ते पुराणे ॥ ९ ॥
कडे कापले तोय नेटें भडाडी । गिरी-कंदरीं घोष तेणें धडाडी ॥
धडाडा नद्या लोटल्या व्योम-पंथें । भुमी तूटल्या घोर घातें निघातें १०
महारण्य तें थोर नीकुंबळेचें । पुढें जावयालागिं सामर्थ्य कैंचें ॥
समुद्रातिरीं दाटलें वीस गांवें । पुढें जावया वाट नाहीं स्वभावें ॥११॥

युद्धकांड, षष्ट प्रसंग. —रामदास.

---

## २३ मूर्तिकार.

### दिंड्या.

दृष्टि फेंकित आपुली सभोंवार । फिरत असतां स्वच्छंद मूर्तिकार ॥
शिला दिसली मार्गांत भव्य त्याला। बघुनि तीतें थांबला मुग्ध झाला १
मूर्ति होती प्रच्छन्न शिलेमाजीं । मूर्ति-कारा मात्र ती दिसे आजी ॥
दिव्य-दृष्टी कवि-चित्रमूर्तिकार । सहज येतें त्यां कळुनि वस्तु-सार ॥२॥

कशी आणूं मूर्ति ती व्यक्ततेला । विचारीं या तो कुशल मग्न झाला ॥
पुरें जाणुनि तद्रूप कल्पनेनें । करी सु-स्थिर तें शांत चिंतनानें ॥ ३ ॥
करीं एकया टांकीस धरुनि वेगें । शिलेवर तो आघात करूं लागे ॥
स्व-कर्तव्यीं संलग्न-चित्त होत । इतर सारें विसरला वस्तु-जात ॥ ४ ॥
करायाचें ज्या असे महत्कार्य । वचन त्यानें हें सदा शिरोधार्य ॥
जरी उत्तम वाटतें कार्य व्हावें । स्व-कार्यातें सर्वस्व तयें द्यावें ॥ ५ ॥
शिलेवर जे हळुहळू होत घाव । दिसूं लागे सत्वरीं तत्प्रभाव ॥
रूप पूर्वीचें जाउनी लयाला । शिला लागे साकार दिसायाला ॥ ६ ॥
दूर सारे जैं मलिन मेघ होती । रम्य तारे चमकती नभःप्रांतीं ॥
शिला-शकलें त्यापरी निघुनि गेलीं । सुभग सत्वर बाहेर मूर्ति आली ७
मूर्तिकारें काढिली शिलेंतूनी । मूर्ति सुंदर संपन्न अवयवांनीं ॥
तीस पाहुनि कृत-कृत्य मनीं झाला । हर्ष-रंगीं नाचला, गृहा गेला ॥८॥
सफल होती सयत्न मानवाचे । हृदय त्याचें तैं हर्ष-भरें नाचे ॥
शीण सत्वर सर्वही लया जाई । कार्य करण्या सामर्थ्य नवें येई ॥ ९ ॥
त्याच ठायीं मग एक भक्त आला । मूर्ति पाहुनि चित्तांत फार धाला ॥
रम्य मंदिर बांधूनि एक तेथें । मूर्ति नेउनि ठेविली तयें हातें ॥ १० ॥
शिला पूर्वीं जी एक रूप-हीन । तीस देऊं लागले लोक मान ॥
विजन होती जी भूमि एक-कालीं । तीच पुण्य-क्षेत्र-भू पुढें झाली ॥११॥
क्षुद्र दगडा देवत्व द्यावयाचें । असे मनुजा ! सामर्थ्य तुझें साचें ॥
कसा दीनाहुनि दीन असा होसी । मूर्ति-काराचा कां न धडा घेसी ? १२
तुझ्या मार्गीं जे दगड आड येती । घाव त्यांवर आपुल्या घाल हातीं ॥
काढ त्यांतुनि रमणीय दिव्य मूर्ति । करिल मग ती तव सर्व काम-पूर्ति १३

माधवानुजांची कविता. —माधवानुज.

---

## २४ दाता व देव.

**श्लोक**—शार्दूलविक्रीडित.

दाता एक कुलीन निर्धन भला कर्जें बहू गांजला ।
स्त्रीच्या दुर्वचनीं तशांत खचला प्राणांस कंटाळला ॥

‘ सारें शून्य मला, अनन्य-गति मी ’ दैन्य-स्वरें तो वदे ।
‘ ये ये सत्वर धांव पाव मरणा ! दीनासि या ठाव दे ’ ॥ १ ॥
माया-पाश निराश-वृत्ति-वश तो छेदी, न त्यां गुंतला ।
जाण्या शून्य पदासि शून्य-हृदयें शून्य स्थळा पातला ॥
तेथें एक विशाल वृक्ष पसरी शाखा नभीं आडवी ।
त्या भासे निज-हस्त मित्र यम कीं स्नेहें अहा ! लांबवी ॥ २ ॥
बांधी पाश हताश काल वश तो त्या वृक्ष-शाखेप्रती ।
लावोनी गळफांस दुर्गति-पथीं घेणार जों सद्गती ॥
तों अव्यक्त अतर्क्य अद्भुत अशी शक्ति स्व-शक्ति-क्रमें—।
तोडी बंधन मृत्यु-साधन, बुडे तो विस्मयीं संभ्रमें ॥ ३ ॥
खालीं पाश गळे, वरी उसळले मिश्र-प्रकाशांकुर ।
लक्ष्मीचेच कृपा-कटाक्ष वळले तद्रक्षणा आतुर ॥
द्रव्याचा निधि दान-पुण्य-फळ कीं पायांतळीं उद्भवे ।
त्याचा हर्ष तसेंच मूल्य निधिचें कोणा कसें वर्णवे ? ॥ ४ ॥
आनंदें उचलावयासि निधितें सारी पुढें जों कर ।
तों शून्यांतुनि शब्द हे उमटले “ हां ! हात तूं आवर ॥
पात्रापात्रनिरूपण स्व-हितही दानीं न तूं लक्षिलें ।
या दोषा त्यजिशील ? ” “ होय ” “मग घे द्रव्यायु देवें दिलें” ॥५॥

—राधारमण.

---

## २५ पुनर्जात प्रेमास.

### पद.

प्रेमा ! ऊठ—चल, उघड झांकली मूठ ॥ ध्रु० ॥
तुंबळ सागर तव खळबळला ।
हृदयीं तटवूं त्यास कशाला ? ।
जगभर लाटा उधळायाला—।
दिली तुज सूट—चल, उघड झांकली मूठ ॥ १ ॥

कोंडुनि असला सागर धरिला ।
माझा मूर्खपणा मज कळला ।
मिळतां स्थळ तुज नाचायाला ।
करीं रे ! लूट—चल, उघड झांकली मूठ ॥ २ ॥
क्षणभर वाटत होतें मजला ।
कीं तव ओघ आटुनी गेला ।
परि जो अ-खंड भरला त्याला ।
कशाची तूट ?—चल, उघड झांकली मूठ ! ॥ ३ ॥
उगवे सूर्य काल मावळतां ।
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां ।
प्राण-जीवना ! तुजही शिवतां ।
मरण हें झूट—चल, उघड झांकली मूठ ॥ ४ ॥
द्वेषावरती, दुःखावरती ।
फिरवीं तुझ्या यशाची महती ।
जा, जा नाच सर्वही जगतीं ।
धांव बेछूट—चल, उघड झांकली मूठ ! ॥ ५ ॥
विसरुनि जाऊं अनुभव-जाला ।
तुडवूं पायीं चल खेदाला ।
टाकूं जाळुनि नैराश्याला ।
दुःख सब झूट !—चल, उघड झांकली मूठ ॥६॥
तुझिया श्वासाच्या उद्गारें ।
टाकूं भरुनी जग हें सारें ।
एकच नादें करूं अतां रे—।
सुखाची लूट—चल, उघड झांकली मूठ ! ॥ ७ ॥
मी तूं दूर न राहूं आतां ।
दाखवुं शक्ती अतुली जगता ।
आणूं परमेश्वरही हाता ।
ऊठ रे ! ऊठ—चल, उघड झांकली मूठ ! ॥ ८ ॥

वागेश्वजयंती. —गोविंदाग्रज.

## २६ प्रीति निमाली तर.

श्लोक–शार्दूलविक्रीडित.

नादें मंजुळ आपल्या रिझविते जी मन्मना नेहमीं ।
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी ! ॥
अंगातें जडवून पंख उसने, जाईन कीं सत्वर—।
मी येथून उडून उंच गगनीं, प्रीती निमाली तर ! ॥ १ ॥
माझी कोण करील उत्सुक मनें मार्ग-प्रतीक्षा घरीं ? ।
प्रेमें बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करीं ? ॥
आतां भासतसे मला भवन जें सर्वस्व चेतोहर ।
त्या येईल खरोखरीच वनता, प्रीती निमाली तर ! ॥ २ ॥
अस्ता जाइल सूर्य-तेज, वितरी विश्वास जें जीवन ।
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन ॥
सौख्याचा लव-लेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर—।
भीतीनें मरतील मानव-कुलें, प्रीती निमाली तर ! ॥ ३ ॥

विनायकाची कविता. —विनायक.

---

## २७ विरहिविलाप.

[ पत्नीच्या मृत्यूमुळें एका विरही पंडितानें केलेला विलाप. ]

श्लोक–शिखरिणी.

अहा ! कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा ! ।
प्रिया एकाएकीं अमर-सदना गेलि सरसा ॥
मना ! आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा ? ।
सुखाच्या शब्दांनीं कवण निववू तापहि तुझा ? ॥ १ ॥
घरातें मी येतां, दचकुनि उठोनी हंसुनियां ।
विशालां नेत्रांहीं अमृत-रस-वृष्टी करुनियां ॥
न कां चित्ता ! आजी मधुर-वचनीं हर्ष करिशी ? ।
असे झाली माझ्या अगळिक करें कोणति अशी ? ॥ २ ॥

बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवघिया ।
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां ॥
जिचे डोळे काळे बघुनि मृग-बाळेंहि झुरती ।
वसे चित्तीं देवीपरि सतत ती मात्र सुदती ॥ ३ ॥
पडायाच्या भीतीस्तव मम करातें धरुनियां—।
विवाहीं पाषाणीं चढालिस सखे ! तूं जपुनियां ॥
कशी ती तूं आजी चढाशि मज सोडोनि गगनीं ।
करी ऐसी शंका हृदय शतधा, येउनि मनीं ॥ ४ ॥
तुझें जाणें प्राणेश्वरि ! परिसुनी स्वर्ग-भुवनीं ।
अलापांतें, शंका त्यजुनि, करिती कोकिल वनीं ॥
निमाली चिंताही सकल कमलांची अजि अहा ! ।
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि पहा ! ॥ ५ ॥
सखे ! विद्युल्लेखा-स्फुरण-चपलां देउन मला ।
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुलां ॥
अहा ! मंत्रभ्रष्ट-क्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी ।
लया पुण्यें जातां त्यजुनि ताशि गेलीस मजशी ॥ ६ ॥
असोनी त्वां भूमिवर चढविलें ज्या सुर-पदीं ।
‘ प्रिया, नाथा ’ ऐशा अति-मधुर संबोधन-पदीं ॥
तया मातें कैशी धरणि-तल-धूळींत, सखये ! ।
दिवस्था होऊनी कलिशि ! दया कां तुज न ये ? ॥ ७ ॥
न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा—।
स्पृहा-युक्तें चित्तें, जित-कमल-नालोत्तम-भुजा ॥
सुशीला तूं ऐशी पर-पुरुष जो निर्गुण तया ।
कशी पाहूं जाशी ? हरिण-नयने ! सत्वरतया ? ॥ ८ ॥
गुणांनीं जी पूर्णा, अणु-सम नसे दोषहि जिला ।
अलंकारीं साजे, रस वसतसे जींत पहिला ॥
मृदू जीचे वर्ण श्रवण-सुख देती परिसतां ।
वसे ती पद्माक्षी मम हृदयिं जेवीं सु-कविता ॥ ९ ॥
सुधा-तुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला ।

कटाक्षांनीं वर्षे जणुं मजवरी नील-कमलां ! ॥
मृगाक्षी, मांगल्यप्रद-विधि-विधात्री सुवदना—।
न सोडी चित्तातें, क्षणभरिहि ती कुंद-रदना ! ॥ १० ॥

पद्यरत्नावलि. —कृष्णशास्त्री चिपळुणकर.

---

## २८ अजविलाप.

[ पत्नीच्या मृत्युसमयीं अजानें केलेला विलाप. ]

### श्लोक.

होता धीर तरी अधीर बहु तो होवोनियां अंतरीं ।
दाटे कंठ, तसाच भूमि-पति तैं शोकें विलापा करी ॥
लोहाला कठिणाहि मार्दवचि दे जो ताप, तो प्राणियां ।
लोकांमाजि मृदू करील, न असे आश्चर्य गोष्टींत या ॥ १ ॥
" केले मी अपराध फार, तंवही केली न तूं हेलना ! ।
आतां तों अपराध अल्पहि नसे हें ठाउकें त्वन्मना ॥
ऐसेंही असतां, न पात्र मम हा संभाषणाही असे ।
ऐसें मानुनियां सखे ! मज, अजी मौना धरीलें कसें ? ॥ २ ॥
कांतेच्या सह जाइ जीव मम हा, ही गोष्ट झाली बरी ।
तीतें सोडुनियां निघे परत तो, ही तों अयोग्या खरी ॥
धिग् जीवा ! करणें तुझें न बरवें वाटे मनीं शोधितां ।
याचें दुःसह कष्ट-रूप फल हें बा ! भोगिं तूं तत्त्वतां ! ॥ ३ ॥
मनेंही म्यां केलें कधिंहि न तुझें अप्रिय सये ! ।
मला टाकायाची मति तव मनीं कैंवि अजि ये ? ॥
पति क्षोणीचा मी परि वरिवरी प्रीति तिकडे ।
खऱ्या प्रेमाचा तों भर सकल वाहे तुजकडे ! ॥ ४ ॥
चंद्राला रजनी पुन्हा मिळतसे, कोकास कोकांगना ।
त्यांचा सावधि तो वियोग म्हणुनी सोसे तयांच्या मना ॥
आतां भेट तुझी अशक्य म्हणुनी संताप जो हा असा—।
होतो त्वद्विरहें, सखे ! मज न तो जाळील कीं अग्निसा ! ॥ ५ ॥

शय्या सुंदर पुष्प-राजि-रचिता तीही खुपे हो जिला ।
ऐसी शारद-पूर्ण-चंद्र-वदने ! जीची तनू कोमला ! ॥
ती, काष्ठीं घटिता भयंकर चिता दीप्ताग्निनें संयुता ।
गे सोशील कशी सरोज-नयने ! सांगें अतां तत्त्वतां ॥ ६ ॥
देखेंही सहकार आणि फलिनी बागामधें संप्रती ।
या दोघांस परस्परें सुचतुरे ! त्वां कल्पिलीं दंपती ॥
त्यांचें मंगल-कार्य हें न करितां गेलीस लोकांतरीं ।
आहे हें करणें तुझें उचित कीं, सांगें मला सुंदरी ! ॥ ७ ॥
केला दोहद तूं अशोक तरुला, त्याला फुलें पातलीं ।
होतीं सुंदर योग्य वेणिस तुझ्या जीं भूषणें चांगलीं ॥
झालीसी पर-लोकवासि सखये ! या कारणानें असा ।
तीं वाहूं तव पिंड-दान-समयीं पिंडावरी गे ! कसा ? ॥ ८ ॥
ज्याचे नूपुर वाजति छुमछुमा, ऐशा पदांचा मला ।
झाला अद्भुत लाभ, हें मनिं सये ! हा आठवोनी भला—॥
पावे चंद्रमुखी ! अशोक-विटपी शोकास तो अंतरीं ।
पुष्पांचें मिष दाउनी करितसे ही बाष्प-वृष्टी खरी ! ॥ ९ ॥
तूं माझ्या असती धनीन घरची, मंत्री विचारांतली ।
एकांतांतिल मित्र, शिल्प-कृतिची गे ! पट्ट-शिष्या भली ॥
ऐसी तूं ! तुजला दया-रहित या दैवें बलें हारितां ।
नेलें सर्वहि, काय शेष उरलें तें तूं वदें तत्त्वतां ! ॥ १० ॥
काढोनी दयिते ! मधु स्व-मुखिचें तूतें मियां अर्पिलें ॥
तें प्राशोनिच संप्रती मन तुझें संतुष्ट कीं जाहलें ॥
त्या पानावर हें तिलोदक कसें स्वर्गी रुचेल प्रिये ! ।
झालें दूषित जें मृगांक-वदने ! उष्णाश्रुंनीं माझिये ?" ॥ ११ ॥
ऐसें तो करुण-स्वरें परिपरी बोलोनि कांतेप्रती ।
उद्यानस्थ तरूंसही रडविता झाला तईं भूपती ॥
वाहे जो मकरंद फुल्ल कुसुमांपासोनि त्यांखालती ।
तद्रूपेंच तईं गमे जन-मना अश्रूच ते ढाळिती ! ॥ १२ ॥

रघुवंशभाषांतर, सर्ग ८. गणेशशास्त्री लेले.

## २९ रामविलाप.

[ सीतेला रावणानें पळवून नेलें, तेव्हां रामानें केलेला विलाप. ]

### आर्या.

हा सीते ! तुजवांचुनि सर्वहि मज ताप-हेतु, हा सीते ! ।
हा सीते ! तूंचि मज व्यसन-समुद्रांत सेतु हा सीते ! ॥ १ ॥
हा सीते ! हा न जगत्प्राण, खरा वाघ वायु हा, सीते ! ।
हा सीते ! व्याळचि हा, व्यक्त पितो राघवायु हा सीते ! ॥ २ ॥
हा सीते ! मज देतो त्वन्मुख-जित चंद्र ताप हा सीते ! ।
हा सीते ! करितो द्विजराजहि म्हणवूनि पाप हा सीते ! ॥ ३ ॥
हा सीते ! कसि कळली त्वद्व्यसन-कथा पिकास, हा सीते ! ।
हा सीते ! जन्हि नत मी, कसितोचि तथापि कास हा, सीते ! ॥ ४ ॥
हा सीते ! जे त्वत्कच-भार-जित-कलाप मोर, हा सीते ! ।
हा सीते ! ते नाचति, मज पाहुनि, मजसमोर, हा सीते ! ॥ ५ ॥
बहु लाजवीत होतों करि-केसरि-कीर-केकि-हरिणां मीं ।
हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं ॥ ६ ॥
वनपर्व, अ. ११. —मोरोपंत.

---

## ३० रामविलाप.

[ सीता आश्रमांत नाहीं असें पाहून, रामानें लक्ष्मणापाशीं काढिलेले दुःखोद्गार. ]

### आर्या.

“ रुचिराक्षा नाहीं कीं, वत्सा ! हें अन्य गेह वाटतसे ।
इतर स्थळासि आलों, चुकती अनभिज्ञ लोक वाट, तसे ॥ १ ॥
वत्सा ! मज जरि म्हणसी, सीतेची हेच होय दल-शाला ।
तरि मीच रामनामा नसेन; साध्वी दिसेल काशाला ! ॥ २ ॥
ते मजवांचुनि नाहीं गेली गोदावरी-विहारातें ।
क्षण मद्विरहें तीतें युग होतें; भार भावि हारातें ॥ ३ ॥

ते प्रियतमा न हिंस्रें वधिली, नाहींच रक्त भूवरतें।
नेलीच राक्षसानें" म्हणोनि शोधी स्थल क्षमा-वर तें ॥ ४ ॥
"कोठें जनक-सुते ! तूं गेलीस धरा-सुते ! प्रिये जाये ! ।
न करीं विनोद; झाला व्याकुळ अत्यंत देह माझा, ये ॥ ५ ॥
तूं काय कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनीं ? ।
तरि चंद्र-मृगहि आणुनि देइन; हें तूं असत्यसें न मनीं ॥ ६ ॥
श्वशुराला पर-लोकीं गेलिस जरि तूं करावया नमना ।
पुसल्यावांचुनि कैसी सीते ! झालीस आज यान-मना ? ॥ ७ ॥
न्यावें मजही तेथें, श्वशुराची प्रार्थना करून, सती ! ।
भरत करू राज्यातें; तुजवांचुनि वांचुनी, सुखें नसती ॥ ८ ॥
राज्य-श्री हरुनि जरी कैकेयीनें वनास पाठविलें ।
तरि तव योगें तें मीं नाहीं कांहीं मनांत आठविलें ! ॥ ९ ॥
मज राजकन्यके ! तूं वरूनियां पावलीस न सुखातें ।
खातें हें चित्तातें; सांगों कोणास मीं स्व-दुःखातें ? ॥ १० ॥
हा कमलाक्षि ! तनूदरि सुंदरि जाये ! प्रिये ! अये ! सदये ! ।
विधुमुखि ! पिक-गर्वापह, अमृताहुनि गोडसें स्वयें वद; ये ॥ ११ ॥
पंकज, विधु, हरि, गज, पिक, चमरी-मृग, कीर जिंकिले होते ।
त्वन्मित्रातें मातें, त्वद्दूरें, पीडितील सखि ! हो ते ॥ १२ ॥
हा प्रियतमे ! वियोग-ज्वलन-मुखीं होमिलेंस कां मातें ।
वैरी संतोषविले, टाकुनि यातें वनीं सकामातें !" ॥ १३ ॥
मंत्ररामायण, अरण्यकांड. —मोरोपंत.

---

## ३१ आम्ही कोण ?

### श्लोक.

आम्ही कोण म्हणून काय पुससी ? आम्ही असूं लाडके—।
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया ॥
विश्वीं या प्रतिभा-बलें विचरतों चोहींकडे लीलया ।
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके ! ॥ १ ॥

सारेही बडिवार येथिल पहा ! अम्हांपुढें ते फिके ।
पाणि-स्पर्शच आमुचा शकतसे वस्तू-प्रती द्यावया ॥
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या ।
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें ! ॥ २ ॥
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें ? ।
पृथ्वीला सुर-लोक-साम्य झटती आणावया कोण ते ? ॥
ते आम्हीच, सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे ।
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें ॥ ३ ॥
आम्हांला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें ।
आम्हांला वगळा—विकेल कवडी-मोलावरी हें जिणें ॥ ४ ॥

केशवसुतांची कविता. —केशवसुत.

---

## ३२ लक्ष्मण-इंद्रजित-युद्ध.

श्लोक—भुजंगप्रयात.

फणी-रावणी वीर सन्मूख जाले । बळाचे महा-काळ जैसे उदेले ॥
करायास निर्वाण ते एकमेकां । विरश्री-बळें सोडिली सर्व शंका ॥ १ ॥
पुढें बोलता जाहला इंद्रजीतू । कृतांतापुढें निर्बळी मानवा तूं ॥
मरायासि कां व्यर्थ आलासि येथें । निमिष्यांत मारीन रे बाण-घातें ॥ २ ॥
बहू बोलिला वाजट्ट घोर शत्रू । प्रती उत्तरें बोलिला तो सुमित्रू ॥
मि हा कोण तूं नेणशी काय मूढा । वृथा विक्रमू बोलशी वाड पूढां ॥ ३ ॥
मही रुंद विस्तीर्ण छपन्न कोटी । गिरी-दिग्गजांची असंभाव्य दाटी ॥
तटाकें नद्या मातले भव्य सिंधू । वरी दाटली जीव-सृष्टी अगाधू ॥ ४ ॥
असंभाव्य हा भार कोणा धरेना । न घेतां पुढें जीव-सृष्टी उरेना ॥
सहस्त्रां फणींचा असंभाव्य व्याळू । तयांमाजि येके फणीं हा भुगोळू ॥ ५ ॥
स्वभावें शिरीं ठेविजे पुष्प जैसें । तयाचे परी घेतलें विश्व तैसें ॥
तयाहून तो कोण आहे विशेषू । मुढा नेणशी कां स्वयें मीच शेषू ॥ ६ ॥
तुतें सांगतों जाण रे सत्य वाणी । प्रतापें तुझें शीर छेदीन बाणीं ॥
तया बोलितां ताविली भीम दृष्टी । उभा काळ जाळावया जीव-सृष्टी ॥ ७ ॥

बळें छेदिता जाहला वोष्ठ दंतीं । सिमा फांकली वैभवाची दिगंतीं ॥
करारां रणीं खादल्या वज्र-दाढा । शतें सोडिलीं बाण वोढूनि मेढा ॥ ८ ॥
बळें धांविलीं बाण-जाळें उफाळें । लखाखीत सौदामिनीचेनि मेळें ॥
तडाडीत घोषें कडाडीत आले । सुमित्रा-सुतें सर्व छेदून नेले ॥ ९ ॥
पुन्हा कोपला तो रिपू कोटि-गूणें । शतांचीं शतें सोडिले बाण तेणें ॥
नभामाजि ते बाण बाणीं सणाणा । कितीएक स्फुल्लिंग भालीं फणाणा॥ १० ॥
असंभाव्य ते जाहली बाण-वृष्टी । जळों लागली पावकें सर्व सृष्टी ॥
अती चंड ते दंड अद्भूत कैसे । महाकाळ कल्पांतिंचे मेघ जैसे ॥ ११ ॥
कडाडां खडाडां गडाडां घडाडां । तडाडां थडाडां दडाडां धडाडां ॥
बहूतांपरीचे बहू घोष झाले । ग्रहां चंद्र-सूर्यादिकां कंप आले ॥ १२ ॥
कितीयेक सिंधूदकें तप्त जालीं । कितीयेक सिंधूदकें तीं उडालीं ॥
असंभाव्य त्या दाटल्या बाण-कोटी । बळें सोडिती पाडिती वीर जेठी॥ १३ ॥
नभामाजि कल्पांत ते बाण-जाळीं । महायुद्ध तें होतसे अंतराळीं ॥
रिपू पेटले दोनही घोर मारा । भुमी वृष्टि गारापरी सर्व तारा ॥ १४ ॥

* * * *

म्हणे रावणी हा रिपू आवरेना । बहूसाल सामर्थ्य याचें सरेना ॥
शरां मारितां सर्व तोडीत आहे । पुढें अग्नि-अस्त्रासि तो सोडिताहे॥ १५ ॥
तयें सोडितां अस्त्र तैसें निघालें । धडाडीत तें तेज-पुंजाळ आलें ॥
नभीं धूम्र दाटे असंभाव्य ज्वाळा । करूं पाहती भस्म नक्षत्रमाळा॥ १६ ॥
असंभाव्य ते चालिली वह्नि-धाडी । मही सर्व आकाश तेणें कडाडी ॥
बहू-वर्ण ज्वाला शिखा धांवताती । कडाडीत नेटें कपीमाजि येती॥ १७ ॥
सुमित्रा-सुतें देखिलें अग्नि-अस्त्रा । पुढें सोडिता जाहला मेघ-अस्त्रा ॥
तया सोडितां मेघ तैसे उदेले । गिरीचे परी अंबरीं भार आले ॥ १८ ॥
नभीं दीसती ते हुडे कोट झाडें । महामेघ गर्जोनि गंभीर वाडें ॥
नभा व्यापिलें घोर अंधार जाला । दिसेना रणामाजि दोहीं दळांला॥ १९ ॥
नभीं चालिले ते बहू कीट काळे । झकाकीत सौदामिनीचोनि मेळें ॥
बळें मेघ-धारा असंभाव्य गारा । सुटे कंप सूसाट घोषें थरारां ॥ २० ॥
प्रसंगीं तये पाणजंजाळ जालें । रणामंडळीं तोय अद्भूत आलें ॥
कितीएक झाडें भुमी चूर्ण होती । पुरें पट्टणें सर्व वाहूनि जाती ॥ २१ ॥

रणीं सोडिलें अस्त्र नेटें विझालें । बहू राक्षसां थोर कल्पांत आलें ॥
त्वरें रावणी वायु-अस्त्रास सोडी । असंभाव्य तो वात नेटें झडाडी ॥ २२ ॥
कडाडीत पाडी असंभाव्य झाडें । बळें पाडिलीं वाड झुंबाड झाडें ॥
फुटों लागलीं शैल-शृंगें खडाडां । कडे चालिले पर्वतांचे भडाडां ॥२३॥
भ्रमों लागलीं खेचरें प्रेत जालीं । गृहें गोपुरें एक वेळे उडालीं ॥
बहूसाल तो वात-आवर्त जाला । तया देखतां मेघ नेटें उडाला ॥ २४ ॥
सुमित्रा-सुतें देखिला चंड वारा । गिरी-अस्त्र सोडूनि केला निवारा ॥
असंभाव्य तीं चाललीं शैल-शृंगें । बहू वात निर्वात केला प्रसंगें ॥२५॥

* * * *

रणीं रावणी लक्षितां तेचि काळीं । बळें भेदिल्या बाण-भाळी कपाळीं ॥
नवां बाण-घातें रिपू स्वस्थ केला । तया मेघनादा बहू खेद जाला ॥२६॥
कपाळीं बळें भेदिला बाण वीरें । प्रवाहो बळें चालिला तो रुधीरें ॥
महामस्तकामाजि सर्वे बुडाले । कपाळावरी पिच्छ बाशिंग जालें॥२७॥
म्हणे वीर बीभीषणू वीर-छात्रा । बरें ऊसणें घेतलें गा सुमित्रा ॥
रिपू रावणी तापला वीर कैसा । शुळें टोंचितां ऊठला सर्प जैसा ॥२८॥
महावीर निर्वाणिंचे बाण सोडी । लघू लाघवें शेष तात्काळ तोडी ॥
असंभाव्य कोपानळें तीव्र ज्वाळा । मुखें सोडितां काळ कांपे चळाळां२९
सिमा सांडिली थोर कल्पांत काळीं । महावीर ते खीळिले बाण-जाळीं ॥
बहू खोंचिले देह दोघां जणांचे । झरे लागले वाहती शोणिताचे ॥ ३० ॥
विर-श्री-बळें दुःख नाहीं प्रतापें । रणीं भेदिती एकमेकांस कोपें ॥
बहू माजलें युद्ध तें ओसरेना । बळें भीडती येकमेकां सरेना ॥ ३१ ॥
पुढें काय केलें सुमित्रा-सुतानें । गुणीं साज्जिलें त्या रवी-चक्र बाणें ॥
मुखीं धांवती त्या शिखा पावकाच्या । बहू चंचला कोटि विद्युल्लतेच्या ३२
कडाडीत कोपानळें बाणभाळी । बळें सोडितां शीघ्र तैशी निघाली ॥
भयातूर दोहीं दळीं कंप जाले । ऋषी देव गंधर्व धाकें पळाले ॥ ३३ ॥
ग्रहादीक आकाश-पंथीं जळाले । बहू खेचरें-भार भूमी गळाले ॥
ध्वनी ऊठला घोर घोषें तडाखा । बळी कांपती ईतरां कोण लेखा॥३४॥
सुमित्रा-सुतें शीघ्र संधान केलें । रणीं रावणी-शीर छेदूनि नेलें ॥
समस्तां सुरांलागिं आनंदवीलें । सुरेशामतींचें महाशल्य गेलें ॥ ३५ ॥

युद्धकांड, सप्तम प्रसंग. —रामदास.

---

# ३३ भीमदुर्योधनांचें गदायुद्ध.

## आर्या.

भीम म्हणे, ‘ रे अधमा ! केलें त्वां आणि जें तुज्या तातें ।
चित्तांत आठवावें पदरीं फळ घ्यावया कुजाता ! तें ॥ १ ॥
विष चारिलें बुडविलें डोहांत, करावयासि वध, मातें ।
स्मर वारणावतींचें जतु-सद्म-च्छद्म-कर्म अधमा ! तें ॥ २ ॥
कपट-द्यूतें हरिलें सर्वस्व, पुढें करून कितवातें ।
नेली सभेंत साध्वी, व्हावें शिवतां जिला चकित वातें ॥ ३ ॥
ऐसीं अनेक पापें केलीं त्वां भरत-कुळ-कळंका रे ! ।
तूं जेंवि दुर्गुणांहीं, न असा दशतुंडही अळंकारे ॥ ४ ॥
भीष्म-प्रभु शर-तल्पीं पडला दुष्टा तुज्याचि पापानें ।
त्वां बहु कुळें बुडविलीं, घननादाच्या असीं न बापानें ॥ ५ ॥
गुरु, कर्ण, शल्य वधिले भगदत्ताधिक अनेक-शत राजे ।
मथिले त्वदनुजहि, म्हणत होते आम्हां ‘ रणांत न तरा ’ जे ॥ ६ ॥
जेणें कपट-द्यूतें करुनि दिली हे तुला वश कु निखिळा ।
मदुरांत पुन्हां परिभव-तापाचा हेतु लाव शकुनि-खिळा ! ॥ ७ ॥
क्षम सज्जन-च्छळासचि सर्व तुम्ही पाप, अक्षम रणाला ।
पांडव न हेतु तुमच्या, हे फिरले तेचि अक्ष, मरणाला ॥ ८ ॥
उरलासि एक, सोदर गेले तिकडे तुलाहि पाठवितों ।
तुज देय फळ दिलें किति, किति उरलें, हें मनांत आठवितों ’ ॥ ९ ॥
कुरुराज म्हणे, “ मंदा ! मेळविलें बहु-विकत्थनें काय ? ।
‘ हाय ! ’ म्हणवितों युद्ध-श्रद्धेसह भंगितों तुजा काय ॥ १० ॥
न्यायें शत्रु मज गदा-युद्धीं जिंकी असा असे कोण ? ।
तूं महिष तोंचि, जोंचि न शोण-गदा-शक्ति-दृष्टिचा कोण ॥ ११ ॥
न्यायें मज जिंकाया न समर्थ गदा-रणीं सुनासीर ।
ये भूमींत, वितिलका व्हाया त्या पांडुच्या सुना, सीर ॥ १२ ॥
वदलासि दुर्विचेष्टित माजें जें जें खरेंच भीमा ! तें ।
मंदा ! न तदेक-प्रतिकृत घडलें म्हणुनि लाज भी मातें ॥ १३ ॥

ऱ्यां करुनि तुम्हां वल्कल-धर दीन, सु-चिर वनोवन फिरविलें ।
अज्ञात-वास दास्यहि करवुनि, निज-तेज दुःसह मिरविलें ॥ १४ ॥
तुज लाविलें स्व-तेजें ऱ्यांच कढी भात वरण घाटाया ।
वाटाया प्राज्य पुरण पापड पोळ्या प्रभूत लाटाया ॥ १५ ॥
माजे तुजेहि मेले आप्त बहु; क्षय समान दोघांचा—।
काळें, जैसा घटजें त्या पूर्वापर-सरस्वदोघांचा ॥ १६ ॥
भाग्यें घडेल जरि तरि मज परम-श्लाघ्य संगरीं पतन ।
जतन क्षत्रिय न करिती, जोडिति नाकीं तनु-व्ययें वतन ॥ १७ ॥
अद्यापि मला कोणी धर्में जिंकी असा असे न गदी ।
छद्में वधितां तुमची होइल अप-कीर्ति विषचि ती अगदीं ॥ १८ ॥
कौंतेया त्वां शारद-वारिधरापरि वृथा न गर्जावें ।
बळ असल्या दावावें प्रथम, विकत्थन समग्र वर्जावें " ॥ १९ ॥
कौरव-वर कोपानें करि-पतिला केसरी तसा पाहे !
राहे निष्कंप पुढें, शक्रा बळसा मरुत्सुता बाहे ॥ २० ॥
भीम म्हणे धर्माला, ' रामापासूनि जेंवि पामर तो ।
मजपासुनि हा दुर्मति दुर्योधन तेंवि भूमिपा ! मरतो ' ॥ २१ ॥
दुर्योधनाप्रति म्हणे, ' केलें अघ-कर्म आठिव रिपो तें ' ।
जें घेतलें बुडाया बहु ओझें, जेंवि पाठिवरि पोतें ॥ २२ ॥
नृ-पति म्हणे, ' बोलेंचि न होतो जन विप्रताप शोभित रे ! ।
भिवाविशि कोणा ? जाले न कुरु वरुनि विप्रता पशो ! भितरे ॥ २३ ॥
चिर-काळ मनीं होतें व्हावें तुजसीं भलें गदा-युद्ध ।
नवसासि पावले सुर, कीं, माजा भाव समजला शुद्ध ' ॥ २४ ॥
वाग्युद्ध करुनि, करिती अतुल गदा-युद्ध ते गदीश तदा ।
वाहे बहु रक्त, गमे तन्मूर्ति सरस्वती नदी शतदा ॥ २५ ॥
अत्यद्भुत करिती ते युद्ध नृपा ! होय वायु पंगु, लिही—।
तेव्हां न चित्रगुप्ताहि, राहे मुनिची उगीच अंगुलिही ॥ २६ ॥
गमलीं साक्षाच्चित्रें प्रेक्षक-कटकें समस्त बापा ! तीं ।
लवलीं न पाहतां त्यां स्व-तुळ-गदा-युद्ध-कौतुका पातीं ॥ २७ ॥
दुर्योधनें गदेनें पार्श्वींच प्रथम ताडिला रागें ।

परि तो प्रहार नाहीं गणिला कुंती-सुतें महा-भागें ॥ २८ ॥
तदनंतर कुरु-राजें केला आघात मस्तकीं क्रोधें ।
बोधें भोग तसा तो धैर्यें त्या साहिला महा-योधें ॥ २९ ॥
मग भीमेंहि क्रोधें पार्श्वींच गदा-प्रहार बा ! केला ।
पडला गुडघे टेंकुनि, तों दे मुदितारि-सैन्य हाकेला ॥ ३० ॥
कुरु-सिंहाच्या नाकीं झाली पांचाळ-गर्जना काडी ।
धावोनि शंख-देशीं अत्यावेशें वृकोदरा ताडी ॥ ३१ ॥
चळला न अचळसा, वरि भरला रक्तें, मनांत रागानें ।
खवळे शिवला पायें जाणों हरि कीं खगेंद्र नागानें ॥ ३३ ॥
कुरु-पतिस दिला भीमें उग्र गदेचा असा रपाटा कीं ।
त्या वपु म्हणे, ' भरवसा माजा राज्या ! असारपा ! टाकीं ' ॥ ३४ ॥
भीम-गदा-घातें तो नृप पडला जेंवि शाल-तरु वातें ।
स्वल्प सभास्तरणीं जो गणि हस्तमिताहि चालत रुवातें ॥ ३५ ॥
डोहांतुनि गजसा, नृप मोहांतुनि निघुनि दे तडाखा तो ।
भीमहि पडला, गमला पवि-पातें देश तो तडा खातो ॥ ३६ ॥
हरिसा गर्जे राजा, तत्सत्वें देव पावले हर्ष ।
व्योमीं जय-ध्वनि उटे, सुर-कुसुमांचें पडे शिरीं वर्ष ॥ ३७ ॥
उठला भीम मुहूर्तें, धरुनि पुन्हां आयुधा, रणाला हो ! ।
पर म्हणति, ' विधे ! हा तव सदयेक्षण आयु-धारणा लाहो ' ॥ ३८ ॥

* * * *

कार्य-व्यग्रा माता सूनुकडे जेंवि दाइला धाडी ।
भीम-दया तासि दृष्टिसि, तों जय सख्योरुतें करें ताडी ॥ ३९ ॥
संज्ञेतें धरुनि मनीं तो निज-संधेसि आठवी, राज्या ! ।
क्रोधांधा न दिसावे दिग्गज दिक्पाळ आठ वीरा ज्या ॥ ४० ॥
हाणिति, चुकवितिहि बळें दावुनि, लागावया गदा, विवर ।
करणें प्रहार माथां ज्याच्या त्या तो गदा न दावि वर ॥ ४१ ॥
बसतां गदा गदेवरि किटळें बहु उसळतीं; अहा ! त्यांचीं—।
तेजें जसीं विजांचीं; झांकिति नयनें नृपा ! पहात्यांचीं ॥ ४२ ॥

चुकवावया प्रहार व्योमीं उडतांचि ऊरुवरि ताडी ।
मांड्या मोडुनि मारुति महिवरि सहसा सुयोधना पाडी ॥ ४३ ॥
देवाश्रु-बिंदु-सह बा ! तव पडला ज्येष्ठ-सुत; पतन याचें—।
कांपवि भूतें, स्तविलें या पांडूच्याचि सु-तप तनयाचें ॥ ४४ ॥
पांचाळ मुदित झाले, जैसे होतांचि वृत्र-हानि सुर ।
होय वृकोदर, मारुनि कुरुपतितें, जेंवि वृत्रहा निसुर ॥ ४५ ॥
पतितातें भीम म्हणे, " रे कुर्वधमा कुबुद्धिच्या कंदा ।
' गौगौ ' म्हणोनि हांसत होतास सतीस तूंच कीं मंदा ! ॥ ४६ ॥
त्या कर्माचें घे फळ, " ऐसें गर्जोनि वाम-पादानें ।
शिर तुडवी, ईश्वरसा दे भीम कृतानुरूप बा ! दानें ॥ ४७ ॥

गदापर्व, अ. २-४. —मोरोपंत.

---

## ३४ कृष्णदुर्योधनसंवाद.

दुर्योधन मांड्या मोडून पडल्यावर, भीमानें द्रौपदीविटंबनादि त्याच्या दुष्कर्मांच्या उच्चारानें त्याच्या अंतःकरणावर यथेच्छ वाक्प्रहार व त्यांबरोबर त्याच्या मस्तकावर मनसोक्त लत्ताप्रहार केले. त्याप्रमाणें इतर पांडवपक्षीयांनींही त्याच्या दुष्कर्मांचा पाढा वाचून शतशः धिक्कारांनीं त्याचा मर्मभेद केला, तेव्हां—

### आर्या.

केशव म्हणे, ' सु-भट हो ! मृत-मारण हें तुम्हां नव्हे युक्त ।
मेला तेंच, गुरूचें जेव्हां याणें विलंघिलें उक्त ॥ १ ॥
मित्र नव्हे, शत्रु नव्हे, आतां बोलोनि काय या खोडा ? ।
सोडा मृत-पाप-कथा, शीघ्र चला दिवस राहिला थोडा ॥ २ ॥
मेला दुर्जन झालें बहु बरवें, सर्व वारली पीडा ।
खळ साधु-पदा भोगित होता, बक जेंवि हंस-खग-नीडा ' ॥ ३ ॥
या स्वाधिक्षेपें तो नृप उठला धरुनियां मनीं राग ।
आगस्कर-घातार्थी पुच्छ-च्छेदार्त-धी जसा नाग ॥ ४ ॥
तनु विकळा परि उठवी टेंकुनि भुज आणि तो टिरी तीतें ।
न गणीच वेदना, त्या स्तविना कां वीर-कोटि रीतीतें ! ॥ ५ ॥

कोपें कृष्णासि म्हणे, " आइक रे कंस-दास-दायादा ! ।
निर्लज्जा ! कपटा तव हृदया तसि गांठि जसि नदा यादा ॥ ६ ॥
या फाल्गुनासि सांगुनि कपट, हळुच खूण दाखवुनि भीमा ।
त्वां मोडविल्या माझ्या मांड्या, त्वत्कैतवा नसे सीमा ॥ ७ ॥
कपटोपायें मारुनि ऋजु-संगर बहु सहस्र कवि राजे ।
लज्जा, दया नसे तुज; सु-भटांत त्वत्पटुत्व न विराजे ॥ ८ ॥
जो धर्म-युद्ध दुर्जय वरुणा, धनदा, द्युपा, यमा, रविला ।
त्वां स्त्री-पूर्व शिखंडी करुनि पुढें आपगेय मारविला ॥ ९ ॥
शिकवुनि धर्मा ' अश्वत्थामा मेला ' असें अलीक रणीं ।
गुरु-घातार्थ वदविलें त्वां स्पष्ट; तुझी भली नव्हे करणी ॥ १० ॥
प्रिय-सुत-शोकीं बुडवुनि करवुनि समरांत आयुध-न्यास ।
त्वां मरणोन्मुख केलें, असतां सामर्थ्य आयु धन्यास ॥ ११ ॥
द्रुपद-सुत प्राय-गत ब्राह्मण-शिर तुजसमक्ष जो कापी ।
ब्रह्मण्य कसा रे ! तूं ? कैसा तो त्वां न वारिला पापी ? ॥ १२ ॥
कर्णें स्व-कवच-कुंडल-धन-दानें शक्ति संग्रहीं केली ।
जी अर्जुनीं पडावी ती त्वां तुच्छीं घटोत्कचीं नेली ॥ १३ ॥
भूरिश्रवा महात्मा त्याचा त्वां दक्ष बाहु तोडविला ।
शिर खंडितां न सात्यकिपासुनि तो प्राय-गतहि सोडविला ॥ १४ ॥
तैसाचि अश्वसेन-व्याळ-शर च्छद्म करुनि चुकवीला ।
मारविलें त्वां चक्र-व्यसनीं कर्णा अशाहि सु-कवीला ॥ १५ ॥
भीष्मासीं कर्णासीं गुरुसीं मजसीं न कपट करितास ।
हरितास क्षितिस न तूं, वाढविसि कुटिलपणेंचि चरितास ॥ १६ ॥
आम्हां असे बुडविले त्वां बहु निज-धर्म-निरत कपटानें ।
झांकिल कसें अनार्या ! स्व-वदन यदु सुर-सभेंत न पटानें ? " ॥ १७ ॥
देव म्हणे " गांधारे ! मेलासि स-पुत्र-बंधु तूं दुरितें ।
सच्छळ-कर्म सु-दारुण वज्र तसें, बहु दृढासही चुरितें ॥ १८ ॥
भीष्म द्रोण सु-दुर्जय परि मेले हे तुज्याचि पापानें ।
ज्यां प्रबळां जोडावे हात जयंताचियाहि बापानें ॥ १९ ॥

होता सुरासुर-नरोरग-दुर्जय कर्णही जसा रुद्र ।
व्यसनीं पडोनि मेला; कीं, तव-शीलानुवर्तक क्षुद्र ॥ २० ॥
म्यां विनविलें परोपरि परि भाग खळा ! न देववे, नाकीं—।
तुजहुनि भला शत-गुणें वदले शक्रादि देव वेना कीं ॥ २१ ॥
कवि-जन हित-महित म्हणुनि बहु न मनुनि याग, देशिकां गातो ।
तदतिक्रम केला त्वां, कोपविल न या गदेसि कां गा ! तो ? ॥ २२ ॥
त्वां भीमासि विष दिलें, तुज योग्य न काय पतन गरदा हें ? ।
मेळविलें अघ पांडव-दाहें बहु जेंवि शत-नगर-दाहें ॥ २३ ॥
दुःशासन केश धरुनि कृष्णेसि जधीं सुयोधना ! कर्षी ।
म्यां तेव्हांचि वधुनि तुज हृष्ट करावे सु-योध नाकर्षी ॥ २४ ॥
कितव शकुनि करुनि पुढें धर्मात्मा धर्मराज नागविला ।
जागविला चिंतेनें तेरा वर्षें सदैव भागविला ॥ २५ ॥
कृष्णा जयद्रथानें हरिली, जासि रावणें अनादि सती ।
जी साक्षाज्जगदंबा शुद्धा अप्राकृता जना दिसती ॥ २६ ॥
बहुतांनीं विरथ करुनी वधिला अभिमन्यु एकला बाळ ।
तें अघ करिल तुझी, जासि वृद्धाची निर्धनत्व आबाळ ॥ २७ ॥
'केला घात अधर्में,' असि मजवरि घालितोसि कां आळ ? ।
व्याळ-सम पोषिला जो तो त्वदधर्मचि खळा ! तुझा काळ ॥ २८ ॥
वृद्ध न उपासिले, गुरु-शुक्रांचे ऐकिले न उपदेश ।
तृष्णांध मूढ लोभी खळ तूं होसील केंवि सुपदेश ? " ॥ २९ ॥
राजा म्हणे, " विसरलों मी, सांगा करुनि पाठ वेदा, न ।
पात्रीं न दिलें ऐसें एकहि मजला न आठवे दान ॥ ३० ॥
अखिळाहि भोगिली म्यां पृथ्वी, पर-मस्तकीं दिला पाय ।
स्वंत-तर कवण मजहुनि ? आतां कर्तव्य राहिलें काय ? ॥ ३१ ॥
अभिमुख शस्त्राघातें समर-मखामाजि वेचिला काय ।
स्वंत-तर कवण मजहुनि ? आतां कर्तव्य राहिलें काय ? ॥ ३२ ॥
मद्भोग मदैश्वर्य प्रेक्षुनि वदले समस्त अरि, 'हाय !' ।
स्वंत-तर कवण मजहुनि ? आतां कर्तव्य राहिलें काय? ॥ ३३ ॥

सत्कारील सुरांचा स-सुहृत्-सुत-सोदरा मला राय ।
स्वंत-तर कवण मजहुनि ? आतां कर्तव्य राहिलें काय ? ॥ ३४ ॥
ज्या वीर-सू तयांला झाली मान्या जगत्रयीं माय ।
स्वंत-तर कवण मजहुनि ? आतां कर्तव्य राहिलें काय ? ॥ ३५ ॥
प्रविहत-संकल्प तुम्हीं झाळां, सर्वहि बुडाल शोकांत ।
सकळ सहायांसह मी प्रमुदित होईन वीर-लोकांत " ॥ ३६ ॥
या वाक्याच्या, झाली कुरु-पतिवरि पुष्प-वृष्टि, अवसानीं ।
सुर झाले हृष्ट, जसे जन होतां काम पूर्ण नवसांनीं ॥ ३७ ॥
गदापर्व, अ. ६. —मोरोपंत.

---

# ३५ जरासंधवध.

जरासंध हा मगध देशाचा राजा. ' पृथ्वीपाळांमाजी श्रेष्ठ । जरासंध परम दुष्ट । निर्दय दुरात्मा पापिष्ठ । उपमे जैसा रावणु ॥ १ ॥ राजे धरूनियां असंख्यात । तेचि कल्पूनियां बस्त । होम करावया उद्युक्त । झाला असे...' युधिष्ठिरानें जेव्हां ' राजसूय ' यज्ञ करण्याचें योजिलें, तेव्हां ' जरासंध अतिदारुण । जीवंत असतां तुमचा यज्ञ । सिद्धी न पावे सर्वथा ' असा श्रीकृष्णाचा अभिप्राय पडला. नंतर युधिष्ठिराचे संमतीनें श्रीकृष्ण, भीम व अर्जुन ब्राह्मणवेषानें जरासंधाकडे गेले. त्यानें त्यांचा योग्य सत्कार करून ' मागाल तें देईन दान ' असें म्हटलें. तेव्हां, बंदिखान्यांत टाकलेल्या राजांस मुक्त कर, नाहीं तर युद्धास उभा रहा, असें श्रीकृष्णानें उत्तर दिलें. तें ऐकून जरासंधास फार राग आला—

## ओंव्या.

पुसोनियां उभय नेत्र । न्याहाळून पाहे वक्त्र । म्हणे, ' हा पांडवांचा मित्र । होय सत्य कीं विचारें ॥ १ ॥ जो आटींव जेठिया ऐसा । चढत तेज मुख-प्रकाशा । भीमाऐसा आंगठसा । माझे दृष्टी दिसतसे ॥ २ ॥ तिसरा जो कां आ-जानु-बाहो । तो द्रौपदीचा तिसरा नाहो । त्रिशुद्धी करूनि खांडव-दाहो । तोषविलें त्रिपादा ॥ ३ ॥ जरासंध असतां जितु । महींद्र-मोचनाची मातु । करी ऐसा वीर-श्री-कांतु । भुवन-त्रयीं

असेना ॥ ४ ॥ खद्योत उजळी रवि-मंडळा । मुंगी उचली ब्रह्मांड-गोळा । तेविं तुझें बोलणें बरळा । शक्तिहूनी अचाट ॥ ५ ॥ अवलोकोनि आपणाकडे । शक्तीसारिखें बोलिजे तोंडें । याचकें जीविकेचिये चाडें । मागों ये तेंचि मागावें ' ॥ ६ ॥ कंसारी संसार-गज-केसरी । हांसोनि बोले श्रीकृष्ण शौरी । ' पांडु-पुत्र हे निर्धारीं । भीमार्जुन जाण पां ॥ ७ ॥ मागां अपराध केले क्षमा । ते कार्याकारणें पुरुषाधमा । लोटली मर्यादेची सीमा । शेवटीं फळ भोगी कां ॥ ८ ॥ सरला सुकृताचा तंतु । आयुष्य-तैला झाला अंतु । माझिये हस्तीं व्यजन-वातु । भीम-रूपें उदेला ॥ ९ ॥ तो झगटतां सत्वर-गती । प्राण-दीप-पंचज्योती । मालवोनि, पडेल क्षिती । गात्र-पात्र पालथें ॥ १० ॥ असेल वांचावयाची आर्ती । तरी रक्षिल्यां करीं बंध-मुक्ती । मग आम्हां तुम्हां अर्थाअर्थीं । वैर-संबंध असेना ॥ ११ ॥ करीं रायांचें बंध-मोचन । कीं युद्धा उठीं न लागतां क्षण । या वेगळा विचार आन । करणें आतां घडेना ॥ १२ ॥ आतां बोलिलासी वचन । मागाल तें देईन दान । न करितां नृपांचें मोचन । ऊठ वेगीं संग्रामा ॥ १३ ॥ तिघांमाजी जो आवडे । त्यासींच भिडिजे इडेपाडें ' । मागध म्हणे, ' मूर्खा ! तोंडें । जल्प करिसी वाचाटा ॥ १४ ॥ तूं बहु-रूपी खेळसी सोंगें । कोणतें युद्ध जिंकिलें आंगें । वेडीं बागडीं भाविकें भणगें । तुझ शूरत्व त्यांमाजी ॥ १५ ॥ पार्थ पृथेचें सु-कुमार बाळ । शस्त्राभ्यासीं गेला काळ । मजसीं अयोग्य, परि अळुमाळ । भीम कांहीं दिसतसे ॥ १६ ॥ तोही मंद जड आळशी । बहुत आहार निद्रा यासी । आयुष्य सरलें म्हणून ऐसी । बुद्धि उदेली तुम्हांतें ॥ १७ ॥ तिघांतें हाणोनि चडकणा । क्षणामाजी मेळवीन मरणा । बळें सर्पाचिया सदना । मंडूक वस्ती पावलां ' ॥ १८ ॥ ' मंडूक किंवा तिघे गरुड । आतांचि होईल हा निवाड । समय प्राप्त झालिया वाड । बोल टाकीं माघारा ' ॥ १९ ॥ ऐसें बोलतां चक्र-पाणी । उभे ठले समरांगणीं । जरासंधें राज्यासनीं । अभिषेकिलें सहदेवा ॥ २० ॥ प्रधानातें निरोपी मुखें । राज्य रक्षावें अति विवेकें । होणार तें होतसे

सुखें । निर्भय सर्वीं असावें ॥ २१ ॥ सरसावुनी वीरगुंठी । भीम लक्षिला दारुण-दृष्टी । जैसा मदोन्मत्त करटी । मृगेश्वरें लक्षावा ॥ २२ ॥ भीमाआंगीं वीर-श्री-लोट्ट । धरितां न धरवे अति-उद्भट्ट । अगस्ती धांवे समुद्र घोट्टूं । तैसा तगटे पुढारां ॥ २३ ॥ दोघे पिटिती पाणि-तळें । जानु-मूळें बाहु-मूळें । मही ताडितां पाद-तळें । शैल-मौळें थरकती ॥ २४ ॥ किरीट काढोनि हस्तकीं । केश आंवळिले मस्तकीं । चंड गर्जना करिती मुखीं । काळ कांपे चळचळां ॥ २५ ॥ धांवोनि भीमाची वीरगुंठी । मागधें कवळोनियां मुष्टी । दक्षिण हस्त सूदला कंठीं । काळ-पाशासारिखा ॥ २६ ॥ दांत खाऊनि करकराटी । गुडघा स्थापिला हृदय-पुटीं । 'सावध'! म्हणे कृष्ण जगजेठी । 'बापा भीमा बलिष्ठा !' ॥ २७ ॥ भीमें भैरवाकार दृष्टी । हृदयीं वोपिली वज्र-मुष्टी । सोडवूनि मगर-मिठी । झिंजाडोनी सोडिला ॥ २८ ॥ तेणें मागुती उठोनि विकळ । पडिला जैसा विशाळ ताळ । पुढती उठोनि उतावीळ । भीम मध्यें कवळिला ॥ २९ ॥ दोन्ही कोंपर दोन्ही मुष्टी । चारी आघात वोपिले पृष्टीं । मागध क्षोभोनि उफराटी । हुमणी हाणीतली मस्तकीं ॥ ३० ॥ झोंबी सोडवोनि तवकें । मस्तका मस्तकें देती थडकें । सहस्र संख्या, लोट भडके । अशुद्धाचे चालती ॥ ३१ ॥ हस्त ओढिती तोडावया । पाय कवळिती मोडावया । डोळे टोंचिती फोडावया । पाडावया दशनांतें ॥ ३२ ॥ कर-प्रहार, लत्ता-प्रहार, । मुष्टि-प्रहार, मस्तक-प्रहार । मोजोनि मारिती शत सहस्र । 'उसणें घे घे' म्हणोनि ॥ ३३ ॥ बाहु-गदा बाहु-मुसळें । बाहु-मुद्गल, कर-त्रिशूळें । एकमेकांचीं मर्मस्थळें । पाहोनियां, मारिती ॥ ३४ ॥ व्याघ्रांऐसे क्रोधानळीं । झोंबों पाहती कंठ-नाळीं । सिंहाऐसे कुंभ-स्थळीं । भेदूं म्हणती मस्तकें ॥ ३५ ॥ सर्पाऐसे फुस्कारती । सिंहाऐसे हुंकारती । वृषभाऐसे फुंपाटती । उफाळती इसाळें ॥ ३६ ॥ मुष्टि-घातांचिया ध्वनी । थरथराटें थरके धरणी । वोथरोनि पाताळ-फणी । मार्ग पाहे पळावया ॥ ३७ ॥ निराहार निरुदक । विसांवा न घेतां पळ एक । तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध झालें दोघांसी ॥३८॥ चतुर्दश-दिनाचे रातीं । मूर्च्छा पावला मागध-नृपती । ते वेळीं संकेत दावी हातीं । पांडवातें माधव

॥ ३९ ॥ ' पाय कवळोनि कर-तळीं । चिरोनि करावीं दोन्ही फळीं । जरेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगीं बळिष्टा ! ॥ ४० ॥ या वेगळा उपाय आन । करितां, मागध न पावे मरण । आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती ' ॥ ४१ ॥ ऐसें बोले जंव मुकुंद । तंव सावध झाला जरासंध । धांवला जैसा द्विरद मदांध । झगटे विशाल द्रुमासीं ॥ ४२ ॥ भीमें रगडोनियां दाढा । मध्य-भागीं कर्षिला गाढा । माथां वाहोनियां भवंडा । चक्राकार दीधला ॥ ४३ ॥ तेथोनि टाकिला भू-तळीं । लात वोपिली वक्षःस्थळीं । वज्रें ताडोनियां मौळी । शक्र भंगी पर्वता ४४ तेवीं पाडोनियां उताणा । वाम-पादें दक्षिण चरणा । रगडोनि सव्य पाय जाणा । उभय हस्तीं कवळिला ॥ ४५ ॥ आंसडोनि बळ-उद्भटें । मध्यें उधडिला तडतडाटें । अशुद्ध-नदीचे खळखळाटे । रंग-भूमिके लोटले ॥ ४६ ॥ भीमसेनें आपुले हस्तीं । करोनि शकलें टाकिलीं क्षितीं । जरासंधा दिधली मुक्ती । कुंती-कुमरें यापरी ॥ ४७ ॥

सभापर्व, अ. ६–७. —मुक्तेश्वर.

---

## ३६ सद्गुरुस्तवन.

### ओंव्या

जयजयाजी सद्गुरु-राजा । विश्वंभरा विश्व-बीजा । परम-पुरुषा मोक्ष-ध्वजा । दीन-बंधु ॥ १ ॥ तुझीयेन अभय-करें । अनावर माया हे ओसरे । जैसें सूर्य-प्रकाशें अंधारें । पळोन जाय ॥ २ ॥ आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे । निसी जालियानंतरें । पुन्हा काळोखें ॥ ३ ॥ तैसा नव्हे स्वामि-राव । करी जन्म-मृत्य वाव । समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ४ ॥ सुवर्णाचें लोह कांहीं । सर्वथा होणार नाहीं । तैसा गुरु-दास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥ ५ ॥ कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ ६ ॥ परी ते सरिता मिळणीमागें । वहाळ मानिजेत जगें । तैसा नोहे शिष्य वेगें ।

स्वामीच होय ॥ ७ ॥ परीस आपणाऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना । उपदेश करी बहुत जनां । अंकित सद्गुरूचा ॥ ८ ॥ शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां न ये । म्हणोनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ ९ ॥ उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंताचि क्षार । अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ॥ १० ॥ उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु । तैसा नव्हे कीं सद्गुरु । परम कोमळ दीनाचा ॥ ११ ॥ उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण । या कारणें दृष्टांत हीण । सद्गुरूस गगनाचा ॥१२॥ धीरपणें उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं । म्हणोन धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा ॥ १३ ॥ आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥ १४ ॥ म्हणोनि उपमे उणा दिनकर । सद्गुरु-ज्ञान-प्रकाश थोर । आतां उपमावा फणिवर । तरी तोही भारवाही ॥ १५ ॥ आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ । सद्गुरु-रूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ १६ ॥ सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्य-पंथ । सद्गुरु-कृपा यथार्थ । अमर करी ॥ १७ ॥ सद्गुरूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनातीत विचारु । कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ॥ १८ ॥ चिंता-मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी । कामधेनूचीं दुभणीं । निष्कामास न लगती ॥ १९ ॥ सद्गुरु म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत । ज्याचे द्वारीं असे तिष्ठत । मोक्ष-लक्ष्मी ॥ २० ॥ स्वर्ग-लोक इंद्र-संपत्ती । हीं काळांतरीं विटंबती । सद्गुरु-कृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २१ ॥ हरि-हर-ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक । सर्वदा अविनाश येक । सद्गुरु-पद ॥ २२ ॥ तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी । पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥ २३ ॥ 'म्हणोनि सद्गुरु वर्णवेना' । हे गे हेचि माझी वर्णना । अंतर-स्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥ २४ ॥

दासबोध १. ५. —रामदास.

## ३७ भक्ताचें पारमार्थिक मरण.

ब्रह्मात्मैक्यस्थितीच्या अनुभवाचें हें वर्णन आहे. या स्थितींत द्वैती भावाचा म्हणजे देवाहून मी वेगळा या भावनेचा पुरा लोप होऊन, मिठाचा खडा पाण्यांत टाकला असतां, पार विरघळून जसा तद्रूप होऊन जातो, तसा भक्त सर्वस्वी भगवंतांत रंगून, लय पावून, निःशेष विरून, मुरून किंवा ' मरून ' जातो.

### अभंग.

१

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम ॥ १ ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रि-भुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥ २ ॥
एक-देशी होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें जाला सु-काळ हा॥ ३॥
फिटलें सुतक जन्म-मरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥ ४ ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥ ६ ॥

२

झाला प्रेत-रूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥
रडती रात्रंदिवस काम-क्रोध-माया । म्हणती हाय हाय यम-धर्म ॥ २ ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेंसी॥ ३ ॥
फिराविला घट फोडिला चरणीं । महा-वाक्य जनीं बोंब झाली ॥ ४ ॥
दिली तिळांजुळी कुळ-नाम-रूपासी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें॥५॥
तुका म्हणे रक्षा जाली आपेंआप । उजळला दीप गुरु-कृपा ॥ ६ ॥

३

स्थिरावली वृत्ती पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनियां ॥ १ ॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी । न निघे बाहेरी सुखावलों ॥ ३ ॥
सुनीळ प्रकाश उदेजला दीन । अमृताचें पान जीवन-कळा ॥ ४ ॥
शशि-सूर्या जाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥५॥
तुका म्हणे सुखें प्रेमेंसी डुल्लत । विरालों निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥

गाथा. —तुकाराम.

# ३८ नदीस पूर आलेला पाहून.

[ मुठा नदीस एकदां फार पूर येऊन श्रीओंकारेश्वराचे मंदिरांत पाणी शिरलें होतें. ]

## पद.

[ चाल—नृपममता रामावरती ]

विरहोत्सुक सागर झाला ।
प्रिय-सखीस भेटायाला ॥ मज गमे ॥
निज-मित्र मेघ पाठविला ।
गिरिराज-श्वशुर-सदनाला ॥ मज गमे ॥
सरिता ही सागर-जाया ।
त्यासवें निघाली जाया ॥ मज गमे ॥
आक्रांत । करित अत्यंत । ठेवितां तात ।
तिजसि उतरोनी ।
भूवरती तट-कटिवरुनी ॥ मज गमे ॥ १ ॥
तो प्रसंग जणुं बघवेना ।
म्हणुनी रवि झांकी नयनां ॥ मज गमे ॥
घन गाळिति अश्रू-धारा ।
दुःखें नच वाहे वारा । मज गमे ॥
शिव-मंदिरिं भगिनी गिरिजा ।
भेटे तिस सागर-भाजा ॥ मज गमे ॥
यापरी । सिंधु-मंदिरीं । जात सुंदरी ।
पूर्ण जल-सरिता ।
शिव-गिरिजा-दर्शन-मुदिता ॥ मज गमे ॥ २ ॥

वाग्वैजयंती. —गोविंदाग्रज.

---

# ३९ फुलराणी.

पूर्वदिवशीं सायंकाळपासून दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळपर्यंतच्या एका कळीच्या विकासाचें काव्यमय वर्णन या कवितेंत केलेलें असून या कळीसच कवीनें 'फुलराणी' हें नांव दिलें आहे.

**गाणें.**

हिरवे हिरवे गार गालिचे । हरित तृणाच्या मखमालीचे ॥
त्या सुंदर मखमालीवरती । फुलराणी ही खेळत होती ॥
गोड निळ्या वातावरणांत । अव्याज मनें होती डोलत ॥
प्रणय-चंचला त्या भ्रू-लीला । अवगत नव्हत्या कुमारिकेला ! ॥
आईच्या मांडीवर बसुनी । झोंके घ्यावे, गावीं गाणीं ॥
याहुनि ठावें काय तियेला । साध्या भोळ्या फुलराणीला ? ॥

* * * *

पुरा विनोदी संध्या-वात । डोलडोलवी हिरवें शेत ॥
तोच एकदां हांसत आला । चुंबून म्हणे फुलराणीलाः—॥
"छानी माझी सोनुकली ती । कुणाकडे ग पाहत होती ? ॥
कोण बरें त्या संध्येंतून । हळुच पाहतें डोकावून ? ॥
तो रवि-कर का गोजिरवाणा । आवडला अमुच्या राणींना ? " ॥
लाजलाजली या वचनांनीं । साधी भोळी ती फुलराणी ॥

* * * *

आंदोलीं संध्येच्या बसुनी । झोंकें झोंके घेते रजनी ॥
त्या रजनीचे नेत्र विलोल । नभीं चमकती ते ग्रह-गोल ! ॥
जादूटोणा त्यांनीं केला । चैन पडेना फुलराणीला ॥
निजलीं शेतें निजलें रान । निजले प्राणी थोर लहान ॥
अजून जागी फुलराणी ही । आज कशी ताळ्यावर नाहीं ? ॥
लागेना डोळ्याशीं डोळा । काय जाहलें फुलराणीला ? ॥

* * * *

या कुंजांतुन त्या कुंजांतुन । इवल्याशा या दिवट्या लावुन ॥
मध्य-रात्रिच्या निवांत समयीं । खेळ खेळते वन-देवी ही ॥

त्या देवीला ओंव्या सुंदर । निर्झर गातो; त्या तालावर—।
झुलुनि राहिलें सगळें रान । स्वप्न-संगमीं दंग होउन ॥
प्रणय-चिंतनीं विलीन-वृत्ति । कुमारिका ही डोलत होती ॥
डुलतां डुलतां गुंग होउनी । स्वप्नें पाही मग फुलराणीः—॥

*        *        *        *

" कुणी कुणाला आकाशांत । प्रणय-गायनें होतें गात ॥
हळुच मागुनी आलें कोण । कुणी कुणा दे चुंबन-दान " ॥
प्रणय-खेळ हे पाहुनि चित्तीं । विरहार्ता फुलराणी होती ॥
तों व्योमींच्या प्रेम-देवता । वाऱ्यावरती फिरतां फिरतां—॥
हळूच आल्या उतरुन खालीं । फुलराणीसह करण्या केलि ॥
परस्परांना खुणवुनि नयनीं । त्या वदल्या ही अमुची राणी ! ॥

*        *        *        *

स्वर्भूमीचा जुळवित हात । नाचनाचतो प्रभात-वात ॥
खेळुनि दमल्या त्या ग्रह-माला । हळुहळु लागति लपावयाला ॥
आकाशींची गंभीर शांति । मंद मंद ये अवनीवरती ॥
विरूं लागलें संशय-जाल । संपत ये विरहांचा काल ॥
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी । हर्ष-निर्भरा नटली अवनि ॥
स्वप्न-संगमीं रंगत होती । तरीहि अजुनी फुलराणी ती ॥

*        *        *        *

तेजोमय नव मंडप केला । लख्ख पांढरा दहा दिशांला ॥
जिकडे तिकडे उधळित मोतीं । दिव्य वऱ्हाडी गगनीं येती ॥
लाल सुवर्णी झगे घालुनी । हांसत हांसत आले कोणी ॥
कुणीं बांधिला गुलाबि फेटा । झकमकणारा सुंदर मोठा ! ॥
आकाशीं चंडोल चालला । हा वाङ्निश्चय करावयाला ॥
हें थाटाचें लग्न कुणाचें । साध्या भोळ्या फुलराणीचें ॥

*        *        *        *

गाउं लागले मंगल-पाठ । सृष्टीचे गाणारे भाट ॥
वाजवि सनई मारुत-राणा । कोकिळ घे तानांवर ताना ! ॥
नाचुं लागले भारद्वाज । वाजविती निर्झर पखवाज ॥

नवरदेव सोनेरी रवि-कर । नवरी ही फुलराणी सुंदर ! ॥
लग्न लागतें सावध ! सारे । सावध ! पक्षी सावध ! वारे ! ॥
दंवमय हा अंतःपट फिटला । भेटे रवि-कर फुलराणीला ॥

बालकवींची समग्र कविता, भा. १. —बालकवि.

---

## ४० भृंग.

[ **मणिबंध** वृत्ताच्या चालीवर. ]

भृंगा ! दंग अहा ! होसी । गुंगत धांव वनीं घेसी ॥
तुजमागुनि वाटे यावें । गोड फुलें चुंबित गावें ! ॥ १ ॥
रवि येत असे उदयातें । अरुण-तेज विलसत दिसतें ॥
तरी तिमिर हा विरल असे । धुकें भरुनि न स्पष्ट दिसे ॥ २ ॥
कविच्या हृदयीं उज्ज्वलता । आणिक मिळती अंधुकता ॥
तीच स्थिति ही भासतसे । सृष्टी कवयित्रीच दिसे ! ॥ ३ ॥
तिच्या कल्पना या गमती । कलिका येथें ज्या फुलती ॥
सुगंध यांतुनि जो झुकतो । रस त्यांतिल तो पाझरतो ! ॥ ४ ॥
भृंगा आणि तुझें गान । सृष्टीचें गमतें कवन ! ॥
गा तूं गा नादीं भ्रमरा । मी गण-मात्रा जुळणारा ! ॥ ५ ॥
शुक पंजर-बंधीं घालूं । त्या पढवूं नर-वाग् बोलूं ॥
श्रुति-वैचित्र्या बघणारे । आम्ही मात्रा जुळणारे ! ॥ ६ ॥
कवि आम्हांलागुनि म्हणणें । कवि-शब्दार्थां लोळविणें ! ॥
अस्मद्गान नव्हे गान । तें गान चिंध्या-दान ! ॥ ७ ॥
परंतु भृंगा ! तव गान । परमानंदें परिपूर्ण ! ॥
उदासीन ही जगाविशीं । तव तन्मयता सृष्टीशीं ॥ ८ ॥
अस्मदीय हृदयीं ठरलें । कीं जग हें दुःखें भरलें ॥
म्हणुनी सुंदरतेलाही । कुसें अम्हां दिसती पाहीं ॥ ९ ॥
परि तव गानांतून अले ! । थबथबला हा भाव गळेः—॥
" गुङ् गुङ् गुङ् गुङ्—भान नसे। सृष्टि अहा गुङ् ! मधुर असे !॥१०

दुःख—वदा तें कंवि असे ? । अश्रू—तें हो काय ? कसें ? ॥
फुलें फुलति–परिमळ सुटती । रस गळती–गुड्ड ! सौख्य किती ! ” ११
जाइ, जुई, मोगरी भली । कमलिनीहि सुंदर फुलली ॥
मधु यांचा सेवुनि गोड । पुरवीं तूं अपुलें कोड ! ॥ १२ ॥
प्रीति, चारुता, आनंद । यांचे गा मधुरच्छंद ॥
प्रीति, चारुता, आनंद । सिंचिति सृष्टीचा कंद ॥ १३ ॥
वरुनि नभांतुनि चंडोल । ओतितसे हेची बोल ॥
खालीं तव गुंजारव हा । प्रतिपादितसे तेंचि अहा ! ॥ १४ ॥

श्लोक.

होईल का रसिकता तव लब्ध मातें ? ।
गुंगी मिळेल मजला तव केधवां त ? ॥
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें ।
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें ! ॥ १५ ॥

केशवसुतांची कविता. —केशवसुत.

---

## ४१ घनागमनोत्कंठा.

श्लोक—पृथ्वी.

कदा नव-जलें तुझीं वरसतील पृथ्वीप्रती ! ।
कदा नदनद्यांतुनी उचमळोनि तीं धांवती ! ॥
कदा तरि वन-स्थली चमकतील पाचेपरी ! ।
जलार्द्र, पवनें कदा डुलाते रे तरू-वल्लरी !॥ १ ॥
सु-तुंग गिरिच्या शिरीं सजल मेघ-माला कदा ।
करोनि अवलंबना वरसतील धोधो सदा ! ॥
कुडे, पळस, कंदली, विविध जातिच्या औषधी ।
तुवां सतत न्हाणितां हरितशा बघें मी कधीं ! ॥ २ ॥
कड्यावरुनियां उड्या धडधडा पयें टाकिती ।
करोनि गुरु-गर्जना निकट-देश नादाविती ॥

दुधापरि जलौघ ते मज पहावयातें कदा ।
उदंड मिळतील गा ! फिरुनियां उदारांबुदा ! ॥ ३ ॥
वना-उपवनांतल्या भिजुनि भूमि वर्षा-जलें ।
तयांवरुनि सांचती चहुंकडे कदा पल्वलें ! ॥
यथेष्ट जल त्यांतलें पिउनि, पूर्ण आनंदुनी ।
विनोद-पर केधवां निघति दर्दुरांचे ध्वनी ! ॥ ४ ॥
प्रसन्न तरु-कोटरीं कुणि तदीय शाखांवरी ।
विहंग जणुं न्हाउनी बसति हर्षुनी अंतरीं ॥
पिसें करिति चंचुंनीं विमल, सु-स्वरें कूजती ।
असे खग असे तरू, मज पुन्हां कदा दीसती ! ॥ ५ ॥
कदा बकुल चंपही फुलुनि केतकी मोगरे ।
गुलाब निशिगंध तद्विविध गंध तो विस्तरे ! ॥
प्रसन्न कमलें कदा निज पराग तीं गाळिती ।
कदा मधुप तन्मधू लुटुनि घ्यावया धांवती ! ॥ ६ ॥
कदा बहर येउनी विपुल पारिजातांवरी ।
तदीय मधु-गंध तो दरवळेल रे अंबरीं ! ॥
तदीय सुमनास्तरें हरित भूमिका झांकतां ।
फुलें टिपुन घ्यावया निघति केधवां योषिता ! ॥ ७ ॥
नवीन तृण खाउनी, तव नवामृत प्राशुनी ।
रवंथ करिती सुखें हिरवळीवरी बैसुनी ॥
सु-तुंदिल-वपू असे वृषभ, धेनुही वत्सला ।
फिरोनि मिळतील गा कधिं तरी बघाया मला ! ॥ ८ ॥
अकिंचन कृषीवलां मिळुनियां तगाई-धनें ।
तसें वृषभ, बीज हीं कृषि करावया साधनें ॥
फिरोनि इरलीं शिरीं गरम घोंगड्या घालुनी ।
स्व-कर्म-रत ते असे कधिं बघेन शेतांतुनी ! ॥ ९ ॥
यदा मग कमोद ते लवुनि आपुल्या लोंगरें ।
प्रमोद-कर मानसा वितरतील आमोद रे ! ॥
अनेकविध शस्य तें चहुंकडोहि जोमावुनी ।

तयें नयन-रम्यही फिरुनि हो यदा मेदिनी; ॥ १० ॥
फिटेल अमुची तदा सकळ पाग, जी संप्रती ।
आम्हांस बहु वृश्चिकासदृश दंशुनी जाचिती ! ॥
स्व-बंधु-जन सर्व हा प्रगतिच्या पथा लागुनी ।
स्मरेल सुख सेवितां त्वदुपकार रात्रंदिनीं ॥ ११ ॥
तरी अयि दयानिधे जलधरा ! अतां सत्वरीं ।
सुखप्रद अम्हांवरी सतत साउली तूं करीं ॥
करीं अमृत-वृष्टि तूं लवकरी धरित्रीवरी ।
तुझ्याविण कुणी नसे इतर, जो अम्हां उद्धरी ॥ १२ ॥
मयूर जय-घोष हे बघ तुझा करूं लागले ! ।
अनाथ निज-लोचनीं स्रवाति शीतलाश्रू-जलें ॥
समस्त जन चातकापरि घना ! तुला पाहतो ।
उदीरित जय-स्वनें गगन-मंडपीं बाहतो ! ॥ १३ ॥

—चंद्रशेखर.

---

## ४२ संशयरत्नमाला.

भक्ताच्या हाकेबरोबर धांवून येणारा परमेश्वर, आपण इतका धांवा करीत असतां आपणास अद्याप कां पावत नाहीं, याविषयीं या प्रकरणांत कवीनें अनेक **संशय** घेतले आहेत; म्हणून यास **संशयरत्नमाला** हें नांव त्यानें दिलें आहे. कोठें कोठें कवीनें आपल्या संशयाचें आपणच निराकरण केलें आहे.

### आर्या.

उठतां बहु त्वरेनें ' कोठें जातां ? ' असें तुम्हां देवी— ।
पुसती झाली जाणों, पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १ ॥
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें ।
प्रेमळ गीत तुम्हांला हरि ! हरिणापरिस बहुत वश करितें ॥ २ ॥
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें ।
शरणागत-भय-शमना ! यास्तव येणें नसे तुझें घडलें ॥ ३ ॥

किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन दास आढळला ।
तच्छुभ-दैव-समीरें त्यावरि करुणा-घन प्रभू वळला ॥ ४ ॥
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ ।
होय महत्कार्य, परि प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ ॥ ५ ॥
किंवा तुज एकाकी पाहुनि, खळ-दैत्य आडवे आले ।
फुटतां सागर, सिकता-सेतूचें काय त्यापुढें चाले ? ॥ ६ ॥
किंवा तुज गुंतविलें भजकीं, परि ते दयार्द्र या रंकीं ।
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कष्टतां पंकीं ॥ ७ ॥
किंवा चुकतें कांहीं स्तवनीं तेणेंचि मागुता बससी ।
तरि हें मन्मूर्खत्व; प्रभु तूं दोषज्ञही तसा नससी ॥ ८ ॥
कीं 'भीतो भ्रांत वृथा मृग-जळ-मग्नासि काय तारावें' ।
म्हणतां असें कसें ? शिशु-भय जाया बागुलासि मारावें ॥ ९ ॥
कीं कांहीं व्रत-नियमीं बोलों चालों नये असें झालें ।
तरि दीन-रक्षणाहुनि अधिक-फळ-व्रत कधीं मना आलें ? ॥ १० ॥
कीं हाक ऐकतांचि प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे ।
वाटे या दुःशील-ग्रीष्मीं तव नव दया-नदी आटे ॥ ११ ॥
किंवा पुराण-पुरुषा ! संप्रति बहु भागलास या कामीं ।
तुज नीज लागली, तों सजलों मारावयासि हाका मी ॥ १२ ॥
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करां ।
तरि वरि तसाच आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥ १३ ॥
कीं धाडिलें पुढें निज-नाम करो सर्व सिद्धता आधीं ।
ऐसें प्रभो ! म्हणावें, तरि तुमचीं चरण-सारसें साधीं ॥ १४ ॥
कीं आर्जविला नाम-प्रतिनिधि हा अमृत उधळितो स्वैर ।
न पुसे, न भी, न ऐके; यास्तव दोघांत लागलें वैर ॥ १५ ॥
कीं संप्रति अभय दिलें कलिला चालावया वरें राज्य ।
परि कोण प्राणि सदय शिंपील बळें दवानळीं आज्य ? ॥ १६ ॥
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे, नसावेंची ।
वसवा पुरें, 'पुरे' कां म्हणतां ? धनवंत कण कसा वेंची ? ॥ १७ ॥

कीं बहु काळ विसरला फाराचि संकोचला सखा लाजे ।
येत असेल हळुहळू म्हणुनाचि एकहि न पादुका वाजे ॥ १८ ॥
कीं याचकासि देतां सरले चारीहि मुक्ति-धन-राशी ।
भक्तिच मज या, यावें देवाला अमृत, योग्य न नराशी ॥ १९ ॥
कीं आज काल ज्याचा तेणें अधिकार घेतला रागें ।
तरि हें अश्रद्धेय, प्रभ्वन्तर ऐकिलें नसे मागें ॥ २० ॥
कीं भेटि बहु दिसां, भय भेटाया दीन-बंधुला वाटे ।
तरि भेटावें विधिनें गेले जातात्ति साधु ज्या वाटे ॥ २१ ॥
कीं भीशी मज एका उद्धरितां लागतील फार झटें ।
तरि कोणाहि न कळतां न्यावा झांकूनि दास पीत-पटें ॥ २२ ॥
कीं लक्ष-भोजनापरि केला संकल्प संपला देवा ।
तरि दाते क्षुद्विकळा मग न म्हणति काय, 'या बसा, जेवा '? ॥२३॥
कीं मींच एक उरलों पापी, हें बीज ठेविलें जतन ।
वतन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ? ॥ २४ ॥
कीं कार्य-बहुत्वें तुज फावेना यावया जगत्पाळा ! ।
तरि रूप घ्या दुजें, ती विद्या कंठीं वसे जशी माळा ॥ २५ ॥
कीं मागें गुप्त उभा असासि प्रेमें उभारुनी बाहे ।
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकशी बा, हे ! ॥ २६ ॥

—मोरोपंत.

---

# ४३ राजपुत्रास उपदेश.

[ ऋषभ ऋषीनें भद्रायु नामक राजपुत्रास केलेला उपदेश. ]

## आर्या.

बा ! कोप, लोभ, शठता, असदाग्रह, पिशुनता, कुटिल-भाव,
उद्वेग, दंभ यत्नें सोडीं, जोडीं महा-जनीं ठाव ॥ १ ॥
तूं क्षात्र-धर्म-रत जरि तरि बा हिंसा करूं नको स्वैर ।
बहु-भाषण, पर-निंदा, वत्सा ! तसेंच शुष्क जें वैर ॥ २ ॥

सक्रोध हो अरि-जनीं, स्व-पर-जनीं हो दयार्द्र तूं बापा ।
सकृप, सलोभहि चित्तीं हो स्व-जनांच्या हरावया तापा ॥ ३ ॥
न करीं निज-प्रशंसा, विज्ञातेंगित परा नको होवूं ।
पुत्रीं, धनीं, कुटुंबीं, बा ! केवळ चित्त तूं नको गोवूं ॥ ४ ॥
जननी, जनक, सती स्त्री, गुरु, सज्जन यांचिया वचा साधो ।
विश्वास सदाहि धरीं, न अविश्वासें व्यथा तुला बाधो ॥ ५ ॥
सावध सदा असावें संसारीं स्व-हित-कृत्य लक्षावें ।
पुरुषार्थाचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें ॥ ६ ॥
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका ।
प्राणहि वेचुनि रक्षीं वृद्धा बाळा सु-दुर्बळा रंका ॥ ७ ॥
वध-योग्यहि अरि येतां शरण तयातें वधूं नको जाण ।
शरणागत जो त्याचे बा रक्षावेचि सर्वदा प्राण ॥ ८ ॥
यत्नें कीर्तिच जोडीं, बा ! होय पदार्थ हाचि बहु धन्य ।
राजे, पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य ॥ ९ ॥
सत्कीर्ति-प्रभवा श्री, पुण्यहि सत्कीर्तिनेंच बा तोक ! ।
ज्योत्स्नेनें चंद्र जसा, शोभे सत्कीर्तिनेंच हा लोक ॥ १० ॥
धन मेळविलें जें हय, गज, कांचन, रत्न-राशि सत्व-रतें ।
त्या बा ! अकीर्ति होतां सोडावें तृण तसेंचि सत्वर तें ॥ ११ ॥
आयुष्य, कीर्ति, यश, बल, पुण्य-द्रव्य, प्रजोन्नति प्राज्य ।
जेणें तें कर्म करीं; धर्म-न्यायेंचि चालतें राज्य ॥ १२ ॥
बह्वर्थ, जन-मनोहर, अल्पाक्षर, मधुर, सत्य बोलावें ।
ज्या सद्वाक्य-श्रवणें बुध-श्रोत्यांचेंचि शिरहि डोलावें ॥ १३ ॥
ज्ञाति-सुत-बंधु-मित्रीं, भार्या-जन-पंक्तियांत सम-भावें— ।
वर्तावें नित्य तुवां; कीं सर्वांहीं तुझेंचि यश गावें ॥ १४ ॥
संतांचे अति-हितकर उपदेश, तशाचि पुण्य-धर्म-कथा ।
यांतें विमुख न हो तूं, वत्सा ! सोडूं नकोचि भव्य-पथा ॥ १५ ॥

ब्रह्मोत्तरखंड, अ. ११. —मोरोपंत.

# ४४ संस्कृत आणि मराठी.

### ओंव्या.

वेदशास्त्र स्मृति-पुराणें । नाना इतिहास व्याकरणें । गाळूनि विचार-रसायणें । द्वैपायनें कुशलत्वें-॥ १ ॥ सुरस सुंदरी पवित्र सृष्टी । पक्वान्नें निपजवूनि पाठीं । संस्कृतशब्द-सुवर्णताटीं । श्रेष्ठश्रेष्ठां वोगरिलीं ॥ २ ॥ तेंचि रसायण दुर्बळपणीं । महाराष्ट्रभाषा-रंभापर्णीं । वाढिलें तरी भुकाळू जनीं । न सेविजे किमर्थ ॥ ३ ॥ समर्थपणें कविपंडितीं । सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं । निर्गुण निर्विकार पशुपती । कनककमळीं अर्चिजे ॥ ४ ॥ तेथें भावार्थी मी दुर्बळ । धत्तूरपुष्प माझे बोल । अल्पमतीचेनि मोल । काढविती ते कैंवि ॥ ५ ॥ तथापि दोहीं ठायीं सारिसा । मोह कराल हा भरंवसा । कां सान थोर महेशा । भजतां असे कडसणी ? ॥ ६ ॥ आणि ईश्वर-स्वरूपीं डोळस । त्यांसी वर्णावर्णीं द्वेष-। नुपजे, जैसा सूर्यप्रकाश । नेणे कदा तमातें ॥ ७ ॥ तेवीं अर्थीं घालितां दृष्टी । न म्हणें संस्कृत मऱ्हाटी । रत्नकुंभीं कीं मृत्तिकाघटीं । गंगोदक सारिखें ॥ ८ ॥ व्यास-वचन इक्षुदंडु । गाळूनि सुरस सारांश गोडु । देशभाषा वळिले लाडू । नावडेचे आवडी ॥ ९ ॥ ते जैसे सुज्ञीं न सेवणें । तैं आग्रहावांचून काय म्हणणें । कळंकरेखेस्तव चांदणें । काय चकोरीं वाळिजे ? ॥ १० ॥ व्यासग्रंथ-गिरीचें सोनें । संस्कृत-खोटिये गाळूनि मनें । देशभाषा घडिलें लेणें । साहित्यरत्नीं सुजडित ॥ ११ ॥ तें लेववितां कर्णभूषण । कां हो ! परते करावे कान । श्रोते हो ! तुम्ही विचक्षण । निर्मत्सर विचारा ॥ १२ ॥

आदिपर्व व सभापर्व, अ. १. —मुक्तेश्वर.

---

# ४५ संस्कृत आणि मराठी.

### श्लोक.

रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं ।
नाहीं हानि कदापि अन्य-कविंहीं तें वर्णितां प्राकृतीं ॥

मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें ।
तो कार्पास-गुणें करूनि करितां काय प्रभेला उणें ?॥ १ ॥
केलें पात्र सुवर्णाचें । कीं विरूपशि खापरी ॥
लावितां तेथ संहारी । तम दीप-शिखा परी ॥ २ ॥
गीर्वाणें राघवाचें यश रसिक-जना लागतें फार मिष्ट ।
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती, मानिती तें न शिष्ट ॥
पीतां गो-क्षीर कार्तस्वर-मणि-चषकें देतसे जेंवि गोडी ।
सारङ्गाला पलाश-द्रुम-दल-पुटकें सेवितां ते न सोडी ॥ ३ ॥

मंत्ररामायणाचा उपसंहार —मोरोपंत.

---

## ४६ हरिनामसुधा.

प्राण्यास मृत्यूपासून सोडविणाऱ्या **सुधे**प्रमाणें, संसारापासून सोडविणाऱ्या **हरि-नामाचा** महिमा एथें वर्णिलेला आहे. म्हणून यास ‘ **हरिनामसुधा** ’ हें नांव दिलेलें आहे.

श्लोक

हरि-चरण-सरोजीं चित्-सुधा-सार-पानें ।
भ्रमर परम-योगी गुंजती नाम-गानें ॥
हरति सकल दुःखा, हीं सुखाचीं निधानें ।
वद वद वद जिह्वे ! वासुदेवाभिधानें ॥ १ ॥
हरिपण हरि-नामें धातु-मूर्तींसि आलें ।
हरिमय हरि-नामें विश्व संतांसि झालें ॥
भव-भय हरि-नामें साधकांचें पळालें ।
वद वद वद जिव्हे ! राम-नामें रसाळें ॥ २ ॥
न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे ॥
अजित-नाम वदो भलत्या मिसें । सकल पातक भस्म करीतसे ॥३॥
अत्यं शुद्धि, हरि-कीर्तन भक्ति-भावें—।
होतां खरें, परि न जाणतही स्वभावें ॥
नारायण-स्मरण-कीर्तनमात्र कांहीं ।
ज्याला घडेल तरि पातक त्यास नाहीं ॥ ४ ॥

कडुवट हरि-नामें वाटती पापियाला ॥
परि दवडुनि पापें, गोड होती तयाला ॥
मग विषय-सुखाची नाठवे त्यास वार्ता ।
म्हणउनि न पुन्हा तो हो अन्याय-कर्ता ॥ ५ ॥

आयासाविण ही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं—।
ज्या चित्तीं उपजे, निघे सहज तो त्याच्या पदीं तत्क्षणीं ॥
ऐसे ये रिति अर्पिती सहजही जे एकदा त्या मना ।
ते स्वप्नीं नयनीं न देखाति यमा, कैंचंया तयां यातना ? ॥ ६

सकळही अघ-बीजें नाशती अंतरींचीं ।
अति अघ-हर नामें ह्यास्तव श्री-हरीचीं ॥
हरि विषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां ।
कर-तल-गत त्याला चारिही मोक्ष तेव्हां ॥ ७ ॥

शर्व-कंठ-विष-गर्व हराया । शक्त नामचि तुझें रघु-राया ॥
सेतु सागर कपी उतराया । नाम-सेतु भव-सिंधु तराया ॥ ८ ॥

प्राण-प्रयाण-समयीं यम-दूत जेव्हां ।
येती, घडे किमपिही हरि-दास्य तेव्हां ॥
आ-जन्म-पातक जळे, मग त्या पवित्रा ।
होतील दुर्गति कशा विविधा विचित्रा ? ॥ ९ ॥

—वामनपंडित.

---

## ४७ नाममाहात्म्य.

### आर्या.

नामा ! सामात्य प्रभु गेला स्व-पदांतरासि ज्या काळीं ।
दे अधिकार तुज निज-प्रतिनिधिला कीं, सुखें प्रजा पाळीं ॥ १ ॥
रामें निज-प्रजांतें बहु सुख दिधलें तसेंचि तद्राज्य ।
नामा ! त्यामागें त्वां विश्वाला दाविलें सुख प्राज्य ॥ २ ॥
नामा ! रामाहुनि तूं सदय; स्तुति-वाक्य हें न दासाचें ।
न म्हणे सत्य म्हणो मन बापा ! करुणा-सुधा-नदा ! साचें ॥ ३ ॥

तूं मात्र राम-नामा ! कामा येसी न पाहसी दोष ।
दुसरे सखे सखेद त्यजिती करिती नय-च्युतीं रोष ॥ ४ ॥
नामा ! जामाता तूं करिसी निज-दास, आत्मजा मुक्ती—।
देसि, म्हणूनचि पुष्कळ गौरविसी; सूचली भली युक्ती ॥ ५ ॥
तृष्णा-नदींत अधना तारिसि तूं नाम-राज नावाडी ।
तोचि उदार, सदन्नें जो क्षुधिता पामरा जना वाडी ॥ ६ ॥
नामा ! बा ! माहेरा न्याया आलासि काय तूं मूळ ।
न सुचेचि काम-धाम, प्रकट स्वांतासि लाविलें खूळ ॥ ७ ॥
प्रभु-पदिं भव-सिंधूद्धृत मुक्तांची नित्य एक लाखोली—।
वाहसि जाणसि कुशला ! भवाब्धिची तूंचि एकला खोली ॥ ८ ॥
काळि-काळीं मंत्रांचें तेज प्रति-वासर क्षया जाय ।
तेज चढे तुज नामा ! बहु माने काळ हा तुला काय ? ॥ ९ ॥
यद्रसनाग्रीं नाचसि तूं होउनि सु-प्रसन्न नटसा रे ! ।
नाचों लागति त्याचे भव-पाश-विमुक्त पितर चट सारे ॥ १० ॥

—मोरोपंत.

---

## ४८ राम-कृष्णांचें हस्तिनापुरीं आगमन.

### ओंव्या.

वार्तिक जाणविती गोष्टी । धर्मराज नृपाचे भेटी । घेऊनि यादवांच्या कोटी । राम-कृष्ण पातले ॥ १ ॥ द्वारकेहूनि बळ अचाट । पातलें इंद्रप्रस्थानिकट । कुंजर-भेटींचा बोभाट । जाणवीत धर्मातें ॥ २ ॥ सन्मुख धाडोनि माद्री-कुमर । रायें शृंगारिलें नगर । मखरें तोरणें अपार । गुढिया नगरीं उभविल्या ॥ ३ ॥ मंडप घातले अपार । अवघे तगटीं झगझगीत थोर । दिधलीं वितानें विस्तार । अति सुंदर साजिरे ॥ ४ ॥ श्रीगंध कस्तुरी केशर । शिंपोनि मार्ग केले सुंदर । स्थळोस्थळीं कृष्णागार । परिमळ-धूपें धूपिले ॥ ५ ॥ स्थळोस्थळीं मुक्ता-झल्लरी । नाना रंगीं रंगकूसरी । चित्रीं चितारिलीं परोपरी । सुशोभित मंदिरें ॥ ६ ॥ अवघीं घरें शृंगारिलीं । पट-पटावें बांधिलीं ।

ध्वज-पताका गगन-मंडळीं । चित्र-विचित्र शोभती ॥ ७ ॥ ऐसें नगर शृंगारिलें । इंद्र-भुवनातुल्य शोभलें । दृष्टी देखतां मन भुले । देह-भाव विसरोनी ॥ ८ ॥ उपायनें घेऊनि भेटी । पातल्या पौरांच्या कोटी । अक्ष-वाणें कनक-तार्टीं । वोवाळिती जन-वधू ॥ ९ ॥

आदिपर्व, अ. ४८. —मुक्तेश्वर.

---

## ४९ महाराष्ट्रकविस्तवन.

### आर्या.

वंदन नंदनसा मी करितों भावें मुकुंद-राजाला ।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति, सुमुक्ति सुंदरा ज्याला ॥ १ ॥
ज्ञानेशा ! भगवंता ! भगवज्जनवल्लभा ! महा-सदया ! ।
कलि-युग-वर्ती जन जो, देशी स्मरणेंचि मुक्तिचें पद या ॥ २ ॥
श्रीमद्भगवद्गीता-व्याख्या केली जनासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति, संसार-ताप साराया ॥ ३ ॥
श्री-नारद-मुनिचें जें सु-महद्-व्रत तेंचि नामदेवाचें ।
याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचें ॥ ४ ॥
भूत-दया संसारीं एकोपंतास निरुपमा घडली ।
जडली आंगासींच क्षांति सदा; शांति तों गळां पडली ॥ ५ ॥
भूताराधन-यज्ञीं सम-दर्शी एक परम हा रमला ।
द्रवुनि म्हणे, ‘ पित्रन्नें भोज्य, जगन्निंद्य पर, महार मला ’ ॥ ६ ॥
ग्रंथ श्री-भागवत श्री-रामायण करी सु-विस्तर; ते— ।
जरि न रचिता दया-निधि, केवळ जड जीव तरि कसे तरते?॥७॥
भगवद्भक्ति कराया बहु जड जीवांसि जो तुका शिकवी ।
त्याच्या दुसरा धरणीवरि येइल कोण हो तुकासि कवी ? ॥ ८ ॥
ज्याच्या होय अभंगांवांचुनि होऊनि हरि-कथा नाहीं ।
श्रोत्यांसि अभंगांहीं ती दे, जसि माय हरिख थानांहीं ॥ ९ ॥
द्विज ‘ सावधान ’ ऐसें सर्वत्र विवाह-मंगली म्हणती ।
तें एक रामदासें आयकिलें त्या सदा असो प्रणती ॥ १० ॥

काम-जयें रघुवीर-प्रेमें, हनुमदवतार हा सत्य ।
भव-रोग हरुनि येणें लाजविले देव-वैद्य नासत्य ॥ ११ ॥
शिव-राजास ज्ञानद जो, जैसा याज्ञवल्क्य जनकास ।
तरले भवार्णवीं बहु दृढ-तर त्याची धरूनि जन कास ॥ १२ ॥
नमिला साष्टांग श्री-पति-भक्ति-रस-ज्ञ वामन-स्वामी ।
रस-भवना तत्कवना मानीं या, तेंवि वाम न स्वा मी ॥ १३ ॥
केली श्री-गीतेची व्याख्या, बहु भक्ति जींत गाजविली ।
साजविली साधु-सभा, भाषा-कवि-कवन-शक्ति लाजविली ॥ १४ ॥
श्री-मुक्तेश्वर कवि-वर यातें कोण न शुभेच्छु वंदील ? ।
बंदी लक्ष जयाचे, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ॥ १५ ॥

सन्मणिमाला. —मोरोपंत.

श्रीमन्मयूर सत्कवि याच्या जरि कवि नवीन समतेला— ।
आणाल, तरि म्हणा मग बुध हो ! हय्यंगवीन-सम तेला ॥ १ ॥
आर्या-छंदें जोडुनि रामायण-भारतादि आयकवी ।
नायक-वीर कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ? ॥ २ ॥

—विठोबाअण्णा.

---

## ५० नैर्ऋत्येकडला वारा.

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

जे जे वात नभांत या विचरती पुण्य-प्रदेशावरी ।
नैर्ऋत्येकडला तयांत वितरी सौख्यास या अंतरीं ॥
येतां तो मम चित्त हें विसरुनी प्रत्यक्ष वस्तूंप्रती ।
अर्धोन्मीलित लोचनीं अनुभवी स्वप्न-स्थिती मागुती ॥ १ ॥
तो वारा मम जन्म-भूमिवरुनी येतो जवें वाहत ।
हें माझ्या हृदयांत येउनि सवें मी ठाकलों चिन्तित ॥
माझ्या जन्म-धरेचिया मग मनीं रूपास मी आणितों ।
तीचे डोंगर उंच, खोलहि नद्या डोळ्यांपुढें पाहतों ॥ २ ॥

मोठे उच्च, शिला किती पसरल्या सर्वत्र ज्यांच्यावरी ।
तुंगें तीं शिरलीं यदीय शिखरें तैशीं नभाभीतरीं ॥
आस्वर्गात् चढती सदोदित महात्म्यांचीं जशीं मानसें ।
या दृष्टीपुढते पुनः बघतसें अद्रीश ते हो असे ! ॥ ३ ॥

ज्यांच्या रम्य तटांवरी पसरल्या झाड्या किती सुंदर ।
ज्यांच्या थोर शिलांतुनी धबधबां जाती तसे निर्झर ॥
वाणीचे कवि-हृद्देशांमधुनियां ते ओघ यावे जसे ।
या दृष्टीपुढते पुनः बघतसें अद्रीश ते हो असे ! ॥ ४ ॥

त्यांचे उंच शिरावरी विलसती किल्ले मराठी जुने ।
देवी पालक त्यांतल्या मज पुनः धिक्कारिती भाषणेंः—॥
" कोठें पूर्वज वीर धीर तव ! तूं कोणीकडे पामरा ! ।
ये येथें, इतिहास-पत्र पडलें वाचूनि पाहीं जरा ! " ॥ ५ ॥

जागोजाग विराजती चल-जलें पाट-स्थलें तीं किती ।
केळी, नारळि, पोफळी, फणस ते आंबे तिथें शोभती ॥
पक्षी त्यांवरुनी नितांत करिती तें आपुलें कूजित ।
स्वप्नीं हें बघतां फिरूनि, मन हें होतें समुत्कंठित ॥ ६ ॥

जागोजागहि दाटल्या निबिड कीं त्या राहट्या रानटी ।
ते पाईराहि, खैर, किंजळ, तिथें आईनही वाढती ॥
वेली थोर इतस्ततः पसरुनी जातात गुंतून रे ।
चेष्टा त्यांमधुनी यथेष्ट करिती नानापरी वानरें ॥ ७ ॥

जन्मस्थान मदीय सुंदर असें त्या माल्यकूटांतल्या ।
आनंदें वन-देवता मधुर जीं गानें भलीं गाइल्या—॥
मज्जन्मावसरास, तीं पवन हा वेगें पहा तेथुनी ।
मातें पोंचवितो, तयां अपुलिया पंखांवरी वाहुनी !—॥ ८ ॥

" गाऊं या ! हृदयांत या अमुचिया प्रीती असे दाटली ! ।
गाऊं या ! हृदयांत या अमुचिया कां स्फूर्ति ही वाढली ?—॥
वाग्देवी-सुत जन्मला अपुलिया ग्रामांत; यालागुनी ।
जैजैकार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनी ! " ॥ ९ ॥

वेगानें जगदुद्धरा-नदिचिया तीरांहुनी वात तो ।
आशीर्वाद मदीय तात-जननी यांचे मला आणितो ॥
वात्सल्यास तयांचिया परिसुनी माझ्या मनीं येतसे—।
‘ तान्हा बाळाचि राहतों तर किती तें गोड होतें ’ असें ! ॥१०॥
आईच्या नयनांत नित्य मग मी स्वर्गास त्या पाहतों ।
तातांकावरि नित्य मी मग जगद्राज्यासना भावितों ॥
कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा—हंत ! मी नष्ट हा ! ।
तान्हा बाळाचि राहतों तर किती तें गोड होतें अहा ! ॥ ११ ॥
जन्मा येउनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय ! गे ।
ताता भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणीं हाय रे ! ॥
वार्द्धक्यीं सुख राहिलें, विसरणें तुम्हांस कोणीकडे ! ।
झालों कष्टद मात्र !—या मम शिरीं कां वीज ती ना पडे? ॥१२॥
पुष्पें वेंचित आणि गोड सु-फलें चाखीत बागांतुनी ।
जेथें हिंडत शैशवीं विहरलों निश्चिंत मी, तेथुनी—॥
हा वारा ममता-प्रसाद मजला आजोळचा आणितो ।
चित्तीं विह्वल होतसें स्मरुनि, मी मातामहां वंदितों ॥ १३ ॥
बंधूचींहि मला तशीं पवन हा आशीर्वचें आणितो ।
चिंताग्रस्त तदीय पाहुनि मुखा, अश्रूंस मी गाळितों ! ॥
भाऊ रे ! तुजलागिं लाविन कधीं मी हात-भारा निज ? ।
तूतें सेवुनि मी सुखें मग कधीं घेईन कां रे निज ? ॥ १४ ॥
श्वासांहीं लिहिलीं, विराम दिसती ज्यांमाजि बाष्पीय ते ।
प्रीतीचें बरवें समर्थन असे संस्पृह्य ज्यांमाजि तें ॥
कांतेचीं असलीं मला पवन हा पत्रें अतां देतसे ।
डोळे झांकुनि वाचितां त्वरित तीं सम्मूढ मी होतसें ! ॥ १५ ॥
माझ्या जन्म-धरेपुढें दिसतसे वाराशि विस्तीर्ण तो ।
त्याचें रम्य तरंग-तांडव पुनः पाहूनि आह्लादतों ॥
जें हृद्रम्य तरंग-तांडव मला तैशापरी वाटतें ।
अज्ञेयावरतीं जसें क्षणिक हें अस्तित्व हो खेळतें ! ॥ १६ ॥

या अब्धीवरतूनि जात असतां बाल्यांत नौकेंतुनी ।
गाणीं जीं म्हटलीं मला निजविण्या वारिस्थ देवी-गणीं ॥
त्यांचे सूर अतां अलौकिक असे जे वात हा आणितो ।
ते ऐकून अहा ! सुषुप्ति चिर ती घ्यायास मी इच्छितों ! ॥१७॥
प्रीती या जगतांत कंटकयुता ही एक वल्ली असे ।
शूलारोपण-यूप त्यावरिल ही कीर्ति-ध्वजा कीं दिसे ॥
तेव्हां या जगतीं नकोत मजला ते भोग भोगायला ।
वाटे नाटक शोक-संकुल असें जीवित्व हें याजला ! ॥ १८ ॥
देवी सागरिका तुम्ही तर अतां तीं गायनें गाइजे ।
त्यांच्या धुंद अफू-गुणें किरकिऱ्या बाळास या आणिजे—॥
निद्रा दीर्घ, जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल ।
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल ! ॥ १९ ॥

केशवसुतांची कविता. —केशवसुत.

---

# ५१ श्रीकृष्णाची मिथिलापुरीस भेट.

## आर्या.

श्री-श्रुतदेव ब्राह्मण होता मिथिलेंत भक्त देवाचा ।
सेवा चालवि भावें, मूर्त प्रेमाचि वासुदेवाचा ॥ १ ॥
श्वश्रू-वश-नियति-सुता गृह चालवि, संग्रहीं नसे कवडी ।
शम-धन कनक-नग, न मन विषयीं, सोडूनि माधवा, दवडी ॥ २ ॥
त्या राष्ट्राचा पाळक राजा बहुलाश्व तोहि हरि-दास ।
ज्या सज्जन-मित्रास त्रास न दे राज्य-दार-सहवास ॥ ३ ॥
बहुलाश्व श्रीमंत, श्रुतदेव दरिद्र, परि सम प्रेमा ।
ते मातेस सुत तसे प्रिय विभुस, भुले न भूति-पति हेमा ॥ ४ ॥
त्या चातकां कृपा-घन, चकोरकां यादवेंदु हरि दोघां—।
भेटाया जाय दया-सागर त्या प्रेम-भक्ति-सरिदोघां ॥ ५ ॥
प्रभुसह नारद अत्रि व्यास असित वामदेव राम शुक ।
कण्व च्यवन गुरु असे बहु, देव सुर-द्रु, ते मुनींद्र शुक ॥ ६ ॥

त्यजिते कृष्ण-सुरद्रुम मुनि-शुक वरिते प्रपंच-किंशुक ते ।
थुकते जरि न विषय-फळ, मुकतेच सुखासि, समय हा चुकते ॥ ७ ॥
अक्षय अमृत-कलश विभु, सकरुण मुनि-वैद्य कवि-मना वाटे ।
भव-रोगियांसि वांटुनि, जोडिति पुष्कळ यशोधना वाट ॥ ८ ॥
जनपद-जन पद-पंकज पर-पुरुषाचें पहावया येती ।
घेती आकंठ अमृत, सु-तृषित उद्गार फारसे देती ॥ ९ ॥
अन्नप्रद-सदनातें दूरुनि धावोनि येति दुष्काळीं ।
तैसे चतुर्विधहि जन मज्जति अमृत-ह्रदीं जगत्पाळीं ॥ १० ॥
कृष्णागमन-श्रवणीं झाल्या स्नानाशन-क्रिया शिथिला ।
मिथिला सीतोपयमावरि पाहे या सुखप्रदा तिथिला ॥ ११ ॥
मिथिलापुरीस जातां, करि पुष्कळ मुक्ति-मूर्ति उत्सव ती ।
जासि काय जाय माय स्व-सुतेसि पहावयासि भाग्यवती ॥ १२ ॥
त्या पुष्प-वाटिकेला शोभेची काय दे वसंत धणी ? ।
भक्त-पुरी गौरविती, लीला-नर-काय देव संत धणी ॥ १३ ॥
मिथिलोदरांत होते जे सात्त्विक-भाव तीं अनादि सलें ।
तद्वृद्धि-सुखप्रसवें यश कृष्णीं वैद्य-सज्जना दिसलें ॥ १४ ॥
बहु दिवसीं पति येतां करि बहु मिथिला पतिव्रता साज ।
आज द्वारवती तज्ज्येष्ठ-सपत्नी मनीं धरी लाज ॥ १५ ॥
धाडी पुढें स्वजन-सुत शृंगारुनि ती पतिव्रता मिथिला—।
जाऊं पाहे, परि गति लज्जा-भूषा-भरोत्सवें शिथिला ॥ १६ ॥
मिथिलापुरवासि-जनें निज-नेत्र-सरोरुहें उदश्रु-जळें—।
प्रक्षाळिलीं प्रथम, मग भगवच्चरणीं समर्पिलीं उजळें ॥ १७ ॥
बहुलाश्व श्रुतदेव प्रेमें धावोनि वंदिती पाय ।
काय उपायन दुसरें ? अर्पिति चरणीं स्व-वाङ्-मनः-काय ॥ १८ ॥

कृष्णविजय, अ. ८७. —मोरोपंत.

# ५२ अन्योक्तिकलाप.

'लेंकी बोले सुने लागे' या म्हणीप्रमाणें एकास बोलून 'अन्यास' लागेल असा ज्यांत अर्थ असतो अशा 'उक्तीस' म्हणजे बोलण्यास 'अन्योक्ति' असें म्हणतात. अर्थात् अन्योक्तींत पशु, पक्षी, झाड वगैरे कोणातरी 'अन्यास' उद्देशून बोलून, प्रस्तुत मनुष्यास पर्यायेंकरून बोध केलेला असतो.

## श्लोक.

### वृक्षान्योक्ति.

दावाग्नी खवळोनियां तरु-वरां जाळावया जैं वळे ।
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, रावे, तसे कावळे ॥
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र जे जाहले ।
येतां संकट-काळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे ! ॥ १ ॥

### आम्रान्योक्ति.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी ।
गंधें युक्त फुलें फळेंहि असती ज्याचीं सुधेच्या परी ॥
वाटे जो रमणीय भूषण वन-श्रीचे मुखींचें, भला ।
आम्रा त्या पिक सेवितां सम-समां संयोग कीं जाहला ॥ २ ॥

### केतकीविषयीं अन्योक्ति.

दलां सर्वां कांटे असति, मधुचा लेशहि नसे ।
उडोनी नेत्रांतें रज बहुत पीडा करितसे ॥
तुझ्या पुष्पीं ऐसे अवगुण असोनी, भ्रमर हा— ।
कसा एक्या गंधें भुलुनि पडला केतकि पहा ! ॥ ३ ॥

### कोकिलान्योक्ति.

काका ! मौन धरूनि बैससि जरी या आम्र-वृक्षावरी ।
तूतें कोकिळ मानितील जन हे सारे स्व-चित्तीं तरी ॥
होती स्थान-गुणेंचि थोर बहुधा वस्तू, नृपाच्या शिरीं—।
पंका कोण न मानिती मनिं, असे कीं कस्तुरी ही खरी ! ॥ ४ ॥

वसंत-समयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो ।
जयास अवलोकुनी सुर-तरूहि चित्तीं थिजो ॥
तया सतत सेविती विहग आम्र-वृक्षा किती ।
परी पिकाचि एकला मधुर वाणी लाधे कृती ! ॥ ५ ॥

## मयूरान्योक्ति.

झाडें पेटुनि वाजती कडकडां, त्यांचा ध्वनी होतसे ।
ज्वाळा राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे ॥
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा ।
वर्षा-काळ न हा, दवानल असे, मोरा ! पळें रे ! घरा ॥ ६ ॥

## शुकान्योक्ति.

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे ।
मला वाटे मोठा तुजजवळि हा दोषचि असे ॥
शुका ! तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजिं पडशी ।
गड्या ! स्वातंत्र्याचीं अनुपम सुखें सर्व मुकशी ! ॥ ७ ॥

## हंसान्योक्ति.

ज्याच्या तीरीं समंतात् मधुर-फल-भरें वांकले वृक्ष भारी ।
ज्यामाजीं पद्म-खंडें फुलुनि विखरती गंध चित्तापहारी ॥
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पंकिला पल्वलातें ।
त्या हंसाच्या, बकांनीं जरि पद दिधलें मस्तकीं, योग्य त्यातें ॥८॥

## हरिणान्योक्ति.

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला ।
व्याधाचे चुकवूनि बाणहि महावेगें पुढें चालला ॥
तों घाईंत उडी फसूनि पडला आडामधें बापडा ।
होती सर्वहि यत्न निष्फळ, जरी होई विधी वांकडा ! ॥ ९ ॥

## गजान्योक्ति.

कर्णीं लोंबति चामरें, चमकती माळा गळां साजिऱ्या ।
वेली रंगविल्याहि शोभति शिरीं सोंडेवरी गोजिऱ्या ॥

ऐसा तो नटला तरी नृप-करी पायीं बिडी वागवी ।
कैसी त्यास मिळे स्वतंत्र वनिंच्या हत्तीपुढें थोरवी ? ॥ १० ॥

## सिंहान्योक्ति.

भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें— ।
डोळां देखोनि होते पळत भय-भरें सोडुनीयां धृतीतें ॥
जेथें मुक्ता-फळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजिं आतां ।
सिंहाच्या, क्षुद्र कोल्हे कलकल करिती, मृत्युनें त्यास नेतां ॥ ११ ॥
मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाही स्वभावें ।
काका ! त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांस-खंडास खावें ॥
जो उन्मत्तां गजांच्या खरतर-नखरीं फोडुनी मस्तकातें ।
धाला रक्ता पिऊनी, नच मृत पशुच्या इच्छितो तो कणांतें ॥ १२ ॥

## चंद्रान्योक्ति.

नक्षत्रें परिवार ज्यास, पतिही जो ओषधींचा असे ।
ज्यातें पाहुनि हर्षती जन, सुधा ज्याच्या शरीरीं वसे ॥
होई तेज कमी तयाहि विधुचें येतां रवीच्या गृहीं ।
ज्या येई लघुता न अन्य-सदनीं ऐसा न कोणीचही ॥ १३ ॥

## सूर्यान्योक्ति.

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें ।
झाला निष्प्रभ तारकाधिपतिही, बोला कशाला दुजें ? ॥
राहूच्या वदनीं अजी गवसतां तो भानु दैवें अहा ।
कैसे क्षुद्रहि काजवे चमकती त्याच्यापुढें हे पहा ! ॥ १४ ॥

## मेघान्योक्ति.

गर्वें पर्वत-मस्तकीं जलधरा ! धारा वृथा वर्षसी ।
पीडा कष्ट करूनि नाविक-जनां, दुष्टापरी हर्षसी ॥
पाण्यावीण लता-तरू सुकति हे; वृष्टी जरी यांवरी ।
रे मेघा ! करितास, कीर्ति भुवनीं होती तुझी बा तरी ॥ १५ ॥

पद्यरत्नावलि. —कृष्णशास्त्री चिपळूणकर.

# ५३ सैनिकाचें स्वप्न.*

श्लोक—शार्दूलविक्रीडित.

वाजे दुंदुभि—युद्ध घोर सरलें—संध्या झणीं पातली ।
तारा-पुंज नभीं इथें झळकतो—अभ्रें इथें दाटलीं ॥
रक्त-स्नात सहस्र वीर पडले घायाळ येथें पहा ! ।
घेती झोंप सुखें किर्तीक; म्हणती कित्येक ते राम हा ! ॥ १ ॥
खालीं घालुनि कांबळी पहुडलों होतों जईं तेधवां ।
अग्नी संनिध जो वृकास पळवी, रक्षी नरांच्या शवां ॥
गेली रात्र असे जईं उलटुनी, मी स्वप्न पाहें तदा ।
होतें सुंदर तें; प्रभात-समयापूर्वीं पडे तनिदां ॥ २ ॥
वाटे, भीषण सैन्य सोडुनि, घरा जाया निघालों, पळें—।
जाईं दूर, विदूरही—भटकलों—मार्गीं न कोणी मिळे ॥
होता तो ऋतु शारदीय, तपला चंडांशुही अंबरीं ।
ताताचें गृह देखुनी फिरुनियां चित्त प्रमोदा वरी ॥ ३ ॥
ज्यामाजी नव-यौवनांत फिरलों, धालों सुखाच्या भरें ।
तीं रम्यें फिरुनी वनें उपवनें धांवें पहाया त्वरें ॥
स्वच्छंदें चरती वनीं हरिखलीं शैलावरी कोंकरें ।
कापी कर्षक धन्य, गायन करी, तो शब्द कानीं भरे ॥ ४ ॥
भेटे आप्त सुहृत्—मनीं विकसतें तें प्रेम संकोचलें ।
घेईं मी शपथा, 'न जाइन पुन्हां सोडूनि जाया मुलें !' ॥
अंकीं लोळाति, घालती कर मुखीं—घेती मुके तीं किती ।
बालांची करणी अशी बघुनियां, न्हाणी निजांगें सती ॥ ५ ॥
"राहा !—हें थकलें शरीर—समरा जाऊं नका—भागलां" ।
बोले स्फुंदुनियां प्रिया; वच तिचें तें मोडवेना मला ॥
हा ! सारें सुख तें प्रभात-समयीं लोपे विधीच्या बळें ।
स्वप्ना घालवुनी प्रवात-लहरी ने तीं वचें प्रेमळें ! ॥ ६ ॥

कुसुमांजलि. —वि. मो. महाजनी.

---

* कँबेलच्या The Soldier's Dream या कवनाचें रूपांतर.

## ५४ दमयंतीनें केलेलें नळाचें स्वागत.

या सरांतील ९ वा उतारा पहा. देवांचा दूत बनून नळराजा दमयंतीपाशीं आला, तेव्हां तिनें केलेलें त्याचें स्वागत एथें वर्णिलेलें आहे.

श्लोक.

रामातें जनक-क्षमापति-सुता, रामा जशी रेवती ।
कामारीस नगाधिराज-तनया, कामासि जैसी रती ॥
या मानूनि तशी विदर्भ-दुहिता रामा मनीं भाविते ।
हा माझा हृदयाब्ज-सूर्य म्हणुनी त्या मानिनी बोलतेः— ॥ १ ॥

साक्या.

कोण तुम्ही कवणाचे कोठुनि येथें कां आलां ? हो ! ।
काय निमित्तें दिधला मजला हा निज-दर्शन-लाहो ? ॥ २ ॥
संभवलां कवणाचे वंशीं सांगा हो ! अकलंकीं ।
उभे असां कां ? भागतसां हो ! या बैसा पर्यंकीं ॥ ३ ॥

श्लोक.

राजे असाल तरि धन्य वसुंधरा हे ।
शोभाल देव तरि नाक यथार्थ आहे ॥
भोगी तुम्हीं उपजलां जरि नाग-लोकीं ।
खालीं असोनि सकळांवरि होय तो कीं ॥ ४ ॥

साक्या.

दुग्ध-पूर नसतां निज-रूपीं क्षीर-सिंधु तो जैसा ।
वसंत आला नाहीं तरि तो उद्यान-भाग जैसा; ॥ ५ ॥
अमृत-कराचा उदय न होतां रजनी-समयो जैसा ।
तुमच्या विरहें आजि जाहला कवण देश तो ऐसा ? ॥ ६ ॥

श्लोक.

भूपाळ जो मम मनो-मुकुरीं उभासे ।
तो नैषधेंद्र तुमचा अनुबिंब भासे ॥

रूपें तशींच दिसतात दिगंतराळीं ।
तीं हीं कशीं म्हणवतील तुम्हांनिराळीं ॥ ७ ॥

साक्या.

सरस-द्युति-पद फुल शिरसाचें फुललें मृदु स्वभावें ।
चालवाल किति दूर तयातें ? अदय हृदय मज भावे ॥ ८ ॥
कर्ण-युगल हें धन्य करावें सांगुनियां निज नांवें ।
स्तवन करी रघुनाथ तयाचें कवन स्वीकारावें ॥ ९ ॥

नलदमयंतीस्वयंवराख्यान. —रघुनाथपंडित.

---

## ५५ प्रेम.

### पद.

[ चाल—अर्धतनू वाळ्ळीं बुडाली. ]

अखिल विश्व हें कां न दिसे मग शून्य वनाच्या परी ।
गेलें प्रेम लयाला जरी ॥ ध्रु० ॥
या विश्वाचें जीवित केवळ चाले प्रेमावरी ।
संसृति प्रेम सुखाची करी ॥
स्वरूप त्याचें वर्णायातें शक्त नसे वैखरी ।
तयाची मूर्ति न दृग्गोचरी ॥
त्याचा संभव कोठें असे ।
स्थानीं कुठल्या केव्हां वसे—।
अतर्क्य सकलां असुनी ज्याची खूण पटे अंतरीं ॥ १ ॥
तेजोराशी दिन-मणि उगवे गगनीं प्रेमामुळें ।
तडागीं सारस तैसें फुले ॥
चंद्र पाहुनी पयोनिधीला भरतें कीं येतसे ।
तैसा कांत-मणी द्रवतसे ॥
याचें कारण नाहीं दुजें ।
एका प्रेमाविण गूढ जें ।
परंतु ज्यानें मोहित केली सारी दुनिया खरी ॥ २ ॥

स्फूर्ति-तरंगीं चित्त कवीचें उंच खळाळे किती ।
कल्पना दिव्य अती नाचती ॥
वृत्ति तयाच्या प्रसन्न होतां, पद्यें वदनांतुनी ।
भराभर बाहिर येती जनीं ॥
मंजुल मुरलीचा तो ध्वनी ।
सुंदर चित्रांची रेखणी ।
कवि होतसे आश्रय नसतां प्रेमाचा पळभरी ॥ ३ ॥
दिव्य प्रेमा ! शुद्ध प्रेमा ! सकल सुखाच्या घरा ।
मातें केवळ तूं आसरा ॥
काळ कंठितों कृपेमुळें तव एकाकी काननीं ।
दूर मी बंधु मित्र सोडुनी ॥
तूं बा ! कंटक-शय्येवरी ।
पसरुनि मखमालचि साजिरी ।
विषम विषासम भवास देसी अमृताची माधुरी ॥ ४ ॥

माधवानुजांच्या कविता. —माधवानुज.

---

# ५६ स्त्री आणि पुरुष.

इंदिरा व चंद्रकेतू यांचें लग्न लहानपणींच ठरलें होतें. पुढें ती मोठी झाल्यावर स्त्रीस्वातंत्र्याच्या कल्पनेनें तिनें विवाह करण्याचें नाकारलें व स्त्रीजातीस पुरुषवर्गापासून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं तिनें जोराचे प्रयत्न सुरू केले. पुढें चंद्रकेतूनें तिचें मन विवाहास प्रवृत्त करण्यासाठीं तिला जो उपदेश केला त्यांतील निवडक भाग खालील उताऱ्यांत दिला आहे.

## दिंड्या.

कशासाठीं स्त्री नराऐशि व्हावी । तिणें कां गे नर-कृती आचरावी ॥
पुरुष-साम्यातीं कां मनीं वहावी । नरांची गे कृति नरांनीं करावी ॥१॥
पुरुष-नारी ही आपुलिया देहीं । तन-मनाच्या घटनेंत भिन्न पाहीं ॥
पिंड पुरुषांचा असे निर्मियेला । शौर्य-धैर्याला बळा दाविण्याला ॥ २॥

स्त्रियेनें गे पति-गृहीं राहुनीयां । सिद्ध व्हावें गृहकार्य तें कराया ॥
प्रेम जागवुनी नरां सौख्य द्यावें । नरां नातरि गे कुठें सौख्य व्हावें ॥३॥

श्लोक.

परस्पर जयीं द्वयें निज-समागमें स्त्री-नर ।
बँघोन गुण-दोष तीं करितिल स्वरूपांतर—॥
स्त्रिया प्रबल अंशतः नर मनीं तसे कोमल ।
तयेंच समयीं जगीं सफल आयु तें होइल ॥ ४ ॥

आर्या.

विद्या संपादावी परि गृह-कृत्याप्रती न त्यागावें ।
संसारीं निज-भर्त्या सुख संतत होय तेविं वागावें ॥ ५ ॥
वाढवुनी निज-बालां, बालांसम शुद्ध चित्त राखावें ।
ऐसा परमेशाचा आहे संकेत पूर्ण समजावें ॥ ६ ॥

श्लोक.

प्रसंग मग येइ कीं पुरुष सर्व तैशा स्त्रिया ।
मनें करुनि मोकळीं सुख परस्परां द्यावया—॥
प्रयत्न करिती, जयीं विषमता नुरे लेशही ।
स्वतंत्र, परि ऐक्य तीं करुनि, शोभवीती मही ॥ ७ ॥

दिंडी.

होइ जगताचा तईं समुत्कर्ष । दुभावाचा होणार नाहिं स्पर्श ॥
अंतिं भुवनीं उपजेल योग्य काळीं । मनुज-जाती संपूर्ण भाग्य-शाली ॥८॥

इंदिरा, सर्ग ७. —का. र. कीर्तीकर.

---

## ५७ पतंगाचे बोल.

श्लोक—वसंततिलका.

दैवें पतंग चढला नभिं उंच भारी ।
जेथें विहंगहि कदा नच घे भरारी ॥
प्रौढी स्वकीय मिरवोनि मनांत डोले ।
गर्वें बघोनि तळिं, काय पतंग बोले ॥ १ ॥

' प्रेमें कसे मजकडे जन हे पहाती ।
उड्डाण हें बघुनि विस्मित फार होती ॥
जातां घनानिकट मी मग काय यांना—।
वाटेल सत्य नकळे मज पाहतांना ॥ २ ॥

कैसें करूं जरिहि होइन मी स्वतंत्र ।
भेदोनि जाइन नभा सहजीं सुयंत्र ॥
देवा ! अहा ! मज कसें पर-तंत्र केलें ।
कैसे उपाय मम सर्व निरर्थ झाले ! ॥ ३ ॥

दोरा पहा मज कसा तळिं ओढितो हा ।
जाऊं न दे मज वरी करुं काय ? हा ! हा ! ॥
मातें मुळीं न सहवे पर-तंत्रता ही ।
वाटे बरा निरय तो जरि ओखटाही ' ॥ ४ ॥

दावावया स्व-बळ तैं मग तो पतंग ।
दोऱ्यास देइ हिसके हसडोनि अंग ॥
ऐसे करोनि मग तो सदुपाय नाना ।
तोडोनि रज्जु सुटला बहु दीनवाणा ॥ ५ ॥

केले प्रयत्न बहु तैं गगनीं रिघाया ।
गेले परंतु सगळे तदुपाय वायां ॥
एकाकि आश्रय तदीय सुटोनि गेला ।
खालीं भराभर पळांत पतंग आला ॥ ६ ॥

होतां अशक्य निज-भार सहावयातें ।
नेला मही-तळिं तसा बहु दूर वातें ॥
गेले विचार जिरुनी मनिं बापुड्याचे ।
मिथ्याभिमान असणें नच योग्य साचें ॥ ७ ॥

हे मूढ ! पंख नसती तुजला पतंग ! ।
जाशील रज्जुविण केंवि नभांत सांग ॥
वाटे पतंग-सम हा मम जीव देवा ! ।
प्रत्यक्ष हा कारितसेचिं तुझ्यासि हेवा ! ॥ ८ ॥

हा ! हा ! प्रभो ! विसरलों त्वदनुग्रहाला ।
नाहीं कधीं मनिं तुझा सु-विचार केला ॥
रे ! मद्धितास्तव तुवां पथ काढिला जो ।
उल्लंघिला सतत म्यां; मम चित्त लाजो ॥ ९ ॥
मिथ्याभिमान मनिं मी धरिला सदा हो ।
अन्य स्थिती तशि मिळो मनिं इच्छिलें हो ॥
साहाय्यही तव कधीं न अपेक्षिलें हो ।
तेणें विपत्ति सहतों बहु मी अतां हो ॥ १० ॥

हृदयतरंग, पुस्तक १ लें. —अनंततनय.

---

## ५८ वैराग्य-मणि-माला.

श्लोक.

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें । धनाढ्य प्रभू व्यापिले दुर्मदानें ॥
शिरीं थोर मूर्खास अज्ञान-ओझें । जिरालें निजांगींच पांडित्य माझें ॥१॥
जेथें एक, अनेक तेथ मिळती स्वाऱ्या, तयांच्या तुटी—।
होतां एक उरे, सर्वेचि मरती, तेंही नुरे शेवटीं ॥
फांसे रात्र-दिनाख्य झेलित पहा तो काळ खेळे असें ।
प्राण्यांचीच करूनियां भव-गृहीं ते सोंगटी चौरसें ॥ २ ॥
व्याघ्रीपरी भय करीत उभी जरा रे ।
देहासि रोग करिती रिपु-तुल्य मारे ॥
आयुष्य भिन्न-घट-नीर सरे तसें हें ।
पापें तथापि जन आचरतात पाहें ! ॥ ३ ॥
गगनीं रजनीस शशी विलसे । दिवसा रवि त्या स्थलिं नांदतसे ॥
उदयास्त अशांस न हे चुकती । स्थिर मानितसे जन हा कु-मति ॥ ४ ॥
गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा ।
गेली ते नगरी, तशा शशि-मुखी ज्या तप्त-हेम-प्रभा ॥
गेला तो नृप-पुत्र, त्या शुभ-कथा, म्यां देखिलें सर्व जें ।
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे ॥ ५ ॥

गेले जिला भोगुनि भूप सारे । त्या भूमि-लाभें तुज गर्व कां रे ? ॥
हही असो; एक धरूनि खेडें । कां मातले हे बहुसाल वेडे ? ॥ ६ ॥

न जाणतां टोळ पडे हुताशीं । नेणोनियां मीन गिळी गळाशी ॥
आभिज्ञ आम्ही विषयांसि जेव्हां । सोडूंच ना मोह बलिष्ठ तेव्हां ! ॥ ७ ॥

संतुष्ट लोकांस करावयासी । कां रे मना तूं तरि खिन्न होसी ॥
प्रसन्न चिंतामणि तूंचि जेव्हां । होसी, तुला वाण नसेचि तेव्हां ॥ ८ ॥

स्वर्गापासुनि शर्व-मस्तक-तटीं, तेथूनियां भूधरीं ।
ग्रावाग्राहुनि भू-तलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरीं ॥
गेली तेथुनि अर्णवाप्रति मदें, ते वंद्यही कष्टली ।
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली ॥ ९ ॥

भेटावें तरि हा नसे समय तो, अंतःपुरीं तो वसे ।
आहे निद्रित, अश्व पाहत असे, स्वारीस गेला असे ॥
आतां क्रुद्ध म्हणूनि भृत्य वदती, टाकीं तया दुर्जना ।
मुक्त-द्वार महेश-मंदिर सुखें जाऊनि सेवीं मना ॥ १० ॥

जों हे स्वस्थ तनू, जरा वसतसे जों दूर, जों इंद्रियें — ।
शक्तें, कीं सरलें न आयु पुरतें जों, पंडितानें स्वयें— ॥
आत्म-प्राप्ति-सुखार्थ यत्न करणें कीं तोंच हा फारसा ।
होतां मंदिर दीप्त, कूप-खननीं उद्योग तो कायसा ? ॥ ११ ॥

माते मेदिनि ! मारुता स्व-जनका ! तेजा सख्या सोदरा ! ।
तोया आणि नभा ! तुम्हां नमितसें जोडूनि भावें करा ॥
जालें ज्ञान भवत्कृपेस्तव मला, आतां पहा सत्वरीं— ।
ब्रह्मीं मी मिळतों, जलीं सम-रसें वर्षोत्पलांचे परी ॥ १२ ॥

वैराग्यशतक. —वामनपंडित.

# ५९ मृत्यु.

१ मरणं प्रकृतिः शरीरिणाम्. २ मृत्युची इच्छा करणारे लोक. ३ लोकापवादामुळें मृत्यूस कवटाळणारे लोक. ४ आत्मघात काय म्हणून करावा ? ५ ऐहिक वस्तूंचा मोह. ६ ईश्वरास प्रार्थना.

### श्लोक.

१

लावी सूर्य-शशांक दीप, पसरी आकाश हा चांदवा ।
पृथ्वी सुंदर रंग-भूमि सजवी, दावी निजा वैभवा ॥
बांधोनी मग जन्म-मृत्यु पडदे तेथें जगन्नायक ।
प्रारंभी प्रभु सूत्र-धार जनहो संसार हें नाटक ॥ १ ॥
पात्रें प्राणि अनेक-रूप असती या नाटकीं जेवढे ।
जन्माचा पडदा प्रवेश करिती सारून एकीकडे ॥
त्या त्यातें निज भूमिकार्थ अवघे संपादुनी शेवटीं ।
जाणें मृत्युचिया असेचि पडद्यामागें, न अन्या गती ॥ २ ॥

२

‘ पश्चात्तापें झुरावें किति तरि ? घडले थोर अन्याय हातें ।
रागें दुःखें जळे ही मम तनु, पळही वाटतें वर्ष मातें ॥
आशेचा लेश नाहीं, असुनिहि मुकतों भू-तला मी जिवंत ।
झाला मृत्यूहि कैसा अकरुण ! ’ वदति बंदि कारा-गृहांत ॥ ३ ॥
मात्रा, चूर्णें, थकति; सरती लेह, भस्में, कषाय ।
राहे क्लेशें पडुनि शयनीं वाळले हात पाय ॥
‘ आप्तां देऊं किति तरि मी त्रास, घेऊनि सेवा ’ ।
रोगी बोले, ‘ मिटविं नयनें ने मला धांव देवा ’ ! ॥ ४ ॥
‘ चिंताक्रांत-मुखी असेल गृहिणी बाळें भुकेलीं घरीं ।
नाहीं घांसभरीहि अन्न, मुख त्यां दावूं कसें मी तरी ? ॥
वेंगाडूं किति तोंड ? निष्ठुर जगीं आतां नको राहणें ! ।
मृत्यो ! दास-जनीं अनुग्रह करीं ’ ऐसें दरिद्री म्हणे ! ॥ ५ ॥
‘ गेला कांत लया, पुन्हां न परते आकांत केला तरी ।

झाला व्यर्थाचि जन्म ! कोठुन मला संसार-सौख्यें खरीं ! ॥
साहूं कैंवि विडंबनेस ? लपवूं हें तोंड काळें कुठें ? ।
ने बापा ! निजमंदिरास ' विधवा मृत्यूस हें प्रार्थिते ॥ ६ ॥

३

मानी जनाचें मन फार कोमल । लोकापवादाप्रत तें न साहिल ॥
धांवूनि तें मृत्युस घालितें मिठी । कीं ही चुकावी इह-लोक-संगती॥७॥

४

जन-द्वेषें धांवें जरि समजुनी मृत्यु-वदनीं ।
गमे ही मूर्खत्वें मम सुचविली व्यर्थ करणी ॥
प्रयासें मी मोठ्या जरि जन-कृपेच्या शिरिं चढें ।
न माझ्या आयुष्यीं शिव ! शिव ! पळाची भर पडे ॥ ८ ॥
द्वेषानें मज जाति-बंधु छळिती हें सत्य आहे जरी ।
नाहीं आवडता तथापि गमतें मी ईश्वराचे घरीं ॥
वल्ली पुष्प-फलाढ्य, दाट तरुची छाया, बसाया शिला ।
तोयें पूर्ण नद्या, तळीं न अजुनी कंटाळती तीं मला ॥ ९ ॥
देतो सूर्य मला प्रकाश दिवसा, रात्रौ निशा-नायक ।
वारा मंद सुगंधि शीतल सुटे, देतो शरीरा सुख ॥
जीवित्वास हवा अवश्यक नवी मातें मिळे निर्मळ ।
कां मी टाकिन देह, मित्र असतां माझे असे पुष्कळ ? ॥ १० ॥

५

असे क्षणिक देह हा म्हणत पूर्व आले मुनी ।
टिकेल शत वत्सर भ्रम असा असे या जनीं ॥
जगांत सुख-संपदा मिळविण्यांत गुंते मन ।
कळे न कधिं मृत्यु तो झडप घालितो येउन ! ॥ ११ ॥
' असेल पुढल्या क्षणीं मरण यावयाचें मला ।
करीन नच पातकें ' धरिं विचार हा चांगला ॥
क्षण-क्षण वृथा पळे, कधिंहि तें न मागें फिरे ।
नरा ! समजुनी असें सुकृत-संचया लाग रे ! ॥ १२ ॥

६

नाना-संकट-कंटकांकित अशा संसार-रूपीं पथीं ।
आलों येथवरी, पुढें न कळत्ये होणार कैशी स्थिती ॥
थांबावें मम मार्ग-संचरण हें वाटेल केव्हां तुला ? ।
सान्निध्या तव सर्व-मंगल-मया ! आत्मा असे लोभला ॥ १३ ॥
इष्टांनीं वेष्टिलेला निज-गृहिं अथवा दूर-देशीं भुकेला ।
घोरारण्यास किंवा जल-निधि-सलिला लंघितां श्रांत झाला ॥
माझा हा देह कोण्या स्थितिंतहि असतां मृत्यु येवो खुशाल !
इच्छा देवाधिदेवा ! तव धरिन शिरीं शांतिनें सर्व काळ ॥ १४ ॥

—वा. वा. खरे.

---

## ६० दांभिकनिंदा.

### अभंग.

१

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥
अवघा वरपांग सारा । पोटीं विषयाचा थारा ॥ २ ॥
मुद्रा लाविती कोरोनी । मान व्हावयासी जनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

२

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ॥ १ ॥
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबू-वेषा सहज स्थिति ॥ २ ॥
कोरोनियां भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ॥ ४ ॥

३

वांझेनें दाविलें गऱ्हवार-लक्षण । चिरगुटें घालुन वाथयाला ॥ १ ॥
तेवीं शब्द-ज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनियां ॥ २ ॥
बोलाचिच कढी बोलाचाचि भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥

कागदीं लिहितां नामाची साखर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥
तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥ ५ ॥

४

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥
अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥ २ ॥
वरी कोण मानी रसाळ बोलणें । नाहीं झालीं मनें ओळखी तों ॥ ३ ॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राज-हंस दोन्ही वेगळालीं ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येर गाबाळाचें काम नाहीं ॥ ५ ॥

५

चातुर्याचे योगें कवित्व करिती । प्रासादिक रंग आणितां न ये ॥ १ ॥
संन्याशाचें सोंग संपादिलें सांग । वैराग्याचें अंग आणितां न ये ॥ २ ॥
चंद्र-सूर्य-चित्रें लिहिताती भिंती । प्रकाशाचें अंग लिहितां न ये ॥ ३ ॥
शिपायाचें सोंग आणितां येइल सांग । शूरत्वाचें अंग आणितां न ये ४
तुका म्हणे गाऊन नाचून करितील सीमा । पांडुरंगीं प्रेमा आणितां न ये ५

६

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥ १ ॥
तैसा भक्ति-वाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥
वेठी धरल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥ ३ ॥
काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ॥ ४ ॥

७

जळो तैसा प्रेम-रंग । जाय भुलोनि पतंग ॥ १ ॥
सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥
मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥
जैसी वृंदावन-कांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥
बक ध्यान करी । दावी सोंग मत्स्य मारी ॥ ५ ॥
तुका म्हणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ॥ ६ ॥

गाथा. —तुकाराम.

# ६१ संतस्तवन.

### ओंव्या.

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान । जयांचेनि गुह्य ज्ञान । प्रगटे जनीं ॥१॥ जे वस्तु परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ । तेचि होय सुल्लभ । संत-संगेंकरूनि ॥ २ ॥ जेथें परीक्षावंत टकले । नातरी डोळसचि अंध जाले । पाहात असतांचि चुकले । निज-वस्तूसी ॥ ३ ॥ जेथें आक्षेप आटले । जेथें प्रयत्न पस्तावले । जेथें तर्क मंदावले । तर्कितां निज-वस्तूसी ॥ ४ ॥ वळे विवेकाची वेगडी । पडे शब्दाची बोबडी । जेथें मनाची तांतडी । कामा न ये ॥ ५ ॥ तेचि वस्तु संत-संगें । स्वानुभवें कळों लागे । त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ॥ ६ ॥ संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषांचें मूळ । ते हे संत ॥ ७ ॥ संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निज-तृप्ती । नातरी भक्तीची फळ-श्रुती । ते हे संत ॥ ८ ॥ संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार । नातरी बोलिजे माहेर । सायुज्य-मुक्तीचें ॥ ९ ॥ जं त्रैलोक्याहून वेगळें । जें वेद-श्रुतीसी नाकळे । तेंचि जयांचेनि वोळे । पर-ब्रह्म अंतरीं ॥ १० ॥ ऐसी संतांची महिमा बोलिजे तितुकी उणी उपमा । जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होय ॥ ११ ॥

दासबोध १. ५. —रामदास.

---

# ६२ ईशप्रार्थना.

### श्लोक–पृथ्वी.

कृतांत-कटकामल-ध्वज जरा दिसों लागली ।
पुरःसर-गदांसवें झगडतां तनू भागली ॥
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ।
न हों जरि उतावळा स्व-रिपु कापितो हा गळा ॥ १ ॥

असो वरि कसा तरी विमल भाव ज्याचा करां— ।
तयावरि दया, पचे वर असाचि या चाकरा ॥
वृथाचि गमतें दिलें बहुहि जें न दासा जिरे ।
पुसोनि अधिकार या, सुकर तें सदा साजिरें ॥ २ ॥

न जें प्रिय, सदोष तें; प्रिय सदोषही चांगलें ।
स्व-तोक पितरां रुचे, जरिहि कर्दमीं रांगलें ॥
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ? ।
जरी मळविशी रजोमलिन-काय तूं अंबरें ॥ ३ ॥

प्रसिद्ध तुमचे महा-सदय पाय; जीवांकडे— ।
चुकी म्हणुनि होतिल क्षणहि काय जी वांकडे ? ॥
न निष्ठुर पिता; म्हणे मनिं, ' न हो प्रजा टोणपी ' ।
अपथ्य-रुचि रुग्ण तो कटुक ओखदें कोण पी ? ॥ ४ ॥

सदाहि हित नायकों, बहु अपाय केले करूं ।
तरि सकृप बाप तूं म्हणसि, ' नायके लेंकरूं ' ॥
कधीं न करिसी प्रभो ! भजक-बाळकोपेक्षण ।
न तूजवरी ज्यापरि पशुप-पाळ कोपे क्षण ॥ ५ ॥

सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी— ।
प्रपंच, भर घे शिरीं, करि कृपा पिता त्यावरी ॥
असा जरि नसे, रुचे तरि न तो अभद्र क्षण ।
तसा तुजचि आवडे; करिसि तूंचि तद्रक्षण ॥ ६ ॥

पिता जरि विटे, विटो; न जननी कु-पुत्रीं विटे ।
दयामृत-रसार्द्र-धी न कुल-कज्जलें त्या किटे ॥
प्रसाद-पट झांकिती, परि परा गुरूचे थिटे ।
म्हणूनि म्हणती भले ' न ऋण जन्मदेचें फिटे ' ॥ ७ ॥

विटेल जननीहि कीं शत रची निमित्तें विधि ।
मळे कलि-युगीं श्रुती जशि, खळीं तिची तेंवि धी— ।
कदाचित विटेल, बा ! तव दया न दीनावरी ।

जशी जगदघ-क्षयीं कर भवन्नदी नावरी ॥ ८ ॥
सुसंगति सदा घडो, सुजन-वाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रि-कमळीं दडो, मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चारित्रीं जडो ॥ ९ ॥
न निश्चय कधीं ढळो, कुजन-विघ्न-बाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त-मार्गीं वळो ॥
स्व-तत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्म-बोधें जळो ॥ १० ॥

केकावली. —मोरोपंत.

---

## सर ३ रा समाप्त.

ॐ तत्सत् ।

---

# स्पष्टीकरण व टीपा.

## सर १ ला.

**संक्षिप्त चिन्हें**—ता. प.=ताडून पहा. म्ह०=म्हणजे. ०=इत्यादि.

**१ ईशस्तवन**—७. प्राप्त-संचित, दैव.

**३ अरुण**—१०. मोत्यें-नक्षत्ररूपी.

**४ इंद्रधनुष्य**—१. वासवचाप-इंद्रधनुष्य. ३. अनंग-मदन. ४. जीवन-पाणी; आयुष्य. ५. मंदाकिनी-आकाशगंगा. शरासन-धनुष्य. ६. लोल-चंचल, लोलुप, आसक्त. ९. संहति-संघ समुदाय. वर्ण-रंग; पक्षीं, अक्षरें. ११. निर्गुण-ज्याहीन, दोरीरहित; पक्षीं, गुणहीन. १२. पयोद-मेघ, घन.

**५ वर्षाऋतु**—१. वर्षा-पावसाळा. २. तपर्तु-ग्रीष्म ऋतु. घटवी-कमी करी. ३. व्योम-आकाश. ४. धाराभिघात-वृष्टिपात. अचल-पर्वत. ६. सगुण-शब्दगुण-युक्त. गुणशुन्य-दोरीराहित. ८. कलाधिप-चंद्र. खद्योत-काजवा. ९. भेक-बेडूक. १०. वेतस-वेत.

**६ वेणुसुधा**—३. व्रज-गोकुळ. लिखितें-काढलेलीं. ५. शतपत्र-कमल. ६. सये-हे सखि. प्रेमरंगीं-प्रेमरूप रंगांनीं. रेखिला-तसबीर काढली. रव-शद्ब. ७. गोधन-गाईंचे समुदाय. वज्-[ व्रज् ] जाणें. थिजावें-थांबून रहावें. ९. क्षिती-भूमीकडे. १०. जगज्जीवन-जगाला आधार. जीवन-वांचणें; पाणी. हो-होय. सुहृद्भाव-मैत्री. ११. लेशवातें-वाऱ्याच्या झुळकीच्या योगानें. स्वात्मदेहार्पण-आपलें मन व शरीर यांचें अर्पण. अज-जन्मरहित; परमेश्वर. १२. चढेल-ह्याचा ' आपला ध्वनि ' हा अध्याहृत कर्ता. आपल्या गर्जनेनें मुरलीचा शद्ब लोपला तर नवविध भक्तींतील श्रवणभक्तीचें उल्लंघन होईल म्हणून तें टाळण्याकरितां हळू शब्द करितो असा भाव. वर्जतो-टाळतो. १३. वंश-पांवा.

**७ रुक्मिणीविवाहकथा**—१. शाल्वमगधपतिसख-शाल्व व मगधपति ( जरासंध ) यांचा मित्र. चैद्य-चेदि देशाचा राजा, शिशुपाल. तद्बलजलनिधींत-त्याच्या सैन्यरूप समुद्रांत. आधि-चिंता. २. नतचा०-शरणागत हेच चातक त्यांची

दयारूप सुधा तिचा मेघ. ३. गरळविलेपन–विषाचा लेप. हरिद्रा–हळद. शुष्कोपचरण–कोरडा बाह्य उपचार. ४. ध्वजा झाल्यें–पताकेसारखी उभी राहिल्यें. पुरेक्षणछद्में–नगरदर्शनाच्या निमित्तानें. हरिदिक्–इंद्राची दिशा, पूर्व. ५. आधिभारभग्न आणि म्हणूनच कष्टी जें मन त्यासी रात्रि यष्टि ( आधार ) झाली. ८. द्विजधन्वंतरी–ब्राह्मणरूपी उत्तम वैद्य. ९. ' ऊठ, गुरुपदास लाग ' असें मन म्हणे. १०. उत्तमश्लोक–उत्तम आहे कीर्ति ज्याची असा. ११. ज्या–चिंतादिकांस. पालविलें–बोलविलें. कृष्ण आल्यामुळें माझी चिंता दूर झाली पण शिशुपालादिक चिंताग्रस्त झाले हा भाव. १४. धात्री–दाई १६. दावा–वैर. कळों नेदावा–कळूं देऊं नये. १७. पद्म–कमळ. लोल–लोलुप, आसक्त. १८. जोडा–उपमा. महा–उत्सवास. कोले–कोल्हे. १९. कैरविणी–रात्रि. वायसाराति–( वायस–कावळा+अराति–शत्रु ) घुबड. रात्रि व घुबड यांमध्यें एक प्रकारचें प्रेम असलें तरी पतिपत्नीभाव नसल्यानें हा दृष्टांत तितका समर्पक नाहीं. ' काय सारा ती ' या दुसऱ्या ओळींतील शब्दांशीं प्रास जुळण्याकरितां पंतांस ' वायसाराति ' हा शब्द योजावा लागला असावा. अशाच प्रसंगीं सुभद्रार्जुनांविषयींच्या पंतांच्याच सुंदर आर्येंतील तोच निर्दोष दृष्टांत पहाः—' सार्थक पार्थ करी; ती कैरविणी, तो सुधांशु गौरविता । सविता बिसिनीसि वरी, कीं भेटे तो गुणज्ञ ती कविता ॥–कृष्णविजय, अ. ८६. २०. मूर्त–मूर्तिमान्. शिशिर–हिंवाळा. २१. आलि–सखि. सुमनोमाळा–फुलांची माळ. वहायास–वहाणें. पद्यरत्नसमुच्चयांत ' वहा यास ' असा व्यस्तपद शब्द लिहिला असून ' या वरास सुमनोमाळा वहा ' असा अन्वय दिला आहे. या आर्येंतील सखीनें केलेला विनोद किती चुरचुरीत आहे बरें ! २३. हरिनीळ०–इंद्रनीलमण्यासारखा पति जो कृष्ण त्याच्या मांडीवर. श्री–शोभा. चपळे–विजेस. २४. मुक्ता–मोतीं. २६. कनक–सुवर्ण; धोतरा. धुतरा–धोतरा.

**८ सीताशुद्धि**—सौदामिनी–वीज. ७. उदंड–पुष्कळ. निराळ–आकाश. १०. विदेहनंदिनी–जनककन्या, सीता. १३. मंगळजननी–भूमि. सीता ही भूमींत सांपडली; म्हणून तिला पृथ्वीची कन्या म्हणतात. १६. रिचवती–गळून पडती. २५. क्षेम देणें–भेटणें. कोदंडपाणी–धनुष्य आहे हातांत ज्याच्या तो; राम. वामांक–डावी मांडी. २६. नवमेघरंग–सजल मेघाच्या रंगाचा; नीलवर्ण.

**९ रांगोळी घालतांना पाहून**—१. गोमय–शेण. बालार्क–बालसूर्य. २.

गोष्पद–गाईचें पाऊल. सुधें–चांगलें. ४. रुचिर–सुंदर. मदीया–माझी ६. सारस–कमल. ७. कृती–धन्य.

**११ गर्व व काळ**—१. अभ्रंकष–गगनस्पर्शी. ३ चंडदंडयुग–प्रचंड दंडांची जोडी. ५. कालोपद्रुत–मृत्युवश.

**१२ तेजस्विप्रशंसा**—१. पोत–मशाल, दिवटी. उफाळे–उसळे. २. अचेतन निर्जीव. दिननायक–सूर्य. पाद–पाय; किरण. ३. चपेटा–चापट, चपराक, थप्पड. करी–हत्ती. ४. निकें–सगळें. मृगराज–पशूंचा राजा, सिंह. ५. रुधिर–रक्त. अवचट–अवचित. गजहंता–सिंह. जंबूक–कोल्हा. ६. विसंबणें–दूर ठेवणें, सोडणें, टाकणें.

**१३ दमयंतीचा विलाप**—१. प्रबोधली–जागी झाली. २. भीमकी–भीमक राजाची कन्या; दमयंती. ४. चामकणें–चालणें, जाणें. ७. गोरटी–नाजूक (स्त्री). वसन–वस्त्र. ९. बाहीं–बाहूंनीं. १०. दुःख कोटी–पुष्कळ दुःख. १२. आक्रांतली–आक्रांत करती झाली. १४. अनिला–हे वायो. १६. युग्म–जोडपें. १०. मुखाब्ज-मकरंद–मुखकमलाचा वास. शुद्धी–शोध, बातमी. २१. अवदशा–वाईट स्थिति.

**१४ गृहस्थाश्रमकर्तव्य**—२. आटा–खटपट, खटाटोप, दगदग. ३. तृष्णा–हांव. बहुवस–पुष्कळ. योग–न मिळालेलें मिळणें. क्षेम–मिळालेलें राखणें.

**१५ शिवधनुर्भंग**—मूर्धनीं–मस्तकावर. ३. उमानीं–उचलून धर. शरासन–कार्मुक, चाप, धनुष्य. तपन–सूर्य. कर–हात; किरण. शंभु–शंकर. पृष्ठीसी–पाठीवर. कूर्मानें पृथ्वी पाठीवर घेतली असल्यामुळें सीता त्यास अशा प्रकारें विनवीत आहे. विधि–ब्रह्मदेव. ४. पुरश्चरण–मंत्रजप. उद्यापन–व्रताची समाप्ति. सुकृत–पुण्य. ५. उदित–उगवलेला; प्राप्त झालेला. लेखा–बरोबरी. ६. केयूर व अंगद–दंडावर धारण करण्याचे अलंकार. जांबूनद–सोनें. नेणेति–नेणती, न जाणती. ७. परिधीं–सभोंवार. थोकले–स्तब्ध झाले. ८. दोर्दंड–हात. कर्णांत–कानापर्यंत. ९. श्लोकाचा भाव असाः–रामानें धनुष्य वर उचललें, त्यावेळीं ऋषीलाहि वर उचललें; म्हणजे त्यास इतका अभिमान वाटला; व ‘ हा पोर धनुष्य काय उचलतो ’ हा राजांचा संशय, आणि ‘ रामाच्यानें धनुष्य उचलेल कीं नाहीं ’ हा जनकाचा संशय, नष्ट केला; धनुष्याच्या दोरीबरोबर सीतेचें चित्तहि ओढलें; परशुरामासारख्याचा गर्व हरण केला व सर्व धनुर्धरांना त्यांच्या आकृति टाकावयास लाविलें, म्हणजे ते लज्जेनें फिक्के पडले. १०. कोलाहल–गडगडाट. तुकणें–डोलविणें. सर्व भूप–सगळे राजे.

**१६ माझें फूल कुस्करलें** !—२. वीची–लाटा. तांडव–नाच. ३. कदली–केळ. ४. तुहिन–बर्फ. २४. निर्घृण–निष्करुण. मतंगज–हत्ती.

**१७ श्रीकृष्णसुदामभेट**—नवनीतांत दिलेल्या पंतांच्या पृथुकोपाख्यानांतील साक्या यांतील आर्योशीं ताडून पहाव्या. **१.**—१. महितप्रताप–मोठा आहे प्रताप ज्याचा तो. त्यास (श्रीकृष्णास) नित्य मोह रिपु [ आहे; आणि ] तीस ( त्या कमलेस ) हित ( मित्र ) असा आहे. कृष्ण हा रुक्मिणीमंदिरांत होता तरी विषयलंपट नव्हता; कारण तो मोहाचा नित्य वैरी होय. मोह हा लक्ष्मीचा मात्र मित्र होय; कारण ती मोहास उत्पन्न करते. २. सन्महसा–परमोत्सवसम. ५. पल्यंक–पर्यंक, पलंग. स्वकृपा०–आपली कृपा हीच सत्कामकल्पवल्ली तिच्या मांडीवर. ६. सेवक०–भक्ताचें पाप हेंच तृण त्यास जाळणारा अग्निच असा कृष्ण. सदवधूतां–योगिवरांसहि. यत्पद०–ज्याच्या पदधूलीनें पवित्र झालेली. देवधुनी–भागीरथी. जगदशुद्धि–जगत्पाप. ८. व्यजन–पंखा. शैब्या–रुक्मिणी. निकाम–अत्यंत. ९. स्वपतिसख–आपल्या पतीचा मित्र. वधू–स्त्रिया. अवधूतें–विरक्तानें. १०. क्षुज्जीर्ण–क्षुधेनें कृश. १२. सद्गतिनें पतिनें-सज्जनांची गति ( आधार ) जो आपला पति कृष्ण त्यानें. १३. सच्चूडारत्न–साधुश्रेष्ठ. तीर्थपद–तीर्थांचें स्थान असा कृष्ण. श्रवण०–ऐकण्यास उत्सुक अशा कानांत. वाक्सुधा–भाषणरूपी अमृत. १४. इंधनानयना–इंधन म्ह० सर्पण आणण्यास. १५. करका–गारा. तमिस्र–गाढ अंधकार. १६. खरकर–चंडकिरण; सूर्य. खरकर... अनुकंपा–सूर्य मावळला. शंपा–वीज. तमही–' भय दे ' हें क्रियापद. न मही पथ–वाट न सुचे. १७. सूर–सूर्य. ध्वांत–अंधकार. १८. आर्तच्छात्र–पीडित किंवा दुःखित शिष्य. १९. अमृतकर–चंद्र. चंद्र निष्कलंक केला तरच तो उपमेस योग्य होईल. २०. अस्मदर्थ–माझ्याकरितां. गहन–वन. दहन–अग्नि. मृगशावक–हरणाचा छावा. २१. सुच्छत्र०–काष्ठभार छत्र किंवा पुष्पगुच्छ भाविले. २२. पुमर्थ–पुरुषार्थ. २३. छंदें–वेद. हृच्छंदें–भवन्मनोभिलाषें. २४. नर्मी–थट्टेंत. मृषोक्ति–असत्य भाषण. शर्म–सुख, कल्याण. वर्म–कवच. २६. क्षीरधि–क्षीरसागर. हर०–शिवमस्तकारूढ. तज्जात–त्यापासून ( समुद्रापासून ) झालेला ( चंद्र ). २७. स्तन्य–दूध. **२**—१ धरादेव–ब्राह्मण. ३. पृथुकप्रसृति–पसाभर पोहे. प्राघुणशिखी–अतिथिरूप अग्नि. ४. लज्जाभ०–भक्ति म्हणे ' द्यावे, ' लज्जा म्हणे ' न द्यावे. ' ५. नवर०–ताज्या कमळासारखें ( कृष्णाचें ) मुख. ता. प.—' संकोचला अधोमुख बसला विप्र न बोले कांहीं । बुडताचि होता मुनि तो केवळ लज्जानदीप्रवाहीं '—पृथुकोपाख्यान. ६. श्रीकामें–

महाल

द्रव्याच्या इच्छेनें. ७. राम–बळराम. ८. श्रीकर–कृष्ण. सत्त्व०–सात्त्विक संपत्तीला भूषणभूत अशा ( चिंद्या ). ९. तुला–उपमा. १०. भेटि–भेट. १२. आणा–शपथा. १३. हरि ! हरि !–आश्चर्यार्थी. सतुष–कोंड्यासह. व्रज–गोकुळ. पशुप–गवळी. १४. भक्तवर्याप्त–भक्तश्रेष्ठांचा आप्त. श्री–लक्ष्मी. पर्याप्त–पुरेसा. **३**—३. प्रभूतनया–सदाचारसंपन्नाला ( विप्राला ). लालस–लालसायुक्त, लोलुप, आसक्त. ४. पादरजा–पदधूली. सदार–पत्नीसह. शय–हात. **४**—३. लोल–लोलुप, लालस. ब्रह्मण्य–ब्राह्मणाविषयीं आदर आहे ज्याला असा.

**१८ अभंगमणिमाला**—३. साधूनी–हळुहळू संचय करून. भुजंग–सर्प.

**१९ ऋतुपाख्य उद्यान**—१. ऋतुपाख्य–ऋतुप नांवाचें. केलि–क्रीडा. चैत्ररथ–कुबेराचें उपवन. २. चिगुरले–पालवीनें भरले. मधु–मध. वी–उत्पन्न करी; दे. ३. मकरंद–फुलांतील रस. कालवे–मिसळतो. सांद्र–दाट. तती–पंक्ति. ४. रुचिर–रुचकर. तूपकेळें–तुपांत तळलेलीं केळीं. रुचितेसी–गोडीला. तूपकेळें–तुपासारखीं गिलगिलीत व पौष्टिक अशीं रसवेळ्या जातीचीं केळीं. रसाळें–आंब्यांचीं झाडें. कदंब–समुदाय. अन्वय–रसाळें फळकदंबेंसहित सांद्र केळी ( होत्या ). ५. सुरसाचे सांचे–गरे. ६. विसांवे–विश्रांतिस्थानें. अलिनीकुल–भ्रमरीसमूह. ७. श्रीफळ–नारळ. वेलांचे वेल–असंख्य वेल. विवर–छिद्र. जयांचे शाखाविवरिं वायू, जे पावयांचे जोड ( पांव्यासारखे ) असे रव करी. ८. तटाक–तळें. तामरसानपायें–( तामरस–कमल अनपाय–अविनाश ) कमलें विपुल असून त्यांचा नाश होत नसल्यामुळें; ' हें निरंतरामंद मरंद वाहे ' याचें कारण. निरंतरामंद–( निरंतर+अमंद ) कधींहि न खळणारा व विपुल. मरंद–पुष्परस. ताप–उष्णकाळ; उन्हाळा. ९. उदरंभर–पोटभरू. बंभर–भुंगे. इंदिरा–लक्ष्मी. जें मरंद पीतां उदरंभर बंभरांचें मंदिर होय व इंदिरेचेंहि मंदिर होय हा अन्वय. लक्ष्मीचें नांव पद्मालया असें आहे. तेव्हां अर्थात् कमल हें तिचें मंदिर आहे, व तें भ्रमरांचेंहि मंदिर होत असे. कारण त्या कमलांत मकरंद इतका विपुल व मधुर असे कीं, तो पिण्यांत भ्रमर गुंतले असतां संध्याकाळचें भान न राहून रात्रभर त्यांतच गुंतून रहात. विसांववीतें–विसांवा देतें. कमलास सहस्र दलें व सूर्यासहि सहस्र किरण; प्रत्येक दल एकेका किरणास वरचेवर धरून ठेवी; तात्पर्य, कमलें मोठमोठालीं व तेजस्वी असून सरोवरांतील उदक गार राही. १० सरोज–कमल. रज–पराग. तयास–जलबिंदूस. ११. मधुप–भुंगा. खिल्लारें–समुदाय. कुमुद–चंद्रविकासी कमल. कल्हार–श्वेतकमळ. मानसोल्लासें–मनाला आल्हाद देणारीं. १२.

मधुरसा–मधुर रुचीला. रसतें–पूर्णतेला आणतें. सारस–एक प्रकारचा पक्षी. उभय–पाणी व पक्षी. होय तशी–पाहिजे तशी. रुचि–गोडी, सुख. वीतसे–देत असे. नवनीतांत दिलेल्या नलदमयंतीस्वयंवराख्यानांतील ३३ वा श्लोक पहावा. १३. राजहंसा–राजश्रेष्ठाला. विसांवती–थांबविती, लोभविती; संतुष्ट करिती. चक्रें–समुदाय.

**२० इंद्रप्रस्थवर्णन**—१. गोपुर–नगरद्वार; मुख्य द्वार. सौध–राजवाडा. दामोदर–विशाल. देहलिका–उंबरठा. २. हुडे–बुरुज. ६. स्वादु–मधुर. कल्हार–कमळ. ७. जातिका–जाई. शतपत्र–शंभर पांकळ्यांचें कमळ. दमनक–दवणा. धुळोरा–धुरोळा, धूळ. ९. पट्टण–नगर.

**२१ पुण्याची सद्यःस्थिति**—सद्यःस्थिति–हल्लींची स्थिति. १. तुला–तुलना, तोड. २. झंझावात–तुफानी वारा. ४. दुःश्रव–ऐकण्यास कठिण. ६. विपत्त्यर्णव–दुःखसागर. रव–शब्द. भव–संसार.

**२२ दुर्जननिंदा**—२. सूकर–डुकर. पाखांड–नास्तिकपणा. क्षीर–दूध. ३. रासभ–गाढव. तेजी–घोडा. पीयूष–अमृत.

**२३ अंतःशुद्धि व बहिःशुद्धि**—१. वृंदावन–कवंडळ. फुंदणें–उसासे टाकणें. २. कोडी–कोटी.

**२४ संतांचीं लक्षणें**—१. आपपर–स्वकीयपरकीय. २. वसुधा–पृथ्वी. ३. कां–किंवा. चाळूं–चेष्टवूं, हालवूं. परौतें गाळूं–पलीकडे टाकूं. ४. तोय–पाणी. ५. आघवियां–अवघ्या, सर्व. एकपणें–समत्वानें. धात्री–पृथ्वी. ६. क्षमेलागीं–सहिष्णुतेविषयीं. पवाड–योग्यता, बरोबरी. उत्संग–मांडी. ७. वार्षियेवीण–वृष्टीवांचून. निर्भर–भरलेला. निरुपचार–साधनावांचून. ८. माजें–क्षोभानें, गाजण्यानें. नुबजे–न कंटाळे. ९. अवेवां–अवयवां. जीवपणें–आपण जीव आहों असें मानून. १०. चोखाळ–चोख, शुद्ध. तत्त्वार्थीचा देखणा पायाळ–तत्त्वरूपी धनाला पाहणारा पायाळू. ११. वोखटें–वाईट. नुमटे–उमटत नाहीं; वाटत नाहीं. घटे–घडे. १२. वैषम्य–विषमता, भेदबुद्धि. १५. इक्षु–ऊंस. पाळतिया–राखणारास. गाळितया–चरकांत घालून रस काढणारास. १६. माधुर्य–आह्लादकता. चंद्रिका–चांदणें. १७. तीन लोक–शत्रु, मित्र व उदासीन; किंवा स्वर्ग, मृत्यु व पाताल. १९. तोखे–संतोष पावतो. न पारुखे–दुःखी होत नाहीं. २२. निष्कळ–निष्कलंक, पूर्ण शुद्ध. २३. पढियंतें–आवडतें. साचोकारें–खरेपणानें, खरोखर.

**२५ परमेश्वरापाशीं मागणें**—१. शाश्वत–ध्रुव, नित्य. २. अहि–सर्प. ३. विश्वपा–हे विश्वाच्या पालनकर्त्या. ६. विशद–स्पष्ट. ९. अनुग्रह–कृपा. भवाब्धि–संसार-सागर. तरी–नौका. १०. गर्ता–खांच, खळगा. नितांत–अत्यंत. कुहर–दरी. ११. भुजंग–सर्प. अहर्निश–रात्रंदिवस. १२. मनस्तिमिरकर्दम–मनाचा अंधकार हाच चिखल. १३. गद–रोग. धन्वंतरी–उत्कृष्ट वैद्य. गदार्त–रोगपीडित.

---

## सर दुसरा.

**१ ईशस्तवन**—१. अघनिधि–पापसागर. २. सुरभि–कामधेनू. वी–देते. ३. ललाट किणें ( घट्टयानें ) पद ( स्थान ) केलें; किंवा 'सदैव पद नमितां जरी ललाट किणें केलें'—कपाळास जरी घट्टे पडले असा अर्थ. ४. कोटिगा–कोडगा. अजांड–ब्रह्मांड. नांदवा–नांदवां. तदा–कृष्णावतारीं. दव–दावानल. कृष्णावतारीं गोकुळास अग्नि लागला होता, तो कृष्णानें गिळून टाकून गोकुळाचें रक्षण केलें. ५. दयाब्द–दयेचा मेघ. उबगणें–उपेक्षणें. अनन्यगतिक–नाहीं ( आपणावांचून ) अन्य आधार ज्याला. सोपद्रव–पीडित. उमोप–पुष्कळ. द्रव–कळवळा. ६. शलभ–टोळ. अहि–सर्प. भेक–बेडूक. ७. आयस–लोखंड. ८. विधि–ब्रह्मदेव. श्रुतिज्ञ–वेद जाणणारा. धी–बुद्धि. ९. घनांबु–मेघाचें पाणी. १०. अदयताख्य–निर्दयता नांवाचा.

**२ सायंकाळ**—१. रश्मि–किरण. नभः–आकाश. दिव्य पथिक–स्वर्गीय वाटसरू. २. केशावली–केशसमुदाय. करभार–खंडणी; किरणसमूह. ३. अध्वन्–मार्ग. ५. उत्तुंग–उंच. पद्मिनीचा पति–सूर्य. कर–हात; किरण. ६. प्रतीची–पश्चिम. लीन–गत, नष्ट. भट–योद्धा. ७. तपन–सूर्य. १०. गेह–घर. ११. निर्जर–देव. १२. सायंतन–संध्याकाळचें. १३. मार्तंड–सूर्य.

**३ शरद्दतु**—१. दुर्दिन–पावसाळी दिवस. साजिरी–सुंदर. २. सस्य–धान्य. अनर्घ्य–अमूल्य. ३. कृषीवल–शेतकरी. शारदीय–शरत्कालीन. ४. गुणाढ्य–गुणमंडित.

**४ कोकिलकूजित**—४. खग–विहंग, पक्षी. सरिता–नदी. मिलिंद–भुंगा. बंदी–स्तुतिपाठक. वैतालिक–प्रातःकाळीं स्तुतिपाठ म्हणून राजाला जागें करणारा. दिगंगना–दिशारूपी स्त्रिया. दर्हिवर–दंव. १३. वल्लरी–वेल.

**५ रामप्रत्यागमन**—१. अनुज–पाठचा भाऊ; लक्ष्मण. कपिपति–मारुति. उत्तमश्लोक–पवित्रकीर्ति. यान–विमान. २. सोदर–सख्खा भाऊ. मोद–आनंद. वर्ष–वृष्टि. वाटे–मार्गांत. ३. पक्व–शिजविलेले. जव–सातू. ४. ध्वस्त–नष्ट, लज्जित. ६. वृंद–समुदाय. चित्र–चमत्कारिक. स्वर्ण–सुवर्ण. सन्नाह–साज, सरंजाम. अभिमुख–सामोर. ७. मुद्रा–शिक्का, ठसा, चिह्न. ८. पद्मा–लक्ष्मी. क्षेम–आलिंगन. ९. उपपादी–सांगे. क्षितिसुता–सीता. १०. कोसल–अयोध्या. ११. जिती–जगतात. सुधाकर...आतपत्र–चंद्राप्रमाणें सित म्ह० शुभ्र छत्र. कृती–धन्य. १२. असिचर्में–ढालतलवार. ऋक्ष–अस्वल. ऋक्षपाळ–जांबुवंत. १३. व्योम–आकाश. गुरु–वसिष्ठ; पक्षीं, गुरुग्रह. सोम–चंद्र. नटति–नाचतात. १४. माउल्या–कौसल्या, कैकेयी व सुमित्रा. लाहो–लाभ. धरातनया–सीता. १६. माया०–प्रेमरसयुक्त ( नयनजळानें ). १७. कोदंडपाणि–चापहस्त. त्रिदश–देव. वंशाब्धिचंद्र–वंशरूप समुद्रांतील चंद्र. १८. अंबर–वस्त्र. पद–पदवी. १९ कमळासन–ब्रह्मदेव. २०. अग्रज–वडील भाऊ. २१. द्वीप–बेट. २२. काया–देह. २३. एकवधूव्रत–एकपत्नीव्रत. मधुव्रत–भ्रमर. स्फुट–स्पष्ट. २४. निर्व्याज–निष्कपट. सगुण–गुणवती. सलज–लज्जावती.

**६ रामराज्यवर्णन**—१. अज–अजन्मा, राम. घटदोहनी–घडाभर दूध देणाऱ्या. सस्य–धान्य. मेदिनी–पृथ्वी. यूप–यज्ञांतील पशु बांधण्यासाठीं खांब. २. स्वादु–मधुर. भूरुह–वृक्ष. चषक–पानपात्र, प्याला. ३. साकेत–अयोध्या.

**७ नळराज्यवर्णन**—पहिल्या तीन ओंव्या मिळून एक रूपक आहे. १. धरा–पृथ्वी, वसुधा. तरणी–सूय. ३. उलूक–घुबड. ४ ब्रह्मगोळ–ब्रह्मांड. अघ–पाप.

**८ दया**—१. न कडसी–न परीक्षी. सानें–लहान. २. हिरतां–हरण करितां. कणव–करुणा, दया. ३. अंगवरी–स्वतः शरीरानें. उपखे–नाश पावे. ५. नेहटे–शिरतो, बोंचतो. ६. पावो–पाय. ७. आरायिलें–उत्पन्न केलें. सेलभागीं–बऱ्यासाठीं. ८. मीं०–उपजतांच त्यानें मला ऋणी केलें.

**९ कवि आणि फूल**—१. श्रेणी–पंक्ति. ३. सुम–पुष्प, प्रसून. आराम–बाग, उद्यान. ३८. सौरभ–सुगंध. ३९. हिम–दंव. ४३. सूरी–कवी. ४४. विवास–वनवास. ५६. हीरक–हिरा. शाणोल्लीढ–साणेवर घांसलेला.

**१० वृक्षोपदेश**—७. झंझावात–तुफानी वारा. ११. नाक–स्वर्ग. १५. कुठार–कुऱ्हाड. १९. काया–( आपलें ) शरीर.

**११ कच आणि देवयानी**—१. अमृतमयवचा–अमृतासारख्या वाणीचा. २. एहि–( आ+इहि ) ये. ३. गुरूदरीं–गुरूच्या पोटांत. वो–ओ. ४. गुरूदर-दारण–गुरूचें पोट फाडणें. ५. कुक्षि–कूस. कुव्यसन–दुष्ट हट्ट. या तुझ्या दुष्ट हट्टानें मी मरेन हा भाव. ७. कनकान्या–कन्येहून इतर. ९. कुलज०–कच कुलीनाच्या कीर्तीचा लोभी होता. म्हणून गुरूचें पोट फाडून बाहेर आला याची त्यास शरम वाटली. ११. स्वकरग्रहार्थ–आपल्या पाणिग्रहणाकरितां म्हणजे आपणाशीं लग्न लावण्याकरितां. सुविद्यता–विद्वत्ता. शुचिता–शुद्ध आचरण. १३. सद्यः–एकदम. स्वपितृ०–आपले वडील व इष्टमित्र यांचें तोंड उतरतें. १५. कीर्तन–स्वतः सांगणें. स्वसे–हे भगिनि. १८. हताश–नष्ट. १९. मलिन–मळकट; पक्षीं, पातकी. कुटिल–कुरळे; पक्षीं, कपटी. नीरस–शुष्क; पक्षीं, प्रीतिरहित. जड–अचेतन; पक्षीं, मूर्ख. पुनर्भवपणें–वारंवार उत्पन्न होण्यानें; पक्षीं, वारंवार मरून जिवंत होण्यानें. कचसा–केंसासारखा. स्वप्रकृतिगुण–आपला स्वाभाविक गुण. २२. ऋषिसुत–ब्राह्मणपुत्र.

**१२ कचाप्रत देवयानी**—३. द्विज–ब्राह्मण; पक्षीं, चंद्र. कुमुद्वती–चंद्र-विकासी कमल. ५. मदनुराग–माझें प्रेम. ६. शेखीं–शेवटीं. ८. जव–वेग. १०. अंतिम–शेवटचें. १४. ईप्सित–इच्छा. १७. मत्कृतसारीदुर्गभ्रंशभयें–मीं रचलेला सोंगट्यांचा बुरूज कोसळेल या भीतीनें. हर्म्य–वाडा. १८. हेति–शस्त्र, तरवार. २१. रक्त–तांबडा. विरक्त–प्रेमरहित. द्वैध–भिन्नता, द्वैत. २२. रुचिर–सुंदर. २७. प्रहरण–शस्त्र. ३१. बहुसाल–पुष्कळ. ३६. मृगाजिन–हरिणचर्म. ४२. लोचनांवाटे–नेत्रमार्गें.

**१३ देवाचा धांवा**—१. भातुकें–खाऊ. २. पांजरा–अस्थिपंजर; अत्यंत कृश. ३. धड–शरीर. शरीर लोटांगणीं जावयास उतावीळ झालें आहे. पारणें–आत्यंतिक समाधान. ४. वासूं–वेंगाडूं. बंदी–स्तुतिपाठक. वोरसणें–पान्हा सोडणें.

**१४ अभिमन्यूचा पराक्रम व वध**—१. वीरसू–वीरमाता. २. व्यूहकोट–व्यूहरूप किल्ला. ३. द्व्यंगुल–दोन बोटें. धड–नीट. कलेवर–शरीर. सुतुमुलाहव–अत्यंत घनघोर युद्ध. वासव–इंद्र. ५. मंथाद्रि–समुद्रमंथनास घेतलेला पर्वत. लहरी–लाटा. ६. समुत्साहें–अत्यंत उत्साहानें. असकृत्–अनेकवार. समुत्साहें–सहर्ष,–आनंदानें. समुत्+साहें–आनंदानें सहन कर. ७. प्रफुलपुष्कर–विकसित कमल. ८. पोत–छावा. शरभ–सिंहापेक्षां बलाढ्य असा एक प्राणी. ११. घूक–घुबड. विरोचन–सूर्य. १२. स्यंदन–रथ. १४. कुमार–कार्तिकस्वामी. १६. सुनीति–ध्रुवमाता.

१७. तुमुल–तुंबळ. १८. रंभाकानन–केळीचें वन. परिरंभ–आलिंगन. १९. मृगोत्तमाराव–सिंहगर्जना. २०. आवांका–धैर्य. आवांका–योजा. २१. आव–सामर्थ्य. २२. काय–शरीर. २३. क्षतधनु–भग्नधनुष्य. २४. नाकाचा प्रभु–स्वर्गाधिपति, इंद्र. सायकासन–धनुष्य. काचा–कच्चें, भग्न, 'क्षत'. ही ओळ क्लिष्ट आहे. कर्णानें त्याचें धनुष्य काचें केलें म्ह० मोडलें हा भावार्थ. २५. हरि–घोडा. पितृ०–बाप व मामा यांच्याप्रमाणें शुद्ध कीर्तीनें पवित्र केली आहे पृथ्वी ज्यानें असा; अभिमन्यु. २८. खड्गचर्म–ढालतरवार. विहाय–आकाश. २९. त्सरू–खड्गमुष्टि. ३०. गणप–गणपति. ३३. भेकमूषकां–बेडूक व उंदीर यांस. ३५. रथोपस्थ–रथांतील बसण्याची जागा. ३८. प्रभोगदाघाली–(प्र+भोगद+अघ+आलि) पुष्कळ दुःख भोगावयास लावणारी पापपंक्ति. ३९. नय–नीति.

**१५ अभिमन्यूविषयीं अर्जुनाचा विलाप**—१. सांजे–सायंकाळीं. पर–शत्रू. ३. खळ...वाडवाभ–दुष्टांचे सैन्यरूप समुद्रास वडवानलासारखा. ४. शिबिर–घर. सद्गुण०–सद्गुणांच्या समृद्धीचें स्थान. ६. दुसऱ्या ओळीचा भावार्थ–बालक असतांनाहि जरी मी त्याला वडिलांसमक्ष घेत नसें, तरी तो मला गोंदाप्रमाणें चिकटून राही. ७. समज–ज्ञान. ८. गुरु०–द्रोणरचित चक्रव्यूहाचा भेद करण्याच्या इच्छेला. १०. ओखटा–वाईट. टोप–बनावट केंसांची वेणी; मुखवटा; मुकुट; शिरस्त्राण. ११. करेणुंनीं–हत्तिणींनीं. रेणु–धूळी. १३. उले–भंगे. तोक–अपत्य. ओकाला–घरास. १४. रक्ताक्षा–रक्तनेत्रा. १५. विशिखजाल–बाणांचें जाळें. वितत–प्रसृत. अस्तमित–अस्तंगत. तरणी–सूर्य.

**१६ रामदासवर्णन**—१. तारूं–तारण्यास. तारूं–गलबत. २. चतुर्विध मुक्ति–सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता. ४. घन–घण, दाट. ५. चिद्बोधसेज–आत्मज्ञानरूप शय्या. अरुवार–मृदु, कोमल. कलत्र–पत्नी.

**१७ नीतिमुक्तामाला**—१. मृगजळ–हरिणांस वाळूवर सूर्यकिरणांमुळें होणारा पाण्याचा आभास. विपिन–वन. २. मकर–मगर, सुसर. ३. पद्मभव–ब्रह्मा. ४. शम–शांति. श्रुत–विद्या. ५. कुरंग–हरिण. पीयूष–अमृत. ७. क्षीर–दूध. नीर–पाणि. हुताशन–अग्नि. ८. श्रीखंड–चंदन. वैडूर्य–एक प्रकारचें रत्न. अर्क–रुई. हल–नांगर. कोद्रव–हरीक ( एक कनिष्ठ दर्जाचें धान्य ). ९. कुज–भूमिज, मंगळ. देवाचार्य–गुरु. दुधड–दुभंग, दुखंड. मुद्रा–तेज, पराक्रम. १०. श्रोत्र–कान.

**१८ उत्तमपुरुषलक्षण**—२. तरतेन–पोहणारानें. ५. जाकसलें–पीडलेलें. १०. उदंड–पुष्कळ. १७. जो क्षमाशील आहे त्याच्या वजनाला हानी नाहीं, त्याचें महत्त्व जात नाहीं. २०. गीता, अ. १६, श्लो. ४. पहा.

**१९ कृष्णा कुमारी**—३. वेल्हाळा–सुंदर २०. मृणालिनी. कमलिनी. २१. रुधिर–रक्त. २६. गुण–दोरा. २७. हिम–बर्फ. ४५. कुसुंबा–अफूपासून केलेलें लाल विष.

**२० दुष्यन्तशकुंतलाभेट**—मुक्तेश्वरकृत नळराजाचें वर्णन पहाः—सुरमंडळीं सहस्रनयन । ग्रहमंडळीं सहस्रकिरण । पाताळभुवनीं सहस्रवदन । तेंवी तो मान्य भूतळीं ॥ १ ॥ न्यायें प्रजांचें पालन । प्रतापें शत्रुकुलाचें दमन । विनयें साधूंचें संरक्षण । शीलवर्तन सर्वदा ॥२॥–वनपर्व, अ. ६. १. आगळा–श्रेष्ठ. २. महीमहेंद्र–पृथ्वीवरील राजश्रेष्ठ. ३. दुर्भिक्ष–दुष्काळ. ४. अक्षोभ–शांत, गंभीर. ५. चूडामणी–शिरोभूषण. ६. संघाट–समूह. ७. वाजी–घोडा. वारण–हत्ती. पदाति–पायदळ. वसन–वस्त्र. १०. डांगें–जंगलें. निर्झर–झरा. भर्जित–भाजलेले. १३. सिद्ध–मुक्त. साधक–मुमुक्षु. १९. पवित्रजीवनी–पुण्यजला. देवतटिनी–भागीरथी. तरंग–लाटा. २३. इंदिरावेशें–लक्ष्मीच्या रूपानें. २४. लतिका–वेल. सौदामिनी–वीज. २५. धरित्रीकांत–राजा. वोपिलें–अर्पिलें. २८. चमत्कारिला–विस्मय पावला.

**२१ स्वहितसाधन**—१. पाचारी–बोलवी. साक्षेपें–प्रयत्नपूर्वक. २. मूळ–बोलावणें. चोजवीत–चोज ( =आवड, उल्हास ) करीत.

**२२ विरामचिह्नें**—१. जीवनलेखनास–जीवितरूपी लेखास. २. दृक्–दृष्टि. ४. सूक्ष्मदेह–लिंगदेह, वासनात्मक शरीर. स्थूलदेह–पंचभूतात्मक शरीर.

**२३ निर्झरास**—" बालकवींचें हें गाणें केवळ अप्रतिम आहे. उत्कृष्ट नाद व उत्कृष्ट ध्वनि यांचा इतका सुंदर मिलाफ दुसऱ्या कोणत्याही आधुनिक गीतांत आढळत नाहीं. झऱ्याच्या झुळझुळत्या लहरींचा नाद व त्याच्या नाचऱ्या गतीचें वर्णन हीं दोन्ही उत्तम साधलीं आहेत "—आधुनिक कविपंचक पृ. १७४–१७५. फलक–फळा. झरे–स्रवे. चवदा भुवनें–भूरादि सप्त लोक व सात पाताळें.

**२४ नारायणाची शांति**—२. धाम–घर. ४. बिरुदाइत–ब्रीद किंवा बाणा बाळगणारा. ५. कळरव–मधुर व अस्पष्ट असा आवाज. ६. निर्द्वन्द्व–सुखदुःखादिद्वंद्वातीत. ८. निःशेखें–पूर्णपणें. १३. बापु–मोठी. मनी–मानी. १८. पुनीत–पवित्र. १९. बळिदान–पूजाद्रव्य. २५. लाजाविरोन–लज्जेनें खजिल होऊन.

**२५ सत्संगमहिमा**—१. अब्धिशुक्तिपुटकीं—सागरांतील मोत्यांच्या शिंपल्यांत. २. वी—देते. पालवी—बोलवी, उत्पन्न करी. ३. रजत—रुपें.

**२६ सत्संगमहिमा**—१. योग—ध्यान, धारणा वगैरे. याग—यज्ञ. ३. विहित—योग्य. ४. कंजनाभा—कंज (कमल) आहे नाभीच्या ठायीं ज्याच्या अशा श्रीविष्णूला. न साधूनि अंजना भागा—एक प्रकारचें अंजन डोळ्यांत घातल्यानें गुप्त धन दिसतें अशी समजूत आहे; कवि म्हणतो कीं सत्संग जें अक्षय धन दाखवील तें कोणत्याहि अंजनानें दिसणार नाहीं. ५. आतळतो—जवळ करतो. ६. चिरकालामय—चिरकालिक रोग. ८. शिखि—अग्नि. ९. श्रीव्रजपतिसूनु—नंदाचा मुलगा; श्रीकृष्ण. १०. अघ—पाप. ११. चित्तरंग—( चित्+तरंग ) चैतन्याचे तरंग; ब्रह्मानंदाचे उमाळे. १०. स्पर्शमणि—परीस. १३. जळद—मेघ. सस्य—धान्य.

**२७ साधूचीं लक्षणें**—१. वित्रास—विगतत्रास; निर्भय; हें साधूचें विशेषण. ४. फुणगी—ठिणगी. ५. व्यसन—संकट. ८. असु—प्राण.

**२८ देवापाशीं मागणें**—१. व्यजन—पंखा. मधुप—भ्रमर. भ्रमरास सोनचाफ्याच्या फुलाचा वास आवडत नाहीं असें म्हणतात. २. जनन्यंचळीं—आईच्या पदराखालीं ( स्तनपानासाठीं ). ४. स्तन्य—दूध. आमा—स्तन. ५. गतिहेतु—चालण्यास आधार. यष्टी—काठी. ६. घडी—घडीभर, घटकाभर. ७. चूर्ण—चुना. कर्षक—नांगऱ्या. हल—नांगर. ९. नग—दागिना. मुग्धा—तरुणी. ११. मेल्याही०—लोभी माणसें मृत्यूनंतरहि पिशाच होऊन पूर्वीच्या घरांत राहतात असा समज आहे.

---

## सर तिसरा.

**१ ईशस्तवन**—ही सबंध भूपाळी एक उत्कृष्ट रूपक आहे. १. इंद्रियगोधनें—इंद्रियरूपी गुरें. गुरुकृपेचा अरुणोदय झाला कीं आत्मबोधरूपी सूर्योदय पाठोपाठ व्हावयाचाच; व लगेच जीवबुद्धिरूपी चंद्र निस्तेज होणारच ! ३. उपनिषदांनीं गाइलेला ‘ अहं ब्रह्मास्मि ’ हा आत्मबोध होतांच वाग्वादरूपी दिवाभीतें मौनाच्या ढोलींत दडी मारतात; म्ह० वाचानिवृत्ति होते.

**२ भीषणरात्रिवर्णन**—१. कोंदली—भरून गेली. ३. यक्षिणीपाळें—यक्षिणी

समुदाय. धुमस–धुडगूस. गदारोळें–मोठ्या आरोळ्यांनीं. दीपिका–दिवट्या. भंबाळें–भकभकीत. ६. मस्तकमणि–सर्प.

**३ प्रभातकाल**—२. भार्गवाचार्य–शुक्र. ३. कुमुद–चंद्रकमळ. कोकनद–सूर्यकमळ. ४. कुक्कुट–कोंबडा. ५. कनकमराळ–सुवर्णहंस; पक्षीं, सूर्य. हंस मोत्यें खाऊन टाकतो हें प्रसिद्ध आहे. ६. व्योम–आकाश. सहस्रकर–सहस्र हातांचा (कार्तवीर्य); पक्षीं, सूर्य. कार्तवीर्यानें एकदां नर्मदेचा प्रवाह आडविला होता तिकडे येथें कवीचें लक्ष्य आहे. ७. कापडी–यात्रेकरू. ८. शाक्त, सौर, गाणपत्य–शक्तीचे, सूर्याचे व गणपतीचे उपासक.

**४ वर्षावर्णन**—१. आर्द्रमहिषोदरतुल्य–जलार्द्र रेड्याच्या उदरासारखा. बलाक–बगळा. २. रजत–रुपें. ४. शिखी–मोर. पिक–कोकिल. ५. पक्षपातें–पक्षांच्या (पंखांच्या) पातानें (हालविण्यानें); पंख हालवून. वीजिति–वारा घालतात. व्यंजन–पंखा. ६. दर्दुर–बेडूक. ६. कुलटा–व्यभिचारिणी, अ-सती. ७. जवन–वेगवान्. तुरग–घोडा. स्तनित–मेघगर्जना. ८. करभार–खंडणी. १२. बलाहक–मेघ. वायुभ्रमें–वायूच्या भ्रमानें किंवा संचारानें. १३. व्यसन–संकट. दिव–आकाश. १४. तमालपिष्टनीलांनीं–तमालवृक्षाच्या चूर्णाप्रमाणें निळ्या अशा. संसक्तशीतसुरभि–संसक्त ( चारी बाजूंनीं येऊन एकत्र झालेले; किंवा, सारखे वाहणारे ), शीत (शीतळ), व सुरभि (सुगंधयुक्त). उपवीजिलें–(पंख्यानें) वारा घातला.

**५ वर्षाकाल**—१. पंचम ऋतु–एथें वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून धरलेला आहे. २. पारधी–व्याध, शिकारी. व्याध नांवाचा एक फार तेजस्वी तारा आहे. याच्या पश्चिमेस एक मोठा तारापुंज आहे. यास ' मृग ' अशी संज्ञा आहे. यांत चार तारे चरणस्थानीं असून चार मुखस्थानीं आहेत. पायांच्या मधोमध उदरस्थानीं तीन ताऱ्यांची एक बारीक रेषा आहे, या रेषांना बाण म्हणतात. व्याधानें मृगावर हे बाण सोडले अशी कल्पना आहे. ३. रोहिणी–हें नक्षत्र मृगाच्या थोडें पश्चिमेस आहे. ५. शाळुंका–ज्याच्या मध्यभागीं बाण बसवितात तो शिवलिंगाचा भाग. शिवपिंडिका–शिवाच्या पिंडी. ६. कपोतक–कबुतर. ७. संघाट–समुदाय. ९. प्रमाण–माप. वोपी–अर्पी, देतो. अयनांशें–उत्तरायण व दक्षिणायन यांनीं. सूर्य उत्तरायणांत बाष्परूपानें आकाशांत उदकाचा संचय करितो, व दक्षिणायनाच्या आरंभीं पर्जन्याच्या रूपानें तें पाणी

पृथ्वीवर सोडतो. यावर कवी अशी कल्पना करतो कीं, जणूं काय सूर्य व चंद्र हीं दोन मापें करून सगळ्या जगाला परमेश्वर अयनांशनानें पाणी मोजूनच देत आहे !

**६ कालियामर्दन**—१. न्हद-डोह. नृपा-परीक्षितराजा. २. रसना-जीभ. दुर्विषें-'दुर्विष' असाहि पाठ आहे. दुर्विष-जहाल, जलाल. शिशु भूमिधरांचे-पर्वतांचे मुलगे, लहानसे पर्वतच. किंवा 'भूमिधराचे' हा पाठ घेतल्यास 'भूमिधराचे ( सर्पाचे ) आंत शिशु ( लहान ) दंत' इ० अन्वय. ३. चेपेट-वेग, लोट. ४. कर घातला-हात टाकला, हातानें धरलें. ५. गती तत्प्राणांच्या०-त्याचे प्राण कंठीं आले. ७. समग्रही सत्त्व-( स्वसामर्थ्यापुढें ) याला सगळे प्राणी तुच्छ होते. ८. दुसऱ्या चरणांत 'जसा' बद्दल 'असा' व चवथ्या चरणांत 'वेगें' बद्दल 'देखे' अशीं पाठांतरें आहेत. त्यांनीं अर्थ सरळ लागतो. १०. पांडवाचा-अर्जुनाचा. तांडव-नृत्य. देवशिखामणीच्या-देवश्रेष्ठाच्या. दीप्तिशिखा-कांतीच्या ज्वाळा. ११. जे रिति-जशा. ज्याकरितां-ज्यामुळें. १२. विलासकला-मनाला रमविणाऱ्या किंवा मौजेच्या कला. कला सकलांचा-सकल कलांचा. तो नट-कृष्ण. १३. अघटिता घटनातें-अद्वितीय अशा सृष्टीस. विलासमयाचा-लीलापूर्ण अशाचा. १४. उखळतो-वरती काढतो. १४. कुलपति-कुटुंबी, कुटुंबवत्सल. ती-अनुप्रास जुळविण्याच्या भरांत कवीनें 'तें'बद्दल 'ती' लिहिलें आहे. १५. विश्वकाय-विश्व आहे काय ( शरीर ) ज्याचा; कृष्ण. लाहो-( लाभ ) कौतुक. १६. वृंद-समुदाय. वृंदारक-देव. मल्लिका-मोगरी. मंदारक-कल्पवृक्ष; रुई. १७. सुरराज-देवश्रेष्ठ; कृष्ण.

**७ नळराजगुणवर्णन**—१. चौगुणीनें-चौपटीनें. शीतभानु-शीतल आहेत किरण ज्याचे असा. वानूं-स्तवूं. पहिल्या दोन चरणांचा भावार्थः-पूर्णिमेचा चंद्र सोळा कलांचा ( चंद्रबिंबाचा सोळावा अंश म्हणजे एक कला. ) असतो. तो चौसष्ट कलांचा होईल तर तो नळासारखा कलावान् होईल. तात्पर्य, चंद्राला कला आहेत, पण सोळाच आहेत. नळराजाच्या ठिकाणीं चौसष्ट कला असल्यामुळें, चंद्र त्याच्या बरोबरीचा होत नाहीं. 'कला' यावर श्लेष आहे. त्याचा दुसरा अर्थ लेखनगायनादि ६४ कलांपैकीं प्रत्येक. २. कळा-क्षयवृद्धि. उपराग-ग्रहण. भंग-लाटा. भंग बहु-येणेंकरून पावसाळ्यांतील पूर सुचविला आहे. पाणउतार-येणेंकरून उन्हाळ्यांत

पाणी आटतें हें सुचविलें आहे. गंगेचें पाणी कमीजास्त होतें पण नळाचें यश सर्वदा एकसारखें असतें हा भावार्थ. ३. वाजी–घोडा. वाजीचें मन जाणता–अश्वपरीक्षक. याजी–यज्ञकर्ता. त्याजी–दान करी. धनद–कुबेर. सुकृत–पुण्य. सुकृत जें०–पुण्याला प्राणाप्रमाणें मानतो; म्ह० प्राणरक्षणाला जसें जपावें तसा तो सद्वर्तनाला जपतो. गाजी–शूर. हूप–उत्साह. ४. लोकबंधू–लोकांचें हित करणारा; पक्षीं, प्रकाशानें लोकांच्या कर्माचें नियमन करणारा. कुवलय–चंद्रकमळ. सांग–अंगयुक्त. कुसुमचाप–मदन. मदन हा सौंदर्याचा उपमानभूत आहे. पण कवी म्हणतो कीं तो संदेह नसल्यामुळें नळराजाची रूपांत बरोबरी कशी करणार ? ५. सरोगबंधू–सरोग म्ह० रोगी ( क्षयी ) आहे बंधु ( चंद्र ) ज्यांचा असे ( देवांचे वैद्य धन्वंतरी ). समुद्रमंथनाचे वेळीं चंद्र व धन्वंतरी एकाच क्षीरसागरापासून उत्पन्न झाले. म्हणून ते भाऊभाऊ होत. चंद्र हा क्षयी असल्यामुळें, ' ज्यांचा बंधु नेहमीं रोगी आहे, ' असा टोला देऊन त्यांच्या वैद्यकज्ञानाचा उपहास केला आहे. अन्वय— जयाचें नाडीज्ञान ( असें होतें कीं, त्यांपुढें ) सरोगबंधू चतुष्पद गणावे. तेजी–घोडा. तुरगी–घोडी. सुत तेजी तुरगीचे–अश्विनीकुमार. हे सूर्याचे पुत्र होते. त्वष्ट्याची संज्ञानामक कन्या सूर्यास दिली होती. तिला सूर्याचें तेज सहन होईना; म्हणून तिनें घोडीचें रूप घेतलें व सूर्यानें घोड्याचें रूप घेतलें. त्या जोडण्यापासून हे उत्पन्न झाले. हे स्वर्गींचे वैद्य असून रूपानें फार सुंदर होते. ६. शरधि–बाणांचा भाता. धन्वीं–धनुष्यास. वरिवरिहि–पुनःपुन्हां, वारंवार. विपक्ष–विरुद्धपक्षीय, शत्रु. विवरलक्षास्तव–विवर ( व्रण किंवा जखम ) पाहिल्यानंतर. शत्रूच्या वक्षःस्थलावर जखम दिसली, म्हणजे नलानें बाण जोडिला व सोडिला, असें लोकांस कळे. एरवीं, तो बाण काढी केव्हां, जोडी केव्हां व सोडी केव्हां हें कोणाला समजत नसे, इतकी त्याची चलाखी होती. ७. धाले–संतुष्ट झाले. ८. वामनैकपद–वामन म्ह० लहान मुलगा ह्याच्या एका पावलाइतकी; तेव्हां ती नळाच्या विस्तीर्ण यशाला उपमा देण्यास योग्य नाहीं. जंघी–वगवान. नसोनि०–दिनराज म्ह० सूर्य हा वेगानें चालणारा नसूनहि ( लोकदृष्टीला तो मंदगतीनें चालतोसा दिसतो ) एका दिवसांत आकाश ओलांडितो; तेव्हां नळराजाच्या यशाला अशा लहानशा आकाशाची उपमा देतां येत नाहीं. वारांशि०–वारांशि म्ह० सागर हा तर माकडानें ( मारुतीनें ) ओलांडिलेला आहे; तेव्हां नलाच्या यशाला समुद्राचीहि उपमा योग्य नाहीं. विलोकीं–समज; किंवा, पाहण्यांत म्ह० पाहतां. ९. पावे समयीं–

प्रसंगीं कार्य करी म्ह० उपयोगी पडे. जोपा–रक्षण. पावन–पवित्र. भीतरीं–मध्यें. विशेष गणिला०–पावन करणारांमध्यें जो श्रेष्ठ मानिला आहे. पुण्यश्लोकनृपावळींत नळ पहिला असून त्याच्या नांवाचें स्मरण करणारा पापमुक्त होतो असें पुराणांत सांगितलें आहे. सोपा–भेटण्यास सुलभ. सुमतिचा सोपा–सद्बुद्धीचें निवासस्थान. सोपा–घर. सदा लाभतो–ज्याच्यापासून निरंतर लाभ होतो. महीगोपायिता–पृथ्वीचा रक्षणकर्ता. १०. धैर्यें धरसा–धैर्यांत पर्वतासारखा अढळ किंवा निष्कंप. सहस्रकर–सूर्य. तमा दूरसा–अज्ञानरूप तमापासून दूर असा; अज्ञानरहित. रत्नाकरसा गभीर–समुद्रासारखा खोल, विचारी; ज्याच्या मनांतली गोष्ट दुसऱ्यास कधीं कळावयाची नाहीं असा. यशोहारसा–यश म्ह० सत्कीर्ति आहे हार ( भूषण ) ज्याचा असा. ज्ञाता जो०–नऊ रसांत शृंगार जसा पहिला, तसा सर्व ज्ञात्यांत हा पहिला. तामरसाक्ष–कमलनेत्र. रसा–पृथ्वी.

**८ दमयंतीवर्णन**—१. सरसीरुह–कमल. गोरोचन–गाईच्या डोक्यांतलें पिंवळें द्रव्य. २. सुधाकर–चंद्र. गमतें–वाटलें असतें. विद्रुमभावना–पोंवळ्यांची स्थिति; पोंवळ्यांशीं सादृश्य. ता. प.—आरक्त ओष्ठ जणुं वेलच पोंवळ्यांचे । तेही गमे विरमतील पुढें तयांचे ॥—टिळक ( एक अमेरिकन मुलगी ). बिंबफळभ्रमानें–तोंडलीच्या ( पिकलेल्या ) फळाच्या भ्रांतीनें. चंचु–चोंच. शुक–पोपट. भासे०–राघूनें अधरोष्ठास तोंडलें समजून तें खाण्यासाठीं आपली चोंचच जणुं पुढें केली आहे. एथें दमयंतीच्या नासिकेवर राघूच्या चोंचेची उत्प्रेक्षा केली आहे. ४. धाता–ब्रह्मदेव. मनोमय०–कल्पनेच्या सांच्यांत ओतून तयार केली; पूर्ण सौंदर्याच्या कल्पनेप्रमाणें मनानेंच बनविली. चवथ्या चरणाचा अन्वय–हे घटिताकृति ( घडलेला आहे आकार जिचा ) न; ( तर ) ओतींव बोलिजेली.

**९ पुण्यश्लोक नल** !—१. देवर्षि–नारद. हरिख–हर्ष. दुसऱ्या चरणाचा अन्वय–[ इंद्राला दमयंतीस्वयंवरास जाण्याची इतकी घाई झाली कीं, त्यावेळीं वाहनासाठीं ] त्याच्या मनातें हरिखग ( गरुड ) न येताचि; [ मग ] विमान येईल काय ? २. कुंडिन–भीमकाची राजधानी. भूभृदर्यनळ–( भूभृदरि–पर्वतशत्रु, इंद्र. अनळ ) इंद्र व अग्नि. नळ–' आला ' हें अध्याहृत क्रियापद. ३. हीर–हिरा. ५. कार्यपर–कार्येच्छु. विमुख–पराङ्मुख, प्रतिकूल. ६. भैम्यर्थ–भैमी ( दमयंती ) करितां. ७. अन्यतमा–कोणा तरी एकास. ८. सुरवरागमनीं–[ आपणा ]

देवश्रेष्ठांच्या आगमनीं. सुरवराग–मधुरध्वनीची आवड. ९. पावा–कृपा करा. दुसऱ्या ओळीचा अन्वय–सुनय ( सुनीति ) स्वातिक्रम ( स्वतःच्या मर्यादेचें उल्लंघन ) आठवन कोणावरिहि न कोपावा. भावार्थः–तुम्ही व मी एकच कार्याकरितां आलों आहों; म्हणून त्याच कामासाठीं तुम्ही मला तिकडे दूत करून पाठवितां हें उचित नाहीं; परंतु तसें न कराल तर कोणाच्याहि हातून नीतीचें उल्लंघन होणार नाहीं. १०. उत्तरार्धाचा अन्वय–व्यवहारीं शब्द अचळ असावा [ व ] संगरीं करीं सदसि ( उत्तम खड्ग ) च अचळ असावा. ११. या कर्मीं०–ह्या ( अंतःपुरप्रवेशरूप ) कार्यांत वायुहि मजबरोबर यावयास भिईल म्ह० वारा सुद्धां तेथें शिरूं शकत नाहीं. सांगाती–सोबती. १३. सुरसा–रसयुक्त; हें 'ती' चें विशेषण. १४. विधु–चंद्र. आग–अपराध. ( मी जें पुढें बोलणार त्याचा राग नसावा ). गुरु–पिता; भीमक. १५. विषय–योग्य, पात्र. परागमना–परक्याच्या येण्यास. १६. अवारित–कोणीं अटकाव न केलेले असे. कार्यार्थ प्रगट दावा, आयकों–कोणत्या कामाकरितां आपण आलां हें स्पष्ट सांगा, तें मला ऐकूं द्या. वाङ्मय–वाणीरूप. सौवर्णआय–सुवर्णाकार. सुवर्ण–चांगलीं अक्षरें; सोनें. आय–आकार. कोंदावा–भरावा. १७. गुरु०–मोठा व उदकानें पूर्ण गच्च भरलेला ( पन्हळ ). वीरसेन–नळाचा पिता. वाहों लागे०–गंभीर व अत्यंत रसाळ असें नळाचें भाषण सुरू झालें. पाशि०–वरुण, यम, अग्नि व इंद्र यांचा दूत. १८. दिव्य रस–अमृत. १९. अन्यतम–कोणी तरी एक. धन्यतमत्व–अत्यंत कृतार्थता. दयित–पति. तम–अंधकार, दुःख. न शिवो०–मनुष्यास वरिलें असतां तो मरणाधीन असल्यानें पतिविरहजन्य दुःख सोसावें लागेल; पण देवांपैकीं कोणास वरिलें तर तें दुःख सोसावें लागणार नाहीं हा भाव. २०. प्रणति–नमस्कार. २१. यज्जीवन–ज्याच्या वांचण्याचें साधन. जीवन–पाणी. २३. परवंचन–दुसऱ्यास फसविणें. २४. अनुकंप्या–दयेस पात्र अशी. स्वयंवरा–स्वतः पति पसंत करून त्यास वरणारी. २५. अपरा–दुसऱ्यास. धी–बुद्धि. २६. रंग–सभा. नलगामी–नलाकडे जाणारा. लगामीं–स्वाधीन. २७. अकृतकार्य–केलें नाहीं कार्य ( देवकार्य ) ज्यानें असा. प्राज्य–पुष्कळ. दून–तप्त. २८. मूर्तज्योत्स्ना–मूर्तिमंत चंद्रकांति तापदमयंती–ताप शमविणारी. २९. सच्छळीं–साधूचा छळ करण्याविषयीं. सदानळसा–निरंतर आलस्यरहित, उद्युक्त अशी. अधिष्ठूनि–आश्रय करून. सदा–सभेस ( सदस्–सभा ). ३०. धवासम–पति जो नळ त्यासारखें. उत्तरार्धाचा अन्वय–बुद्धि म्हणे [ जर ]

गुरुचरणीं ( गुरु जे इंद्रादि देव त्यांचे चरणीं ) खेद त्यजुनि लवतीस ( नम्र होतेस–शरण जाण्यास सिद्ध आहेस ) [ तर तूं ] कां भीसी ? भीसी–भितेस. ३४. सुरहृत–देवांनीं [ कपटानें ] घेतलेलें. बहु०–हिरा ऊनीं म्ह० उन्हांत जसा [ जास्त ] तेज प्रकट करितो तसा शुद्ध असा सत्त्वगुण हा छळीं म्ह० त्याचा छळ केला असतां जास्त सामर्थ्य प्रकट करतो. ३५. सवांग–( सव+अंग ) यज्ञाचे अंगभूत; यज्ञांग. कुश–दर्भ. नळद–वाळा. उपभोगोचितत्व–उपभोगाला योग्य असणें. जसे देव पवित्र तसा नलही पवित्र; ते जसे प्रेमार्ह तसा हाही प्रेमार्ह. पण ते गुरु म्हणून प्रेमार्ह व हा पति म्हणून [ उपभोगोचितत्वामुळें ] प्रेमार्ह असें समजून तिनें नलालाच वरिलें. ३६. लोकेश–इंद्रादि लोकपाल. ३७. जरि–ज्याअर्थी, ज्यापक्षीं. सासु–जीवंत. ३९. सदार–स्त्रीसह.

**१० हरिश्चंद्रगुणवर्णन**—१. केसरी–सिंह. भूपकुंजर–नृपरूपी हत्ती. विभांझूनि–जिंकून. ४. आंवतणें–आमंत्रण करणें, बोलावणें. मळवट–कस्तुरीचा. ५. श्यामता–[ कस्तूरीचा ] नीलवर्ण. श्यामता आकाशांत जाऊन आकाश निळें बनलें; व त्या कस्तूरीच्या गंधानें पृथिवी व्यापिली. मषी–शाई. ६. यशोधवलिमा–कीर्तिशुक्लता. अर्थनामसंबंधासाठीं–सार्थ ( अन्वर्थ ) अशा आपल्या नांवाचा संबंध जुळण्यासाठीं. त्याचें नांव ‘ हरिःचंद्र ’. पैकीं ‘हरि’ (म्ह० हरण करणारा; सिंह किंवा वाघ ) तो कसा होता ह्याचें वर्णन पहिल्या तीन ओंव्यांत झालें. या ओंवींत ‘ शुक्लता ’ व ‘ कलंक ’ या दोन गोष्टी मृगांक ( चंद्र ) व हा राजा यांस साधारण असल्यामुळें हा राजा ‘ चंद्र ’ हि आहे असें कवी म्हणतो. मुक्तेश्वरकृत हरिश्चंद्राख्यानांतील हरिश्चंद्रवर्णन पहाः—शत्रुकरीलागीं **हरी** । साधुसज्जना **सुधाकारी** । बळी त्रासी यालागीं **हरि–श्चंद्र** नाम तयाचें ॥ ८. उजु–सरळ, योग्य, नीट.

**११. दुर्योधनाचें भीमाच्या गदेशीं लग्न**—१. केळवली–केळवण झालेली. सगुणाथिली–सद्गुणवती. घटित–वधूवरांच्या जन्मकाळावरून ज्योतिःशास्त्राच्या नियमानें ठरणारा परस्परांविषयींचा अनुकूल भाव. २. बाहुलें–बहुलें, बोहलें. रणतळवट–समरभूमीचा तळ. ३. हरिद्रा–हळद. तुनलेपनीं–अंगास लावण्यास. ४. मंचक–पलंग.

**१२. द्रौपदीगुणवर्णन**—१. श्री–लक्ष्मी. महिला–पृथ्वीला. महिला–स्त्री. २. शरदु०–शरत्कमलपत्रनेत्रा. अस्खलित–अडखळूं न देतां. यष्टि–काठी. ३. रागे-

जणें–रागावणें. द्रौपदी आधीं कधीं रागावयाची नाहीं; त्यांतून कधीं रागावलीच तर, अग्निज्वाला जशी तत्काळ आकाशांत निघून जाते, तद्वत् तिचा रागहि तत्काळ नाहींसा होतो. श्रिततापहर–आश्रितांचा ताप हरण करणारा. समाचार–समान आचरण.

**१३. राजा विश्वासरायाच्या भार्येचें गुणवर्णन**—६. निर-भिलाष–निरपेक्ष.

**१४. माझी भार्या**—या कवनाविषयीं कवि स्वतः सांगतोः—

केलें काव्य परंतु यांत मम हो संबंध कांहीं नसे ।
मित्रांनो ! जरि वाचितांच अपुल्या वाटेल चित्ता तसें ॥
येथें नायक कल्पिला करितसे भार्यागुणांची स्तुति ।
तेणें ती न कळे मदीय अथवा मद्गेहिनीची स्थिति ॥ १ ॥

१. सरी–बरोबरी. दुसरी ओळ–दयितेचा ( प्रियेचा ) वर्ण स्वर्णाचा ( सोन्याचा ) मद लवही न हरी. हरि–सिंह. २. मत्तेभ–मत्त हत्ती. रुचिर–सुंदर. सरणी–पद्धति. ३. स्मेर–स्मितयुक्त; प्रफुल्ल. हारी–( मन ) हरण करिते; मनास भुलविते. सायंत-नरुचा–संध्याकाळची प्रभा. ५. अकृतोपाय–अकृत्रिम, साहजिक. ६. छद्मोक्ति–कपटोक्ति. ७. लावण्य–सौंदर्य. वहिलें–सुंदर. निळें वा०–तें रत्न असलें म्हणजे झालें; मग त्याचा बाह्य रंग निळा असो वा काळा असो. ९. उपल–( चंद्रकांत ) दगड. १२. अनवद्य–अनिंद्य, शुद्ध. १३. चाटुगदित–गोड भाषण. उदित–( उत्+इत ) वर आलेलें, दिसलेलें. १५. खनि–खाण. १६. समीक्षा–विचार.

**१६ दैवी संपत्तीचीं लक्षणें**—२. गोवा–गुंता. ४. उदंड–पुष्कळ. १४. मार्तंड–सूर्य.

**१७ धर्मगुरूचा आदर्श**—२. असल्लापन–असत्य भाषण. मंजु–मंजुळ, गोड. ३. पलितमुंड–पिकलेल्या डोक्याचा. ४. च्युत–पतित, चुकलेला. युवन्–तरुण. युवती–तरुणी, स्त्री.

**१८ सेतुबंधावर उत्प्रेक्षा**—' अमुक वस्तु जणूं काय अमुकच आहे, ' अशा प्रकारच्या वचनांत ' उत्प्रेक्षा ' अलंकार होतो. जसें–' हें मुख जणूं काय चंद्रच आहे ! ' १. आयत–लांब. २. कपिक०–कपिकटक म्ह० वानरसैन्य हाच उत्तरसिंधू त्यांतून उद्गत म्ह० निघालेला. बुभुक्षु–भुकेलेला. कालाही–काळसर्प. रात्रिचर–निशाचर, राक्षस. ३. स्वसुता–स्वकन्या, सीता. वृक–लांडगा. एणी–

हरिणी. ४. पाटाव–उंची वस्त्र. ५. जलधितृण–समुद्ररूपी गवत. प्रभुप्र०–रामचंद्राचा प्रतापाग्नि. असितपथ–कृष्णवर्त्मा, अग्नि. रक्षोटवी–राक्षसरूप अरण्य. राक्षसरूप अरण्य जाळावयाचें, मग जलधिरूप तृण कोण जाळतो, म्हणून रामप्रतापाग्नि वरच्या वर जसा काय समुद्ररूप गवताचे शेंडे जाळीत गेला. त्याचा जो काळा मार्ग तो सेतू हा भाव. ६. शरण्य–शरण जाण्यास योग्य. सांजनाश्रु–अंजन ( काजळ ) युक्त अश्रूंनीं भरलेला. पथ–मार्ग. ७. शोकानळ०–[ आपल्यावर माकडांनीं सेतु बांधला या अपकीर्तीनें झालेल्या ] शोकरूपी अग्नीनें जळालेलें असें. सागरोरः– समुद्राचें वक्षःस्थळ. महासुधीरचित–अत्यंत बुद्धिवान् अशा रामानें ( किंवा नळानें ) रचलेला.

**१९ चंद्रावरील कलंक**—२. अलि–भ्रमर. ४. कनीनिका–डोळ्यांतील बाहुली. शंकरानें भालप्रदेशावरील चंद्र परत देण्याच्या वेळीं, चुकून कपाळावरील अग्निनेत्र दिला, तोच जणूं आकाशांत दिसत आहे !

**२० हिमालय**—१. परिसर–सभोंवतालचा प्रदेश. गव्हर–गुहा, दरी. कासार–तळें. २. निघोट–दाट; एकवट. ६. रजत–रुपें. पद्मराग–एक प्रकारचें रत्न. चिंतारत्न–चिंतामणि. वापिका–विहिर. ७. संभार–समुदाय. ८. नितंब–कटि, कंबर. मेखळा–कमरपट्टा. पल्लवसडका–लांब सरळ असे पल्लव.

**२१ हिमालयाच्या मस्तकावरील भयाण प्रदेश**—१. आवास–निवास. उद्भिज–वनस्पति. २. आस्पद–स्थान. ३. पातविशीर्ण–पतनामुळें फुटलेलीं. तूर्ण–त्वरित. शतधा–शेंकडों प्रकारांनीं किंवा मार्गांनीं. ४. भीम–भयंकर. प्रपूरित–भरलेल्या. स्वर्गा०–स्वर्गांत चढून जाण्यासाठीं केलेला. सोपान–जिना, दादर. ५. क्षीरविपांडु–दुधाप्रमाणें पांढरें. हिमप्रावार–बर्फाच्छादन. भास्वान्–सूर्य. प्रत्यब्दीं–प्रतिवर्षी. ७ आदिम–पहिला, मूळचा, अंगचा. वर्णैकता–रंगसादृश्य.

**२२ भीषण महारण्य**—१. वितंड–मोठें, विशाल. उदंड–पुष्कळ. २. वंश–वेळू. वाड–पुष्कळ. ४. शार्दूल–वाघ. ५. रीस–अस्वल. शुनी–कुत्री. मीति–गणती. ७. व्याळ–वयाळ, सर्प. विखार–विषारी सर्प. ९. दारी–दरी, दऱ्या. थाट–समुदाय. दर–दरी. दर्कुट–दरेंखोरें.

**२३ मूर्तिकार**—४. जात–समुदाय. ५. शिरोधार्य–मनांत धरण्यास योग्य. ११. विजन–निर्जन. १३. कामपूर्ति–इच्छातृप्ति.

**२४ दाता व देव**—३. कालवश–मृत्युवश. संभ्रम–मनाचा गोंधळ. ४. आतुर–उत्कंठित, तत्पर. निधि–सांठा. ५. पात्रापात्रनिरूपण–योग्यायोग्यविचार.

**२५ पुनर्जात प्रेमास**—१. तटवूं–थांबवूं, अडवूं. ५. बेछूट–निःशंक. ६. जाल–जाळें.

**२६ प्रीति निमाली तर**—२. चेतोहर–मनोहर.

**२७ विरहिविलाप**—हा उतारा जगन्नाथपंडितकृत भामिनीविलासांतील करुणविलासाच्या मराठी रूपांतरांतील आहे. संस्कृत विद्यार्थ्यांनीं हा ‘ विरहिविलाप ’ व पुढील ‘ अजविलाप ’ मूळ संस्कृताशीं ताडून पहावा. म्हणजे उभय पंडितांनीं मराठी रूपांतरांत मूळांतील रसाची हानि तर होऊं दिली नाहींच, पण क्वचित् मूळावरहि ताण केली आहे असें आढळून येईल. उदाहरणार्थ—‘ हरिणशावकलोचना ’ याचें ‘ जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळेंहि झुरती ’ हें कृष्णशास्त्रीकृत रूपांतर व ‘ नवपल्लवसंस्तरेऽपि ते मृदु दूयेत यदङ्गमर्पितम् । तदिदं विषहिष्यते कथं वद वामोरु चिताधिरोहणम् ॥ ’ याचें ‘ शय्या सुंदर ’ इ० २८ व्या उताऱ्यांतील ६ वा श्लोक, हें गणेशशास्त्रीकृत रूपांतर ताडून पहावें. १. अमरसदन–स्वर्ग. ३. सुदती–सुंदर आहेत दांत जिचे अशी. ४. विवाहीं पाषाणीं०–विवाहांत वधूनें पाषाणावर ( सहाणेवर ) पावलें टाकीत जाण्याचा विधि असतो तो एथें लक्ष्य आहे. ५. निमाली–नाहींशी झाली. सुषमा–मोठी शोभा. ६. विद्युलेखा०–विजेच्या चमकेप्रमाणें चंचल किंवा क्षणिक. सुरेंद्र–इंद्र. उपभोग–सुख. मंत्रभ्रष्ट–मुत्सद्यांची सल्लामसलत ज्याला मिळत नाहीं किंवा जो ऐकत नाहीं असा. ७. ज्या–मला. दिवस्था–स्वर्गस्थ. ८. जित०–कमलाच्या देंठाहूनहि अधिक कोमल आहे भुज जिचा अशी. निर्गुण परपुरुष–गुणरहित ( पतिखेरीज ) इतर पुरुष; निर्गुण परमात्मा. ९. यांत सुकविता आणि पद्माक्षी ( कमलनेत्रा अशी दयिता ) यांचें श्लिष्टपदांनीं चमत्कारिक साम्य वर्णिलेलें आहे. गुण–प्रसाद, ओज व माधुर्य; दयितापक्षीं, पातिव्रत्यादि गुण. दोष–कर्णकटुत्व, क्लिष्टत्व इ०; दयितापक्षीं, पतीशीं विरोध, गर्विष्ठपणा इ०. अलंकार–उपमा, उत्प्रेक्षा इ० अर्थालंकार व यमकानुप्रासादि शब्दालंकार; दयितापक्षीं, सुवर्णमुक्तादिकांचीं भूषणें. पहिला रस–शृंगार; दयितापक्षीं, प्रेम. वर्ण–अक्षरें; दयितापक्षीं, शब्द. मृदु–रसानुकूल; दयितापक्षीं, मनाला रंजविणारे. हास्य–याचा रंग कवी सुधेप्रमाणें शुभ्र मानितात. शिवाय त्यांत

माधुर्यहि व्यंजित झालें आहे. भक्त इष्ट देवतांवर दुग्धादिकांचा अभिषेक करून मग कमलादिकांनीं त्यास पूजितात हा लौकिक आचार येथें लक्ष्य आहे. कटाक्षक्षेपांनीं... नीलकमलां–कटाक्षक्षेपाच्या वेळीं नेत्रांतील निळी बाहुली नेत्रांतीं असल्यामुळें कटाक्षक्षेपांनीं नील कमलांचा जणुं वर्षाव होतो ! मृगाक्षी–हरिणनेत्रा. विधात्री–करणारी. कुंदरदना–कुंदपुष्पाप्रमाणें आहेत दंत जिचे अशी.

**२८ अजविलाप**—२. हेलना–अवहेलना, अपमान, हेटाळणी. ४. क्षोणी–पृथ्वी. ५. कोक–चक्रवाक. सावधि–समर्याद. ६. राजि–पंक्ति, समुदाय. शारद–शरत्कालीन. तिसरी ओळ–ती [ तनू ] काष्ठीं घटिता ( रचलेली ) [ व ] दीप्ताग्निनें संयुता अशी भयंकर चिता कशी सोशील इ०. ७. सहकार–आम्र. फलिनी–प्रियंगुलता. दंपती–जोडपें. ८. दोहद–गर्भाधान संस्कार. अशोक वृक्षाला सुंदर स्त्रीनें पायानें ताडण केलें असतां हा संस्कार होतो. ९. विटपी–वृक्ष. ११. मधु–मदिरा. पान–पिणें. मृगांक–चंद्र.

**२९ रामविलाप**—१. व्यसन–संकट. २. जगत्प्राण–वायु. व्याळ–सर्प. राघवायु–रामाचें आयुष्य. ३. त्वन्मुखजित–तुझ्या मुखानें जिंकलेला. द्विजराज–चंद्र; पक्षी, ब्राह्मण. ३. तुझ्या मधुर स्वरानें लज्जित होऊन कोकिळानें आजवर मूकव्रत घेतलें होतें; परंतु आतां तें भय नाहींसें झालेंसें पाहून तो पुन्हां शब्द करूं लागला आहे हा भाव. कसितो–बांधतो. ५. त्वत्कच०–तुझ्या केशकलापानें जिंकला आहे पिसारा ज्यांचा असे मोर. ६. सीतेची मंदगति, कृशकटि, सरलनासिका, कृष्ण केशकलाप, आणि दीर्घ, चंचळ व काळेभोर असे नेत्र, यांनीं यथाक्रम हत्ती, सिंह, पोपट, मोर आणि हरिण यांस लाजवीत होतीं.

**३० रामविलाप**—१. रुचिराक्षा–सुंदरनेत्रा. गेह–घर. अनभिज्ञ–अज्ञ, गैरमाहितगार. २. दलशाला–पर्णकुटिका. ३. भावी–मानी. माझ्या विरहांत तिला हारसुद्धां भार ( ओझें ) वाटतो. ६. अपूर्व मृग–सुवर्णमृग. ७. यानमना–गमनेच्छु. ११–१२. मागील उताऱ्यांतील टीपा पहा. ज्वलन–अग्नि. १३. वैरी–कमल, चंद्र इ०. याच्या पुढील आर्याः–ऐसा रात्रिदिवसही विलाप करि शोकपर जसा कोक । कोकनदाक्ष सुमित्रातोकसहित तो करी विकल लोक ॥ पंतांच्या ह्या दोन्ही कवनांवर ( उतारे २९–३० ) संस्कृत वाङ्मयाच्या दृढ परिचयाची दाट छाया पडलेली आहे. [ मुख्यतः, विक्रमोर्वशीय नाटकांतील अंक ४; ]

भामिनीविलासांतर्गत करुणविलासांतील ७ वा श्लोक (' विरहिविलाप ' या उताऱ्यांतील ५ वा श्लोक ); रघुवंश ८. ५९-६० व ९. ६७; मालतीमाधव ९. २७; व मेघदूतांतील ' श्यामास्वङ्गं ...' हा श्लोक पहा. ]

**३१ आम्ही कोण ?—** ' कवि आणि फूल ' (दुसऱ्या सरांतील ९ वा उतारा) यांतील पहिल्या दोन साक्या आणि ' कवि व कविता ' यांतील खालील आर्या, यांवरून टिळकांच्या कवीविषयक मताची कल्पना येईल—

आलाप कोकिलांचे इतुक्या कालांत जाहले इतुके ।
निर्झर गान गणावें कोणीं वर्षांत जाहलें तितुकें ॥ १ ॥
तारांगणिं कवि खेळे, चंद्रासह करि विनोद-हास्यातें ।
वाणी प्रेमानंदें चुंबी त्याच्या प्रसन्न आस्यातें ॥ २ ॥
बोलति फुलें तयासह, पक्षी करिती अनेक गुजगोष्टी ।
' ये काढ चित्र माझें ' सांगे त्या कामरूपिणी सृष्टि ! ॥ ३ ॥

तसेंच रामदासांच्या पुढील ओंव्या ( दासबोध १.७ ) पहाः-कवि देवांचे रूपकर्ते । कवि ऋषींचे महत्त्ववर्णिते । नाना शास्त्रांचे सामर्थ्यते । कवि वाखाणिती ॥ १ ॥ नस्ता कवींचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार । म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ २ ॥ नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं । कवीपासून सर्वही । सर्वज्ञता ॥ ३ ॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे बोध लोटले । नाना सुखाचें उचंबळलें । सरोवर हें ॥ ४ ॥

१. लीलया–लीलेनें. २. बडिवार–थोरवी, डौल ३. शरण्य–शरण जाण्यास योग्य.

**३२ लक्ष्मणइंद्रजितयुद्ध**—१. फणी–शेष, लक्ष्मण. रावणी–रावणपुत्र, इंद्रजित्. निर्वाण–निकराचें युद्ध. २. निमिष्य–निमिष, डोळ्याची पापणी लवण्यास लागणारा काळ; क्षण. ३. वाजट–वाचाळ. ४. वाड–पुष्कळ. ५. व्याळ–सर्प. भुगोळु–पृथ्वीगोल. ७. ताविली–संतप्त केली. ९. उफाळें–उसळीनें, वेगानें. सौदामिनी–वीज. १०. स्फुलिंग–ठिणगी. ११. पावक–अग्नि. जेठी–ज्येष्ठ, श्रेष्ठ. १९. हुडे–बुरूज कोट–किल्ले. २०. कीट–अत्यंत. २१. जंजाळ–भोंवरा; वैपुल्य. २३. झुंगाड–दाट, गर्द. खेचर–खं म्ह० आकाशांत संचार करणारा; गंधर्व, किन्नर इ०. २४. वातआवर्त–वाऱ्याचा भोंवरा, वावटळ. २६ बाणभाळी–बाणसमुदाय. मेघनाद–इंद्रजित्. रुधिर–रक्त, शोणित. २७. पिच्छ–बाणांचीं पिसें. २८. छात्र–शिष्य. २९. शेष लक्ष्मण. ३२. गुण–धनुष्याची दोरी. रविचक्र–सूर्यास्त्र. शिखा–ज्वाला. ३५. सुरेश इंद्र.

**३३ भीमदुर्योधनांचें गदायुद्ध**–१. कुजात–निंद्य आहे जन्म ज्याचें. २ वारणावत–हस्तिनापुर. जतुसद्मछद्मकर्म–लाक्षागृहरूप कपटकृत्य. ३. कितव–जुगाऱ्या; शकुनि. चकित–भयभीत. ४. न अळंकारे–अलंकृत झाला नव्हता. दशतुंड–दशमुख, रावण. ६. तल्प–बिछाना. घननाद–मेघनाद, इंद्रजित्. त्याचा बाप म्ह० रावण. ६. त्वदनुज–तुझे पाठचे भाऊ. रणांत न तरा–युद्धांत बुडा म्ह० मरा. ७. कु–पृथ्वी. निखिळा–निखिला, सर्व. दुसरी ओळ–शकुनिरूप दुःखदायक खिळा पुनः मदुरांत म्ह० माझ्या उरांत लाव म्ह० मार. ‘ तुझ्या शकुनीलाहि आम्ही मारलें ’ हें येथें खोंचून सांगितलें आहे. ८. क्षम–समर्थ, योग्य. अक्ष–फांसे. ९. सोदर–सख्खा भाऊ. देय–देण्यास योग्य. १०. विकत्थन–बडबड. युद्धश्रद्धेसह... काय–तुझी युद्धाची हौस ( किंवा उमेद ) व तुझा देह दोन्ही भंगितों. महिष–महिषासुर किंवा रेडा. शोण–रक्त, तांबडा. शक्ति–देवी. कोण–कोपरा, कटाक्ष. जोंचि न०–जोंपर्यंत गदारूप देवीच्या आरक्त दृष्टीचा कटाक्ष तुझ्यावर पडला नाहीं इ०. १२. सुनासीर–इंद्र. भूमींत सीर–समरांगणांत शीर म्ह० ये. वितिलक–कुंकुमतिलकरहित, विधवा. १३. दुर्विचेष्टित–दुष्कृति. तदेकप्रतिकृत–त्यांपैकीं एकाचाहि प्रतिकार. १५. कढी भात इ० करण्यास–अज्ञातवासांत विराटाचे घरीं बल्लवरूपानें राहात असतांना. प्राज्य–प्रभूत, पुष्कळ. १६. घटज–अगस्ति. पूर्वापरसरस्वतओघांचा–पूर्वपश्चिम समुद्रांच्या ओघांचा. १७. श्लाघ्य–स्तुत्य. संगर–युद्ध. नाक–स्वर्ग. तनुव्ययें–देह खर्चीं घालून. १८. गदी–गदाधर. छद्म–कपट. १९. शारद वारिधर–शरदृतूंतील मेघ. हे पाणी न देतां वृथा गर्जना मात्र करितात. २०. करिपति–हस्तिश्रेष्ठ. ळब–बळासुर. मरुत्सुत–भीम. २१. तो पामर–रावण. २२. पोत–शिशु अथवा नौका. २३. विप्रताप–विशेष म्ह० मोठा आहे पराक्रम ज्याचा. २५. गदीश–गदिश्रेष्ठ. सरस्वती–ही नदी नांवडी आहे. २६. राहे मुनिचो०–नारद वीणा न वाजवी. २७. कटक–सैन्य, समुदाय. स्वतुळगदायुद्धकौतुकां–स्वतःचीच आहे तुला ( तुलना ) ज्याला असें गदायुद्धकौतुक ज्यांचें अशा त्यां ( भीमदुर्योधनांस ). २८. पार्श्वीं–बरगडींत. ३०. मुदितारिसैन्य–आनंदित झालेलें शत्रूचें ( पांडवांचें ) सैन्य. ३१. शंखदेशीं–आखावर. ३३. हरि–सिंह. खगेंद्र–गरुड. नाग–हत्ती; सर्प. ३४. त्या–दुर्योधनास. वपु–शरीर. असारपा–असारपाळका. ३५. सभास्तरणीं–दिवाणखान्यांतील बिछायतीवर. हस्तमित स्वातें–हातभर उंचीच्या कापसाला. चालत असतां हस्तमित स्वातेंहि जो स्वल्प गणी इ० अन्वय. ३६. पवि–वज्र. देश–भूभाग. तडा खातो–चिरतो, भंग पावतो. ३७.

व्योम–आकाश. वर्ष–वृष्टि. ३८. सदयेक्षण–कृपादृष्टि. आयु–आयुष्य. लाहो–लाभो. ३९. सूनु–आत्मज; पक्षीं, अनुज. तों जय०–इतक्यांत अर्जुनानें डावी मांडी थोपटून संकेत केला. ४०. संधा–प्रतिज्ञा. ४१. बळें–मुद्दाम. विवर–छिद्र, मर्म. ४२. किटळें–ठिणग्या. ४३. व्योमीं–अंतराळीं. मारुति–भीम. ४४. भूतें–याच्या-पुढें ' परंतु ' हा अन्वयाकारितां अध्याहार. ४५. वृत्रहन्–इंद्र. निसुर–निश्चिंत. ४६. गौगौं–गाय रे गाय ! ४७. कृतानुरूप–कर्मानुरूप.

**३४ कृष्णदुर्योधनसंवाद**—१. भट–योद्धा. २. खोडा–वठलेल्या झाडाच्या खोडासारख्या दुर्योधनास. मृतपापकथा–मृतवत् अशा दुर्योधनाच्या पापाचाराच्या गोष्टी. ३. नीड–घरटें. ४. अधिक्षेप-धिक्कार. आगस्करघातार्थी–अपराध कर-णाऱ्याचा नाश करूं इच्छिणारा. पुच्छच्छेदार्तधी–शेंपूट तुटल्यानें आर्त म्ह० पीडित ( दुःखित ) झाली आहे बुद्धि ( मन ) ज्याची. ५. टिरी–ढुंगण. वीरकोटी–वीरजन. रीतीतें–[ स्वाभिमान व आवेश यांनीं युक्त अशा दुर्योधनाच्या ] वागणुकीस. ६. कंसदासदायादा–कंसाच्या दासाच्या ( वसुदेवाच्या ) पोरा ! यादा–जलजन्तूस. ७. कैतव–कपट. ८. ऋजुसंगर–सरळ म्ह० धर्मानें युद्ध करणारे; हें ' राजे ' याचें विशेषण. ९. द्युप–स्वर्गपाळक. स्त्रीपूर्व-प्रथम स्त्री असून मागून पुरुष झालेला. आपगेय–नदीपुत्र, भीष्म. १०. अलीक–खोटें. ११. आयुधन्यास–शस्त्रत्याग. धन्यास–धन्य अशा द्रोणाचार्यास. १२. प्रायगतब्राम्हणशिर–प्रायोप-वेश ( मरणाच्या निश्चयानें अन्नपाणी वर्ज्य करून एके जागीं बसणें ) करून बस-लेल्या द्रोणाचें मस्तक. ब्रह्मण्य–ब्राह्मणाचें रक्षण करणारा. १३. कर्णाच्या आंगावर जन्मतःच दिव्य कवचकुंडलें होतीं. अर्जुनाचें हित साधण्याकरितां इंद्रानें ब्राह्मणवेषानें येऊन तीं त्याजपासून मागून घेतलीं. तेव्हां कर्णानें इंद्रापासून एक अमोघ शक्ति मागून घेतली. ती अर्जुनास मारण्याकरितां त्यानें राखून ठेविली होती. पण शेवटीं ऐन प्रसंगीं त्याला ती घटोत्कचावर टाकावी लागली. १४. दक्ष–उजवा. तो प्रायगतहि०–तो ( भूरिश्रवा ) प्रायोपवेशन करून मरणाची वाट पहात बसला असतांहि. १५. अश्वसेनव्याळशर–अश्वसेन हा तक्षकाचा पुत्र. कृष्णार्जुनाच्या मदतीनें अग्नि खांडव-वन खाऊं लागला, तेव्हां त्याची आई त्याला तोंडांत धरून नेत असतां तिला अर्जुनानें मारलें. पण तो वांचला. पुढें आईच्या बधाबद्दल सूड घेण्याकरितां अश्वसेन गुप्त रूपानें कर्णाच्या बाणावर राहिला. तो बाण जेव्हां कर्णानें सोडला, तेव्हां तो अर्जुनास लागूं नये म्हणून कृष्णानें त्याच्या रथाचे घोडे खालीं

दाबले व अशा रीतीनें बाण चुकविला. चक्रव्यसनीं–चक्राच्या संकटांत; पृथ्वीनें त्याच्या रथाचें चाक गिळलें असतां. १७. पट–वस्त्र. १९. जयंताचा बाप–इंद्र. २०. मुरासुर०–देव, दानव, मनुष्य व सर्प या सर्वांस जिंकण्यास कठिण. तवशीलानुवर्तक–तुझ्या शीलाप्रमाणें ( दुष्ट स्वभावाप्रमाणें ) वागणारा. २१. नाग–स्वर्ग. वेन–एक दुष्ट राजा. २२. हितमहित–हितकर्त्यांत पूज्य ( श्रेष्ठ ). याग–यज्ञ. देशिक–गुरु. तो–तो अतिक्रम. २३. गरदा–विष देणाऱ्या तुला. २४. नाकर्षि–देवर्षि. २७. आबाळ–हाल. २८. व्याळ–सर्प. २९. गुरुशुक्रांचे उपदेश–बृहस्पतिनीति व शुक्रनीति यांतील उपदेश. ३०. सांगा–[ सहा ] अंगांसह. ३१. स्वंततर–( सु+अंत+तर ) ज्याचा अंत अधिक चांगला झाला आहे असा. ३२. समरमख–रणयज्ञ. ३४. ससुहृत्सुतसोदरा–मित्र, पुत्र व बंधु यांसहित असणाऱ्या ( मला ). ३५. वीरसू–वीरमाता. ३६. प्रविहतसंकल्प–भग्नमनोरथ; पुत्र व आप्तजन नष्ट झाल्यामुळें ज्यांचे बहुतेक संकल्प ( इच्छा ) फुकट गेले आहेत असे. ३७. अवसानीं–शेवटीं.

**३५ जरासंधवध**—बस्त–बकरा, बोकड. २. जेठिया–मल्ल. आंगठसा–आंगलट, आंगाची ठेवण. ३. जानु–गुडघा. नाहो–नवरा, पति. त्रिपाद–अग्नि. जेणें करूनि खांडवदाहो०–अग्नीला आपलें अजीर्ण घालविण्यासाठीं इंद्रप्रस्थाजवळील खांडववन खावयाचें होतें. पण त्यांत इंद्राचा मित्र तक्षक रहात असल्यामुळें इंद्र अग्नीला तें खाऊं देईना. तेव्हां अग्नीच्या विनंतीवरून कृष्ण व अर्जुन ह्यांनीं त्यास तें खाण्यास साह्य केलें. तेव्हां अग्नीनें संतुष्ट होऊन अर्जुनास गांडीव दिलें. ६. चाडें-लाजेनें. ‘ पाडें ’ असाहि पाठ आहे. भावार्थ–याचकपणाला शोभेल तें मागावें. ७. शौरी–‘ शूर ’ कुलोत्पन्न ( कृष्ण ). ९. व्यजन–पंखा. १०. गात्र–शरीर. ११. आर्ती–तीव्र इच्छा, आतुरता. १४. इडेपाडें–वीरश्रीनें, ईर्ष्येनें. वाचाट–बड-बड्या. १५ भणग–भणंग, भिकारी, दीन. १६. अलुमाळ–कांहींसा. १८. चड-कणा–प्रहार, रपाटा. मंडूक–बेडूक. १९. वाड–थोर, पुष्कळ, गंभीर. सहदेव–जरा-संधाचा पुत्र. २१. निरोपी–सांगे. २२. वीरगुंठी–केशबंध, शेंडी, बुचडा. करटी–हत्ती. २३. अतिउद्भट–अतिशय शूर. तगटे–सरसावे. २४. मौळ–मस्तक, शिखर. २६. सूदला–घातला. २७. करकराटीं–करकरां. २८. भैरव–भयंकर, भयप्रद. वोपिली–अर्पिली, दिली. २९. विकळ–व्याकुळ. ३०. हुमणी–बुक्की, तडाखा. ३१. तवक–ताव, आवेश, क्रोध. ३१. अशुद्ध–रक्त. ३४. मुद्गल–एक आयुध. ३६. उफाळती–उसळती. इसाळें–वीरश्रीनें. ३७. वोथरणें–घाबरणें. ४०. जरेनें सांधिला–मगधदेशच्य

बृहद्रथ राजाला दोन राण्या होत्या. एका ऋषीनें त्याला एक पुत्रदायक फल दिलें. तें दोघी राण्यांनीं अर्धें अर्धें खाल्लें. पुढें त्यांना गर्भ राहून प्रत्येकीस यथाकालीं अर्ध-शरीरात्मक मूल झालें. तीं दोन्ही छकलें दासींनीं चवाठ्यावर टाकून दिलीं. जरा नांवाच्या राक्षसीनें तीं घेतलीं व एकत्र जुळविलीं, तों त्यांचें एक जिवंत मूल झालें! तें तिनें राजवाड्यांत आणून दिलें. जरा राक्षसीनें सांधलें म्हणून त्याचें नांव जरा-संध पडलें. तिचा त्याला असा वर होता कीं, हा सांधा जसा जुळविला तसाच सोडविला तर मात्र जरासंध मरेल. ४२. द्विरद–हत्ती. द्रुम–वृक्ष. ४५. वाम–डावा, सव्य. दक्षिण–उजवा. ४६. उधडिला–उखळला.

३२, ३३ व ३५ या उताऱ्यांतील युद्धवर्णनें ताडून पहावीं.

**३६ सद्गुरुस्तवन**—८–९. परीस हा लोखंडांचा परीस करीत नाहीं; तो त्याचें फक्त सोनें करितो. पण सद्गुरु हा शिष्यास सद्गुरु करतो. १५. फणिवर–सर्पश्रेष्ठ, शेष. भारवाही–ओझें वाहणारा; शेषानें पृथ्वी मस्तकावर धारण केली आहे असा समज आहे. २३. पंचभूतिक उठाठेवी–पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पांच महाभूतांची मात्रा किंवा गडबड. २४. गे–पादपूरणार्थक अव्यय.

**३७ भक्ताचें पारमार्थिक मरण**—१. आथिला–भरलेला. २. महावाक्य–' तत् त्वमसि ' किंवा ' अहं ब्रह्मास्मि. '

**३९ फुलराणी**—सृष्टीशीं पूर्णपणें समरस होऊन 'अरुण' ' शुक्रोदय,' 'संध्या-रजनी' ' निर्झर ' इत्यादि निसर्गदृश्यांचीं हृदयंगम वर्णनें बालकवी किती तद्रूपतेनें करीत असत याचें ' फुलराणी ' हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. रसरमणीयतेंत फुल-राणीच्या तोडीचें कवनकुसुम आधुनिक काव्योद्यानांत क्वचितच आढळेल.

या कवनाचें शेवटचें कडवें पुस्तकांत द्यावयाचें राहून गेलें. तें असें:—

वधूवरांना दिव्य रवांनीं । कुणीं गाइलीं मंगल गाणीं ॥
त्यांत कुणीसें गुंफित होतें । परस्परांचें प्रेम अहा ! तें ॥
आणिक तेथील वनदेवीहि । दिव्य आपुल्या उछ्वासांही ॥
लिहीत होत्या वातावरणीं । फुलराणीची गोड कहाणी ॥
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं । स्फूर्तीसह विहराया जाई ॥
त्यानें तर अभिषेकच केला । नवगीतांनीं फुलराणीला ! ॥

**४० भृंग**—" या फुलावरून त्या फुलावर बागडणाऱ्या भृंगाला पहात असतां, त्या वेळच्या तल्लीनावस्थेंत केशवसुतांस स्फुरलेलें हें गाणें अतीव मधुर आहे.

पहांटेस फांकणारें अरुणाचें सौम्य तेज आणि कमी कमी होत जाणारा अंधार पाहून त्यांना काव्यस्फूर्तीच्या वेळीं कविहृदयांत हळुहळू उदित होणाऱ्या प्रतिभा-तेजाचें व त्या तेजाच्या उदयामुळें उणावत जाणाऱ्या ऐहिक उपाधींच्या अंधाराचें स्मरण झालें आणि सृष्टि कवयित्रीच दिसली !"—आधुनिक कविपंचक पृ. ५९.

**४१ घनागमनोत्कंठा**—१. वल्ली-वेल. २. तुंग-उंच. ४. दर्दुर-बेडूक. ५. कोटर-ढोली. ८. तुंदिल-पुष्ट. वपु-शरीर. वृषभ-बैल. अकिंचन-निर्द्रव्य. १०. कमोद-तांदुळाची एक उत्तम जात. १०. शस्य-धान्य. १३. उदीरित-उच्चारलेला. स्वन-आवाज.

**४२ संशयरत्नमाला**—१. कोणी कामाकरितां बाहेर जात असतां, 'कोठें जातां?' असें कोणी विचारिलें तर तो अपशकून समजून, जाणें तहकूब ठेवण्याची रूढी आहे. २. आलापीत-गात गात. स्वकीय-तुमची स्वतःची. हरि-अहो हरि. ३ शरणागतभयशमना-शरण आलेल्यांचें भय नाहींसें करणाऱ्या. ४. तच्छुभदैवसमीरें-त्याचें शुभकारक दैव हाच समीर म्ह० वारा त्यानें. ५ होय महत्कार्य-मजसारख्या महापातक्यास तारणें हें महत्कृत्य खरेंच. ६. आडवे आले-युद्धाकरतां आडवे आले. सिकतासेतु-वाळूचा बांध. १०. अधिकफलव्रत-( दीनरक्षणापेक्षां ) अधिक आहे फल ज्याचें असें व्रत. ११. रक्षणार्ह-रक्षण करण्यास योग्य. वाटे०-हा मी जो दुष्ट स्वभावाचा मनुष्य हाच ग्रीष्मऋतु ह्यांत तुझी दयारूप नदी आटली असें वाटतें. १२. पुराण-म्हातारा; पक्षीं, अनादि. १३ दुसरी ओळ-कोळशाप्रमाणें मी जसा बाहेर तसाच आंत काळा ( पातकी ) आहें; कोळसा आंत कसा आहे हें पाहण्यासाठीं कोणीं उगाळूं लागल्यास हातास श्रम मात्र होईल. १४. सारस-कमल. सार्धी-ज्यांना डामडौल आवडत नाहीं अशी. १५. नाम हा तुझा प्रतिनिधि ( ह्याचें ) कोणीं आर्जव केलें असतां तो यथेच्छ मोक्ष देतो; व तुम्हांस पुसत नाहीं इत्यादि. दोघांत-तुम्हां दोघांत. १६. आज्य-तूप. १७. नसावेंची-जागा शिल्लक न उरणें हेंच चांगलें. दुसरी ओळ-धनवंत झाला तरी त्यास मिळालेला कण तो वेंचून म्ह० सांठवून ठेवतो, टाकीत नाहीं. तेव्हां मला ठेवायला जागा नाहीं म्हणून टाकून कसें देतां ? आणखी नगरें निर्माण करा. १९. चार मुक्ती-सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता. २०. अश्रद्धेय-अविश्वसनीय. प्रभ्वंतर-( प्रभु+अंतर ) दुसरा ईश्वर. २१. दुसरी ओळ-बारा वर्षांनंतर आप्ताची भेट घेणें झाल्यास, सांबाच्या देवालयांत भेट घ्यावी, असा कांहीं विधि आहे, त्या विधीनें. झट-उपाधि, लचांड. पीतपट-

संग्रहालय

पिंवळें वस्त्र, पीतांबर. २३. क्षुद्विकल–भुकेनें व्याकूळ झालेला. २४. बीज–( पेरण्याकरितां ) बीं. दुसरी ओळ–कल्याणाचें स्थान असें तुझें नांव मज आपलें वतन म्ह० हक्काची जागा कां करितें ? तुझें मंगल ( पापनाशक ) नाम माझ्या तोंडांतून कसें येतें ? कारण तुझें नांव तोंडांतून आलें तर मुक्ति मिळालीच पाहिजे. २६. बाहे–हात.

**४३ राजपुत्रास उपदेश**—१. शठता-लबाडी. असदाग्रह–दुराग्रह. पिशुनता–चहाडखोरी, दुष्टपणा. उद्वेग–विषाद, खेद. दंभ–ढोंगीपणा. २. स्वैर–स्वच्छंद, निरर्गल. ४. विज्ञातेंगित–समजलेलें आहे इंगित म्ह० मनांतील गोष्ट ज्याची. ६. पुरुषार्थांचें–जन्माच्या सार्थकाचें; धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार अत्यंत श्रेष्ठ साध्य वस्तूंचें. १०. प्रभव–उत्पत्तिस्थान. तोक-मूल. ११. सत्त्वरतें–सात्त्विक माणसानें. १२. प्रजोन्नति–प्रजेचा उत्कर्ष. प्राज्य–पुष्कळ. १३. बह्वर्थ–ज्यांत पुष्कळ अर्थ भरला आहे असें. १४. ज्ञाति–जातभाई. १५. भव्यपथ–कल्याणाचा मार्ग.

**४४ संस्कृत आणि मराठी**—२. वोगरिलीं–वाढिलीं. ३. रंभापर्ण–केळीचें पान. भुकाळ–भुकेलेला ( भारतकथाजिज्ञासु ). ४. पशुपति–शंकर. ५. धत्तूर–धोतरा. ६. कडसणी–भेद, फरक. ९. नाबद–साखर. १० वाळणें–टाकणें. ११. खोटी–मूस. लेणें–अलंकार.

**४५ संस्कृत आणि मराठी**—१. मुक्ता–मोतीं. वहिला–सुरेख, सुंदर. कार्पासगुण–कापसाचा दोरा २. विरूप–विद्रूप, ओबडधोबड. तम-अंधार. दीपशिखा–दिव्याची ज्योत. ३. गीर्वाण–संस्कृत भाषा. अचतुर–सारासार विचार नाहीं ज्यास, अरसिक. गोक्षीर–गाईचें दूध. कार्तस्वरमणिचषक–रत्नखचित सोन्याचा पेला. पलाशद्रुमदलपुटकें–पळसाच्या झाडाच्या पानांच्या द्रोणांतून. ते–गोडी.

**४६ हरिनामसुधा**—१. सरोज–कमल. चित्सुधासारपानें–आत्मज्ञानरूप अमृताच्या प्राशनानें. निधान–वसतिस्थान. २. हरिपण–देवपण. साधक–मुमुक्षु. ३. अजित–ईश्वर. ४. शुद्धि–' होते ' ह्या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता. ६. त्या–हरीला. ७. चार मोक्ष–सलोकता, समीपता, व सायुज्यता ह्या चार मुक्ती. ८. शर्व–शिव. देवदैत्य समुद्रमंथन करीत असतां, त्यांतून हालाहल नांवाचें अतिप्रखर विष उत्पन्न होऊन साऱ्या जगतास जाळूं लागलें, तेव्हां देवादिकांच्या प्रार्थनेवरून शंकरानें तें प्राशन केलें. तें त्याच्या कंठास फार जाळूं लागलें. तो दाह शांत व्हावा म्हणून त्यानें मस्तकीं गंगा, चंद्र धारण करणें इत्यादि अनेक उपाय केले; परंतु व्यर्थ.

शेवटीं ' राम ' या नामानें तो विषदाह शांत झाला. सेतु सागर०-सागर उतराया कपींना जसा सेतु तसा इ० ९. प्राणप्रयाण-मृत्यु. आजन्मपातक-उपजल्यापासून मरेपर्यंत केलेलें पाप. दुर्गति-नरकयातना.

**४७ नाममाहात्म्य**—१. स्वपदांतरासि-लोकांतरास, निजधामास. २. प्राज्य-पुष्कळ. ४. नयच्युत-नीतिभ्रष्ट. ७. माहेरा-जगन्मातेच्या घरास, ब्रह्मपदास. मूळ-( माहेरचें ) बोलावणें. स्वांत-चित्त, मन. ८. भवसिंधूद्धृत मुक्तांची-संसाररूपी सागरांतून काढलेल्या मोत्यांची; पक्षीं, मोक्ष पावलेल्या लोकांची. भवाब्धि-संसार-सागर. १०. भवपाशविमुक्त-संसारबंधनांपासून मुक्त झालेले.

**४८ रामकृष्णांचें हस्तिनापुरा आगमन**—१. वार्तिक-बातमी पोंचविणारा, बातमीदार, जासूद २. कुंजरभेटी-हत्तींचे समुदाय. ५ कृष्णागार-कृष्णागरु, एका जातीचें चंदन. ९. उपायन-वाण, भेट, देणगी. पौर-पुरवासी जन.

**४९ महाराष्ट्रकविस्तवन** २. भगवज्जनवल्लभ-भगवद्भक्तप्रिय. ३. सारा-सारभूत ( उत्कृष्ट ) अशा. ८. तुक-तुलना, बरोबरी. ११. नासत्य-अश्विनीकुमार. १३. रसभवन-रसस्थान, रसपूर्ण. वाम-सुंदर. १४. भाषाकवि-मराठी कवि. १५. बंदी-स्तुतिस्तोत्रें गाणारे. मंदील-जरीचें पागोटें, मुकुट. १. हय्यंगवीन-ताजें तूप.

**५० नैऋत्येकडला वारा**—१. अर्धोन्मीलित-अर्धवट उघडलेले. २. जव-वेग. ७. निबिड-दाट. १६. तरंगतांडव-लहरींचें नृत्य. १८. शूलारोपण-वधस्तंभ.

**५१ श्रीकृष्णाची मिथिलापुरीस भेट**—२. पहिल्या ओळीचा मूळ पाठः-' श्वश्रूवशसीच नियति, साहित्य करी, न संग्रहीं कवडी. ' नग-पर्वत. ४. भूतिपति-कृष्ण. ५. सरिदोघ-( सरित्+ओघ ) नदीप्रवाह. ६. सुरद्रु-सुरद्रुम, कल्पवृक्ष. शुक-पोपट. ७. किंशुक-पळस. ८ वाटे-वाटतें. वाटे-मार्गांत. ९ जनपद-देश. उद्गार-ढेंकर १०. चतुर्विध जन-बद्ध, साधक, मुमुक्षु व मुक्त. ह्रद-डोह. ११. सीतोपयमावरि-सीताविवाहानंतर. १३. धणी-तृप्ति. लीलानरकाय-लीलेनें धारण केलें आहे मनुष्यरूप ज्यानें असा. १४. सलें-वाढ खुंटलेले गर्भ. १५. साज-थाटमाट. १६. लज्जभूषा०-लज्जा, पुष्कळ अलंकार व आनंदातिशय यांमुळें. ' मिथिलेच्या गतीला शिथिलत्व कां आलें याचीं तीन कारणें प्रतिव्रतेला अत्यंत साजतील अशीं मोठ्या मार्मिकतेनें पंतांनीं दिलीं आहेत. ' १७. उदश्रुजळें-प्रेमाश्रु-जळानें. १८. उपायन-भेट, देणगी. आर्या १८-२२ यांविषयीं रा. रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी म्हणतात-" सद्भावपूर्णतेनें, रचनामाधुर्यानें, कल्पनासौष्ठवामुळें

व अलंकारसौंदर्याच्या योगानें या आर्या नितांत मनोहर अशा वठल्या आहेत. मिथिला नगरीवर पतिव्रता स्त्रीचें व श्रीकृष्णावर प्रिय पतीचें रूपक केलें आहे; त्यामुळें द्वारकेवर ज्येष्ठ सपत्नीचें व मिथिलेच्या नागरिकांच्या नेत्रांवर पूजाकमलांचें रूपक केलें आहे. अशा रीतीनें येथें समस्तवस्तुविषयक सांग रूपक झालें असून परंपरित रूपकाची सुंदर छायाहि त्यांत दृग्गोचर होते."—केसरी, ता० ६।१।१९२५.

**५२ अन्योक्तिकलाप**—१. शिखी—मोर. २. पिक—कोकिल. ३. रज—पराग. ५. सुरतरु—कल्पवृक्ष. थिजो—गारठो; लाजो. ८. पद्मखंडें—कमलसमुदाय. विखरती—पसरिती. चित्तापहारी—मनोहर. १२. खरतर—फार प्रखर किंवा तीक्ष्ण. नखर—नख. धाला—संतुष्ट झाला. १४. चंडांशु—चंडकिरण. तारकाधिपति—चंद्र. १५. नाविक-खलाशी.

**५३ सैनिकाचें स्वप्न**—२. अग्नि—शत्रूची हालचाल समजण्यासाठीं पेटत ठेवलेला अग्नि. ४. कर्षक—शेतकरी.

**५४ दमयंतीनें केलेलें नळाचें स्वागत**—१. रामा—बलरामास. कामारि—मदनशत्रु, शिव. नगाधिराज—हिमालय. ४. नाक—स्वर्ग. भोगी—सर्प, नाग. खालीं असोनि०—नाग जरी पाताळांत असतो तरी तो जगत्कर्ता जो विष्णु त्याच्यावर आपलें फणाछत्र धरितो म्हणून अर्थात् तो सकळांवर ( सकलश्रेष्ठ ) आहे. ६. अमृतकर—चंद्र ७ मनोमुकुरीं—मनोरूप आरशांत. ९ युगल—जोडी.

**५५ प्रेम**—चौथी ओळ—प्रेम संसृति ( संसार ) सुखाची करी. तडाग—सरोवर, तळें. सारस—कमल. विषम—कठिण, तीव्र. भव—संसार.

**५६ स्त्री आणि पुरुष**—१. साम्यार्ती—समतेची इच्छा.

**५७ पतंगाचे बोल**—४ निरय—नरक. ओखटा—वाईट ८ रज्जु—राजु, दोरी. ९. अनुग्रह—कृपा.

**५८ वैराग्यमणिमाला**—१. अभिज्ञ—ज्ञाता, जाणता. २. जेथें एक०—ज्या घरांत एक मनुष्य होता, तेथें अनेक मनुष्यें झालीं. फांसे रात्रि०—रात्र व दिवस या नांवाचे दोन फांसे घेऊन व प्राणी ह्याच सोंगट्या संसाराच्या पटांतील घरांत लावून काळ खेळत असतो. ३. भिन्नघटनीर—फुटलेल्या मडक्यांतील पाणी. ५. स्मरणास योग्य—स्मृतिशेष, नामशेष. ७. हुताश—अग्नि. ९ शर्व—शिव भूधर—पर्वत. ग्रावाग्र—पर्वतशिखर. स्वर्णदी—गंगा. अर्णव—सागर. १०. महेश—शंकर. ११. शक्त—समर्थ. आयु—आयुष्य. दीप्त—पेटलेलें. कूपखनन—विहीर खणणें. १२. मेदिनी—पृथ्वी. मारुत—वारा. वर्षोपल—गारा.

**५९ मृत्यु**—१. शशांक–चंद्र. चांदवा–छत. ३ बंदी–कदी. कारागृह-तुरुंग. ४. लेह–चाटण. ६. विडंबना–विटंबना; अपमान. १४ चौथ्या ओळीचा अन्वय–तव इच्छा सर्व काळ शांतिनें शिरीं धरीन.

**६० दांभिकानिंदा**—२. जंबू–अस्वल. ३. महंती–महंतपणा, साधुत्व. ४. साचार–खरा. चार–चेष्टा. ७. वृंदावन–कंवडल.

**६१ संतस्तवन**—१. अधिष्ठान–स्थान, आश्रय. २. जे वस्तु–ब्रह्म. दुल्लभ–दुर्लभ ५. वेगडी–वेंगडी, आंग आंवळलें जाणें १०. वोळे–प्रकटे.

**६२ ईशप्रार्थना**—१. कृतांत०-यमाच्या सैन्याचा शुभ्र ध्वजच अशी जरा म्ह० म्हातारपण. पुरःसर०–सैन्याच्या पुढें येणारे बिनीचे लोकच असे गद म्ह० रोग. ३. तोक–अपत्य, मूल. कर्दम–चिखल. रजोमलिनकाय–धूळीनें मळलें आहे शरीर ज्याचें. अंबर–वस्त्र. ४. टोणपी–मूर्ख. अपथ्यरुचि–प्रकृतीस न मानवणाऱ्या पदार्थांविषयीं ज्याला आवड आहे असा. आम्हांस विषयाची गोडी असल्यामुळें पहिल्यानें कठिण वाटणारा असा जो सन्मार्ग तो कसा गोड लागेल ? हा अर्थ एथें विवक्षित आहे. रुग्ण–रोगी. ५. भजकबाळकोपेक्षण–भक्तरूप बालकाची उपेक्षा. पशुपपाळ–गवळ्यांचा नायक; नंद. ७. दयामृत०–दयारूप अमृतरसानें स्निग्ध आहे अंतःकरण जिचें अशी. कुलकज्जल–कुलकलंक. न किटे–मळत नाहीं म्ह० तिची, त्याच्यावरची ममता कमी होत नाहीं. प्रसादपट–दयेचें पांघरूण. पर गुरु–गुरु म्ह० वडील माणसें आई व बाप अशीं दोन; पैकीं आईबद्दल अगोदर सांगितलें, तेव्हां पर ( दुसरा ) गुरु म्ह० बाप. थिटे–आंखूड, शेवटपर्यंत न पुरणारे ( असे पट ). ८. विधि–दैव. कलियुगीं श्रुति०–दुसऱ्यास पवित्र करणारे असे जे वेद ते सुद्धां कलियुगांत अपवित्र झाले; कारण यवनादिकांच्या मुखीं गेले. जगदघक्षयीं–जगाच्या पातकाचा क्षय करण्यांत. भवन्नदी–भागीरथी. सदंघ्रिकमळीं दडो–साधूंच्या चरणकमलीं सक्त होवो. मुरडितां–एकीकडे काढिलें असतां.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ द नारायण
दा. नों. १०९

समाप्त.

## दि. सी. सांखळकर यांचीं इतर पुस्तकें.

**१ धर्म अथवा संतवचनामृतः**—धर्मतत्त्वांच्या विविध अंगांची महाराष्ट्रीय संतवचनांच्या द्वारें माहिती करून देणाऱ्या या सर्वांगसुंदर पुस्तकाची मांडणी विशेष सुसंगत असून पद्यांची निवड मार्मिकपणें केलेली आहे. पारिभाषिक शब्दांवर अर्थबोधक टीपा दिल्या असून विषयसुगमतेसाठीं क्वचित्प्रसंगीं विवरणहि दिलें आहे. तसेंच सामान्य वाचकाच्या कक्षेंत न येणाऱ्या संस्कृत, मराठी, इंग्रजी, अशा अनेक ग्रंथांतून त्या त्या विषयासंबंधीं वचनें मार्मिकपणें टीपांत उद्धृत केलीं आहेत; तीं तो तो विषय समजण्यास उपयुक्त असून, वाचकाच्या धर्मज्ञानांत चांगली भर घालणारीं आहेत. पुस्तकाच्या शेवटीं पद्यांची वर्णानुक्रमणिका व शब्दकोष दिला आहे.

**ब्राह्मण**, इस्लामपूर, ( भाद्रपद शके १८४५ ) म्हणतोः—" ...... एकाद्या तत्त्वज्ञानात्मक स्वतंत्र ग्रंथाचेंच स्वरूप 'धर्म' या पुस्तकास प्राप्त झालेलें आहे. ज्ञान, भक्ति आणि कर्म यांचा लो० टिळकप्रभृति विद्वानांनीं जो मेळ घातलेला आहे त्याला अनुकूल अशीच एकंदर पुस्तकाची रचना आहे......परमेश्वराच्या सर्वव्यापी स्वरूपाचें ज्ञान होऊन लोकांनीं निष्कामबुद्धीनें कर्में करावीं हा उपदेश संतवचनांच्या द्वारें वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा ग्रंथकर्त्याचा प्रयत्न चांगला साधला आहे. "

या पुस्तकाचा धर्मशिक्षण देणाऱ्या शाळांस व संस्थांस, तसेंच कीर्तनकारांस व सामान्य मुमुक्षुजनांसहि चांगला उपयोग होईल असा अनेक विद्वानांचा अभिप्राय आहे. पृष्ठसंख्या ४०० वर; किंमत १॥ रुपया.

**२ काव्यमंजरी**, भा. १ लाः—ईशभक्ति व देशभक्ति यांचें बीज मुलांच्या मनोभूमींत योग्य रीतीनें पेरलें जाऊन, त्यांस वीर्यशाली सदाचाराचें वळण लागावें या दृष्टीनें नव्या जुन्या कवींच्या निवडक कवितांचा यांत संग्रह केला आहे. किंमत १२ आणे.

शिवाय मेडिकल् व स्कूलबुक्स्, नाटकें, कादंबऱ्या वगैरे सर्व प्रकारचीं पुस्तकें मिळतात. व्यापाऱ्यांस व शिक्षकांस भरपूर कमिशन मिळतें.

**एस. गोविंद आणि कंपनी**, बुकसेलर्स,
सॅन्डर्स्ट् रोड, गिरगांव, मुंबई.